# नीतिबोधमाला

## सुमन दुसरे

## कृष्णराव अर्जुन केळूसकर

संपादक - राजन गवस

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

वाय ६४७-१

⏩ **पुस्तकाचे नाव :** गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर यांचे समग्र वाङ्मय
नीतिबोधमाला सुमन दुसरे

⏩ **लेखक :** कृष्णराव अर्जुन केळूसकर

⏩ **संपादक :** डॉ. राजन गवस

⏩ **पुनर्मुद्रण :** २०१९

⏩ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

⏩ © **प्रकाशकाधीन :**

⏩ **मुखपृष्ठ :** सरदार जाधव

⏩ **मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६ ००३.

⏩ **किंमत : १४७/-**

---

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

महाराष्ट्राचे वाङ्मयमहर्षी




**गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर**

# अध्यक्षांचे मनोगत

## नीतिबोध कथामाला

गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर हे गेल्या शतकातील एक महत्त्वाचे चरित्रकार आहेत. संत तुकाराम महाराज, गौतम बुद्ध आणि छत्रपती शिवाजी महाराज या युगपुरुषांचे ते मराठी भाषेतील पहिले चरित्रकार आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात २० ऑगस्ट १८६० रोजी जन्मलेल्या केळूसकरांचे शिक्षण सावंतवाडी व नंतर मुंबईत झाले. विल्सन हायस्कूलमधून मॅट्रिक झालेल्या कृष्णरावांनी पुढे या शाळेत अध्यापन करत असताना लेखन, वाचनाच्या गोडीतून मराठी-इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवून वेगवेगळ्या विषयात अभ्यास करून प्रगती केली.

सत्यशोधक समाज, कामगार, शेतकरी, मागासवर्ग आणि दलित यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करणाऱ्यांसोबत ते काम करू लागले. सामाजिक सुधारणाबद्दल निर्भीडपणे लिहू लागले, विचार मांडू लागले. त्यामुळे गेल्या शतकातील राजकीय ऋषी मामा परमानंद, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे या विचारवंतांनी त्यांच्या लेखणी व विचारांची प्रशंसा केली. मुंबईच्या विल्सन हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून काम करताना त्यांनी लेखन, सामाजिक कार्य आणि प्रबोधनाचे काम सुरू ठेवले. यातून शिक्षणशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, बालवाङ्मय - या चौफेर क्षेत्रांत लेखन-वाचन अभ्यास सुरू ठेवला. या साधनेतून गीता आणि बौद्ध धर्माचे भाष्यकार होत धर्मशास्त्रातही त्यांनी आपले वेगळेपण दाखवून दिले.

गुरुवर्य केळूसकर हे गहन विषयांवर लिहिणारे प्रकांड पंडित बनले; परंतु त्याकाळात सर्वच बहुजन समाजाच्या लेखकाच्या वाट्याला येणारी उपेक्षा आणि फरफट त्यांच्याही वाट्याला आली. महाराष्ट्राने या वाङ्मयमहर्षीकडे दुर्लक्षच केले. जनात जनार्दन पाहणारे ते ऋषितुल्य पज्ञावंत होते. महात्मा जोतीराव फुले यांची

सत्यशोधक समाज चळवळ आणि मराठा ऐक्येच्छू सभेसाठी त्यांनी आयुष्यभर कार्यकर्ता म्हणून काम केले. त्यांच्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे नेते समाजास मिळाले.

संत चरित्रे कशी लिहावीत, हे केळूसकरांनी तुकाराम बावांचे चरित्र आणि गौतम बुद्धाचे चरित्र लिहून महाराष्ट्रास दाखविले. सत्यनिष्ठा, चिकित्सा व माहिती पडताळून पाहणे हे त्यांच्या चरित्रलेखन आणि एकूणच लेखनाचे गुणवैशिष्ट्ये आहेत. ते लिहिताना जितका भाग ऐतिहासिक व खरा भासायचा, तेवढाच ते घेत असत.

महाराजा सयाजीराव गायकवाड या दूरद्रष्टी राजाने देशभरातील नव्हेतर जगभरातील वेगवेगळ्या विषयांतील तज्ज्ञ अभ्यासकांना ओळखून त्यांना बडोद्यात बोलावून त्यांच्या ज्ञानाचा उपयोग रयतेसाठी करून घेतला. गुणवंताचे पारखी असलेल्या मामा परमानंदांनी गुरुवर्य केळूसकरांचे लेखन गुण लक्षात येताच त्यांची शिफारस महाराज सयाजीरावांकडे केली. महाराजांनी केळूसकरांना मुंबईत भेटीस बोलावले. त्यांना प्रश्न विचारून त्यांची चाचपणी केली. केळूसकरांची वाचन-विचारातील प्रगल्भता बघून त्यांना समाधान वाटले आणि त्यांनी केळूसकरांना फ्रान्सचा जुना इतिहास या ग्रंथाच्या भाषांतराचे काम सोपविले. बहुजनाच्या एका शूद्र माणसाला महाराजांनी लेखन काम सोपविले, ही गोष्ट बडोद्यातील विद्वानांना आवडली नाही; पण महाराज आपल्या निर्णयावर खंबीर राहत त्यांनी केळूसकरांना आणखी प्रोत्साहन दिले. महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरातील हुशारी ओळखून जशी चार वेळेस त्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देऊन मदत केली, तशीच मदत केळूसकरांनाही करीत राहिले.

फ्रान्सचा जुना इतिहास (१८८३), तुकाराम बावांचे चरित्र (१८९६), सेनेका व एपिक्टेट्सची बोधवचने (१८९७), गौतम बुद्धाचे चरित्र (१८९८), सात उपनिषदांचे भाषांतर (१८९८) आणि श्रीमद्‌भगवतगीता हा ११०० पृष्ठांचा ग्रंथ (१९०२) यासारखे चौफेर लेखन गुरुवर्य केळूसकरांनी केले. या काळात त्यांचे बडोद्यात येणे-जाणे वाढले. बडोद्याचे दिवाण-महात्मा जोतीरावांचे स्नेही रामचंद्र विठोबा धामणसकर केळूसकरांचे चाहते मित्र होते. केळूसकर शिक्षकाची नोकरी, वेगवेगळ्या मासिकांचे संपादन, कौटुंबिक आर्थिक ओढाताण-त्यासाठी शिकवण्या घेणे आणि राहिलेल्या वेळात झंझावातासारखे लेखन करीत होते. लोकमान्य टिळकांनी गीतारहस्य लिहिण्याअगोदर गुरुवर्य केळूसकरांनी गीतेवर भाष्य करणारा ग्रंथ लिहिला. बावीस वर्षे

तो प्रकाशकाविना पडून राहिला. गुरुवर्य केळूसकरांनी लहान मोठी एकोणचाळीस पुस्तके लिहिली, असा उल्लेख आहे; परंतु ते सर्व ग्रंथ उपलब्ध होऊ शकले नाहीत. संस्कृत धातुरूप कोश, इंग्रजी मराठी कोशाची नोंद आहे; पण तेही मिळू शकले नाहीत. केळूसकर गुरुजींच्या नातवांकडे-स्नेह्यांकडे या आणि अप्रकाशित लेखन शोधण्याचा मी प्रयत्न केला. ग्रंथालयात जे ग्रंथ उपलब्ध होऊ शकले त्यावरच समाधान मानावे लागत आहे.

बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड हे चिकित्सक वाचक होते. समाज शिक्षण देवून त्यांच्या परिवर्तन करण्याच्या अनेक गोष्टींची मूळापासून सुरुवात ते बडोद्यात करीत होते. परिवर्तनशील जगात धर्मही महत्त्वाची संस्था आहे, हे ओळखलेल्या तरुण राजाने धर्मशिक्षण तळागाळातल्या प्रजेला देता यावे या करिता इ.स. १८-- साली वेदोक्त पाठशाळेची सुरुवात करून समाज सुधारणेच्या कार्याची सुरुवात केली. ही प्रबोधनात्मक चळवळ तत्कालिन वरिष्ठ वर्गातील मंडळींना आवडणे शक्य नसल्याने त्याची सूक्ष्म खळखळ उमटू लागली; पण समाजाच्या प्रबोधनाच्या माध्यमातून धर्मसंस्थेने काम केल्यास धर्मच गरीबांचा कैवारी बनू शकतो, या करिता धर्मखात्याची सुरुवात केली. धर्म हा मानवी जीवनाचं अंग आहे. ते निर्दोष व सत्यमय असावे म्हणून सयाजीराव यांनी पुरोहितांचा कायदा करून सुप्रशासनाची त्याला जोड दिली. याच काळात कृष्णराव अर्जूनराव केळूसकर हा बहुजनाचा वाङ्मयमहर्षी 'जगत्वृत' नावाच्या साप्ताहिकाचे इ.स. १९०८ साली संपादक बनून समाज प्रबोधनाचे काम करू लागला. गॉर्डन हे गृहस्थ 'ॲडव्होकेट ऑफ इंडिया' नावाचे इंग्रजी पत्राचे मालक होते. ते 'जगत्वृत' नावाचे मराठी वर्तमानपत्र चालवत होते. त्याच्या संपादकाची जबाबदारी कृ. अ. केळूसकरांकडे सोपविली.

सामाजिक सुधारणाशी जवळीक असणाऱ्या केळूसकरांनी प्रबोधनात्मक आणि तात्त्विक लेखनातून तत्कालिन रूढी परंपराविरुद्ध विवेकशाली लेखन करू लागले. टोपन नावाने असणारे हे वेगळे लेखन महाराजा सयाजीरावांच्या वाचण्यात आले. त्यांनी वृत्तपत्राचे मालक मि. गॉर्डन यांनी लेखमालेची प्रशंसा केली. याचे लेखक कोण आहेत हे विचारले. ते आपले लेखक केळूसकर आहेत, हे ऐकूण सयाजीरावांना आनंद झाला. अशीच विचारणा आणि लेखकाचे अभिनंदन न्यायमूर्ती चंदावरकर यांनीही केली होती. ते लेखन म्हणजे केळूसकरांची 'नीतिबोधमाला'. सात वर्षे या

साप्तहिकाचे संपादक म्हणून केळूसकरांनी काम केले. कर्तृत्त्ववान पुरुषांची स्फूर्तिदायक काही चरित्रे आणि नीतिबोधमाला तत्कालिन सुशिक्षित विशिष्ट वर्गातील प्रतिष्ठांना आवडली नाही. याच काळात नाशिकचे कलेक्टर जॅक्सन यांचा वध झाला. या मारेकऱ्यासंबंधी आपले स्पष्ट मत केळूसकरांनी साप्ताहिकात मांडल्याने त्यांच्याविरुद्ध लोकमत कलुषित होवून वातावरण तापले आणि केळूसकरांनी संपादक पदाची जबाबदारी सोडली.

नीतिबोधकथांचे चार खंड प्रकाशित झाले आहेत. या कथा बालकथांपासून मोठ्यांपर्यंत संस्कार करू शकतील असा लेखकाचा उद्देश होता. वाचकांच्या मानसशास्त्राचा सूक्ष्मपणे विचार करून केळूसकरांनी हे कथा लेखन केले आहे. या बहुरुपी बोधकथांच्या माध्यमातून असा संस्कार करणारे ते मराठीत पहिले ठरले. समाज बांधणीसाठी, सुधारणेसाठी हे वाचनसाहित्य मदत करील, असा त्यांचा ठाम विश्वास होता. यातील प्रत्येक कथेचे स्वतंत्र वेगळेपण आहे. कर्तव्यपरता, उद्योगशीलता, दीर्घप्रयत्न, आज्ञांकितपणा, आज्ञाभंगाचे परिणाम, हेकटपणा, मनोनिग्रह वेळेची किंमत, प्रसंगावधान, ज्ञानाची महती, अज्ञानाचे दुष्परिणाम, अशा मानवी संस्काराच्या विविधांगणी गुण-अवगुणांची सांधणी या नीतिबोधकथांच्या माध्यमातून गुरुजींनी केली आहे. सर्व थरातील आणि वयोगटातील व्यक्तिंना सर्वकाळात आवडण्यात असे हे अक्षरधन गुरुवर्य केळूसकरांनी आपल्यासाठी निर्माण केले आहे.

अशा वाङ्मयमहर्षी कृ. अ. केळूसकरांच्या नीतिबोधमालाच्या चार भागांची ओळख मराठी वाचकांसाठी करून देण्याची संधी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास लाभली, याचा आम्हाला खूप आनंद आहे. या संपादनाची वाङ्मयीन जबाबदारी आमचे मित्र डॉ. राजन गवस आणि मित्रांनी पार पाडली त्याबद्दल आभार. महाराष्ट्रातील दुर्लक्षित प्रकांड पंडितांची ही नवी ओळख सर्वांना आनंद देणारी आहे.

**बाबा भांड**

दि. १५-११-२०१८

अध्यक्ष

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,

मुंबई.

# संपादकीय...

गुरुवर्य केळूसकर यांनी शालेय व माध्यमिक स्तरावर शिक्षक म्हणून व्रतस्थपणे सेवा केली. आपल्या सेवा कालखंडात ते उत्तम प्रयोगशील शिक्षक म्हणून ख्यातकीर्त होते. सामान्य परिस्थितीतील मुलांबद्दल त्यांना विशेष कळवळा होता. बहुजन समाजातील मुलांना कोणतीच शैक्षणिक पार्श्वभूमी नसल्यामुळे त्यांचा शिक्षण प्रवास अनेक अडथळ्यांच्या शर्यती पार करत चाललेला असतो. हे त्यांनी स्वानुभवातून अनुभवलेले होते. त्यामुळे अशा मुलांचा शिक्षणप्रवास सुसह्य व्हावा म्हणून त्यांनी आपल्या सेवा कालखंडात विशेष प्रयोग केलेले दिसतात. मॅट्रिक पास झाल्यानंतर त्यांनी मे. हाईम साहेबांनी चालवलेल्या शाळेत शिक्षकाची नोकरी पत्करली. मुलाखतीतच त्यांना विचारण्यात आले की, तुम्ही देशस्थ की कोकणस्थ? या प्रश्नाचे उत्तर देताना त्यांनी मी मराठा असे सांगितले. महिना पंधरा रुपये पगारावर त्यांनी नोकरी स्वीकारली. त्यावेळी हाईम साहेबांनी एका ग्रंथातला मजकूर मराठीत भाषांतरित करावयास सांगितले. हा मजकूर तपासण्याची जबाबदारी त्या शाळेतील हेडमास्तरांवर सोपवली. त्यांनी भाषांतर उत्तम असल्याचे सांगितल्यावर शिक्षकाच्या जागी रुजू करून घेणेत आले. पण त्यांना मराठी चांगली करण्याची ताकीद देण्यात आली. ही ताकीद त्यांना फारच लागली. आणि त्यांनी परिश्रमपूर्वक आपले मराठी चांगले करून घेतले. उत्तम शिक्षक म्हणून त्यांच्यावर इस्त्राईल मासिकाचे संपादन कार्य सोपवण्यात आले. याबरोबरच सामान्य मुलांची अभ्यासाची तयारी उत्तम करून घेण्यासाठी त्यांनी विशेष धडपड केली. पुढे या शाळेत एक उत्तम शिक्षक म्हणून त्यांनी नावलौकिक प्राप्त केला. विल्सन हायस्कूलमध्ये पुढे नोकरी स्वीकारल्यानंतर त्यांनी व्याकरण शिकवण्यात विविध प्रयोग केले. आपली मुले चौकस व उत्तम ज्ञानी झाली पाहिजेत यासाठी गुरुवर्य केळूसकरांनी विविध प्रयोग केले. मुलांना शारीरिक शिक्षा करावी की करू नये याबाबत स्वत:चे असे विचार विकसित करून शिक्षकांना शिक्षा करण्यास मनाई मुळीच करू नये, असे आपले परखड मतही व्यक्त केले. याच काळात त्यांनी

विद्यार्थी बहुश्रुत व्हावेत म्हणून वेगवेगळे प्रयोग केले. त्या काळात गुरुवर्य केळूसकर ख्रिस्ती मिशनऱ्यांना मराठी व संस्कृत शिकवित होते. त्याबरोबरच ख्रिस्ताचा उपदेश भाषांतरित करण्यास मदतही करत होते. संपूर्ण सेवा काळात त्यांनी स्वत:ची अशी अध्यापनपद्धती विकसित केली. यामुळे ते सर्वत्र प्रयोगशील शिक्षक म्हणून नावाजले गेले. विद्यार्थ्यांना द्यावयाच्या स्वाध्यायात त्यांनी विकसित केलेली स्वाध्यायपद्धती विशेष चर्चिली गेली. यातूनच त्यांना नीतिबोधकथा लेखनाची प्रेरणा मिळाली. केळूसकरांना 'जगद्‌वृत्त' नावाचे पत्र चालवावयास मिळाल्यानंतर काही थोर माणसांची चरित्रे या पत्रात त्यांनी प्रसिद्ध केली. याबरोबरच अर्थशास्त्रावर आणि आरोग्यशास्त्रावर लेखमाला लिहिल्या. याच पत्रात नीतिबोधमालेचे लेखन केले.

२.

गुरुवर्य केळूसकरांनी लिहिलेल्या नीतिबोधकथांचे आजवर चार खंड प्रकाशित झाले आहेत. या नीतिबोधकथा लिहित असताना गुरुवर्य केळूसकरांनी भारतीय समाजमानस आणि भारतीयांचे वर्तन याबरोबरच भारतीय मूल्यव्यवस्था याचा सूक्ष्मविचार करून या नीतिबोधकथांचे लेखन केले आहे. मुळातच ते लोकशिक्षक असल्यामुळे व्यक्तीच्या वर्तन परिवर्तनावर त्यांचा विश्वास होता. व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व प्रयत्नपूर्वक सुसंस्कारित करता येते, यावर त्यांचा विश्वास होता. व्यक्तींवर करावयाच्या संस्कारासाठी कथा या रचनाबंधाचा वापर अधिक परिणामकारकपणे करता येईल, असे त्यांनी आपल्या शिक्षकी पेशातील अनुभवावरून अनुमान काढले होते. ते स्वत: चरित्रलेखक व उत्तम भाषांतरकार असल्यामुळे जगभरातील साहित्याचा त्यांचा व्यासंग उल्लेखनीय होता. प्रत्येक माणसाला अगदी लहानपणापासून गोष्ट ऐकणे आवडत असते. बालपण हे तर गोष्टीच्या भुकेने व्याकूळ झालेले असते. याच काळात व्यक्तीच्या मनावर चांगले-वाईट, योग्य-अयोग्य ठसत असते. यासाठी वेगवेगळ्या गोष्टींचा वापर केला तर व्यक्तिमानस घडवणे शक्य आहे. याचे पुरावे आपल्याला रामायण-महाभारतापासून मिळतात. माणसात असणारे उपजत कुतूहल गोष्टीच्या माध्यमातूनच अधिक संवेदनशील बनवता येते. मानवी जीवनातील विविध शोध या कुतूहलातून व जिज्ञासेतून लागलेले आहेत. बोधकथेत या कुतूहलाचा वापर अत्यंत सुबुद्धपणे केलेला असतो. त्यामुळे बोधकथेची रचनाही कुतूहलवर्धकच असते. बोधकथेच्या संरचनेत कुतूहलाबरोबरच रंजकतेला स्थान दिलेले असते. रंजकतेच्या यथायोग्य वापरामुळे बोधकथेची परिणामक्षमता आपोआपच वाढत असते. हे कुतूहल आणि रंजकता नीतिबोधकथेत निर्माण करण्यासाठी यथायोग्य संघर्षाचा वापर रचनाकार करत असतो. यातून शेवटी निघणारा निष्कर्ष अथवा संदेश मानवी जीवनास हितकारक ठरणारा असतो.

नीतिबोधकथेत कधी चांदोबाची गोष्ट, परीची गोष्ट, राजा-राणीची गोष्ट, देवदूत, चेटकीण, भूतराक्षस, पशूपक्षी, प्राणी यांचा वापर केला जातो. या मिथकांना प्रवाही करून जगण्यास विविध मूल्यांबाबतचा विश्वास निर्माण करण्याचे कार्य या नीतिबोधकथा करत असतात. नीतिबोधकथांच्या संरचनेत ऐकणाऱ्याच्या अथवा वाचणाऱ्याच्या मानसशास्त्राचा विचार अधिक सूक्ष्मपणे केलेला असतो. व्यक्तीला स्वत:चे, कुटुंबांचे मानसिक आरोग्य सदृढ राखणे, जीवनाकडे पहाण्याचा उदात्त व वास्तव दृष्टिकोन विकसीत करणे, जीवनातील चढउतार पचवण्याची ताकद निर्माण करणे, माणसातील वृत्तीप्रवृत्ती ओळखणे, जीवनाचा अर्थ शोधून जागरूक जीवन जगण्यासाठी आवश्यक क्षमता निर्माण करणे या हेतूने या नीतिकथा निर्माण होत असतात, पसरत असतात. या कथा नित्यनूतन असतात. प्रत्येक पिढी, प्रत्येक समाज या नितिकथांमध्ये आवश्यक भर घालत असतात. व अनावश्यक तपशील कालबाह्य झाल्यास वगळलाही जात असतो. याअर्थी नीतिकथा सतत बदलत असते. वर नीतिबोधकथा सतत प्रवास करत असतात. त्यांना आपोआपच पाय फुटतात. त्यामुळे एका समाजातून दुसऱ्या समाजात, एका भाषेतून दुसऱ्या भाषेत अशा जगभर फिरत असतात. प्रदेशानुसार, भाषेनुसार, राजवटीनुसार वेष परिधान करीत असतात. याअर्थी नीतीबोधकथा या बहुरूपी असतात. प्रत्येक प्रदेशातील त्यांचा कर्ता त्यांना हवा तो नवा जन्म देत असतो. असे असले तरी या नीतिबोधकथांच्या आत्म्याला धक्का लावून चालत नसते. तपशीलाचा फेरफार, रचनेचा सैलपणा, बंदिस्तपणा यांना मुभा असते. पण मूळ वृत्तीला हात न लावण्याची अध्याहृत सक्ती असते. त्यामुळे या नीतिबोधकथा बाह्यरूप पालटत जगभर मूल्यांची संस्कारपेरणी करत प्रवास करत असतात. मुख्यत: मौखिक असणाऱ्या या नीतिबोधकथा कधीकधी ग्रांथिकरूपही धारण करतात. त्यासाठी त्यांना योग्य शब्दांकनकर्ता भेटावा लागतो. जगभरात या मौखिक कथांना शब्दबद्ध करणारे अनेक अभ्यासक वेगवेगळ्या कालखंडात भेटत गेल्याचेही आपणासमोर येते. मराठीत या नीतिबोधकथांना ग्रंथबद्ध करणारे गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर हे पहिले ग्रंथकर्ते आहेत, असे म्हणावयास प्रत्यवाय नसावा.

३.

गुरुवर्य केळूसकरांनी या नीतिबोधकथा चांगल्या समाजाच्या बंदोबस्तासाठी 'जगद्वृत्ता'मध्ये क्रमश: प्रकाशित केल्या. काही पुराणप्रिय लोकांना केळूसकरांचे काही लेखन न आवडल्यामुळे त्यांच्याविरोधात तक्रार करणेत आली. या तक्रारीची

दखल घेऊन मि. गार्डन यांनी हे लेखन थांबवण्याची सूचना गुरुवर्य केळूसकरांना केली. या लेखनाबाबत विरोधी तक्रार करणारे जरी असले तरी ही लेखमाला त्या काळात प्रचंड लोकप्रिय झालेली होती. याबाबत केळूसकर आपल्या चरित्रात लिहितात की, 'मि बी.बी. केसकर नावाचे एक टेलिग्राफ ऑफिसमध्ये मोठे कामदार होते. ते प्रार्थना समाजाचे सभासद होते. त्यांना हे माझे नीतीपर लेख आवडून त्यांनी या सगळ्यांचा संग्रह केला. हल्ली ते त्यांनी माझ्या स्वाधीन केले. ते छापू गेल्यास प्रत्येकी अडीचशे पानाचे सहा भाग होतील, परंतु त्याचे मुद्रण करण्यास मजकडे दाम नाहीत. आणि हल्ली नाटके व कादंबऱ्या लोकांना आवडत असून असल्या ग्रंथांना फारशी मागणी नाही. यामुळे छापणारे ते आपल्या जोखमीवर प्रसिद्ध करावयास तयार नाहीत. पुढे ही माझी नीतिबोधमालाही मि. गार्डन यांनी बंद करावयास सांगितली. यावरून ही नीतिबोधमाला पुढेही लिहिण्याचा मानस गुरुवर्य केळूसकरांचा होता. असे यावरून दिसते. आज रोजी या नीतिबोधमालेले चार खंड प्रसिद्ध झालेले आहेत. पण त्याच्या प्रती आज फारशा उपलब्ध नाहीत.

गुरुवर्य केळूसकरांनी नीतिबोधमालेच्या प्रत्येक खंडामध्ये बारा ते चौदा भाग समाविष्ट केलेले आहेत. आणि जवळपास १८० ते २०० च्या आसपास नीतिबोधकथा समाविष्ट केलेल्या आहेत. या प्रत्येक खंडात विभिन्न देशात प्रवास केलेल्या भिन्नसंस्कृतीत वाढलेल्या पण चांगल्या माणसाची मागणी करणाऱ्या संस्कारगर्भ नीतिबोधकथा एकत्रित केलेल्या आहेत.

नीतिबोधमालेच्या या दुसऱ्या खंडात एकूण पंधरा भाग आहेत. जगताना प्रत्येक माणसाला ज्या संस्काराची, मूल्यांची चांगला माणूस म्हणून गरज असते. अशा वृत्ती, प्रवृत्ती, मूल्ये याबाबत बोध करणाऱ्या जवळपास १८५ कथा या खंडात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. आज्ञांकितपणा, आज्ञाभंगाचे परिणाम, हेकटपणा, मनोनिग्रह, कर्तव्यपरता, उद्योगशीलता, दीर्घप्रयत्न, आळसाचे वाईट परिणाम, चालढकल, वेळेची किंमत, सावधगिरी, प्रसंगावधान, विद्याप्रीती, अज्ञानाचे वाईट परिणाम, अविचारीपणाचे वाईट परिणाम असे मानवी जगण्यास हितकारक ठरणारे विषय या खंडात एकत्रित केलेले आहेत. रशिया, प्रशिया, इंग्लंड, फ्रेंच, वेस्ट इंडीज, इराण, अरबस्थान, ग्रीस अशा विविध देशातील या कथा आहेत. यातील बहुतांशी कथा केळूसकरांनी भाषांतरित केलेल्या आहेत. या भाषांतरावरून गुरुवर्य केळूसकरांच्या अफाट व्यासंगाची कल्पना येते. या कथा सुट्यासुट्या आहेत. प्रत्येक कथेला स्वतंत्र अस्तित्व आहे. काही कथा

कल्पित आहेत. तर काही कथा वास्तवावर आधारलेल्या आहेत. या सर्व कथांचे भाषांतर सहज सोपे केले असून ओघवत्या भाषेमुळे या नीतिबोधकथांचे सौंदर्य अधिकच खुलवलेले आहे.

'आज्ञांकितपणा' या विभागात एकूण अकरा कथा समाविष्ट केल्या आहेत. मोहाचे क्षण माणसाच्या जगात विविध पेच निर्माण करीत असतात. या मोहाच्या क्षणांना टाळण्याची ताकद अंगभूतपणे असतेच असे नाही. परंतु आज्ञापालन केल्यास आज्ञा करणाऱ्याच्या अनुभवातून आलेल्या शहाणपणाचा उपयोग होऊन मोहाचे क्षण परतवण्याची ताकद निर्माण होते. वडीलधारी माणसे जेव्हा एखादी आज्ञा करतात तेव्हा त्या आज्ञेमागे त्यांच्याकडे कितीतरी पिढ्यांच्या ज्ञानाचा हस्तांतरित होत आलेला वारसा असतो. त्यामुळे अशा वडिलधाऱ्यांच्या आज्ञेकडे संशयाने पाहणे किंवा हरकत घेणे अयोग्य आहे, असा नीतिबोध या अकरा कथांमधून होतो. तर पुढच्या भागात एकत्रित केलेल्या बारा कथांच्याद्वारे आज्ञाभंगाचे वाईट परिणाम सांगितलेले आहेत. वडिलधाऱ्यांनी पुढच्यास ठेच मागचा शहाणा या न्यायाने आपल्या अनुभवातून मिळवलेल्या ज्ञानाच्या आधारे केलेली आज्ञा हितकारक असते. पण ती आज्ञा मोडल्यास त्याचे परिणाम आज्ञा मोडणाऱ्यास भोगावेच लागतात. पण काहीवेळेला आज्ञा पालन केल्या तर त्याचा फायदाही आज्ञा पाळणाऱ्यास होत असतो. काही वेळा आज्ञा मोडल्याने फायदा होईल असे वाटते, पण ते सार्वकालिक खरे नसते. आज्ञाभंगामुळे वरिष्ठांच्या मनाला यातना तर पोहोचतातच पण त्याबरोबरच व्यक्तीलाही हानी सहन करावी लागते. त्यामुळे वरिष्ठांची आज्ञा आपल्यास हितकारक व प्रगल्भ बनवण्यास मदत करीत असतात. काही माणसे स्वभावत:च हेकट असतात. हा हेकटपणा त्यांच्यासमोर अनंत अडचणी उभ्या करत असतो. कोणताही मनुष्य कितीही शहाणा असला तरी तो सर्वज्ञ नसतो, त्याला सर्वच गोष्टी कळतात असे काही नसते. विश्व अनंत आहे. त्यामुळे आपणच पूर्ण ज्ञानी आहोत असा हट्ट धरल्यास माणसाची फजिती होण्याचीही शक्यता असते. सत्तेपुढे शहाणपणा चालत नाही हे म्हणणे तितकेसे खरे नसून हाताखालच्या माणसालाही ज्ञान असते असे मानणे शहाणपणाचे असते. त्यामुळे सार्वकालिक हेकटपणा फारसा उपयोगी नसतो. असा बोध 'हेकटपणा' या शीर्षकाखाली एकत्रित केलेल्या सहा कथांत देतात. गुरुवर्य केळूसकर या कथांची रचना चढत्या क्रमाने करतात. त्यामुळे हेकटपणा अंगाशी येण्याची शक्यता कशी अधिक आहे, हा परिणाम वाचकाच्या मनावर ठसत जातो.

'मनोनिग्रह' या विभागात वीस बोधकथा एकत्र केलेल्या आहेत. माणसावर विविध क्षणी, विविध प्रकारची विपरीत परिस्थिती अचानकपणे येत असते. या विपरीत परिस्थितीत मनोनिग्रह फार महत्त्वाचा असतो. हा मनोनिग्रह जितका बलिष्ठ असेल तितक्या समर्थपणे माणूस या विपरीत परिस्थितीतून मार्ग काढू शकतो. आपले मन वाईट गोष्टींकडे जाऊ न देण्याचा निर्धार केला तर आपल्या अंगी सुजाणता व पवित्रता वाढत असते. मात्र सुजाणता आणि पवित्रता हे शब्द प्रगल्भपणे समजून घ्यावे लागतात. मनोनिग्रहाने स्वभावामध्ये बदल घडू शकतात. मूळातच दुराचारी असणाऱ्या माणसाने मनोनिग्रह केला तर त्याच्यात वर्तनबदल सहजशक्य असतात. जे लोक दुर्बल असतात. ते फार गलबला करतात. त्यांच्याकडून काही होत नाही. पण जे लोक बळकट असतात, ते नेहमी शांत व गंभीर असतात. त्यांच्या हातून काही घडण्याची शक्यता असते. ज्यांच्याकडे मन जिंकण्याचे सामर्थ्य नाही अशांचा विनाश अटळ असतो. कायद्याच्या आधारे व्यक्तीच्या मनाचे नियमन करून चालत नाही तर मनोनिग्रह महत्त्वाचा असतो असा ठसा या कथा परिणामकारकपणे ठसवतात. मनोनिग्रह हा जगण्यात किती महत्त्वाचा आहे हे ही अधोरेखित करतात. 'कर्तव्यपरता' या भागात अठ्ठावीस नीतिबोधकथा एकत्र केलेल्या आहेत. कार्यतत्पर माणसे कोणत्याही संकटांना घाबरत नाहीत. कर्तव्यापुढे कशाचीही तमा बाळगत नाहीत. कर्तव्यनिष्ठ माणसाची नेहमीच प्रशंसा केली जाते. अशी माणसे दृढनिश्चयाने जगत असतात. प्राण्यांच्या ठायी ही कर्तव्यदक्षता सततच दिसून येत असते. पण माणसाला ही कर्तव्यनिष्ठा पाळता येतेच असे नाही. आपले कर्तव्य आपण योग्य रीतीने पार पाडताना त्रास किंवा गैरसोय सोसावी लागली तरी कर्तव्यापासून दूर होत नसतात. ज्यांच्या हाताखाली कर्तव्यनिष्ठ व विश्वासू माणसे असतात असा मनुष्य भाग्यवान समजावयास हवा. आपल्या प्राणावर भयंकर संकट आले तरी आपल्या जीवावर निश्चित असणाऱ्या हजारो माणसांसाठी कर्तव्य बजावणाऱ्या माणसास नेहमीच सलाम केला जातो. अशा कर्तव्यदक्ष माणसांना त्यांच्या कर्तव्यनिष्ठेचे फळ नक्कीच मिळते. अशा या अठ्ठावीस कथा वाचकाच्या मनावर संस्कार करतात.

उद्योगशील माणूस आपल्या जीवनात सततच यशस्वी होत असतो. ज्याच्या जगण्यात श्रमाला महत्त्व असते, त्याच्या जगण्यात आनंद भरून उरलेला असतो. सततच्या उद्योगशीलतेमुळे मातीचेही सोने करण्याची हिंमत अशा उद्योगशील माणसांमध्ये असते. अशा माणसाला धनसंपत्ती नेहमीच वश असते. कोणतेही काम श्रेष्ठ अथवा कनिष्ठ दर्जाचे नसते. उद्योगशील माणूस कोणतेही काम करण्यास लाज बाळगत नाही.

सुस्तपणे विनाकारण विपत्ती भोगण्यापेक्षा श्रमाने जीवन सुंदर करणे अधिक हितकारक असते. मौज म्हणून शिकलेले कामही संकटकाळी उपयोगी पडत असते. त्यामुळे उद्योगशील माणसे सतत नवनवीन काहीतरी शिकण्याचा प्रयत्न करीत असतात. पक्षीसुद्धा उदरनिर्वाहासाठी स्वस्थ न बसता सतत धडपडत असतात. आपण तर माणसं आहोत. श्रमाने जग अधिक सुंदर करणे हे माणसाला शक्य आहे. त्यामुळे उद्योगी, हुशार आणि कसबी माणसाला समाजात नेहमीच प्रतिष्ठा मिळत असते. अशा प्रकारचे संस्कार करणाऱ्या बावीस नीतिबोधकथा ‘उद्योगशीलता’ या विभागात एकत्रित केलेल्या आहेत. उद्योगशीलतेबरोबरच ‘दिर्घप्रयत्न’ हाही माणसाजवळ आवश्यक असणारा गुण आहे. पशू, पक्षी, प्राणी, किडामुंगी सततच्या प्रयत्नाने, चिकाटीने न थकता अविरत कष्टातून यश प्राप्त करत असतात. माणसानेही हिंमत सोडून हातपाय गाळून निराश न होता यशासाठी चिकाटीने प्रयत्न केल्यास यश त्याच्या पदरी पडत असते. अपयशाने खचून न जाता नवनवीन मार्ग शोधून काढल्यास आपण योजिलेले काम तडीस नेऊ शकतो. काही तरी कमावण्यासाठी काहीतरी गमवावे लागते अशा शिकवण देणाऱ्या दहा कथा ‘दिर्घप्रयत्न’ या विभागात समाविष्ट केल्या आहेत. आळसाचे वाईट परिणाम सांगणाऱ्या दहा कथा स्वतंत्र विभागात एकत्र केल्या आहेत. आयुष्य जगत असताना गुंतागुंतही अपरिहार्य असते. यावर तोडून टाकणे हा पर्याय असत नाही. तर ती गुंतागुंत अलगद सोडवण्यात खरा शहाणपणा असतो. श्रमशील, उद्योगी माणसे गुंतागुंत सोडवण्यात यशस्वी होतात पण आळशी लोक दु:खात खितपत पडतात. आळसामुळे जीवनातल्या अनेक चांगल्या संधींना मुकावे लागते. म्हणून आळस सोडून दिला पाहिजे असे या कथा अधोरेखित करतात. कोणत्याही कामामध्ये निष्काळजीपणा न करता वेळेच्यावेळी पूर्ण केल्यास त्या कामात यशस्वीता प्राप्त होते. एकदा निघून गेलेली वेळ पुन्हा येत नसते. त्यामुळे वेळेचे काटेकोर नियोजन करून सदैव कार्यरत राहणारी व्यक्ती ध्येयप्राप्तीपर्यंत जलद पोहचते. अशा उपदेश करणाऱ्या पाच कथा ‘चालढकल’ या भागात समाविष्ट केल्या आहेत. आजचे काम उद्या केले तर काय बिघडते? असा अविचार करणारी माणसे आयुष्यातील अनेक संधी गमवतात. ज्याला वेळेचे महत्त्व समजले आहे असा मनुष्य स्वत:चा व इतरांचाही बहुमूल्य वेळ कधीही वाया जाऊ देत नाही. ‘वेळेची किंमत’ या भागात सदर संबंधाने दहा कथा अंतर्भूत केल्या आहेत. ‘सावधगिरी’ या विभागामध्ये जगण्यात सावधानता किती महत्त्वाची आहे हे सांगून अविचारी वर्तनाचे धोकेही सांगितले आहेत. प्राणीसुद्धा पाऊल टाकताना सावधगिरी बाळगतात. मग माणसाने बेसावध का रहावे असा प्रश्न ते उपस्थित करतात. ‘प्रसंगावधान’ या भागामध्ये पंधरा कथा

एकत्रित केल्या असून जगण्यात समयसूचकता किती महत्त्वाची असते. आततायीपणापेक्षा शांतपणे विचार केल्यास कठीण परिस्थितीतून सहज मार्ग काढता येतो. संकटातून प्रसंगावधानामुळेच बाहेर पडता येते. असा बोध या कथा वाचकाच्या मनावर ठसवतात. जीवनात विद्याव्यासंग किती महत्त्वाचा आहे हे सांगणाऱ्या दहा कथा 'विद्याप्रीती' या शीर्षकाखाली एकत्रित केल्या आहेत. शिकण्याची उत्कट इच्छा असली की आपोआपच मार्ग सापडतात. नवे ज्ञान मिळवणाऱ्याला इतर लोकही मदतच करीत असतात. ज्ञानी माणसास सतत आदर व लौकिक मिळत असतो. यासाठी माणसात ज्ञानलालसा असली पाहिजे. विद्याप्राप्तीने आणि विद्याप्रेमाने माणसाच्या जगण्यात व्यापकता आणि विशालता येत असते. म्हणून माणसाने विद्याप्रेम बाळगले पाहिजे, असे या कथा सुचवितात. या नंतरच्या भागात अज्ञानाबरोबर अज्ञानाचे परिणाम सांगणाऱ्या बारा कथा एकत्र केल्या आहेत. अज्ञानामुळे माणूस अंधश्रद्धेला, फसवणुकीला बळी पडत असतो. त्याचे सहज शोषण करणे कोणासही शक्य होते. म्हणून विद्या, अक्षरज्ञान महत्त्वाचे. विद्येनेच माणसाचा उत्कर्ष होत असतो. शोषणातून मुक्ती मिळत असते. हा बोध या कथा वाचकाच्या मनावर ठसवतो. अविचाराने वाईट परिणाम सांगणाऱ्या एकूण सात कथा या भागात एकत्र केल्या आहेत. अविचाराने माणसाच्या जगण्यात दु:खच येत असते. लाभाचा विचार करून घेतलेला निर्णय आत्मघातकी ठरत असतो. यातूनच माणसाला अनेक संकटांना सामोरे जावे लागत असते. अविचाराच्यावेळी माणसाने विवेकाला हद्दपार केलेले असते. त्यामुळे अनेक नवे प्रश्न आ वासून उभे राहतात, म्हणून कोणत्याही गोष्टीचा परिणाम काय होईल याचा विचार करूनच कार्यास सुरुवात केली असता अडचणी निर्माण होत नाहीत.

या खंडातील सर्वच नीतिबोधकथा माणसाच्या जगण्यात सुसंस्कार आणि सुविचार पेरण्याचा प्रयत्न करतात. अखिल मानवजातीला सुसंस्कारित करण्याचे सामर्थ्य या कथांमध्ये आहे. माणसाच्या जगण्यातील सुंदरतेला आणि संपन्नतेला या बोधकथा महत्त्व देतात. अनेक पिढ्यांच्या अनुभवातून हस्तांतरित झालेल्या ज्ञानाचा उपयोग पुढील पिढ्यांना व्हावा हा हेतू मुळाशी ठेवून या कथा उभ्या राहतात. सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक आरोग्य निर्मळ रहावे यासाठी या कथा महत्त्वाच्या ठरतात.

या कथा सहजसोप्या, साध्या भाषेत सामान्य माणसाला समजतील, बोध करतील अशा आहेत. सर्वसामान्य माणसाच्या भाषेत त्याला समजेल असे लिहिणे अधिक अवघड असते. गुरुवर्य केळूसकर व्रतस्थ शिक्षक असल्यामुळे सर्वसामान्य विद्यार्थ्यालाही कळेल, त्यात त्याला आवड निर्माण होईल अशा पद्धतीने या सर्व बोधकथांची रचना

करतात. सुलभ निरुपणाने वाचणाऱ्याच्या मनाचा वेध घेतात. या कथा रचत असताना आपल्याला उद्याची पिढी घडवायची आहे. उद्याचा सुसंस्कारित समाज निर्माण करायचा आहे, याचे भान गुरुवर्य केळूसकरांनी वापरलेल्या प्रत्येक शब्दांत दिसते. निर्मळ आचरणाचा माणूस निर्माण करावयाचा असेल तर त्याच्याठायी कोणत्या वृत्तींचा परिपोष झाला पाहिजे, हे या कथांतून गुरुवर्य केळूसकर मानवी मनावर ठसवतात. या कथांमधील अनेक तपशील सर्वांच्याच ज्ञानात भर घालणारे तर आहेतच पण त्याबरोबरच सामान्यांतील अतिसामान्य माणसास हे आपणांस सहज शक्य आहे असा विश्वास देणारे आहेत. या कथा शब्दांचा मितव्यय करून मर्यादित व्यक्तिरेखा, घटनांच्या सहाय्याने सखोल परिणाम साधणाऱ्या बोधकथेचे रेखीव रूप गुरुवर्य केळूसकर आपल्यासमोर ठेवतात. निरसता, रुक्षपणा, बोचरेपणा यांना फाटा देऊन हे कथेचे रूप घडवत असताना परिणामकारक बोधप्रदतेला या कथा अधोरेखित करतात. या कथांचे स्वरूप स्फूट असले तरी जगण्याच्या समग्र साकल्यतेला, सौंदर्यपूर्ण जगण्याला आणि मानवी मनाच्या विशालतेला या कथा भरीव अवकाश प्राप्त करून देतात. छोट्या छोट्या पात्रप्रसंग, भाववृत्तीतून एक मोठे शब्दशिल्प कसे घडवले जाते याचा प्रत्यय या कथा देतात. एकच एक संस्कार आणि परिणामातील एकाग्रता आणि उत्कटता ही या कथेंची खास वैशिष्ट्ये आहेत. या कथांमधून व्यावहारिक सत्याचे आणि मानवी स्वभावाचे दर्शन घडते. उद्‌बोधकता आणि परिणामकारकता हे या कथांचे मुलभूत गुणधर्म आहेत. नीतितत्त्व सांगणे हे या कथांचे प्रयोजन आहे. यात कुठेही धार्मिक प्रेरणा, धर्मविधीचा संबंध नाही. सुष्ट, नीतिमान माणूस घडवणे हे या कथांचे ध्येय आहे. चांगुलपणाला या कशा अधिक महत्त्व देतात. दृष्टाचे वर्तन परिवर्तन करून त्यास सुष्ट बनवता येते यावर या कथांचा विश्वास आहे.

या कथा सामान्य माणसापासून उच्चस्तरीय राजवैभवालासुद्धा शहाणे करण्याची क्षमता बाळगतात. त्यामुळे गरीब, श्रीमंत, सुष्ट-दृष्ट, राजा-रंक या साऱ्यांमधील चांगुलपणाला त्या आवाहन करतात आणि चांगल्या माणसांचे जग निर्माण करण्याची क्षमता बाळगतात. त्यामुळे कोणत्याही काळात कोणत्याही समाजात या कथा माणसातील माणसाला हाक घालत राहणार आहेत म्हणून त्या ताज्या व नित्यनूतन आहेत.

वाङ्मयमहर्षी गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकरांचे वाङ्मयातील व सामाजिक कार्यातील असामान्य कर्तृत्व जाणून घेऊन महाराष्ट राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मा. बाबा भांड व मंडळातील त्यांचे सहकारी, मंडळाच्या सचिव मिनाक्षी पाटील यांनी ह्या महत्त्वकांक्षी प्रकल्पाची जबाबदारी महाराष्ट्र शासनाच्या

वतीने माझ्यावर सोपवून माझ्यावर जो विश्वास दाखवला त्या बद्दल त्यांच्या ऋणातच असणे मी पसंत करतो. महाराष्ट्र शासनाच्या उदार व वाङ्मयप्रेमी दृष्टिकोणाचा मी ऋणपूर्वक उल्लेख करतो.

हा प्रकल्प पूर्ण करताना अनेकांचे सहकार्य लाभले. सतीश बडवे, प्रकाश पवार, अवनीश पाटील, प्रवीण बांदेकर, नीतीन रिंढे, रणधीर शिंदे, नंदकुमार मोरे, अरुण शिंदे, नीला जोशी यांनी गरुवर्य केळूसकरांच्या ग्रंथांना अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहून दिल्या. त्यासाठी त्यांनी बरेच परिश्रम घेतले. तसेच रफिक सूरज, शोभा नाईक, सुजय पाटील, अनिल गवळी, रमेश साळुंखे, गोमटेश्वर पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांचे आभार मानणे त्यांना आवडणार नाही. कारण हे सर्व अभ्यासक व्रतस्थ वाङ्मय सेवक आहेत. या ग्रंथाचे संकलन करण्यात साकेत बाबा भांड यांनी केलेली मदत मोलाची आहे. याबरोबर हे प्रकल्प काम पूर्ण करण्यास आप्पासाहेब बुडके, तेजस चव्हाण, राजेश पाटील, नवनाथ गोरे, संदीप मुंगारे, प्रदीप पाटील, निहाल शिपुरकर यांची मदत झाली. त्यांचे मनःपूर्वक आभार. त्या बरोबरच मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयचे ग्रंथपाल, सा.वा.ना. नाशिक, श्रीराम वाचन मंदिर सावंतवाडी, करवीर नगर वाचन मंदिर कोल्हापूर, बॅ. खर्डेकर ग्रंथालय, कोल्हापूर या बरोबरच महाराष्ट्रातील अनेक ग्रंथालयाच्या ग्रंथपालांनी विशेष मदत केली त्यांचे मनःपूर्वक आभार. या शिवाय या प्रकल्पास मदत करणाऱ्या सर्व ज्ञात अज्ञातांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतो. ह्या प्रकल्पाचे वाचक मनापासून स्वागत करतील अशी खात्री आहे. या प्रकल्पात काही त्रुटी असेल तर ती माझी मात्र चांगल्याचे सर्व श्रेय बाबा भांड आणि त्यांचे सहकारी यांचे आहे. धन्यवाद!

**– राजन गवस**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| भाग पहिला – आज्ञांकितपणा | .. | १ |
| भाग दुसरा – आज्ञाभंगाचे वाईट परिणाम | .. | १४ |
| भाग तिसरा – हेकटपणा | .. | २४ |
| भाग चौथा – मनोनिग्रह | .. | ३१ |
| भाग पाचवा – कर्तव्यपरता | .. | ४९ |
| भाग सहावा – उद्योगशीलता | .. | ७८ |
| भाग सातवा – दीर्घ प्रयत्न | .. | १०० |
| भाग आठवा – आळसाचे वाईट परिणाम | .. | ११३ |
| भाग नववा – चालढकल | .. | १२२ |
| भाग दहावा – वेळेची किंमत | .. | १२८ |
| भाग अकरावा – सावधगिरी | .. | १३६ |
| भाग बारावा – प्रसंगावधान | .. | १४३ |
| भाग तेरावा – विद्याप्रीति | .. | १५१ |
| भाग चौदावा – अज्ञानाचे वाईट परिणाम | .. | १६० |
| भाग पंधरावा – अविचारीपणाचे वाईट परिणाम | .. | १६७ |

# नीतिबोधमाला

## सुमन दुसरे

### भाग पहिला

# आज्ञांकितपणा

## आज्ञांकित मुलगा

एकदां एका गृहस्थानें आपल्या मुलास सांगितलें कीं,''मी परत येईं तोंपर्यंत घरांतून कोठें जाऊं नको; कारण तुला शहरांत कांहीं कामासाठीं पाठवावयाचें आहे.'' ह्या आज्ञेप्रमाणें तो मुलगा आपल्या घराच्या दाराशीं बापाची वाट पाहत उभा होता. इतक्यांत त्याचा एक सोबती पतंग घेऊन तेथें आला, आणि त्यास म्हणाला: ''हा पाहा, मीं कसा चांगला पतंग आणिला आहे, आणि माझ्यापाशीं सूत तर इतकें आहे कीं हा मी दिसेना इतका उंच उडवीन. तूं चल मजबरोबर, आणि मला पतंग उडवायाला मदत कर.'' मुलगा म्हणाला: ''माझ्या बापाची आज्ञा अशी आहे कीं, तो परत येईपर्यंत मी कोठें जाऊं नये, आणि परत आल्यावर मला तो शहरांत कांहीं कामासाठीं धाडणार आहे.'' सोबत्याने विचारिलें: ''तुझा बाबा केव्हां परत येईल?'' मुलगा म्हणाला: ''तें मला बरोबर माहीत नाहीं; तरी त्याला परत यावयाला निदान अर्धा तास लागेल असा अंदाज आहे.'' सोबती म्हणाला: ''त्याला यावयास अर्धा तास आहेना? तर तेवढ्या अवकाशांत आपण पतंग उडवून सहज परत येऊं.'' मुलगा म्हणाला: ''पण बाबानें' घरांतून कोठें जाऊं नको म्हणून सांगितलें आहे ना? ती

त्याची आज्ञा मी कशी मोडूं?'' सोबती म्हणाला:''अरे, तो घरीं असता तर त्यानें तुला मजबरोबर खचीत जाऊं दिलें असतें. बरें, तूं मजबरोबर आलास, व आम्ही पतंग उडवून तो घरीं येण्यापूर्वीं परत आलों, तर त्याला तें कळावयाचे नाहीं.'' मुलगा म्हणाला : ''त्याला कळलें नाहीं तरी मीं त्याची आज्ञा मोडिलीं ही वाईट गोष्ट केली, असें माझें मन मला खाईल, नाहीं काय? यास्तव तुझ्याबरोबर येऊन पतंग उडविण्याची मौज पाहण्यापेक्षा मला माझ्या बापाची आज्ञा पाळण्यांत विशेष आनंद वाटेल.'' हें त्याचें उत्तर ऐकून तो सोबती निरुत्तर होऊन तेथून निघून गेला.

## ल्युसी ग्रे

विलायतेंत एका खेडेगांवीं एक गरीब शेतकरी रहात असे. त्याची बायको एके दिवशीं जवळच्या शहरांत बाजारास गेली होती. तिला परत यावयाला रात्र होईल, व कांहीं वेळानें बर्फाची मोठी वृष्टि होण्याचा संभव आहे असें लक्षांत येऊन तो आपली मुलगी ल्युसी हिला म्हणाला: ''मुली, तुला कंदील घेऊन शहरांत गेलें पाहिजे. कारण आज रात्रीं बर्फाचें वादळ खात्रीनें होणार, आणि तुझ्या आईला परत यावयाला बराच उशीर होणार. तिला रात्रीची बर्फांतून वाट उमगणार नाहीं.'' ल्युसी म्हणाली: ''बाबा, अजून दिवस आहे. काळोख पडण्यापूर्वी मी शहरांत सहज जाऊन पोहोंचेन'' असें बोलून ती कंदील घेऊन लागलीच मोठ्या हुशारीनें निघाली. पण झालें काय कीं, तिच्या बापानें अटकळ केली होती त्यापूर्वींच बर्फाची वृष्टि सुरू होऊन सर्व दिशा धुंद झाल्या, आणि त्या मुलीस वाट उमगेना. वाट चुकून कोणीकडच्या कोणीकडे ती भटकत गेली. त्या वैराण व बर्फाने आच्छादिलेल्या माळावर ती फिरत असतां एका नाल्यांत पडली!

इकडे तिची आई शहरांतून घरीं आली. तेव्हां अर्थात् त्या प्रेमळ मातापितरांस त्या मुलीची चिंता पडून तीं तिला शोधीत सगळी रात्र या माळावर फिरत होतीं. दिशा उजळून साफ दिसूं लागलें. तेव्हां तिचीं बर्फांत उमटलेलीं पावलें दिसलीं. त्यांच्या मार्गानें जातांजातां एका नाल्यावर अलीकडेपलीकडे जाण्यासाठीं घातलेल्या फळीच्या मध्यभागापर्यंत तिचीं पावलें लागलीं असून पुढें तीं लागलीं नाहींत, असें पाहून ती त्या नाल्यांत पडून मेली असा त्यांनीं तर्क केला. तेव्हां अशी सुशील व आज्ञाधारक मुलगी गमावल्याबद्दल त्या मायाळू मातापितरांना केवढा शोक झाला असेल. हें सहज मनांत येण्याजोगें आहे.

## हुकमाचे ताबेदार

रशिया व टर्की यांचें युद्ध सन १८५४ त चाललें असतां इंग्रज व फ्रेंच यांनी जूट करून, क्रिमिया नांवाचा द्वीपकल्प रशियाच्या ताब्यांत आहे, तो हस्तगत करण्यासाठीं रशियाशी युद्ध चालविलें. तें चालले असतां बालाक्लेवा येथें मोठी लढाई झाली. तींत एका इंग्रज सेनापतीनें आपल्या घोडदळास शत्रूच्या तोफांवर चाल करून त्या घेण्याचा हुकूम केला. त्या वेळीं शत्रूच्या तोफा तिन्ही बाजूंनी सारख्या सुटत होत्या. यास्तव त्यांचा मारा चुकवून कोणत्याही बाजूकडील त्यांवर चाल करून जाणें सुरक्षित नव्हतें. यावरून पाहतां असा हुकूम त्या घोडदळाला केला तो निखालस चुकीचा होता. पण हुकूम सुटताच तें घोडदळ एकदम दौडत सुटलें अशा बिकट जागीं शत्रूवर चाल करावयाला सांगणें चुकीचे आहे, व हुकूम देणाराकडून कांहीं तरी गफलत झाली आहे. हें त्या घोडदळांतील प्रत्येकाला कळून चुकलें होतें. पण ती वेळ तक्रार करण्याची किंवा जिवाला भिऊन कचरण्याची नव्हती. वरिष्ठांच्या हुकमाप्रमाणें तत्काळ वागावे हें आपलें कर्तव्य आहे असें लक्षांत आणून त्यांनीं त्या हुकमाप्रमाणें बेधडक चाल केली. तिन्ही बाजूंनीं तोफांचा भडिमार होत असून त्यांतले घोडेस्वार पटापट मरून पडत होते, तरी ते बिलकूल डगमगले नाहींत. त्यांनीं समोरील तोफा डागणारांची कत्तल उडवून मागें दौड केली. ती त्यांस तोफांच्या भडिमारांतून करावी लागली. त्यामुळें त्यांपैकी अगदीं थोडे स्वार जीवंत परत आले. या घोडदळांत सहाशे योद्धे होते. पण त्यांपैकीं एकहि आपलें कर्तव्य करण्याला डगमगला नाहीं. अशी ही मृत्यूच्या मुखांत उडी टाकण्याला ते हुकमासरशीं तयार झाले, याचें सगळ्या जगाला मोठे कौतुक वाटलें; आणि या त्यांच्या पराकाष्टेच्या शौर्याची व आज्ञांकितपणाची तारीफ महाकवींनीं केली आहे. सैन्यामध्ये असा हुकूमबंदेपणा असला तरच तें यशस्वी होण्याजोगें असतें. ब्रिटिश लोकांनीं सगळ्या जगांत जें येवढें साम्राज्य संपादिलें आहे, तें त्यांना अशा अप्रतिम गुणांमुळेंच प्राप्त झालें आहे.

## आज्ञाधारक मुलगा

प्रशिया देशांतील एका प्रांतांतून आगगाडीची एकेरी सडक नेली होती. तीवरून एकच गाडी जाण्यासारखी असल्याकारणाने जागोजाग सांधे बदलण्याची व्यवस्था केली असे. दोन गाड्या समोरासमोरून आल्या असतां सांधेवाल्यांनीं एक गाडी बाजूच्या लाइनीवर जाण्यासाठीं सांधा बदलावा, आणि दुसरी गाडी निघून गेल्यावर पुन: सांधा बदलून बाजूस काढिलेली गाडी जाऊं द्यावी अशी व्यवस्था केली असे.

अशा एका सांध्यावर एक माणूस असतां दोन गाड्या समोरासमोरून आल्या. तेव्हां तो सांधा बदलावयास धावला. सांधा फिरवावयाच्या दांड्याला तो हात घालायास गेला तों त्याची नजर त्याच्या लहान मुलाकडे गेली. तो लाइनीवर खेळत होता. त्याला उचलून एकीकडे ठेवावयास जावें तर एन्जिन अगदीं जवळ आलें असल्याकारणानें तसें करावयास त्याला मुळीं अवकाश नव्हता. मुलास वांचवावयास धावून शेंकडो माणसांच्या नाशाला कारण व्हावें हें त्याला नीट दिसलें नाहीं. इतक्यांत त्याला एक युक्ति सुचली. तो मुलास हाक मारून म्हणाला: ''मुला, आडवा पडून रहा.'' बापाचे हे शब्द कानीं पडतांच त्यानें तत्काळ तसें केलें; आणि सगळी गाडी त्या मुलावरून घडघडत गेली. ती जाईपर्यंत त्या पुत्रवत्सल बापाच्या मनाची अवस्था कशी झाली असावी. याची कल्पना सहज करितां येण्याजोगी आहे. सगळी गाडी बाजूच्या लाइनीवर जातांच तो त्या मुलाकडे धावत गेला. तो अगदीं छिन्नभिन्न होऊन पडला असावा, असें त्याला वाटलें होतें. पण त्याला बिलकूल इजा झाली नाहीं, हें पाहून त्याच्या जिवांत जीव आला.

या सांधेवाल्याची ही अशी कर्तव्यदक्षता बाजूस काढिलेल्या गाडींतील लोकांना कळली तेव्हां त्यांनीं त्याची फार तारीफ केली; अणि पुढें त्या देशाच्या राजाला ही गोष्ट समजली तेव्हां त्यानें त्याला बोलावून आणून शाबासकी दिली आणि एक सोन्याचें पदक इनाम दिलें.

वडिलांनीं कोणतीही गोष्ट करावयास सांगतांच ती तत्काळ करण्याची सवय त्या मुलास होती म्हणून त्याचा असा बचाव झाला हें उघड आहे. वडील माणसे आपणांला सांगतात तें आपल्या हिताचें आहे. असें मानून तें तत्काळ करावें तें त्यांनीं पुनः सांगण्याची वाट पाहू नये. किंवा त्याविषयीं संशय अथवा हरकत घेऊं नये, अशी मुलांची वृत्ति व्हावी हें अत्यंत इष्ट होय.

## आज्ञांकितपणाची कमाल

बर्कनहेड नांवाचें एक मोंठें जहाज कांहीं सैन्य घेऊन दक्षिण आफ्रिकेच्या किनाऱ्याजवळून सन १८५२ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत चाललें होतें. मजल लौकर काटावी म्हणून कप्तानाने तें मुद्दाम किनाऱ्याजवळून चालविलें होतें. त्यावर एकंदर ६३२ माणसे होतीं. तें केप डेंजर नांवाच्या भूशिरापाशी आलें तेव्हां तेथें एका पाण्याखालच्या खडकाला लागून तें फुटलें. त्याबरोबर त्यावरील सैन्याचा कर्नल सेटन यानें सैनिकांना हत्यारबंद होऊन वरच्या तक्तापोशीवर जमा होण्याचा इशारा पडघम

वाजवून केला. तो कानीं पडतांच सगळे सैनिक तत्काळ सज्ज होऊन परडीला उभे रहातात तसे निमूटपणें उभे राहिले. मरणभयाचें किंवा अस्वस्थतेचें जरासुद्धा चिन्ह कोणींएकानें दाखविलें नाहीं. आतां आपणांला मृत्यू खास येणार हें सर्वांना कळून चुकलें होतें. पण वरिष्ठाचा इशारा होतांच कोणींही हुकूम तोडिला नाहीं. त्यांच्या कर्नलानें त्यांना बजाविलें कीं, मुलांना व बायांना किनाऱ्यावर नेऊन पोंचविण्यापुरत्या होड्या आहेत. यासाठीं त्यांचा बचाव पहिल्याने केला पाहिजे. हें त्याचें म्हणणें कोणीही अमान्य केलें नाहीं.

मग त्या सैनिकांनी हुकमाप्रमाणें जहाजावरील सगळ्या होड्या पाण्यांत लोटून त्यांत मुलांना व बायांना उतरविण्यास मदत केली. हें सगळे काम त्यांनीं मोठ्या त्वरेनें पण शांतपणें केलें. शोकाचे किंवा भयाचे उद्‍गार कोणाच्याही तोंडून निघाले नाहींत. होड्या किनाऱ्यावर जाऊन परत आल्या म्हणजे पुनः दुसरीं मुले व बाया त्यांत उतरीत.अशा रीतीनें होड्यांच्या तीनचार खेपा होऊन बहुतेक मुलें व बाया यांचा बचाव झाला. हा सगळा प्रकार अर्धातासपर्यंत चालला होता. एवढ्या अवधींत जहाजांत पाणी भरून तें खालीं जात चालले होतें; आणि किनाऱ्याकडे शेवटीं गेलेल्या होड्या परत येण्याच्या अगोदर तें पाण्याखाली साफ गेलें. आणि त्याबरोबर त्या सैनिकांनाही जलसमाधि मिळाली! तारूं पाण्याखाली जाईपर्यंत ते आपल्या जागेवरून हालले नाहींत!

आज्ञाधारकपणाचा हा केवळ अप्रतिम मासला होय. ह्या शिपायांनी ह्या घोर प्रसंगीं जें अलौकिक धैर्य प्रगट केलें, त्याला सगळ्या जगाच्या इतिहासांत जोडा नाहीं. या त्यांच्या विलक्षण शौर्याचे व आज्ञांकितपणाचे स्मारक महाराणी व्हिक्टोरिया यांच्या आज्ञेवरून ग्रिनिज येथील हॉस्पिटलांत उभारिलें आहे.

## विहिरींतली आंगठी

एका राजाला एक चांगला विश्वासू नोकर हवा होता. तो कसा शोधून काढावा असा विचार करितांकरितां त्यानें पुढील युक्ति योजिली. त्यानें शहरांत अशी दवंडी पिटविली कीं, एका दिवसापुरता रोजमुरा करणारा एक माणूस आपणांस पाहिजे. त्याबरोबर दोन मनुष्य त्याच्याकडे येऊन म्हणाले कीं, ''खावंद सांगतील तें काम करण्यास आमची तयारी आहे.'' राजानें त्यांची मजुरी ठरवून त्यांना दोन बांबूच्या टोपल्या दिल्या आणि सांगितलें कीं, ''राजवाड्याला लागून बाग आहे, त्यांतल्या विहिरींतले पाणी ह्या टोपल्यांत भरा.''

त्याच्या हुकमाप्रमाणें त्या टोपल्या घेऊन ते त्या विहिरीवर गेले. आणि पोहऱ्यांनीं पाणी काढून त्यांत ओतूं लागले. पण, टोपल्यांस लहानलहान छिद्रें होतीं, त्यांतून ओतावें तेवढें पाणी गळून जाऊ लागलें. हें पाहून त्यांपैकीं एकजण त्रासून म्हणाला: ''असलें वेडगळपणाचें काम करीत रहाण्यांत काय हाशील आहे?'' दुसरा म्हणाला: ''या कामांत अर्थ काय आहे तें पाहण्याचें आपलें काम नाहीं. त्याचा विचार राजा हवा तर करील. आपणांला रोजमुरा मिळाला म्हणजे बस आहे.'' पहिला म्हणाला: ''मी नाहीं असलें काम करीत रहाणार. हें कोणी पाहील तर मला मूर्ख म्हणेल.'' असें म्हणून तो टोपली तेथेंच टाकून चालता झाला.

दुसरा माणूस तें काम सगळा दिवस करीत राहिला. तो विहिरींतून पाणी काढून टोपलींत सारखा ओतीत होता. असें करितांकरितां विहिरींतलें पाणी बहुतेक खलास झालें. तेव्हा तो तींत डोकावून पाहूं लागला तो त्यांत कांहीं चमकत आहे असें त्याच्या नजरेस पडलें. तें त्यानें तत्काळ बाहेर काढून पाहिले तों ती सुंदर आंगठी आहे असें त्याला आढळून आलें. तेव्हां तो आपल्याशीं म्हणाला:''या विहिरींतलें पाणी काढून टोपलीत ओतण्याचें कारण मला आतां समजलें. विहिरींतलें पाणी संपण्यापूर्वीं पोहऱ्यातून पाण्याबरोबर आंगठी वर आली तर ती पाण्याबरोबर टोपलीत पडून सहज हातीं लागावी, असा हें काम करावयास सांगण्याचा उद्देश होता. तेव्हां हें काम कांहीं निरर्थक नव्हतें.'' मग त्यानें ती आंगठी राजवाड्यांत नेऊन राजाच्या हातीं दिली. ती पाहून राजा खुष होऊन म्हणाला: ''मीं सांगितलेंलें चमत्कारिक काम तूं हुकमाप्रमाणें केलेंस. यास्तव याहून चांगलीं कामें विश्वासानें करण्यास तूं लायक आहेस. ही आंगठी तुला घे. मीं तुला आजपासून नोकरीस ठेविलें आहे.''

## लष्करी शिस्त

पारीसशहराजवळील एका खेड्यांत पिरी नांवाचा एक गरीब मजूर रहात असे. तो मोठा मेहनती व हुशार होता. त्याच्याप्रमाणें त्याची बायकोही मोठी कष्टाळू व संसारदक्ष होती. त्यांला तीन मुलें होतीं. पिरीनें त्या गांवांत एक लहानसें घर भाड्यानें घेतलें होतें. पण त्यानें काबाडकष्ट करून कांहीं पैसा सांचविला आणि तें घर त्याच्या मालकाकडून विकत घेतलें. तें त्याच्या मालकीचे झालें तेव्हां त्याला अतिहर्ष होऊन त्यानें आपल्या कांहीं मित्रांना मेजवानी दिली.

असा तो आनंदानें आपल्या घरांत नांदत असतां फ्रान्स व जर्मनी या देशांची सन १८७० सालीं मोठी लढाई सुरू झाली. त्या वेळीं लढाईचें काम शिकलेल्या सगळ्या

लोकांस आपले उद्योगधंदे सोडून ह्या लढाईंत सामील व्हावें लागलें. बाकीच्यांबरोबर पिरीवरही ही पाळी आली. पिरी तोफखान्यांतलें काम शिकला असून तोफेचा अचूक नेम मारण्याच्या कसबांत तो पुरा वाकबगार होता.

ह्या लढाईंत जर्मन लोक पारीसशहरापर्यंत चाल करून आले असून त्यांनीं आसपासची खेडीं सर केली होतीं. तेव्हां अर्थात् पिरी ज्या खेड्यांत रहात असे तेंही जर्मन लोकांच्या हातीं गेलें होतें. या खेड्यांत जमलेल्या जर्मन सैन्यावर पारीस शहरास भोंवतालच्या किल्ल्यांवरून तोफांचा भडिमार होत होता. पिरीच्या खेड्यासमोरील किल्ल्यावरील तोफा डागण्याच्या कामावर जे लोक होते त्यांत तोही होता. एके दिवशीं सेनापति नोवेल त्या किल्ल्यावर येऊन दुर्भिणींतून त्या खेड्याकडे पाहूं लागला. तेव्हां त्यांतील घरांतून जर्मन लोक दडून राहिल्याचा वहीम येऊन तो पिरीला हाक मारून म्हणाला: ‘‘त्या पलीकडच्या पुलाशेजारी झाडीमध्ये एक घर आहे तें तुला दिसत आहे काय?’’ हा प्रश्न ऐकून पिरीचें तोंड खरकन् उतरलें. तरी तो धैर्य धरून म्हणाला: ‘‘होय.’’ सेनापति म्हणाला: ‘‘त्या घरांत जर्मन लोक छपून राहिले आहेत असें वाटतें. तर त्यावर नेम धरून तोफ सोड आणि तें जमीनदोस्त करून टाक.’’ हा हुकूम ऐकतांच पिरीच्या अंगाला घाम सुटला, व त्याचा चेहरा अगदीं काळवंडून गेला. पण त्यानें आपल्या मनाची स्थिति कोणाला कळूं न देतां त्या घरावर बिनचूक नेम धरून तें त्यानें साफ पाडून टाकिलें. तें पाहून सेनापतीनेंत्याला शाबासकी देऊन म्हटलें: ‘‘चांगला, फार चांगला नेम मारिलास.’’ असें बोलून सेनापतीनें त्याच्या तोंडाकडे हसून पाहिलें तों पिरीच्या डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या आहेत असें त्याच्या नजरेला पडलें. तेव्हां सेनापतीने अंमळ कठोर स्वराने विचारिलें: ‘‘तुला वाईट वाटायाला काय कारण झालें रे?’’ पिरी दीन स्वरानें म्हणाला: ‘‘सेनापतिसाहेब, मला क्षमा करा. तें घर माझें स्वतांचें होतें. माझें सारें वित्त काय तें तेवढेच होतें! ’’

## कासाबियांका

अठराव्या शतकाच्या अखेरीस इंग्रज व फेंच यांच्या समुद्रावर लढाया चालल्या होत्या. त्यांपैकीं एक लढाई मिसरदेशालगतच्या समुद्रांत झाली. तींत फ्रेंचांच्या आरमाराचा ब्रिटिश आरमारानें पराभव केला. ही लढाई चालली असतां, फ्रेंचांचे लीओरिएन्ट नांवाचें एक लढाऊ जहाज होतें, त्याला आग लागून त्यांतील माणसांची तारंबळ उडाली. तें पाहून ब्रिटिश जहाजांवरील होड्या पाण्यांत लोटून त्या पेटत्या जहाजावरील लोकांचा बचाव करण्यांत आला. त्या जहाजावरील लोक प्राणरक्षणासाठीं शत्रूच्या

होड्यात उतरू लागले तेव्हां त्यावरील कप्तानाच्या एका दहाअकरा वर्षांच्या मुलास ते आपल्याबरोबर बोलावूं लागले. पण तो मुलगा त्यांच्याबरोबर जाईना. ज्या जागी तो उभा होता तेथून तो कांहीं केल्या हालेना. तो म्हणाला कीं, ''माझ्या बाबानें मला या जागीं उभे रहावयास सांगितले आहे. व त्याची मला अशी आज्ञा आहे कीं, ''माझ्या हुकमावांचून तूं येथून हालूं नको.' यास्तव त्याचा हुकूम झाल्यावांचून मी येथून कोठे जाणार नाहीं.'' लोक म्हणाले: ''तुझा बाप जखम लागून बेशुद्ध होऊन पडला आहे. तो मरणोन्मुख झाला आहे. तो अर्ध्यापाव घटकेनें मरण पावेल; आणि आगीचा भडका होऊन सगळें जहाज पेटण्यास विलंब लागणार नाहीं. अशा आगींत मरण पावण्यापेक्षां आमच्याबरोबर येशील तर तुझा प्राण वाचेल.'' हें त्यांचें सांगणे त्यानें मनास आणिलें नाहीं. तो आपल्या जागेवर निश्चल उभा राहिला. धुराचे व ज्वालांचे लोळ जवळजवळ येऊं लागले, तरी तो शूर मुलगा डगमगला नाहीं. तो आपल्या बापाला मोठ्यानें हाका मारून विचारू लागला कीं, ''बाबा, माझें काम आटोपलें कीं काय ते सांगा हो!'' त्याच्या हाकांस कांहींएक जबाब मिळेना. तेव्हां पळून जाणाऱ्या लोकांनी सांगितलें तें खरें आहे, अशी त्याची खात्री होऊन तो आपल्या बापाचा शोध करावयास खालीं गेला. तेथें तो बेशुद्ध होऊन पडलेला, त्यास आढळला. तेव्हां तेथें जवळच एक डोलकाठीचा तुकडा पडला होता. त्याला आपल्या बापाचे प्रेत बांधून तो त्यानें पाण्यांत लोटिला व त्याबरोबर तो स्वत: पाण्यांत उतरून त्या तरंगत्या तुळईबरोबर पोहूं लागला. पाण्यांत उड्या टाकलेल्या लोकांस वर घेण्यासाठीं ब्रिटिश लोकांच्या होड्या त्या जळत्या जहाजाच्या आसपास फिरत होत्या, त्यांतील एका होडीवरील खलाश्यांनीं तो मुलगा त्या तुळईला धरून पोहत आहे असें पाहिले; आणि त्याचा बचाव करण्यासाठीं ते आपली होडी त्याच्याकडे नेणार. तों त्या जळत्या जहाजाचा भयंकर स्फोट होऊन त्याचीं शकलें जिकडेतिकडे विखरलीं. त्या गर्दींत तो मुलगा व ती तुळई हीं कोणीकडे गेलीं, त्याचा पत्ता लागला नाहीं.

याप्रमाणें त्या अल्पवयी मुलानें असें भयंकर प्राणांतसंकट आलें असूनही आपल्या बापाचा हुकूम मोडिला नाहीं; आणि शेवटीं आपला बाप मरण पावला अशी खात्री होऊन तो त्या आगीच्या डोंबांत त्याला शोधावयास गेला; आणि तो जखम लागून बेशुद्ध पडला आहे असें पाहून त्याचा बचाव करण्याचा त्यानें निश्चय केला. शेवटपर्यंत त्याला त्यांने सोडिलें नाहीं. ही केवढी विलक्षण पितृभक्ति! ब्रिटिश खलाशी लहान वयापासून जहाजावर राहून अशी उत्तम शिस्त शिकतात, व मृत्यु त्यांनां केवळ कस्पटासमान वाटतो, म्हणूनच आज ब्रिटिश लोकांचें समुद्रावर साम्राज्य आहे.

## आगीचा इशारा

थंड देशांतल्या शाळांत हिंवाळ्यामध्यें मुलांस थंडीपासून उपद्रव होऊं नये म्हणून वाफेच्या नळ्या प्रत्येक वर्गांतून नेलेल्या असतात. त्यांच्या योगानें खोल्यांतील हवा गरम रहाते. पाणी जितकें जास्त गरम करावें तितकी जास्त वाफ नळ्यांत खेळून आतील हवा गरम होत असते, हें उघडच आहे. तिकडील शाळांतून हिंवाळ्यांत मोठ्या भट्ट्या पेटवून पुष्कळ पाणी तापवावें लागतें. अशा व्यवस्थेमुळें शाळांच्या इमारतींला आग लागण्याची भीति असते. असा प्रसंग आला असतां शाळांतील मुलांस कांहींएक गोंधळ न होतां बाहेर काढून देण्याची कवायत शिकवून ठेवावी लागते. तिला फायरड्रिल म्हणतात.

अमेरिकेंतील थंड प्रदेशांतल्या एका शाळेंत हिवाळ्यामध्यें भट्टी पेटती ठेवण्याच्या कामावर एक माणूस होता, तो एके दिवशीं आजारी झाला. त्याचा एक जाणता मुलगा त्या शाळेत जात असे. तो वरच्या वर्गात शिकत होता. तो आपल्या बापाला भट्टी पेटविण्याच्या वगैरे कामीं वेळोवेळां मदत करीत असे. त्यामुळें त्याला तें काम चांगले कळत होतें. तेव्हां अर्थात् आपल्या ऐवजीं आपला हा मुलगा भट्टी पेटविण्यासारखा आहे असें वाटून त्यानें त्याला तें काम करावयास सांगून असें बजाविले कीं, ''उष्णता वाढविण्याविषयीं शिक्षक आग्रह करितील. पण त्यांचें ऐकिले न ऐकिलेंसें कर. उष्णता जास्त वाढविण्यासाठीं भट्टीतला जाळ वाढवूं नको. कारण वाफ जेथून नळ्यांत जाते तो भाग उष्णतेने फाजील तापला तर शाळेच्या इमारतीला आग लागण्याची भीति आहे.''

हा मुलगा शाळेंत येऊन बापानें सांगितल्याप्रमाणें भट्टीची व्यवस्था ठेवीत असतां, उष्णता पुरेशी नाहीं अशा कागाळ्या शाळेच्या मुख्य शिक्षकाकडे येऊं लागल्या. तेव्हां तो खालीं भट्टीच्या जागी जाऊन त्या मुलास म्हणाला: ''उष्णता जास्त वाढेल अशी तजवीज ठेव.'' मुलगा म्हणाला: ''माझ्या बाबाने मला असें बजाविले आहे कीं, भट्टींत जाळ जास्त झाला तर इमारतीस आग लागण्याची भिती आहे.'' तो शिक्षक म्हणाला : ''कांहीं चिंता नाहीं. तूं आणखी थोडी उष्णता वाढविलीस तर कांहीं हरकत नाहीं. भट्टींत आणखी जाळ करून जास्त वाफ नळ्यांतून सोड आणि वर वर्गांत जाऊन बस.'' अशी आज्ञा त्यानें निक्षून केल्यावरून त्या मुलानें त्याच्या सांगण्याप्रमाणें केलें. कारण त्यानें असें मनांत आणिलें कीं, आपल्या बाबाला सुद्धा त्याचें ऐकावें लागलें असते.

तो मुलगा त्याच्या हुकमाप्रमाणें सगळी व्यवस्था करून वर जाऊन आपल्या वर्गांत बसला. पण बापाच्या सांगण्याची त्याला पुरी खात्री असल्यावरून कांहीतरी अपघात खास होईल असें त्याला वाटत होतें. म्हणून पहिला धडा होतांच तो धावत खालीं गेला; आणि भट्टीच्या खोलीपाशी तो जातो तों धुराचा लोळ त्याच्या दृष्टीस पडला, व लांकूड पेटून तडतड वाजत होतें त्याचा आवाज त्याच्या कानी आला. ती इमारत सगळी लांकडी होती. तेव्हां ती पेटून भडका होण्यास विलंब लागणार नाहीं. हें त्याच्या लक्षांत आलें; आणि बाहेर पडून आग लागल्याचा पुकारा करावा असें त्याच्या मनांत आलें. पण त्यानें लागलीच असा पोक्त विचार मनांत आणिला कीं, शाळेंतल्या तीन मजल्यांवर एकंदर सातशें मुलें आहेत. तीं सगळी आगीच्या पुकाऱ्याबरोबर घाबरून जाऊन जिन्यांत गर्दी करून चेंगरून जातील, व अशानें त्यांनां बाहेर पडण्यास विलंब लागेल; आणि तेवढ्या अवकाशांत आग भडकून तींत पुष्कळ मुलें सांपडून प्राणांस मुकतील. तर आपण असा एकदम पुकारा न करितां फायरड्रिलची वर्दी देऊन सगळ्या मुलांना व्यवस्थेनें खालीं उतरावे. असा बेत करून तो तिसऱ्या मजल्यावर धावत गेला, आणि प्रत्येक वर्गांत जाऊन फायरड्रिलची वर्दी त्यानें मोठ्या धिम्मेपणाने व हसतहसत दिली. ती वर्दी मुख्य शिक्षकाकडून आली आहे असें वाटून शिक्षकांनीं आपले वर्ग नेहमींच्या शिस्तीप्रमाणें सोडिले. अशीच वर्दी दुसऱ्या मजल्यावरच्या वर्गांस त्यानें दिली. याप्रमणें सगळीं मुलें भराभर खालीं उतरतांना पाहून, मुख्य शिक्षक तळमजल्यावर आपल्या खोलींत होता तो बाहेर येऊन त्या मुलास दरडावून म्हणाला: ''अरे, हें काय केलेंस? तुला अशी वर्दी न्यायाला कोणी सांगितलें?'' त्या मुलानें भट्टीच्या खोलीकडे बोट दाखवून म्हटलें: ''गुरुजी अशी ड्रिल करावीच लागली.'' इतक्यांत आगीचा भडका होऊन वरचा मजला पेटलेला त्याच्या दृष्टीस पडला. आग इतकी झपाटल्यानें पसरली कीं, तळमजल्यावरील वर्गांतल्या मुलांस बाऱ्यांतून खालीं उतरावें लागलें. याप्रमाणें त्या मुलाच्या अंगच्या प्रसंगावधानामुळें सगळ्या मुलांचा बचाव झाला; आणि आगीच्या कवायतीची वर्दी मिळतांच एकदम सगळ्यांनीं वर्गांबाहेर पडून एकामागून एक जिन्यांवरून खालीं उतरावें, अशी जी शिस्त लावून दिली होती ती पाळण्यास त्या शाळेंतील मुलें अगदीं तयार असल्यामुळें त्या सगळ्यांचा बचाव झाला.

## पहारेकरी आणि राजा

प्रशियाचा राजा रशिया व आस्त्रिया या देशांशी लढत असतां त्याच्या सैन्याचा तळ एका खोऱ्यात असून त्याच्या दुसऱ्या बाजूला शत्रूच्या सैन्याचा तळ होता. रात्रीच्या

समयीं छावणीच्या आसपास सक्त पहारा ठेवावा लागतो; आणि शत्रू जवळ असला म्हणजे तर तो विशेषच कडक असावा लागतो. अशा पहाऱ्यावर रात्रीच्या वेळीं उइलियम बासम नांवाचा एक प्रशियन शिपाई होता. या रात्रीं पराकाष्ठेची थंडी पडली होती; आणि तो शिपाई थंडीवाऱ्यानें अगदीं गारठून गेला होता. पहाऱ्यावर असें कुडकुडत रहावे त्यापेक्षा शत्रूशी लढण्याचा प्रसंग येईल तर तो पुष्कळ बरा, असें त्याला होऊन गेलें; आणि तो मोठ्याने बोलला कीं, ''राजा स्वत: अशा थंडींत बाहेर पडेल व माझ्यासारखा हिंवांत रखडत राहील, तर त्याला ही लढाई नकोशी होऊन ही तो लौकर आटपील.'' हे त्याचे शब्द जवळच कोणी होता त्यानें ऐकून त्याला असा जबाब दिला कीं, ''त्यालाहि कंटाळा आला नसेलसें तुला कशावरून वाटतें?'' हे शब्द ऐकतांच बासम शुद्धीवर येऊन आपल्या कामाचें त्याला तत्काळ भान झालें, आणि चटदिशी खांद्यावर बंदूक घेऊन त्यानें मोठ्याने पुकारिलें: ''कोण आहे तो?'' तो नवखा मनुष्य म्हणाला: ''दोस्त आहे.'' तो पहारेकरी म्हणाला: ''दोस्त असलास तर असा पुढें येऊन आपला खुणेचा शब्द सांग.'' त्यानें तो सांगतांच पहारेकरी त्याला म्हणाला: ''दोस्त, सगळें कांहीं ठीक आहे; जा.''

पण तो चालता झाला नाहीं. तो त्या पहारेकऱ्याजवळ आला.तो असा जवळ आला तरी त्यानें त्याला ओळखिलें नाहीं. कारण, त्यानें घोडेवाल्याचा झगा पांघरावयास घेतला असून डोळ्यांवर टोपी ओढिली होती. तो त्या पाहरेकऱ्यास म्हणाला: ''मित्रा, ही जागा फारच सर्द आहे, व थंडीहि फार पडली आहे. तर तुझा चुट्टा कां पेटवीत नाहीस? तमाखूचे दोन झुर्के मारिलेस तर तुझी थंडी पळणार नाहीं का?''

पहारेकरी–काय तंबाखू ओढूं! भाई, तूं कोठून आलास? नोकरीवर असता तंबाखू ओढण्याची सक्त मनाई आहे, हें तुला ठाऊक नाहीं काय?

नवखा मनुष्य–पण खुद्द राजाने तुला तंबाखू ओढण्याची परवानगी दिली तर तूं ओढणार नाहींस का?

पहारेकरी–राजानें? पण आमचा कॅपटन काय म्हणेल? राजाच्या कानावर गोष्ट जाण्यापूर्वीं माझ्या पाठीवर मात्र कोरडे बसतील!

नवखा मनुष्य–अरे, पण आतां येथें कॅपटन कोठे पाहायाला आला आहे? काढ, काढ, तुझा चुट्टा काढ! मी कांहीं कोणाला सांगणार नाहीं.

पहारेकरी–(रागास चढून) अरे लुच्च्या! मला पेंचांत आणायाचा तुझा बेत आहे असा मला आतां तुझा संशय येतो. तर आतां बऱ्या बोलानें येथून चालता हो कसा! नाहीं तर तुझें पाहा काय करीन तें.

नवखा मनुष्य– (हसून) तूं तंबाखू ओढून काय होतें तें पाहा तर खरें.

हे त्याचे थट्टेचे शब्द ऐकतांच त्या पहारेकऱ्यानें त्याच्या डोकीवर एक ठोसा मारिला. त्याबरोबर त्याच्या डोकीची टोपी उडून त्या तडाक्यानें त्याची झोकांडी गेली. अमळशानें तो नवखा मनुष्य पूर्वस्थितीवर येऊन निराळ्या स्वराने म्हणाला: ''ह्यासंबंधानें तुला उद्यां काय तें कळेल, आणि याचा तुला योग्य मोबदला मिळेल. भिऊं नको. सलाम.'' असें बोलून खालीं वांकून त्यानें कांहींसें जमिनीवर पडलें होतें तें उचलून घेतलें, आणि मग तो तेथून चालता झाला.

अशा रीतीनें तो स्वर बदलून बोलला, आणि धमकी देऊन निघून गेला. त्यामुळें त्या शिपायाच्या पोटात धास्ती उत्पन्न झाली. त्याला वाटलें कीं, आपण कोणातरी बड्या अंमलदाराची बेअदबी केली असावी. तो कर्नल किंवा फार तर जनरल असावा. असा त्यानें तर्क केला. पण तो मनांत म्हणाला कीं,''त्याला आपलें नांव कांहीं ठाऊक नाहीं, व अमक्याच ठिकाणीं आपण पहाऱ्यावर होतों हेंही त्याला रात्रीचा काळोख असल्यामुळें उमगणार नाहीं.'' असें समाधान तो मानून घेत आहे, इतक्यांत तंबाखूची पिशवी त्याच्या कमरपट्ट्याला होती ती कोठे नाहीशी झाली असें त्याला आढळून येऊन तो घाबरला. कारण तो नवखा माणूस जाते वेळीं ओणवून कायसें उचलून घेऊन चालता झाला होता. हें त्याच्या ध्यानांत आलें. ती आपली पिशवीच असावी असें त्याला वाटलें. त्या पिशवीवर त्याचें पुरे नांव होतें, ह्यामुळे त्याचें मन अगदी अस्वस्थ झालें. नंतर अर्ध्या तासानें त्याच्या जोडीदारानें त्याला पहाऱ्यावरून सोडविलें; आणि तो जाऊन निजला. पण ह्या चिंतेमुळे त्याला झोंप येईना. आपण हुकमाप्रमाणें वागल्याबद्दल सेनापति आपणास शिक्षा करणार नाहीं अशी तो आपल्या मनाची समजूत करी. पण तो अंमलदार आहे, तो मनास वाटेल तें करील, असाही धाक त्याच्या मनाला वाटूं लागला.

दुसरें दिवशीं सकाळीं त्या पहारेकऱ्याला न्यावयास चौघे शिपाई आले. त्यांनीं त्याला छावणीच्या मुख्य ठिकाणीं नेंलें. तेथें सगळे सेनापति एका पातळ अंगाच्या गलीच पेहराव केलेल्या मनुष्यासभोंवतीं उभे आहेत असें त्यानें पाहिलें; आणि तो खुद्द राजा फ्रेडरिक दि ग्रेट आहे असें त्याला तत्काळ कळलें त्या पहारेकऱ्याला जवळ नेलें तेव्हां त्याच्याकडे डोळे वटारून पाहून राजा जवळच्या सरदारांस म्हणाला: ''गृहस्थहो, प्रशियाच्या राजावर जो शिपाई हात घालितो त्याला कसली शिक्षा करावी?'' त्यांनीं उत्तर केलें: ''देहांतशिक्षा करावी.'' राजा म्हणाला: ''तर मग, हा

तो शिपाई; ही पाहा त्याची तंबाखूची पिशवी. हीवर ह्याचे पुरें नांव आहे.'' तें ऐकून तो शिपाई गुडघे टेकून व हात जोडून म्हणाला: ''खावंदांनीं मजवर दया करावी! मी रात्रीं ज्याच्याबरोबर बोलत होतो ती खावंदांची स्वारी होती हें मला ठाऊक नव्हतें.'' राजाने त्याच्या खांद्यावर थाप मारून म्हटलें; 'मलाही तसेंच वाटतें. जसा तूं हुकूम पाळण्यात दक्ष आहेस, तसे माझे इतर शिपाई दक्ष रहातील अशी मला उमेद आहे. मी रात्रीं जाते वेळीं म्हटलें होतें कीं, 'याचा तुला योग्य मोबदला मिळेल.' तर तो आतां देतो आज तुला मीं सार्जंटच्या हुद्याला चढविलें आहे.''

❑❑❑

## भाग दुसरा

# आज्ञाभंगाचे वाईट परिणाम

## सुंदर फळ

एके ठिकाणीं एक मोठा बाग होता. त्यांत नाना प्रकारचीं लहानमोठीं झाडें लाविलीं होतीं. वनस्पतिशास्त्राचा अभ्यास करणारांस तेथें बहुतेक प्रकारच्या वनस्पतींचे मासले पाहायाला मिळत. ह्या बागांत एके दिवशीं एक मुलगा झाडांची शोभा पाहत हिंडत होता. तो एका लहान झाडापाशीं येऊन तें मोठ्या कौतुकानें पाहूं लागला. कारण त्याचीं पानें व फळें सुंदर दिसत होतीं. तें पाहतां पाहतां त्याला असा मोह पडला कीं, त्याचें एक फळ काढून खावें. मग आसपास कोणी नाहीं असें पाहून त्यानें त्या झाडाचे एक फळ पटकन तोडून तें चाविलें. त्याबरोबर त्याचा चटका तोंडाला बसून तो मोठ्यानें ओरडला; आणि त्यानें तें फळ खालीं टाकिलें. त्याची आई जवळ होती, ती त्याची ओरड ऐकून त्याच्यापाशीं आली. तेव्हां आपल्या मुलाची कृति तिच्या लक्षांत येऊन ती त्याला रागें भरून बोलली: ''वेड्या मुला, मीं तुला किती वेळां बजावून सांगितलें आहे कीं, जें फळ तुझ्या ओळखीचें नाहीं, तें तूं मला दाखविल्यावांचून कधीं खाऊ नको. हें फळ तूं खाल्लें असतेंस तर तूं तत्काळ मेला असतास. शिवाय ह्या बागांतल्या झाडांला हात लावूं नको अशी मीं तुला अनेक वेळां ताकीद दिली असतां तूं आपली ही वाईट खोड कांहीं सोडीत नाहींस.''

## आज्ञाभंगाबद्दल देहांतशासन

प्रशियाचा राजा फ्रेडरिक दि ग्रेट हा एका मोहिमेवर गेला असतां एके ठिकाणीं आपल्या सैन्याचा तळ देऊन छावणीस राहिला. ही छावणी शत्रूस कळूं नये म्हणून रात्रीच्या अमुक घटकेस छावणींतल्या सगळ्या लोकांनी दिवे मालवावे; जो कोणी हा

हुकूम मोडील त्याला देहांतशिक्षा होईल, असें त्यानें फर्माविलें. ह्या हुकमाप्रमाणें सगळे लोक वागतात किंवा कसें हें पाहण्यासाठी हा राजा रात्रीच्या वेळीं छावणीतून फिरत असतां एका तंबूत दिवा आहे असें त्याच्या नजरेस पडलें. त्याबरोबर तो त्यांत शिरून पाहतो तों एक अंमलदार एक पत्र लिफापांत घालून तो बंद करीत आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. राजाने त्याला दरडावून विचारिले: ''तुला माझा हुकूम मोडण्याचे धैर्य कसें झालें!'' अंमलदार म्हणालाः ''खावंद सरकार, मी माझ्या बायकोला हें पत्र लिहीत होतों.'' राजा बोलला: ''असें काय? तर थांब. तो लिफाप बंद करूं नको. त्या पत्राच्या शेवटीं असें लिही कीं, ''हें पत्र तुझ्या हातीं जाण्यापूर्वी राजाचा हुकूम मोडिल्याबद्दल मला तोफेच्या तोंडी देणार आहेत.''

फ्रेडरिक राजाची ही कृति मोठी निष्ठुरपणाची होती असें कोणास वाटेल. पण असें पाहा कीं, त्या अंमलदाराच्या कुचराईमुळें शत्रूला ती छावणीची जागा उमगून तो तीवर कदाचित् छापा घालिता, तर हजारो माणसांचा संहार होण्याचा संभव होता. यास्तव सगळ्या लोकांना जरब पोंचावी म्हणून त्याला त्या अंमलदारास अशी कडक शिक्षा करावी लागली.

## आज्ञाभंगाचा वाईट परिणाम

एका शेतकऱ्याची शेतवाडी रेल्वेलाइनीच्या बाजूला होती; आणि त्याचा शेतातला मांगर लाइनीच्या अगदी जवळ होता. तेथून जवळच लाईन ओलांडून गांवांत जाण्याची वाट होती. एके दिवशीं त्या शेतकऱ्यानें आपल्या एका तरुण नोकराला गांवांतून कांहीं निर्वाहाचे पदार्थ आणायाला पाठविलें. त्यानें त्याला आपला खटारा घेऊन जावयास सांगून असें बजाविले कीं, लाईन ओलांडून जातां येतां लाइनीची दोन्ही फाटक प्रथम उघडून मग खटारा आंत न्यावा, आणि एका बाजूने फाटकें बंद करून घेऊन लाइनींतून बाहेर पडल्यावर दुसरें फाटक लावून घ्यावे. धन्यानें सांगितलेलें काम करून त्यानें खटारा घराकडे हाकिला; तेव्हां त्याच्या ओळखीचे कित्येक मुलगे खटाऱ्यांत मौजेखातर चढले. तो लाइनीच्या फाटकापाशीं आला तेव्हां आपल्या धन्याच्या ताकिदीचा परवा न करून एकच फाटक उघडून तो खटारा आंत घेऊन आला, आणि तो लाइनीवरच ठेवून दुसरें फाटक उघडावयास लागला. इतक्यांत एक गाडी मोठ्या वेगाने आली, आणि जवळचे वळण सोडून त्या वाटेवरून केव्हांच निघून गेली. तिच्या झपाट्यासरशीं तो खटारा ताडकन उडून त्याचा चुराडा झाला. आणि आंतले मुलगे जवळच्या वईंत

जाऊन पडले. फाटक उघडून परत येऊन आगगाडी येण्यापूर्वीं खटारा लाइनीवरून नेण्यास त्याला साधलें नाहीं. ह्याप्रमाणें त्याच्या अल्लडपणामुळे त्या मुलांस जबर दुखापत झाली खटाऱ्याचा तट्टू प्राणास मुकला, आणि गाडी मोडून पडली.

## हुकमाप्रमाणें वागलेंच पाहिजे

इंग्लंडांतल्या एका मोठ्या व्यापाऱ्याचीं बरींच जहाजे होतीं. त्यांतून तो आपला माल दूर देशीं पाठवीत असे. एकें वेळीं त्यानें एका जहाजांत माल भरून त्यावरील कप्तानाला असें फर्माविले कीं, हा माल हिंदुस्थानांत नेऊन विकावा, आणि त्याचे जे पैसे येतील त्यांचा अमुक प्रकारचा माल विकत घ्यावा. त्या कप्तानाने तो माल किफायतीच्या दरानें विकून आलेल्या पैशांचा धन्यानें सांगितलेला माल न घेतां दुसऱ्याच जातीचा माल खरेदी केला. कारण त्याला वाटलें कीं, ह्या दुसऱ्या मालाचा सौदा केला तर आपल्या धन्याला विशेष फायदा होईल; आणि ह्या त्याच्या अटकळीप्रमाणें त्या मालाच्या व्यापारांत दोनतीन हजार पौंडाचा जास्त फायदा झाला. तो त्यानें आपल्या धन्याच्या स्वाधीन केल्यावर त्यानें त्याला त्याचें ठरलेलें वेतन देऊन आणखी बरीच रक्कम इनामादाखल दिली, आणि त्याला कामावरून तत्काळ दूर केलें. ह्या गोष्टीचें आश्चर्य वाटून त्या कप्तानानें त्याला विचारिलें: ''अहो, मीं तुमचा एवढा मोठा फायदा करून दिला असून तुम्ही मला नोकरीवरून दूर करितां याचें कारण काय?'' व्यापारी म्हणाला: ''ह्या खेपेस तूं माझ्या सांगण्याप्रमाणें न वागतां मला किफायत करून दिलीस. पण दुसऱ्या एकादे वेळीं असें होईल कीं, तूं माझें न ऐकितां भलताच एकादा सौदा केलास तर त्यांत मला तोटा येईल, किंवा माझें सर्वस्वीं नुकसान होईल. तेव्हां असला आज्ञा मोडणारा कप्तान माझ्या मुळीं उपयोगाचा नाहीं.'' असें निक्षून सांगून त्यानें त्याला नोकरीवरून दूर केलें. पुढें ह्या कप्तानानें त्याच्याकडे पुनः नोकरी मिळावी म्हणून पुष्कळ खटपट केली. पण ती सगळी व्यर्थ गेली.

## गैदी मुलगी

एका श्रीमंत गृहस्थांची एक मुलगी होती. तिला घरांत एक स्वतंत्र खोली दिली होती. तींत तिचें सगळे सामानसुमान, कपडालत्ता वगैरे असे. ह्या तिच्या वस्तु खोलींत अस्ताव्यस्त पडलेल्या असत. तिची आई तिला ह्याबद्दल वेळोवेळां बोले. पण त्याचें त्या मुलीस कांहीएक वाटत नसे. खोलीतल्या वस्तु जेथल्यातेथें नीटनेटक्या लावून ठेवण्याचा तिला पुरा आळस असे. 'अशा गैदीपणाबद्दल तुला एकादे वेळीं अद्दल घडेल,' असें तिची आई तिला वारंवार बजावी.

एके दिवशीं तिसऱ्या प्रहरीं त्या मुलीच्या एका मैत्रिणीनें तिला टोपलीभर द्राक्षें आणून दिली. त्या वेळीं ती पेहराव करून बाहेर जावयास निघत होती. म्हणून तिनें ती टोपली आपल्या खोलींत नेऊन एका खुर्चीवर ठेविली. बाऱ्यांवरून व टेबलावरून कपडे वगैरे पडले होते. म्हणून ती टोपली तिला खुर्चीवर ठेवावी लागली. काळोख झाला तेव्हां ती सहल करून परत आली, आणि अंगातले कपडे काढण्यासाठी अंधारांतच एका खुर्चीवर बसली. पण तत्काळ वर उठून तिने मोठी किंकाळी मारिली. त्याबरोबर तिची आई दिवा घेऊन तिच्या खोलींत धावत आली, आणि पाहते तों ती काळोखांत या फळांच्या टोपलीवर बसल्यामुळें तीं चिरडून जाऊन त्यांच्या रसांत तिचा उंची पांढरा झगा भरून गेला आहे, असें तिच्यां दृष्टीस पडलें. तिचा तो झगा इतका बिघडून गेला कीं, तो पुनः घालिता येण्याजोगा नव्हता. हा असा तिचा हलगरजीपणा पाहून आई तिच्यावर फार रागावली आणि म्हणाली: ''तुला मी सगळ्या वस्तु जेथल्या तेथें नीट लावून ठेवावयास नेहमी सांगत असतां तूं माझें कधीं ऐकिलें नाहींस, याचें तुला हें योग्य शासन झालें.''

## नवा पेहराव

विलायतेंत एका कुटुंबांतल्या मुलीचा वाढदिवस आला. तेव्हां तिच्यासाठी नवा पेहराव तयार करवून तो तिला कसा होतो तें पाहण्यासाठीं तिच्या आईने शिंप्याला तो घेऊन बोलाविलें. तो अतिसुंदर व उंची होता. तो पाहून त्या मुलीस मोठा हर्ष झाला. तिने तो घालून पाहिला. तो तिला चांगला झाला. मग तिची आई तिला म्हणाली: ''मुली, आपल्या शिंप्यानें तुझा पेहराव चांगला तयार केला आहे. तरी त्याला आपण कांहीं तरी प्यायाला देऊं या. खालीं जाऊन फडताळांतली ती शरबताची बाटली आण. अंधार झाला आहे, म्हणून दिवा घेऊन जा, आणि बाटली नीट संभाळून काढ.''

आईच्या सांगण्याप्रमाणें ती खालीं बाटली आणण्यास गेली. पण दिवा पेटवून नेण्याचा तिनें आळस केला. फडताळांतली बाटली आणून एका पेल्यांत तिने ओतिली, आणि तो मोठ्या आदरशीलतेनें त्या शिंप्याला दिला. त्यानें तो घेऊन तोंडास लाविला आणि एक घोट घेतला. तो कसासाच लागल्यामळें त्यानें तो चटकन थुंकून टाकिला. तेव्हां संशय येऊन तिनें कसली बाटली आणिली तें आईनें दिवा आणून पाहिलें, तों ती शाईची आहे असें तिला आढळून आलें. तो तिचा निष्काळजीपणा पाहून आईला तिचा फार राग आला, आणि शिंप्याने तोंडातल्या शाईचा चूळ बाहेर टाकिला तेव्हां

त्याचे फवारे त्या मुलीच्या पेहरावावर पडून त्याला पुष्कळ डाग पडले. तें पाहून ती मुलगी मोठ्यानें रडूं लागली. शिंपी खट्टू होऊन गेल्यावर आईनें तिला म्हटलें; ''तुझा हा पेहराव असा अगदीं खराब होण्याला कारण तूंच आहेस. हा आतां घालण्याची मुळींच सोय नाहीं. त्याला इतके पैसे खर्चून फुकट गेले. उद्यां तुझ्या वाढदिवसासाठी तुला नवा पोशाक घालायास मिळणार तर नाहींच; पण दुसरा नवा तुला आणखी एक वर्ष मिळणार नाहीं. तूं माझ्या सांगण्याप्रमाणें वागून दिवा घेऊन फडताळ उघडिलें असतें, तर तुझ्या हातून अशी चुकी झाली नसती. तूं मोठी आळशी व आपढंगी आहेस. तुला ही शिक्षा केलीच पाहिजे. त्याशिवाय तूं वाटेवर यावयाची नाहीस.''

## आपढंगी मुलगा

एका गृहस्थाच्या घराच्या मागल्या बाजूस एक विहीर होती. तिचें तोंड फळ्यांनीं झांकून पाणी काढावयास पुरे एवढें भोंक ठेविलें होतें; व तेथें एक कपी लावून तींतून दोर सोडिला होता. त्या विहिरीचा हा असा बंदोबस्त करण्याचें प्रयोजन अर्थात् असें होतें कीं, लहान मुलें घरांत होतीं, तीं विहिरींत पडू नयेत. त्यांनीं विहिरीपाशीं मुळीं जाऊं नये अशी त्यांला ताकीद होती.

एके दिवशीं मागीलदारच्या परसांत कांहीं मुलें खेळत होतीं, त्यांस कांहीं वेळानें खेळाचा कंटाळा आला, आणि आतां वेळ कसा घालवावा याचा तीं विचार करूं लागलीं. इतक्यांत त्यांतल्या एकाच्या डोक्यांत असें आलें कीं, विहिरीपाशीं जाऊन तिजवरचें झांकण उचलून आंत पाहावें. त्याचे सोबती म्हणाले: ''विहिरीपाशीं जाऊं नका अशी ताकीद आम्हांला बाबांनीं केली आहे. बाबांची आज्ञा आपण मोडूं तर आम्हांला शिक्षा होईल; व न जाणो कदाचित् आपण विहिरींत पडूं.'' तो मुलगा म्हणाला: ''बाबा उगीच काहीतरी सांगतात. विहिरीपाशीं जायाला काय हरकत आहे? हा पाहा, मी जाऊन तें झांकण उचलितों.'' असें बोलून तो अल्लड मुलगा विहिरीपाशीं गेला, आणि झांकण वर उचलून आंत डोकावून पाहूं लागला. तोल सावरावा म्हणून त्यानें कपीच्या दोरास धरिलें होतें. तो दोर त्याच्या भारानें खालीं सरकल्यामुळें तो विहिरींत कोसळला. विहिर फार खोल नव्हती, व तींत पाणीही थोडें होतें. म्हणून त्याला फारशी दुखापत झाली नाहीं, व गटंगळ्या खाव्या लागल्या नाहींत. तो विहिरींत पडला हें पाहनू बाकीचीं मुले घाबरून विहिरीजवळ धावत गेलीं. त्यांस त्या मुलानें दोर वरती ओढायास सांगितलें. पण त्यांला तो त्याच्या भारासकट वर ओढितां येईना.

तेव्हां जवळच कांहीं माणसें काम करीत होतीं, त्याला त्यांनीं हाका मारिल्या. त्याबरोबर त्या माणसांनीं धावत येऊन त्यास वर काढिलें. अबधाकामुळें व पाण्यांत भिजल्यामुळें तो आजारी झाला. त्यांतून बरा व्हावयाला त्यास बरेच दिवस लागले.

## अल्लड मुलगी

एका बाईची एक मुलगी होती. ती अमळ हूड व अल्लड होती. शिवाय तिला कसलेंच काम नको असे. त्यामुळें ती वडिलांच्या आज्ञेचें वेळोवेळां उल्लंघन करीत असे. ती आपल्या आईला एके दिवशीं म्हणाली कीं, ''मला एक मैना हवी आहे. ती मला विकत घेऊन दे.'' तिची आई म्हणाली: ''तूं नीट रीतीनें वागूं लागलीस, माझें सांगितलेलें ऐकूं लागलीस, आणि आळस टाकून देऊन आपलें काम नेमानें करूं लागलीस म्हणजे मी तुला मैना विकत घेऊन देईन.'' ह्याप्रमाणें जपून वागण्याचें त्या मुलीनें कबूल केलें. नंतर एके दिवशीं ती शाळेंतून परत आली तेव्हां तिची आई तिला म्हणाली: ''मुली टेबलावर ही लहान पेटी आहे, हिला हात लावू नको. हें माझें सांगणे ऐकशील तर तुला अतिशयित आनंद वाटेल अशी एक वस्तु देईन.'' असें सांगून ती शेजारच्या घरीं गेली. इकडे ती मुलगी मूळस्वभावावर जाऊन त्या पेटींत काय आहे तें पाहण्यास अगदीं उत्सुक झाली; आणि आईची पाठ वळली न वळली तो तिने ती पेटी उचलिली. ती हलकी असून तिच्या झांकणाला लहानलहान छिद्रे आहेत असें पाहून तिनें ती लागलीच उघडिली. त्याबरोबर, आंत एक सुंदर मैना होती, ती भुरकन उडाली. तेव्हां ती अगदीं घाबरून गेली, आणि ती मैना धरण्यासाठीं ती खोलीत इकडूनतिकडे धावपळ करायास लागली. पण ती कांहीं केल्या तिच्या हातीं लागेना. अशी तिची धांदल चालली आहे तो तिची आई घरांत आली; आणि पाहते तो त्या अल्लड पोरीने आपल्या आज्ञेची परवा न करितां पेटी उपटून मैना सोडून दिली, असें तिच्या दृष्टीस पडलें. त्यावरून आईनें तिला मोठा दोष दिला, आणि म्हटले: ''मुली, तुला ती मैना मी देणार होतें. पण तूं माझें ऐकिलें नाहीस. तेव्हां तुझ्यासारख्या वाईट मुलीस ती न देता दुसऱ्या एकाद्या चांगल्या मुलास द्यावी असें मला वाटतें. तर आतां ती तुला मिळायाची आशा धरू नको.'' असें म्हणून तिनें ती मैना धरून शेजारच्या ऐका चांगल्या मुलास दिली.

## हूडपणाचा भयंकर परिणाम

अमेरिकेत वेस्ट इन्डीज नांवाची बेटें आहेत. त्यांपैकीं एका बेटाच्या किनाऱ्यापाशीं एक मगर वारंवार येऊन पाण्यांत पोहणाऱ्या शिद्यांस व खलाशांस उपद्रव करीत असे.

त्याच्या पायीं पुष्कळ माणसांचा प्राणनाश झाला होता. म्हणून त्या बंदरांतील पाण्यांत कोणी स्नान करूं नये किंवा पोहूं नये, अशी दवंडी पिटिली होती. पण तिची परवा न करितां एक तरुण मुलगा पाण्यांत उतरून पोहूं लागला. त्याचा भाऊ त्याच्याबरोबर आला होता, त्यानें त्याला पाण्यांत उतरू नको म्हणून सांगितलें, व बापानें त्यासंबंधानें ताकीद दिली होती, तिची त्याला आठवण दिली. पण त्याचें सांगणे त्यानें जुमानिलें नाहीं. तो थोडा दूर पोहत गेला तों तो मगर त्याच्या दृष्टीस पडला. त्याबरोबर तो घाबरून मोठ्या वेगानें पोहत माघारी येऊं लागला. त्याचें भयंकर संकट पाहून त्याच्या भावाने मोठ्यानें किंकाळी फोडिली. ती, त्यांचा एक तरुण शिद्दी गुलाम जवळच काम करीत होता, त्यानें ऐकिली, आणि किनाऱ्यावर धावत येऊन आपल्या छोट्या धन्याचा बचाव करण्यासाठीं पाण्यांत उडी टाकिली. तो गुलाम मोठा पट्टाईत पोहणारा होता. मगराच्या तावडींतून सोडविण्यासाठीं त्या मुलास धरून किनाऱ्याकडे लोटीत आणण्याचा प्रयत्न त्यानें चालविला. इतक्यात त्या मगरांने त्या मुलाच्या एका हाताचा लचका तोडिला! तो त्या गुलामाच्या वेंगेंत होता म्हणून निभावला; नाहीं तर त्या मगराने त्याला ओढून नेलेच असतें. त्या शूर गुलामाने त्याला पुढें घालून किनाऱ्याकडे चालविलें असतां मगरानें पुनः झडप घालून त्याचा पाय धरिला. इतक्यांत किनाऱ्यावरच्या लोकांनीं पाण्यांत उड्या टाकून त्या दोघांसही किनाऱ्यावर ओढून आणिलें. त्या ओढाताणींत त्या बिचाऱ्या गुलामाचा पाय मगराने तोडून नेला!

त्या मुलाच्या बापानें त्याची चांगली खरडपट्टी काढिली, आणि आज्ञाभंग करून आपला व त्या बिचाऱ्या गुलामाचा जीव धोक्यांत घातल्याबद्दल तो त्याला पुष्कळ बोलला. ह्याप्रमाणें तो आपढंगी मुलगा जन्माचा थोटा झाला; आणि त्याच्याबरोबर तो इमानी गुलाम जन्माचा पांगळा झाला.

## आज्ञाभंगाबद्दल प्रायश्चित्त

जॉन्सन नांवाचा एक मोठा विद्वान् ग्रंथकर्ता अठराव्या शतकांत इंग्लंडामध्यें होऊन गेला. त्याची कीर्ति व मान्यता चोहींकडे अतिशयित झाली होती. त्याच्या वेळच्या सगळ्या विद्वानांस तो पूज्य वाटे. तो एकदा लिचफील्डनामक शहराजवळील एका खेड्यांत आपल्या मित्रांस भेटण्यासाठी गेला. त्यांच्या घरीं असतां एके दिवशीं तो मोठ्या पहाटेस उठून एकटाच कोणीकडे निघून गेला. सकाळच्या न्यहारीला किंवा दुपारच्या भोजनाला आपला पाहुणा आला नाहीं म्हणून घरच्या मंडळीस मोठी काळजी

लागून राहिली. ते दिवस हिंवाळ्यातले असून बर्फाचा वर्षाव सगळा दिवस सारखा होत होता. अशा गारठ्यांतून तो कोठे निघून गेला असावा हें त्याला कांहींच कळेना. शेवटीं संध्याकाळ झाली तेव्हां तो परत आला. त्या वेळीं त्याच्या अंगावर बर्फ पडून सगळे कपडे भिजून चिंब झाले होते; आणि तो थंडीने कुडकुडत होता. ही त्याची अवस्था पाहून त्याच्या मित्रांस मोठा अचंबा वाटला. पण, 'आपण सगळा दिवस कोठे होतां' असें त्याला विचारण्याचें धैर्य कोणालाही झालें नाहीं. मग रात्रीच्या भोजनास मंडळी बसली तेव्हां त्यानें आपण होऊन आपली त्या दिवसाची हकीकत घरधनिणीला सांगून साऱ्या दिवसांत घरीं परत न आल्याबद्दल तिची क्षमा मागितली. तो म्हणाला: ''पन्नास वर्षांपूर्वीं ह्याच दिवशीं मी पित्राज्ञाभंगाचें मोठे पातक केलें होतें. तें तेव्हांपासून हा दिनपावेतो माझ्या मनाला डाचत होतें. माझा बाप पुस्तके विकीत असे. त्याचें पुस्तकांचें दुकान लिचफील्डशहरांतल्या बाजारांत होतें. तें तो नित्य नेमानें जाऊन उघडीत असे. एके दिवशीं तो आजारी झाला, आणि त्याच्यानें दुकान उघडावयास जाववेना. तेव्हां त्यानें मला सांगितलें कीं, 'बाजारांत जाऊन दुकान उघडून बस.' मी पाठशाळेंत शिकणारा विद्यार्थी असल्यामुळे मला असें वाटलें कीं माझ्यासारख्यानें दुकानावर बसणें हें हलके काम आहे. असें मनांत येऊन मीं त्याचें ऐकिलें नाहीं. हा मजकडून आज्ञाभंग झाला होता. त्याचें प्रायश्चित्त करावें असें माझ्या मनांत येऊन मी आज सकाळीं गाडींत बसून त्या शहराच्या बाजारांत गेलों; आणि ज्या जागीं माझ्या बापाचें दुकान होतें तीसमोर रस्त्यांत उघड्या माथ्यानें मी एक तास उभा राहिलों. वरून बर्फाची वृष्टि होत होती, व बाजारांतले लोक मजकडे टकमक पाहत होते, व अशा कृतीबद्दल माझा उपहास करीत होते. पण तें मीं मुळींच मनास आणिलें नाहीं. अशा रीतीनें मीं माझ्या पित्याची जी ही एकाच प्रसंगीं अवज्ञा केली होती, तीबद्दल मीं आज प्रायश्चित्त केलें आहे.

## हुकमाप्रमाणें न वागणारी दासी

एका श्रीमंत बाईची एक दासी होती. ती मोठी आळशी व निष्काळजी होती. तिला कोणतेंही काम अनेक वेळां सांगितलें तरी तें ती मन लावून करीत नसे. तिला तें पुनःपुनः सांगावे लागे. एके दिवशीं तिची धनीण कोठें बाहेर जावयास निघाली, तेव्हां तिनें तिला बजाविले कीं, ''तूं कोठें बाहेर जायाची असलीस तर सगळीं दारे नीट झाकून घे. विशेषत: रस्त्यावरचा दरवाजा झांकावयास विसरूं नको. ही गोष्ट मीं

तुला अनेक वेळां सांगितली आहे, पण तुझा हलगर्जीपणा कांहीं जात नाही. दारें उघडीं टाकिलींस तर घरांत कोणी तरी शिरून आह्मांला लुटील, याची तुला कांहींच धास्ती वाटत नाहीं. तर आज तरी संभाळ. मी परत येईतोपर्यंत घरांतून कोठे दूर जाऊं नको.'' असें बजावून ती घरधनीण निघून गेली. ती जातांच ती दासी घरांत पाणी भरण्याच्या निमित्तानें जवळच्या विहिरीवर गेली. त्या वेळीं तिला धनिणीनें केलेली ताकीद आठवली. पण तिच्या व्यर्थ भीतीबद्दल ती नुसती हसली. ती आपल्या मनांत म्हणाली कीं, ''धनिणीला उगीच चोरांची धास्ती वाटते. दिवसाढवळ्या कोण घरांत शिरते? तशांत मी तरी कोठें घरापासून फार दूर जात आहें? तर सगळीं दारें लावनू घ्या आणि पुन: उघडा, ही दगदग कशाला करावी?'' असें मनांत आणून ती दारें उघडीं टाकून विहिरीवर गेली. तेथें दुसऱ्या मैत्रिणी होत्या, त्यांच्याशीं गप्पा मारीत ती बराच वेळ उभी राहिली.

इकडे ती गेल्यावर एक मोठा बोकड त्या घराजवळ आला, आणि दारें उघडीं पाहून आंत शिरला. तेथें दिवाणखान्यांत मोठें उंची सामान जिकडेतिकडे रचून शोभेसाठीं ठेविलें होतें. त्यांत एक मोठा आरसा होता, त्याकडे बोकडाची नजर गेली तों त्याला त्यांत आपलें प्रतिबिंब दिसलें. तेव्हां हा कोणी दुसरा बोकड आहे असें वाटून त्यानें त्याला टक्कर देण्यासाठीं पुढले पाय वर केले. त्याबरोबर आरशांतल्या प्रतिबिंबाचीहि हुबेहूब तशीच हालचाल झाली; त्यावरून त्या बोकडाला चेव येऊन त्यानें मोठ्या जोराने आरशावर धडक मारिली. त्यासरशीं तो फुटून त्याचे शेंकडो तुकडे झाले. इतक्यांत ती दासी आंत आली. दिवाणखान्यांत आवाज कसला झाला तें पाहावयास ती धावत गेली. तेव्हां तो आरसा बोकडानें फोडिलेला पाहून ती अगदीं घाबरून गेली. धनीण घरीं आली तेव्हां अर्थात् त्या दासीचा तिला अतिशयित राग आला, आणि तिनें तिला नोकरीवरून दूर केलें.

## मला तें व्हावयाचें नाही

एक लहान मुलगी होती. ती फार सुंदर होती; व तिची वाणी मधुर होती. तिची आई तिचे फार लाड करी, व तिला चांगलेचांगले कपडे घालून सजवीत असे. तिचें कोणतेंही कोड पुरविण्यास ती आळस करीत नसे. घरांत सगळ्यांची ती लाडकी होती. पण ती अमळ मोठी झाली तेव्हां तिला एक वाईट खोड लागली. तिला कोणी कांहीं काम करायाला सांगितलें म्हणजे तिच्या कपाळाला आठ्या पडत, आणि ती

तोंड हिरमुसले करून म्हणे कीं, 'मला तें व्हावयाचें नाहीं!' तिची आई तिला जेव्हातेव्हां छेडी आणि सांगे कीं, ''कोणतेही काम करून पाहण्यापूर्वी 'मला तें व्हावयाचें नाहीं' असा जबाब देऊं नये. आपल्याकडून होईल तेवढा प्रयत्न करूनही जर एकादे काम झाले नाही, तर त्याला आपला इलाज नाही. त्याबद्दल आपणांला कोणी दोष देणार नाहीं. पण काम सांगतांच तें मला व्हावयाचें नाही असें म्हणणें अगदीं वाईट आहे. असा जबाब दिल्याने आपण लबाड व आळशी ठरतों; व आज्ञाभंगाचे पाप आपल्या माथी येतें.'' हा असा बुद्धिवाद आई तिच्याशीं करी, पण तो तिला मुळीं रुचत नसे; आणि तिने ती आपली वाईट खोड कांहीं टाकिली नाहीं. त्यामुळें तिचीं वडील माणसें तिजवर पूर्वीप्रमाणे प्रेम करीतनाशीं झालीं.

एकदां ह्या मुलीचा वाढदिवस आला, तेव्हां तिच्या एका नातलगानें तिला एक पोपट बक्षीस दिला. तो फार नामी असून बोलायाला चांगला शिकला होता. पण त्या मुलीच्या स्वाधीन झाल्यापासून तो पक्षी मुळीं बोलेनासा झाला. त्याला तेथलीं सगळीं माणसें वगैरे नवीं असल्यामुळें तो त्यांचीं बोलणीं मुकाट्यानें ऐकत राही. ती मुलगी त्याच्याबरोबर वारंवार खेळे, व त्याला दाणापाणी वगैरे वेळच्यावेळीं आणून घाली. त्या पोपटानें बोलावें म्हणून ती हरप्रयत्न करी; पण बरेच दिवस त्यानें तोंडावाटे एक शब्दही काढिला नाहीं. शेवटीं एके दिवशीं ती मुलगी नेहमींप्रमाणे त्या पोपटाच्या पिंजऱ्याजवळ उभी राहून, ''पोपटा, बोल! बोल!'' असें म्हणूं लागली, तेव्हा त्याला एकदम वाचा फुटून ''मला तें व्हावयाचें नाहीं!'' ''मला तें व्हावयाचें नाहीं!'' असे शब्द त्या मुलीच्या स्वराचें हुबेहून अनुकरण करून त्यानें उच्चारिले. ते ऐकून जवळ घरांतलीं माणसें होतीं तीं खदखदां हसूं लागलीं; आणि पोपटानेंसुद्धां तिची फजिती करावी हें किती वाईट असें म्हणून तिचा उपहास करूं लागलीं. अशी आपली फजिती झालेली पाहून ती मुलगी अतिशयित लज्जा पावली; आणि तिनें ती खोड सोडून देण्याचा निर्धार केला. तेव्हांपासून पुढें कधींही तिच्या तोंडांतून ते शब्द आले नाहींत.

❑❑❑

## भाग तिसरा

# हेकटपणा

## हातघाईवर येणारा राजा

प्रशियाचा राजा फ्रेडरिक दि ग्रेट याला एकादा विषय काढून त्यावर वादविवाद करण्याची हौस असे. पण होई काय कीं, तो ज्याच्याशीं वाद करीतो आपल्याहून वरचढ आहे असे प्रत्ययास येऊन आपल्यावर बाजू येणार असे दिसतांच तो रागास चढून त्याची गचांडी धरी आणि त्याच्या ढुंगणावर बुटाच्या लाता मारी. हा असा त्याचा हेकटपणा लोकांच्या अनुभवास आल्यामुळें त्याच्याशीं कोणत्याही गोष्टीसंबंधानें बोलण्यास फारसे कोणी धजत नसत. एके दिवशीं एका महत्त्वाच्या प्रश्नासंबंधानें हा राजा आपल्या कामदारांशी खलबत करीत असतां त्यानें एकाला विचारिलें कीं, ''तुम्ही आपलें मत कांहींच देत नाहीं हें कसें?'' तो कामदार म्हणाला: ''सरकारांच्या अभिप्रायाविरुद्ध माझा अभिप्राय पडला तर सरकार माझ्याशीं वाद करणार, आणि माझा अभिप्राय खरा ठरतो असें दिसतांच माझ्यावर लातांचा प्रहार होणार. तेव्हां हा असा अपमान व लत्ताप्रहार सोसण्यापेक्षां निमूट राहिलें तर काय वाईट? सरकारांला नेहमीं वाटत असतें कीं, आपलें तेंच खरें. तेथें कोणाचें काय शहाणपण चालणार?''

ह्या अशा हट्टी स्वभावामुळें त्या राजाला कसलीही चांगली मसलत द्यायाला कोणी पुढे होत नसत. त्यामुळे त्याला अनेक वेळां मोठी अद्दल घडे. खरें म्हटलें असतां कोणी कितीही शहाणा असला तरी त्याला एकादी गोष्ट पूर्णपणें कळेलच, याचा कांहीं नेम नसतो. यास्तव भलताच हट्ट धरून कोणाचें कांहीं ऐकायाचें नाहीं, असें जो मनांत आणितो त्याची कधींकधीं चांगलीच फजिती होते.

## पक्ष्यांला त्रास देणारा मुलगा

एका मुलास पक्षी पकडण्याचा नाद फारच लागला होता. त्यांसाठीं मोठमोठ्या

झाडांवर चढून तो फासे लावीत असे. त्याच्या आईबापांनीं त्याला असें करूं नये म्हणून अनेक वेळां सांगितलें. पण त्यानें आपला हा नाद कांहीं सोडिला नाहीं. एके दिवशीं ते आपल्या बहिणीबरोबर एका राईंत हिंडत असतां एक पक्षी त्याच्या नजरेस पडला. तो फार सुंदर असल्यामुळें त्याला पकडून पिंजऱ्यांत ठेवावें असें त्याच्या मनांत आलें; आणि त्यानें हा बेत आपल्या बहिणीला सांगितला. ती म्हणाली: ''बाबांनीं तुला असें करूं नये म्हणून अनेक वेळां सांगितलें असून तूं आपला हा नाद सोडीत नाहींस, तेव्हां तुला काय म्हणावें?'' तो म्हणाला: ''अगे, बाबा कोठें आहेत येथें पाहायाला?'' असें म्हणून तो आपढंगी मुलगा झाडावर चढला, आणि फासा लावून खालीं उतरला. मग तो त्या पक्ष्याची वाट पाहत जवळच्या झाडींत लपून बसला. कांहीं वेळानें तो पक्षी त्या झाडावर आला आणि त्या फासांत सांपडला. ह्याप्रमाणें आपला डाव साधला याबद्दल आनंद वाटून तो त्या झाडावर लगबगीनें चढला, आणि तो पक्षी फासांतून सोडवितांना पाय सरून धाडदिशीं खालीं पडला. त्यामुळें त्याला बरेंच लागलें. त्याची बहीण त्याच्याकडे धावत येऊन त्याला उठवून म्हणाली: ''पाहिलेंस ना, आईबापांची आज्ञा मोडणाऱ्या हट्टी मुलाचें काय होतें तें! ही अशी दुखापत तुला झाली आहे याची आतां आठवण ठेव, आणि पुन: असल्या फंदांत मन घालून आईबापांची अवज्ञा करूं नको. एकादे वेळीं तुझे हातपाय मोडण्याची किंवा भलतेंच कांहीं तरी होण्याची भीति आहे हें ध्यानांत ठेव.'' तो म्हणाला:''अगे, असल्या दुखापतीला मी कोठे भीक घालितो आहें? पण, ताई, आपली मसलत फसली. तो सुंदर पक्षी फासांतून एकदा निसटून गेला, तो आतां पुन: तसल्या फासांत मुळीं सांपडणार नाहीं.'' हें ऐकून त्याची बहीण हसून म्हणाली:''तर मग तो पक्षी तुझ्यापेक्षां शहाणा समजावयाचा.''

## सांगितलेलें न ऐकल्याचा परिणाम

एक मुलगा एका राईंत खेळावयास गेला होता. तेथें फुलझाडांवर पतंग बसत ते धरण्याच्या नादानें तो उनांत इकडूनतिकडे पुष्कळ धावला. त्यामुळें त्याला पराकाष्ठेची तहान लागली. लपून तो जवळच्या एका झऱ्यावर पाणी प्यावयास गेला. तो पाण्यांत हात घालणार इतक्यांत त्याला त्याच्या बापाने अनेक वेळां सांगितलेलें असें आठवले कीं, ''उनांत चालून किंवा धावून अंग तापलें असतां थंड पाणी पिऊ नये, किंवा डोकें, तोंड वगैरे धुऊं नये; तर आधीं कांहीं वेळ स्वस्थ बसून विसावा घ्यावा, आणि मग तोंड वगैरे धुऊन पाणी प्यावें. अशी सावधगिरी घेतली नाहीं तर एकादे वेळीं

आजारी पडण्याची भीति असते.'' पण हें बापाचें सांगणें त्यानें मनास आणिलें नाहीं. तो मनांत म्हणाला कीं,''ही भीति व्यर्थ आहे. आपणाला तहान फार लागली आहे; तर प्रथम पाणी प्यावें, डोकें, तोंड वगैरे धुवावें, आणि मग ह्या झाडीच्या शीतल छायेत बसून विश्रांति घ्यावी.'' ह्याप्रमाणें बापाच्या सांगण्याची अवज्ञा करून त्या अल्लड मुलानें आपली तहान यथेच्छ भागविली, आणि डोकीवर व तोंडावर चपाचपा पााणी मारून घेतलें. मग तो तेथे जवळच सावलींत बसला असतां त्याच्या अंगांत काही वेळाने हींव भरून आलें, आणि त्यास कसेंच वाटू लागलें. तेव्हा तो घाबरून घरीं गेला. याला सपाटून ताप आला, आणि त्यामुळें तो बरेच दिवस बेजार झाला. त्याच्या बापास त्याची मोठीच काळजी लागून राहिली. तो बरा व्हावा म्हणून औषधपाण्यासाठी त्याला पुष्कळ पैसे खर्चावे लागले. त्याच्या ममताळू आईला तर तो बरा होईपर्यंत फारच दगदग सोसावी लागली. अशा रीतीनें त्याच्या अल्लडपणामुळें त्याला स्वतांला बरेच दिवस बिछान्यावर इवळत पडावें लागलें, बापाला खर्चाखालीं यावें लागलें, आणि आईला चिंताज्वर लागून राहिला. शेवटीं एकदांचा तो बरा झाला, तेव्हां त्याच्या आईबापांचा जीव खालीं पडला. दुखण्यांतून उठल्यावर त्यानें कानास खडा लावून घेतला, आणि बापापाशीं असा नेम केला कीं, ''इतःपर तुमच्या सांगण्याबाहेर कधीही वागणार नाहीं.''

## मृगजल

आफ्रिकाखंडांत वाळूचीं अतिविस्तीर्ण मैदानें आहेत. तीं प्रखर उनानें तापलीं म्हणजे त्यांतून प्रवास करणारांस कांहीं अंतरावर मोठा तलाव असून त्याच्या आसपास हिरवींगार झाडें आहेत, असा भास होतो. म्हणून प्रवासी तृषाक्रांत होऊन व उनानें अगदीं तापून जाऊन ह्या दुरून दिसणाऱ्या तलावाकडे धावत सुटतात. पण हा सगळा आभास असल्यामुळे त्यांची निराशा होते. ह्या अशा आभासाला मृगजल म्हणतात. कारण तान्हेल्या मृगांस हा आभास फसवीत असतो; आणि त्यांच्या झुंडीच्या झुंडी इकडूनतिकडे सारख्या दौडतांना दिसतात.

एके समयीं मिसर देशांतील एक पलटण न्युबियाच्या वालुकामय प्रदेशांतून कूच करीत असतां उनाच्या प्रखर तापाने अगदीं तृषाक्रांत होऊन 'पाणी! पाणी! पाणी!' करूं लागली. प्रत्येक सैनिकाला थोडेथोडे पाणी दिलें होतें तें केव्हांच खलास होऊन ते सगळे तहानेने अगदीं बेजार झाले. अशा स्थितीमध्यें असतां त्यांनीं दुरून हा पाण्याचा आभास पाहिला; आणि त्यांला वाटलें कीं, हा अतिसुंदर जलाशयच आहे.

तेव्हां त्यापाशी आपण केव्हां जातों असें त्यांला होऊन गेलें, आणि ते आपल्या वाटाड्यांला म्हणू लागले कीं, ''त्या तलावापाशी आम्हांस घेऊन चला.'' हे वाटाड्ये अरब होते. त्यांला अशा आभासाचा नेहमींचा अनुभव होता. त्यांनीं त्या सैनिकांला पुष्कळ समजावून सांगितलें कीं, ''हा केवळ आभास आहे; हा खरा तलाव नव्हे. ह्या आभासाला भुलून आपण विनाकारण भटकण्यांत वेळ दवडावा हें बरोबर नाहीं.'' हें त्यांचें म्हणणें त्या शिपायांला पटेना. ते त्यांला धमकी देऊन म्हणाले कीं, ''आम्हांला त्या तलावापाशीं तुम्हीं नेलेंच पाहिजे. असें न कराल तर तुम्ही प्राणांस मुकाल.'' त्या अरबांनी त्याला पुन: पुन: विनवून सांगितलें कीं, ''तुम्हांला ह्या मृगजलाचा अनुभव नाही, पण आम्हाला तो आहे. यास्तव तुमच्या ह्या आग्रहांत कांहींएक अर्थ नाही.'' हें त्या वाटाड्यांचें सांगणे त्या हट्टी शिपायाला रुचलें नाहीं. त्यांनीं त्यांला ठार मारून त्या भासरूप तलावाकडे धाव घेतली. ते जसजसे पुढेंपुढें धावत जात तसतसा तो तलाव अजून पुढेंच आहे असें त्यांला वाटे. असे धावतां धावतां ते अगदीं थकून गेले. तहानेनें आणि भुकेनें व्याकूळ होऊन ते अफाट मैदानांत कोठच्या कोठें जाऊन पडले. त्यांतून परत वाटेला लागावें कसें याचा त्यांला घोर लागला. अशा अतिभयंकर अवस्थेंत ते शक्ति होती तोपर्यंत भटकत राहिले, आणि शेवटी त्या रखरखीत मैदानांत सगळे मरून पडले!

## सोन्यारुप्याची ढाल

ग्रेटब्रिटनांत अतिप्राचीन काळी अनेक देवतांची पूजा करणारे लोक होते. तेथल्या एका पराक्रमी राजाने विजयश्रीच्या देवतेचा पुतळा उभारिला होता. ह्या देवीच्या एका हातांत भाला व दुसऱ्या हातांत मोठी ढाल दिली होती. ही ढाल चहुथऱ्याला टेकली असून तीवर या पुतळ्याचा हात टेकला होता, आणि तिची एक बाजू सोन्याच्या तकटानें व दुसरी बाजू रुप्याच्या तकटानें मढविली होती. एके समयीं दोन शूर योद्धे घोड्यांवर बसून समोरासमोरून त्या पुतळ्यापाशी आले. तो त्यांनीं पूर्वी कधीं पाहिला नसल्या कारणानें ते त्याच्या दोन बाजूंस उभे राहून तो निरखून पाहूं लागले. पाहतां पाहतां त्यांतला एकजण मोठ्या आश्चर्यांने बोलला: ''अहो, ही ढाल सोन्याची आहे.'' दुसरा बोला: ''काय? सोन्याची? वा! तूं मोठा गाजरपारखी आहेस! मला तर ही रुप्याची आहे असें स्पष्ट दिसत आहे.'' तें ऐकून पहिला म्हणाला: ''तुझे डोळे तर गेले नाहींतना! मला ही स्पष्ट सोन्याची दिसत आहे; समजलास?'' दुसरा अमळ आवेशास चढून म्हणाला: ''अरे वेड्या, अशा उघड्या ठिकाणी कोणी सोन्याची

ढाल ठेवील काय? आणि ही रुप्याचा ढाल तरी येथें कशी ठेविली आहे याचेंच मला नवल वाटत आहे. येथून जाणारेयेणारे सगळेच लोक साधेभोळे व प्रामाणिक असतील असें ही मूर्ति येथें ठेवणारास वाटलें तरी कसें, याचा मला मोठा अचंबा वाटत आहे; आणि हीवर खोदलेल्या लेखावरून तर असें कळतें की, ही मूर्ति येथें आज तीन वर्षे आहे!'' असा त्या दोघांचा मोठा कडाक्याचा वाद जुंपून राहिला. शेवटी ते दोघे हातघाईवर येऊन द्वंद्वयुद्ध करण्यास सिद्ध झाले. तेथून अमळ दूर एक उघडी बखळ होती. तींत आपले घोडे नेऊन ते एकमेकांवर चालून गेले; आणि त्यांनीं एकमेकांस भाल्यांचा प्रहार केल्यामुळें ते दोघेही मूर्च्छित होऊन घोड्यांवरून खालीं पडले.

ते असे तेथें बेशुद्ध पडले असतां त्या काळचा एक उपाध्याय त्या वाटेनें आला. ते असे मृतवत् पडलेले पाहून त्याला त्यांची करुणा आली, आणि त्यांच्या जखमांला कांहीं दिव्य औषधी त्यानें लाविली. त्याबरोबर ते तत्काळ शुद्धीवर आले. मग त्यांनीं आपल्या भांडणाचे कारण त्या पुजाऱ्याला सांगितलें. तें ऐकून तो पोट धरून हसू लागला आणि म्हणाला : ''तुम्ही दोघेही वेडे आहां. आपलें तेंच खरें. असा हट्ट न धरितां तुम्ही दुसरा आपल्या उलट बोलतो याचें कारण काय असावें हें समजून घेण्यासाठी त्याच्या बाजूकडे येऊन पाहण्याची थोडीशी तसदी घेतली असती तर तुमच्या ध्यानांत तेव्हांच आलें असतें कीं, त्या ढालीची एक बाजू सोन्यानें मढविली आहे, आणि दुसरी बाजू रुप्यानें मढविली आहे. असा वास्तविक प्रकार असल्याकारणानें तुमचें दोघांचेंही म्हणणें अर्धें खरें आहे व अर्धें खोटें आहे. पण त्या ढालीचें पुरें स्वरूप कळले आहे असा खोटा भरंवसा मानून हटास पेटून तुम्ही एकमेकांचा प्राणघात करण्यास तयार झाला होतां, याला काय म्हणावें? इत:पर ध्यानांत बाळगा कीं, आपला प्रतिपक्षी जें बोलतो त्यांत तथ्य कितपत आहे याचा नीट शोध केल्यावांचून त्याच्याशीं केवळ हठाग्रहास्तव विरोध करणें मुळीं पसंत नाहीं.

## स्वच्छंदी मुलगी

एका कुटुंबांत एक मुलगी होती. ती अमळ स्वछंदी असे. तिला वाटे कीं,''आई आपणाला हवें तें करूं देत नाहीं; ती जेव्हांतेव्हां आपल्या इच्छेच्या आड येते, हें कांहीं ठीक नाहीं.'' पण आईच्या आज्ञेबाहेर वागण्याचें तिला धैर्य होत नसे. एके दिवशीं रात्रीं निजावयाच्या वेळीं ती मुलगी आपल्या आईस म्हणालीः ''बये, मला एक दिवस तरी माझ्या इच्छेप्रमाणे वागावयास देशील तर बरें होईल. मला तूं ज्या त्या गोष्टीला अडवितेस. त्यामुळें मला मोठे दुःख होतें,'' आईनें या अल्लडपोरीचा कल

पाहून म्हटले कीं, ''बेटा, तुला आम्ही नीट वागण्याविषयीं नेहमी सांगत असतो. तें केवळ तुझ्या हितासाठी असतें. तें तुला तुझ्या अल्प बुद्धीस्तव रुचत नाहीं. तरी तुझी तशी इच्छाच आहे तर उद्यांचा दिवस तुझ्या मनास वाटेल तें करण्याची तुला मी मोकळीक देतें.''

दुसरा दिवस उजाडला तेव्हां ती मुलगी सगळ्या गोष्टी स्वच्छंदपणे करूं लागली. घरांत कांहीं गोड पदार्थ केले ते ते तिने ओक येईपर्यंत खाल्ले. त्यामुळें तिला बरीच सुस्ती आली, व तिचें पोटही दुखूं लागले. तरी पण तिच्या मनांत आले कीं, आतां आपण बाहेर वाटेल तिकडे खेळायास जावें. बाहेर पडण्यापूर्वीं तिनें आपला सगळ्यांत चांगला पेहराव होता तो घातला. ''खेळायास जातांना चांगले उंची कपडे घालू नयेत, कारण ते मळतात,'' असें तिची आई तिला नेहमी सांगत असे. पण तें तिनें ह्या वेळीं मनास आणिलें नाहीं.

बागेंत इकडेतिकडे खिदळत असतां एक सुंदर पतंग तिनें पाहिला. तो ह्या फुलावरून त्या फुलावर असा स्वच्छंदपणे उडत चालला होता. त्याला पकडण्याचे तिच्या मनांत येऊन ती त्याच्या मागून धाऊं लागली. त्याला पकडण्याच्या नादांत ती कांटेझाडांमध्यें शिरली. तेथें तिचा परकर कांट्यांत गुंतून बराच फाटला; आणि ती अडकून भुईवर पडली. त्यामुळें तिचे अंग मातींत लोळले, व तिच्या अंगातला पोलका मळला. तेव्हां अमळ खिन्न होऊन तिनं तो पतंग पकडण्याचा नाद सोडून दिला.

अमळशानें, पलीकडच्या आवारांत कांहीं मुले खिदळत होतीं. त्यांची गडबड तिच्या कानी आली. तेव्हां तीं कोण आहेत व कोणता खेळ खेळत आहेत तें पाहण्याची तिला इच्छा झाली, आणि आवाराच्या भिंतीवरून पलीकडे पाहावें म्हणून, तेथें एक शिडी उभी करून ठेविली होती, तीवर ती चढावयास गेली. त्या वेळीं तिला आईचे असें सांगणें आठवलें कीं, त्या उंच शिडीवर लहान मुलांनीं चढूं नये. पण पुन: लागलींच तिला आठवण झाली कीं, आईनें आपणास आज हवें तसें वागण्याची परवानगी दिली आहे. तर तिचे हें सांगणें कशाला मनास आणा? असें मनांत आणून ती शिडीवर चढूं लागली. ती भिंत बरीच उंच असल्यामुळें तिला शिडीच्या बहुतेक शेंड्यापर्यंत चढावें लागलें. ती अशी भिंतीवर चढतांना एका कुत्र्यानें पाहिलें. तेव्हां हें कोणी परकी मांजर असावें असें वाटून तो खालून मोठ्याने भुंकू लागला. त्याबरोबर ती घाबरली, आणि ती वरल्या कडीवर पाय ठेवीत होती तो चुकून ती धाडदिशीं खालीं पडली. त्यामुळें तिचें सगळे अंग चांगलें ठेंचून निघालें, आणि तिचा एक पाय मोडला.

तशा स्थितामध्यें तिला उचलून घरीं आणिलें, आणि वैद्याकडून औषधोपचार सुरू केले. तिच्या आईबापांला तिची शुश्रूषा सारखी दीडमहिना करावी लागली. ह्या आजारांत तिला आईची आपणावर किती ममता आहे, व ती आपल्या जिवास किती जपते याचा चांगला प्रत्यय आला. शिवाय ह्या सगळ्या आजारांत ती ममताळू माता तिच्या स्वच्छंदपणाबद्दल एक शब्दही बोलली नाहीं. ह्यावरून त्या मुलीची अशी खात्री झाली कीं, आपले आईबाप आपणांस जें कांहीं सांगतात व बोलतात, तें आपल्या बऱ्याचेंच असतें. तें कधींकधीं आपल्या मनासारखें नसलें तरी त्याविषयी मुळीं खेद मानूं नये, किंवा भलताच हट्ट करूं नये. ती मुलगी साफ बरी झाल्यावर आपल्या वडिलांची अवज्ञा कोणत्याही बाबतींत न करण्याविषयीं फारच जपूं लागली.

❑❑❑

## भाग चौथा

# मनोनिग्रह

## मुलगा आणि गांधीलमाशी

एका मुलाच्या बंडीच्या बाहीवर एक गांधीलमाशी येऊन बसली. त्यासरशीं किंकाळी मारून तिला झाडून टाकण्याच्या बेतांत तो होता. पण इतक्यांत त्याच्या मनांत असें आलें कीं, तिला आपण झाडून टाकावयाला लागलो तर ती चिडेल आणि आपल्या हाताला चावा घेईल. म्हणून त्यानें आपला हात न हालवितां तसाच कांहीं वेळ धरून ठेविला. मग त्याच्या बाहीवर कांहींएक खाद्य मिळत नाहीं असें पाहून ती गांधीलमाशी उडून गेली. त्याच्या हाताला तिनें मुळीं इजा केली नाहीं. ह्या वेळीं ह्या मुलानें आपलें मन आवरिलें नसतें, आणि तिला झाडून टाकावयाचा प्रयत्न केला असता, तर ती त्याला कदाचित् चावली असती.

## माणूस आणि सर्प

एका माणसाला आपल्या परसाच्या कुंपणापलीकडे असलेली एक वस्तु हवी होती. त्या वेळीं रात्रीचा काळोख होता. पण ती कोठें आहे याचा त्याला चांगला अदमास होता. म्हणून दिवा घेतल्यावांचून ती वस्तू होती तेथें तो गेला, आणि कुंपणाबाहेर हात घालून ती तो चाचपूं लागला, तो त्याच्या हाताच्या तळव्याला कांहीं थंड व गुळगुळीत लागलें. त्याबरोबर त्यानें लागलीच ताडिलें कीं, हें सर्पाचें अंग आहे. तेव्हां तत्क्षणी त्यांच्या ध्यानांत असे आलें कीं, आपला हात पटकन मागें घेतला तर हा सर्प बिचकेल आणि आपल्या हाताला दंश करील. तरी आपण आपला हात असाच स्थिर राहू द्यावा. मग तो सर्प हाताखालून सावकाश सगळा सरपटत जाईपर्यंत त्यानें आपला हात त्याच्यावर तसाच धरून ठेविला. हा असा मनोनिग्रह

त्याच्या अंगीं अर्थात् पुष्कळ दिवसांच्या सरावानें आला होता. त्यानें यत्किंचित् उतावळेपणा केला असता व घाबरून हाताची चलबिचल केली असती तर त्याचा कदाचित् घात झाला असता.

## मुलगा आणि कासव

एक लहान मुलगा बागेंत एकटाच हिंडत असतां त्याला एक कासव दिसला. तो भुईवरून हळूहळू चालला होता. त्याला दगड मारावा असें त्या मुलाच्या मनांत येऊन त्यानें एक दगड उचलिला. इतक्यांत त्याला असा सुविचार सुचला कीं, हा प्राणी गरीब आहे, ह्याच्यापासून आपणाला कांहींएक उपद्रव झालेला नाहीं. तर अशा निरपराध प्राण्याला आपण नाहक इजा करावी हें अगदीं बरोबर नाहीं. असें मनांत आणून त्यानें हातचा दगड टाकून दिला. मग तो आपल्या आईकडे जाऊन म्हणाला: ''आई, कासवाला दगड मारावा असें मनांत येऊन पुन: माझें मन फिरले याचें कारण काय बरें?'' ती म्हणाली: ''बाळा, तुझ्या ठायीं मनोदेवता आहे तिचा हा प्रभाव होय. तुझ्या मनाने तुला ती गोष्ट वाईट आहे असें सांगितल्यावर मनाचा निग्रह करून म्हणजे मनाला आळा घालून तूं ती केली नाहींस. ह्या गोष्टीला मनोनिग्रह म्हणतात. अशाच रीतीनें तूं आपलें मन वाईट गोष्टींकडे जाऊं न देण्याचा निर्धार करिशील तर तुझ्या अंगीं खरी सुजनता व पवित्रता वाढेल. आणि तूं वास्तविक सुखी व संपन्न होशील.''

## सॉक्रेटीस

सॉक्रेटीस नांवाचा एक मोठा शहाणा व सज्जन पुरुष ग्रीसदेशांत होऊन गेला. त्यानें लोकांला सदाचार शिकविण्यांत आपलें सगळें आयुष्य वेंचिलें. त्याच्या ज्ञानाला व सुजनतेला लुब्ध होऊन पुष्कळ तरुण जन त्याचा उपदेश ऐकण्यास सर्वदा उत्सुक असत. अशा रीतीनें त्याचे पुष्कळ शिष्य झाले होते. ते त्याला अतिशयित मान देत व परम पूज्य समजत. एके दिवशीं अथेन्सशहरांत एक मनुष्य आला. माणसांचे चेहरे पाहून तीं कशा स्वभावाची आहेत तें सांगण्याची विद्या आपणास येते असें तो तेथल्या लोकांस सांगू लागला. तेव्हां लोक त्याची ती विद्या अजमावून पाहूं लागले. सॉक्रेटिसाचे शिष्यही त्याची ती विद्या पाहावयास गेले, आणि त्यांनीं त्याला आपल्या गुरूपाशी आणून म्हटलें कीं, ''ह्या आमच्या परमपूज्य गुरूचा स्वभाव कसा आहे तें सांगा.'' त्या मनुष्याने सॉक्रेटिसाच्या चेल्याकडे निरखून पाहून सांगितलें कीं, ''हा मनुष्य मोठा दुराचारी व दुष्ट स्वभावाचा आहे.'' हें ऐकून ते शिष्य खदखदां हसूं लागले; आणि त्याला कांहींएक समजत नाहीं असा अभिप्राय त्यांनीं स्पष्टपणे बोलून दाखविला.

तेव्हां सॉक्रेटीस हसून म्हणाला: ''हा मनुष्य कांहीं चुकला नाहीं. ह्याचें म्हणणें अगदीं बरोबर आहे. माझी जात्या दुराचाराकडे प्रवृत्ति होती. पण ती दाबण्याचा प्रयत्न मीं पुष्कळ दिवस एकसारखा केला. म्हणून माझ्या स्वभावांत पालट झाला आहे. माझ्या ठायींच्या वाईट वृत्ति नाहींतशा करण्यात मला मोठा प्रयास पडला आहे.

## उतावळेपणा

अरबस्थानांत आलकसाई नांवात एक विख्यात कवि होऊन गेला. त्याने एके समयीं एक उत्तम व दुर्मीळ लाकूड पैदा करून त्याचे धनुष्यबाण तयार केले. ते घेऊन मोठ्या हौसेनें तो एका मैदानांत रानगाढवांची शिकार करण्याकरिता रात्रीच्या वेळी गेला. गाढवांचे कळप येण्याच्या वाटेवर तो टपून बसला असता, पहिल्यानें एक कळप आला, त्यावर त्यानें धनुष्य मोठ्या नेटानें ओढून बाण सोडिला, तो एका गाढवाच्या अंगातून आरपार जाऊन एका खडकाला लागला. त्याचा खणकर आवाज झाला तो ऐकून त्याला वाटलें कीं, आपला नेम चुकला. मग दुसरा कळप आला, तेव्हां त्यानें त्यावर पुन: एक बाण मारिला. तोही एका गाढवाच्या अंगांतून पलीकडे जाऊन एका खडकावर बसला. तेव्हां त्यानें पुन: पहिल्याप्रमाणेंच अटकळ केली. ह्याप्रमाणें पाच वेळां प्रकार झाला. तेव्हां तो अगदी खिन्न झाला. त्याची पुरी निराशा झाली; आणि त्याला असें वाटलें कीं, तें धनुष्य कुचकामाचे आहे. असें मनांत येतांच त्यानें तें रागाच्या झटक्याबरोबर मोडून टाकिलें. उजाडलें तेव्हां त्या ठिकाणी, पांच गाढवें मरून पडलेलीं त्याच्या दृष्टीस पडली. तीं पाहून त्याला आपल्या उतावळेपणाची मोठी लाज वाटली, आणि असलें उत्कृष्ट धनुष्य आपण विनाकरण गमाविलें म्हणून तो खेद करूं लागला.

## पेरिक्लिजाची सहनशीलता

पेरिक्लिज नांवाचा एक थोर पुरुष अथेन्सनगरींत होऊन गेला. एके समयीं त्या नगरीचा राज्यकारभार ह्या पुरुपाच्या हातीं होता. त्याच्या कारकीरर्दींत ह्या संस्थानाची चांगली सुधारणा झाली, व लोकांला पुष्कळ सुख लाभलें. ह्यामुळें तो लोकप्रिय झाला. पण कांहीं वाईट चालीच्या लोकांला त्याची राज्यव्यवस्था बरीच कडक वाटे. असे लोक त्याचा तिरस्कार करीत. एके दिवशीं संध्याकाळच्या वेळीं तो रस्त्यांतून एकटाच चालला असतां त्याचा द्वेष करणारा एक इसम त्याच्या मागून येऊन त्याला शिव्या देऊं लागला. त्या त्यानें मुकाट्याने ऐकून घेतल्या. त्याला त्यानें उलट जबाब मुळीं दिला नाहीं, किंवा त्याचें शासन करण्याचें मनांत आणिलें नाहीं. हा त्याचा

धिम्मेपणा पाहून त्या उद्दाम माणसाला अधिकच चेव आला, आणि त्यानें त्याच्यावर अपशब्दांचा सारखा भडिमार चालविला. ह्याप्रमाणें पेरिक्लिज पुढें चालला असून तो खट्याळ माणून शिव्या देत मागून चालला होता. जातांजातां पेरिक्लिज आपल्या घराच्या दरवाजापाशीं जाऊन पोंचला, आणि आंतील चाकराला हाक मारून म्हणाला: ''अरे, कंदील पेटवून आण आणि ह्या माणसाला घरीं पोंचीव. कारण मला शिव्या देत माझ्या मागून चालण्याच्या नादांत हा आपल्या घरापासून फार दूर आला आहे; आणि आतां काळोख पडला आहे.'' असें म्हणून तो घरांत गेला. ही त्याची सहनशीलता पाहून तो माणूस किती ओशाळला असेल बरें!

## तारवावरील शिस्त

इंग्रज लोकांच्या एका तारवाला भर समुद्रांत आग लागली. तिचा भडका होऊन ती विझवितां येईना. तेव्हां कप्तानानें खलाश्यांना हुकूम केला कीं, ''तारवावरच्या सगळ्या होड्या पाण्यांत लोटून त्यांत सगळे एकामागूनएक उतरा.'' ह्या हुकमाप्रमाणें त्यांनीं होड्या पाण्यांत लोटिल्या. पण ते त्याला म्हणूं लागले कीं, ''तुम्ही आधीं होडीत उतरा. मग आम्ही उतरूं.'' तो म्हणाला, ''बाबांनो, तारवावरची शिस्त अशी नाहीं. कप्तानाने तारवावरील सगळ्या लोकांचा बचाव आधीं करावा, आणि मग आपल्या बचावास लागावें. तर तुम्ही सगळे सुखरूपपणें होड्यात उतरां, तोंपर्यंत मला तारवावरच राहिलें पाहिजे. तुमचे प्राण बचतील अशी माझी खात्री झाल्यावर मग माझें मी पाहीन.'' असें त्यानें त्यांला निक्षून सांगितलें, तरी त्यांचा आग्रह सुटेना. कारण सगळ्यांचा तो अतिशयित प्यारा होता. तरी तो आपली शिस्त मोडण्यास तयार झाला नाहीं; आणि आगीचा तर मोठाच भडका होत चालला. म्हणून त्यानें त्यांला दरडावून होड्यांत उतरावयास सांगितलें. तेव्हां ते निरुपाय होऊन उतरले. ते सगळे उतरल्यावर त्यांतल्या एका होडींत आपणाला सहज जागा होण्यासारखी आहे असें पाहून तींत तो स्वत: सगळ्यांच्या मागून उतरला, आणि ते सगळे सुरक्षितपणें किनाऱ्यास जाऊन पोंचले. अशा जिवावरच्या संकटाच्या वेळींहि तो शूर व कर्तव्यदक्ष पुरुष आपली शिस्त मोडण्यास तयार झाला नाही. ह्यांत त्यानें विलक्षण मनोनिग्रह प्रकट केला हें उघड आहे.

## दुर्बळ व सबळ

एक मुलगा आपल्या शिक्षकाबरोबर सहल करावयास गेला असतां वाटेत कांहीं कुत्री त्यांच्या अंगावर भुंकून त्यांच्या मागून धावत आलीं. शिक्षकाच्या हातांत काठी

होती, ती त्यानें त्यांजवर उगारतांच तीं मागल्या पायीं पळत सुटलीं. ते पुढें चालले असतां एक भला मोठा कुत्रा वाटेंत स्वस्थ पडलेला त्या मुलानें पाहिला. तेव्हां तो घाबरून पुढें पाऊल घालीना. शिक्षक म्हणाला: ''भिऊं नको. हा कुत्रा आपल्या वाटेस जाणार नाहीं.'' त्यावरून तो आपल्या शिक्षकाचा हात धरून भीतभीत त्या कुत्र्याजवळून गेला. त्या कुत्र्यानें त्यांच्याकडे धड पाहिलेंही नाहीं, मग भुंकायाला किंवा गुरगुरायाला कोठला! ते आणखी पुढें गेले तों, रस्त्याच्या बाजूला कुरण होतें, त्यांत कांहीं हंस त्यांच्या नजरेस पडले. ते प्राणी त्यांला पाहून पळत सुटले. ते माना वरती करून त्यांच्याकडे टकटकां पाहून केकावूं लागले. पण दुसऱ्या बाजूला कांहीं गाई चरत होत्या त्यांनीं त्यांच्याकडे बघितलें देखील नाहीं. हा असा प्रकार पाहून मुलास अचंबा वाटला, आणि त्यानें आपल्या शिक्षकाला पुसलें; ''गुरुजी, तीं कुत्री आणि हे हंस आम्हांला पाहून कसे ओरडूं लागले, आणि त्या मोठ्या कुत्र्यानें व ह्या गाईंनीं आमच्याकडे नुसतें पाहिलेंही नाहीं, याचें कारण काय?'' शिक्षक म्हणाला: ''मुला, जे प्राणी दुर्बळ असतात, ते फार गलबला करितात. ते घाबरून जाऊन ओरडत केकावत सुटतात. त्यांच्या हातून कांहींएक होत नाहीं. पण जे प्राणी बळकट असतात, ते नेहमी शांत व गंभीर असतात. माणसांलाही हाच नियम लागू आहे.''

## फोशिअनाचें इमान

अथेन्स शहरांत फोशिअन नांवाचा एक मोठा पराक्रमी पुरुष होता. तो तेथल्या सैन्याचा सेनापति होता. तो थोर मनाचा व सचोटीचा माणूस होता. त्याचें वर्तन उत्तम होतें. ह्या त्याच्या चांगुलपणामुळें तो सगळ्या लोकांला अतिप्रिय झाला होता. सगळ्या दरजांचे लोक त्याला मोठा मान देत. सैन्यांतल्या सगळ्या शिपायांची त्याजवर पराकाष्ठेची भक्ति असे. ते त्याच्या अर्ध्या वचनांत असत. त्याच्यासाठी आपल्या प्राणांचे बळी देण्यास ते नेहमी तयार असत.

मासिडोनियाचा बादशहा शिकंदर यानें मुलूखगिरी सुरू करून प्रथम आपला मोर्चा अथेन्स शहरावर फिरविला. पण फोशिअन सेनापतीपुढें त्याचा कांहींएक इलाज चालेना. तेव्हां त्या बादशहानें या सेनापतीला लांच देऊन वश करून घेण्याचा प्रयत्न चालविला. त्यानें फोशिअन याला असें सांगून पाठविलें कीं, ''तूं माझ्या पक्षाला अनुकूळ होशील तर तुला मी पुष्कळ द्रव्य देईन, व तुला वाटतील तीं चार शहरें इनाम करून देईन.'' परतु ह्या लालचीनें त्याचें मन बिलकूल फिरले नाहीं; आणि त्यानें आपल्या देशाशीं दगाबाजी केली नाहीं. त्यानें शिकंदराला असा उलट जबाब पाठविला कीं,''शिकंदर

बादशहाच्या मनांत मजविषयीं आदर असल्यास त्यानें मला माझी सचोटी सोडायास लावण्याचा प्रयत्न करूं नये. त्याच्या लाचलुचपतीला भुलून मीं माझ्या लोकांचा दगा केला तर तोच बादशहा मला नीच व विश्वास ठेवण्यास नालायक समजेल.''

## हुसेन आणि त्याचा दास

महमद हा मुसलमानांचा पैगंबर होय. ह्यानें मुसलमानी धर्माची स्थापना केली. मुसलमान लोक ह्याला देवाचा दोस्त समजतात. ह्या पैगंबरानें कुराण नांवाचा धर्मग्रंथ मुसलमानांस दिला आहे. ह्या पैगंबराचा नातू हुसेन नामेंकरून होता. तो मोठा सत्ताधीश व श्रीमान् होता. त्याचा स्वभाव अमळ तापट होता. तो आवरण्याचा प्रयत्न तो नेहमी करी. एकदा त्याचा एक दास कढत पाण्याचें भांडें हुसेन जेवायाला बसला होता तेथून नेत होता, तों तो कशाला तरी अडखळून भांड्यांतलें तापले पाणी हुसेनाच्या अंगावर पडले. त्यानें त्याच्या अंगाला चटका बसून तो मोठ्यानें ओरडला. ह्या अपघातामुळें तो दास अगदीं घाबरून गेला; आणि आपला धनी आपणाला आतां देहांतशिक्षा करितो असें भय त्याला पडलें. पण त्याच्या अंगीं समयसूचकता चांगली असल्या कारणानें त्याला त्या क्षणीं कुराणांतलें एक वचन आठवलें. तें त्यानें हुसेनपुढें गुडघे टेकून व हात जोडून म्हटलें. त्यामुळें हुसेनाच्या राग लागलींच निवाला. ते वचन येणेंप्रमाणें : 'जे आपला क्रोध आवरतात तेच आनंदभुवनाचे अधिकारी होतात.' हे शब्द ऐकून हुसेन लागलींच शुद्धीवर येऊन म्हणाला: ''मला क्रोध आला नाहीं.'' तो दास ह्या वचनाचा पुढला भाग म्हणाला, तो असा: ''जे कोणी दुसऱ्याला क्षमा करितात, ते आनंदभुवनांत प्रवेश करण्यास पात्र होतात.'' हुसेन म्हणाला: ''मी तुला तुझा अपराध क्षमा केला आहे.'' तो दास त्या वचनाचा शेवटचा भाग म्हणाला, तो असा: 'दुसऱ्यांवर उपकार करणारांवर देव प्रीति करितो.' हें शब्द ऐकून हुसेन अगदीं प्रसन्न होऊन म्हणाला: ''तूं ह्या क्षणी दास्यापासून मुक्त झाला आहेस. तूं आतां स्वतंत्र झाला आहेस; आणि तुला मी चारशें रुपये बक्षीस देतों.''

## धुराडी झाडणारा मुलगा

विलायतेंतल्या घरांस धुराडीं असतात. त्यांतून घरांतल्या चुलींचा धूर बाहेर जातो. ह्या धुराड्यांत काजळी माजते, ती झाडायाला माणसे ठेवितात. एका श्रीमंत बाईच्या घरांतलें धुराडें झाडायाचें काम एक तरुण मुलगा एके दिवशीं करीत होता. तो खोलींत एकटाच होता. धुराडें झाडून झाल्यावर तो त्या खोलीतल्या वस्तु पाहूं लागला. तेव्हां एका मेजावर सोन्याचें घड्याळ ठेविले होते, त्याजकडे त्याची नजर गेली, आणि

जवळ जाऊन तें तो पाहू लागला. तेव्हां त्याच्या मनांत असें आलें कीं, खोलीत कोणी नाहीं; तर आपण हें घड्याळ उचलून काजळीच्या पिशवींत घालून ठेवावें. आणि बाहेर पडल्यावर बाजारांत नेऊन विकावे, म्हणजे आपणाला एकदम पुष्कळ पैसे मिळतील. असें म्हणून त्यानें तें उचलिलें. पण इतक्यांत त्याला आठवण झाली कीं, आपली कृति कोणी पाहत नसला तरी देव ती पाहत असतो. हा विचार मनांत येतांच त्यानें तें घड्याळ जेथलें तेथें ठेविलें,आणि गुडघे टेकून देवाची अनन्यभावानें अशी प्रार्थना केली कीं, ''हे प्रभो, मला ह्या मोहापासून दूर ठेव. माझ्या मनांत ही पापवासना आली ह्याबद्दल मला क्षमा कर.'' मग तेथून तो झटदिशीं बाहेर पडला.

ही त्याची सगळी कृति घरधनिणीनें दुसऱ्या खोलींतून त्याला नकळत पाहिली, आणि त्यानें प्रार्थना केली ती ऐकिली. त्यावरून तिची त्या मुलावर मर्जी बसली; आणि तिनें त्याला शाळेंत पाठवून त्याचा सगळा खर्च चालविला. तो मुलगा जात्या हुशार होता. त्यानें मन लावून विद्याभ्यास केला. त्या उदार व कृपाळू बाईनें त्याच्या पाठशाळेंतल्या शिक्षणाचीही चांगली तरतूद केली. ह्याप्रमाणें सुशिक्षण मिळाल्यामुळें त्याची योग्यता वाढली; पुढें तो चांगल्या उद्योगधंद्यांत पडून नांवारूपास आला, आणि मोठा सधन झाला. ह्याहून विशेष काय कीं, तो मोठा पापभीरु व सचोटीचा माणूस आहे, असा त्याचा चोहोंकडे लौकिक झाला. सारांश, अशा थोड्याशा मनोनिग्रहामुळें त्याचा चांगला उद्धार झाला. तोच जर त्या वेळीं मोहवश होऊन तें घड्याळ चोरिता, तर त्या बाईनें त्याला पकडून पोलिसाच्या हवाली केलें असतें, आणि न्यायाधिशानें त्याला शिक्षा केली असती.

## चोरी करण्याचा मोह

एक मुलगी घरांत एकटीच होती. तिची आई कोठें बाहेर गेली होती. बाहेर जातांना तिनें त्या मुलीस सांगितलें होतें कीं, ''तुला दुध ठेविलें आहे तें अमळशानें पी.'' आई गेल्यावर ती दुधाचा पेला पुढें घेऊन बसली. इतक्यांत तिला आठवण झाली कीं, फडताळात आईने आंबे ठेविले आहेत, त्यांतला एक आपणास दुधाबरोबर खायाला मिळेल तर बरें. आई घरीं असती तर ती मला एकदोन आंबे खचीत देती. तर आपण फडताळ उघडून त्यांतला एक आंबा घ्यावा. असें मनांत आणून ती फडताळाची चावी घेऊन तें उघडावयास गेली. आईला नकळत फडताळ उघडावे कसें, हा विचार तिच्या मनात आला; पण त्याची परवा न करितां तिने तें उघडिलें. तेथें एका टोपलींत बरेच आंबे ठेविले होते. त्यांतला एक उचलून ती आपल्या मनांत म्हणाली, 'यांतला

एक आंबा मीं घेतला तर आईला कळणार देखील नाहीं; कारण टोपलींत पुष्कळ आबें आहेत. ते तिनें मोजिले नसतील.' हा विचार तिच्या मनांत घोळत आहे, व आंबा घ्यावा कीं घेऊं नये अशी तिच्या मनाची ओढाताण चालली आहे, तो इकडे घरांतलें मांजर तिच्या दुधांत तोंड घालून ते चाखूं लागलें. तिकडे तिची नजर जाऊन ती रागानें त्याच्यावर धावून गेली, आणि त्याला एक गुद्दा देऊन मोठ्याने ओरडली: ''चोरट्या मांजरा, तुला माझें दूध चोरून पिण्याचें धैर्य तरी कसें झालें!'' त्या मांजराला अशा शिव्या देत ती फडताळांतला काढिलेला आंबा उचलायास गेली. तों इतक्यांत मांजराला बोललेले शब्द तिच्यी मनांत आले; आणि ती ओशाळून आपल्याशी बोलली कीं, ''मीं मांजराला चोरी केल्याबद्दल शिक्षा केली; आणि मी स्वत: हें काय करीत आहें? आईला नकळत फडताळातला आंबा मीं घ्यावा ही चोरी नव्हे काय? चोरी करणें वाईट आहे हें त्या मांजराला कांहीं कळत नाहीं; पण मला हें चांगलें कळत असतां मीं अशी चोरी करावी हें खरोखरीच वाईट आहे. खरें म्हटलें असतां त्या मांजराला मीं मारिलें तें कांहीं मीं बरोबर केलें नाहीं. मला मात्र ह्या चोरीबद्दल शिक्षा होणें रास्त आहे.'' असा विचार तिच्या मनांत येऊन ती अगदीं ओशाळली; आणि तत्काळ फडताळापाशीं धावत जाऊन तिनें तो आंबा जेथला तेथें ठेविला.

## वाणीचे संयमन

इंग्लंडांतल्या एका खेड्यांत एक सज्जन शेतकरी होता. तो मोठा पापभीरु होता. त्याच्या पदरीं एक नोकर होता, तो मोठा प्रामाणिक व कर्तव्यदक्ष होता; पण स्वभावानें अमळ तापट असल्या कारणानें तो आपल्या हाताखालच्या दुसऱ्या कामकऱ्यांवर एवढ्यातेवढ्या कारणावरून रागावे, आणि त्याला शिव्याशाप देई. ही त्याची तापट वृत्ति पाहून त्याच्या धन्याला फार वाईट वाटे. तो त्याला वारंवार असा उपदेश करी कीं, ''असे अपशब्द बोलून दुसऱ्याचें मन दुखवूं नये. त्यांत देव राजी नाहीं.'' तो नोकर म्हणे: ''याला माझा इलाज नाहीं. ह्या चाकरांचा हलगरजीपणा व आळस पाहून माझ्या अंगाची आग होते; आणि मग माझा मला सुमार रहात नाहीं. ह्यांना अपशब्द बोलूं नये म्हणून मी पुन:पुन: निश्चय करितों, पण माझा राग मला आवरत नाहीं.''

एके दिवशीं त्या सज्जन शेतकऱ्यानें त्या नोकराला असें म्हटलें कीं, ''आज सगळा दिवस कोणावर बिलकूल रागावणार नाहींस, आणि कोणाला शिवीगाळ करणार नाहींस, तर तुला मी एक क्राऊन देईन.'' ही लालूच दाखविल्याचा परिणाम त्याच्या मनावर असा विलक्षण झाला कीं, तो सगळ्या दिवसांत कोणावर यत्किंचित्‌ही

रागावला नाहीं, किंवा एकही वाईट शब्द बोलला नाहीं. त्याच्या हाताखालच्या चाकरांला ही गोष्ट कळल्यामुळें त्यांनीं त्याला राग आणण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न केला. त्यांनीं अनेक वाईट गोष्टी केल्या. पण त्यानें त्या सगळ्या निमूटपणें सोशिल्या. त्यानें पैशाच्या लालचीनें आपलें मन आवरिलें.

याच्या धन्यानें त्याजवर सगळा दिवस सक्त नजर ठेविली होती. संध्याकाळ झाली तेव्हां त्यानें त्या नोकराला हाक मारून जवळ बोलाविलें अणि म्हटलें: ''तूं आज सगळा दिवस कोणाही कामकऱ्यावर जरासुद्धां रागावला नाहींस. तुला चिडविण्याकरितां त्यांनीं अनेक आगळिका केल्या; पण तूं आपलें मन आवरिलेंस, व तुझ्या तोंडांतून एकही अपशब्द निघाला नाहीं. तेव्हां तूं जी सबब नेहमीं सांगत ती अगदीं खोटी आहे. असें तुझ्या आजच्या वागणुकीवरून दिसून आलें आहे. तुला मी बोलीप्रमाणें क्राऊन तर देतोंच, पण केवळ पैशाच्या लोभास्तव तूं आपल्या वाणीला व मनाला आळा घालण्यास तयार झालास, याची तुला लाज वाटली पाहिजे.''

## गरीब मुलगा आणि नारिंगे

एका बाईला बाजारांतून नारिंगें आणावयाचीं होतीं. हें काम कोणाला सांगावें असा विचार करीत ती आपल्या दाराशीं उभी होती. इतक्यांत शेजारचा एक गरीब मुलगा तिच्या दारावरून चालला होता, त्याला हाक मारून तिनें विचारिलें: ''बाळा, मला बाजारांतून नारिंगें आणून देतोस का?'' मुलानें होय म्हटल्यावरून तिने त्याच्या हातावर पैसे ठेविले, आणि नारिंगांसाठी एक टोपली दिली. तीं घेऊन तो धावत बाजारांत गेला. तेथें फळेंविक्यानें त्याच्या टोपलींत तेरा नारिंगे मोजून घातलीं आणि म्हटलें कीं, ''आम्ही डझनाला तेरा देतों.'' तीं घेऊन तो परत येत असतां त्याच्या मनांत असें आलें कीं, यांतलें एक नारिंग आपणाला खायाला मिळेल तर बहार होईल. त्या बाईपाशीं एकादें मागावे तर तें बरें दिसायाचे नाहीं. इतक्यांत त्याच्या डोक्यांत अशी कल्पना आली कीं, त्या बाईने बारा नारिंगे आणायला सांगितलीं असून तेरा मिळालीं आहेत. तरी एक जास्त मिळालें आहे, तें आपण घेतलें तर त्यांत कांहीं वावगें होणार नाहीं. कारण बाईला फक्त बाराच नारिंगें हवी आहेत. असें मनांत आणून त्यानें एक नारिंग टोपलींतलें काढून आपल्या खिशांत ठेविलें. पण जातांजातां त्याच्या मनांत पुन: असा सुविचार आला कीं, हें नारिंग आपलें नाहीं. ह्यावर आपला हक्क नाहीं. हें दुसऱ्याचें आहे. तेव्हां तें घेतल्यानें चोरी केली असें होईल. आपली आई आपणास नित्य असें सांगत असते कीं, पापवासनेचा विटाळ मनाला होऊं देऊं

नये; आणि चोरी वगैरे वाईट कृत्यें करून हाताला विटाळ होऊं देऊं नये. ह्यासाठीं हें नारिंग मला कितीही आवडत असलें तरी हें मीं घेऊं नये. असें मनांत आणून त्यानें ते खिशांतले काढून पुन: टोपलींत ठेविलें.

मग त्यानें तीं त्या बाईला नेऊन दिलीं आणि म्हटलें : ''डझनाला तेरा मिळालीं आहेत.'' त्या बाईनें तीं मोजून घेऊन त्याचे आभार मानिले. त्या मुलास या वेळीं वाटलें होतें कीं, एक अधिक मिळालेलें फळ ती आपणास देईल. पण तिने त्याला तें दिलें नाहीं. तें पाहून तो फार खट्टू झाला; आणि त्याच्या मनांत पुनः असें आलें कीं, आपण तें एक फळ ठेविले असतें तर बरें झालें असतें. पण पुन: त्याच्या मनावर सुविचाराचा पगडा होऊन तो ताडदिशीं उडी मारून मोठ्याने बोलला: ''मीं केलें तेंच बरोबर आहे. मीं तें नारिंग आपणाला ठेविलें असतें तर मीं चोरी केली असें झालें असतें; आणि ही गोष्ट माझ्या मनाला जन्मभर खाती. आतां त्या बाईनें माझ्या मेहनतीबद्दल मला एक नारिंग द्यायाचें होतें; तें तिने दिलें नाहीं, याचें मात्र मला वाईट वाटतें.''

## मनोनिग्रह नसल्यानें अनर्थ होतों

शिकंदरबादशहाचा एक परम स्नेही होता. त्याजवर तो अगदीं जीवप्राण करीत असे. हा मित्र तापानें बेजार झाला. तेव्हां बादशहानें वैद्यास बोलावून त्याला चांगले औषधोपचार करण्याचा हुकूम केला. वैद्यानें त्याला औषध देऊन पथ्य करावयास सांगितलें. कोणत्याही प्रकारचें जडान्न किंवा मद्य रोग बरा होईपर्यंत सेवन करूं नये, असें त्यानें त्याला बजावून सांगितलें. हा वैद्य त्याच्याजवळ नेहमीं राहून त्याची प्रकृति संभाळी. पण एकदां तो कोठें बाहेर गेला असतां त्या मनुष्याला मांसान्न खाऊन मद्य पिण्याची हुकी आली; अणि सेवकांकडून तीं आणवून त्यांवर त्यानें यथेष्ट ताव मारिला. ह्या कुपथ्यामुळें त्याचें दुखणे उलटून असाध्य झालें, आणि त्यांत त्याचा अंत झाला.

आपला मित्र मृत्यु पावला हें पाहून शिकंदराला पराकाष्ठेचे दु:ख झालें; आणि त्या निरपराध वैद्यावर संतापून त्याला त्यानें सुळीं देवविलें! तो इतकेंच करून थांबला नाहीं, तर लढाईत बंदिवान केलेल्या सगळ्या माणसांची कत्तल उडविण्याचा त्यानें हुकूम दिला; त्याप्रमाणेंच सैन्यातील सगळ्या घोड्यांचे व खेचरांचे केस साफ भादरावे असा हुकूम त्यानें सोडिला. लष्करांत कोणी कसलेही वाद्य वाजवूं नये किंवा गाण्याबजावण्याची वगैरे कसलीही करमणूक करूं नये अशी ताकीद त्यानें दिली.

ह्याप्रमाणें पराकाष्ठेच्या दु:खामुळे तो अगदीं वेडा होऊन गेला, आणि भलभलत्या गोष्टी करूं लागला. त्याचें मन त्याला आवरतां आवरेना.

ह्या पराक्रमी बादशहाच्या अंगीं मनोनिग्रह फार कमी असल्यामुळें त्याचाही अंत वर सांगितलेल्या त्याच्या मित्राप्रमाणेंच झाला. तो देश जिंकीत जिंकीत बाबिलोन शहराजवळ येऊन तेथें तळ देऊन राहिला असतां त्याला ताप आला. त्याची परवा न करितां तो मनास येईल तसें वागूं लागला. त्याला दारूचें व्यसन मनस्वी जडलें होतें. तो तापानें बेजार झाला असतां त्याला दारू प्यावीशी वाटली आणि ती आणवून अगदीं बेहोष होईपर्यंत तो प्याला. त्यामुळें त्याचें दुखणें जड होऊन त्यांतून तो उठला नाहीं. त्यांत त्याचा वीसपंचवीस दिवसांत अंत झाला. ह्याप्रमाणें त्या शूर व पराक्रमी योद्ध्यानें एवढे देश काबीज केले, व एवढे राजे जिंकून आपले मांडलिक केले, तरी आपलें मन जिंकण्याचे सामर्थ्य त्याला आलें नाहीं. ह्यामुळें त्याचा नाश अल्पवयांत झाला.

## जहाजावरील काम शिकणारीं मुलें

ग्रेटब्रिटनाचें सगळें वैभव व थोरवी हीं आरमार व समुद्रावरील व्यापार यांवरच मुख्यत: अवलंबून आहेत. ह्यासाठी त्या राष्ट्रांतल्या बऱ्याच लोकांना जहाजावरील खलाशाचा धंदा शिकावा लागतो. हें शिक्षण लोकांस लहान वयांत देण्याची व्यवस्था तिकडे होत असते. पुस्तकी विद्या शिकावयाला जशा लहानमोठ्या शाळा असतात, तशीं खलाशाचें काम शिकण्यासाठीं लहानमोठीं तारवें असतात. अशा प्रकारच्या गोलियाथ नांवाच्या एका मोठ्या तारवावर पांचशें मुलांस खलाशाचे काम शिकवीत असतां एके दिवशीं कांहीं अपघात होऊन त्या तारवाला आग लागली. ती विझविण्याचा प्रयत्न कप्तानानें आपल्याकडून झाला तेवढा केला, पण आग कांहीं आवरेना. ती अधिकाधिक भडकूं लागली. तेव्हां त्यानें जहाजावरील सगळ्या मुलांस वरच्या मजल्यावर येऊन व्यवस्थितपणें उभें रहाण्याचा हुकूम केला. त्या हुकमाबरोबर ते सगळे पटापट वर आले, आणि कप्तानानें फर्मविल्याप्रमाणें निमूटपणें उभे राहिले. सभोंवतालीं आगीच्या ज्वाळा उसळत होत्या तरी त्या पाहून त्यांतला एकही मुलगा डगमगला नाहीं; आणि कप्तानाने सांगितलें तसें करण्यास तयार झाले. त्याच्या हुकमाप्रमाणें वागणें हें आपलें कर्तव्य आहे, कसाही संकटाचा प्रसंग आला तरी त्याचा हुकूम मोडावयाचा नाहीं, अशी भावना त्यांच्या ठायीं दृढ झाली होती.

मग या कप्तानानें पाण्यांत होड्या लोटावयास सांगून त्या मुलांपैकी जे अगदीं लहान होते त्यांना पहिल्यानें त्यांत उतरण्यास सांगितलें. त्यांनीं एकदम गर्दी करून

एकमेकांस चेंगरूं नये म्हणून तो एकाएकाचें नांव वाची, आणि तेवढाच होडींत उतरण्यास जाई. अशा व्यवस्थित रीतीनें त्यानें सगळ्या मुलांचा बचाव केला. बरेच मुलगे होड्यांत बसून किनाऱ्यावर गेल्यावर बाकीचे जे कप्तानाच्या आसपास उभे होते ते त्याला म्हणूं लागले कीं, ''तुम्ही आतां आमच्याबरोबर चला. कारण सगळें तारूं पेटून ज्वाळा आपल्या अगदीं जवळ आल्या आहेत. त्या आतां तुह्मांस केव्हा ग्रासतील याचा नेम नाहीं.'' ज्वाळांचा शेक कप्तानाला लागूं नये म्हणून कांहीं मुलगे तर त्याला बिलगून राहिले. अशी त्या मुलांची आपणावर निःसीम भक्ति आहे हें पाहून त्या कप्तानाला मोठा गहिंवर आला. कांहीं मुलांना किनाऱ्यावर पोंचवून होड्या परत तारवाजवळ आल्या, तेव्हा ते मुलगे कप्तानाला आपल्याबरोबर होडींत उतरण्याचा आग्रह करूं लागले. पण त्या परमनिग्रही व कर्तव्यपरायण कामदारानें त्यांला असें निक्षून सांगितलें कीं, तारवावरील एकूण एक माणसें सुखरूपपणें किनाऱ्याकडे रवाना झाल्याची खात्री झाल्यावांचून मला तारूं सोडून निघतां नये. कारण तारवावरील शिस्त अशीच आहे, आणि ती मला प्राणसंकट आलें तरी अवश्य पाळिली पाहिजे. केवढा अलौकिक मनोनिग्रह हा! आणि केवढी निःसीम कर्तव्यपरता! ह्या सद्गुणांचें बाळकडूं ब्रिटिश राष्ट्रांतल्या लोकांस पाजण्याची व्यवस्था होत असते म्हणूनच त्यांची आज एवढी थोरवी आहे.

## शूर बाई

विलायतेंतील एका शाळेची शिक्षक बाई आपल्या शाळेंतल्या मुलींस बरोबर घेऊन सहल करावयास गेली असतां ती त्यांला एका पुलावरून नेत होती. हा पूल एका नदीवरचा होता. त्या अर्धा पूल ओलांडून गेल्या न गेल्या तों मागून हाकआरोळी झालेली त्या बाईच्या कानीं आली. ती कसली आहे तें ती मागें वळून पाहूं लागली तों एका कुत्र्याच्या मागून काही माणसे दौडतांना तिच्या नजरेस पडलीं. तो कुत्रा पिसाळलेला होता, आणि त्याला ठार मारण्यासाठी एक माणूस बंदूक घेऊन त्याच्या मागून धावत होता.

हें संकट पाहून त्या बाईनें मुलींस पुलाच्या भिंतीला लागून मुकाट्याने उभे रहाण्यास सांगितलें. इकडे तो पिसाळलेला कुत्रा माणसांच्या आरडाओरडीला बिचकून पुलाच्या बाजूला माणसांची गर्दी नव्हती, म्हणून तिकडे धावत सुटला, आणि पुलावरून येऊं लागला. तेव्हां आपल्या मुलींच्या रक्षणासाठीं ती सगळ्या मुलींच्या पुढें उभी राहिली. इतक्यांत तो कुत्रा तिच्याजवळून निमूटपणें पुढें गेला आणि त्यांतल्या एका

मुलीस चावण्यास धावला. तें पाहून त्या बाईनें विजेच्या वेगानें त्याच्यासमोर धावत जाऊन त्याच्या तोंडांत आपला हात दिला. त्याला तो एकसारखे चावे घेऊं लागला. पण तिने मुळीं हाय म्हटलें नाहीं, आणि त्याच्या तोंडांतला हात काढिला नाहीं. इतक्यांत बंदूक घेऊन धावणारा माणूस तेथें येऊन पोंचला. त्यानें नेम धरून त्या कुत्र्यावर गोळी घातली; आणि तो तेथल्या तेथें मरून पडला.

मग त्या बाईनें त्या मुलींस आपआपल्या घरीं रवाना करून आपल्या हातास औषधोपचार करण्यासाठीं हॉस्पिटलाची वाट धरिली. त्या कुत्र्यानें तिचा हात चावूनचावून इतका छिन्नभिन्न केला होता कीं, तो पाहून ह्या बाईनें एवढी जबर इजा सोशिली तरी कशी याचें वैद्यांला मोठें नवल वाटलें; आणि तिच्या अशा विलक्षण धैर्याची, शक्तीची व मनोनिग्रहाची तारीफ त्यांनीं केली. लोकांला त्या बाईची ती कृति कळली तेव्हां तिला पहावयास हॉस्पिटलात सारी गर्दी होऊं लागली. तिला बरी करण्यासाठीं मोठमोठ्या वैद्यांनीं आपली शिकस्त केली; पण ती सुधारण्याची आशा मुळींच नाहीं असें पाहून त्यांनीं अगदीं हात टेकिले; आणि अशा थोर मनाच्या व कनवाळू बाईचा अंत होणार हें मनांत येऊन ते व इतर लोक हळहळूं लागले. पण ती बाई बिलकूल डगमगली नाहीं. ती म्हणाली: ''एवढ्या मुलींचा बचाव करण्याच्या कामीं माझा जीव बळी पडला तर त्यांत मला समाधानच आहे.''

ती बाई ह्या इजेनें मरण पावल्यावर लोकांनीं फंड उभारून तिचा पुतळा त्या पुलावर उभारिला.

## थेमिसटॉकलीजचा मनोनिग्रह

प्राचीन काळीं इराणच्या बादशहानें ग्रीस देशावर स्वारी केली. त्याचीं पुष्कळ जहाजे त्या देशाच्या बंदरांत आलीं. ग्रीक लोकांची जहाजें शत्रूशीं लढण्यासाठीं तयार करण्याचें काम थेमिसटॉकली जयाजकडे होतें. हा मोठा शूर योद्धा होता. शत्रूशीं सामना करावयास जाण्यापूर्वीं ह्या सेनापतीनें आपल्या हाताखालच्या लोकांची मसलत घेतली. ही मसलत चालली असतां एका बाबीसंबंधानें त्यांचा मोठा कडाक्याचा वाद झाला. त्यांपैकीं एका गृहस्थास थेमिसटॉकलीज याची मसलत पसंत न वाटून तो रागास चढला आणि त्या संतापाच्या झटक्यासरशीं तो थेमिसटॉकलीजला मारण्यासाठीं काठी उगारून पुढें आला. तो त्याच्या राग व उद्दामपणा पाहून थेमिसटॉकलीज याला अर्थात् राग आला. पण तो आवरून त्यानें त्याला शांतपणें म्हटलें कीं, ''मी काय म्हणतों तें अगोदर स्वस्थपणें ऐकून घ्या, आणि मग योग्य वाटल्यास मला मारा.'' ही

अशी त्याची शांत वृत्ति पाहून तो चवताळलेला माणूस चकित झाला, आणि त्याचा राग तत्काळ निवाला. मग थेमिसटॉकलीज याचीच मसलत पसंत ठरली, आणि तिला अनुसरून ग्रीक लोकांनीं शत्रूच्या जहाजांवर हल्ला केला. त्यांत त्यांला पुरा विजय मिळाला. इराणी लोकांची जहाजें ग्रीक लोकांनीं फोडून जाळून टाकिलीं; आणि त्यांचा मोठा नाश होऊन त्यांला पळून जावें लागलें. ही सालामीसची इतिहासप्रसिद्ध लढाई होय. ही इसवीसनापूर्वीं ४८० व्या वर्षीं झाली.

ह्याप्रमाणें थेमिसटॉकलीज यानें आपल्या संस्थानाचा बचाव करून ग्रीक लोकांचें स्वातंत्र्य कायम राखिलें. पण पुढें त्याच्यावर अथेन्सकरांची इतराजी होऊन त्यांनीं त्याला हद्दपार केलें. तेव्हां तो आपल्या लोकावर बिथरून त्यांचा सूड उगविण्याच्या इराद्यानें इराणच्या राजाकडे गेला. त्यानें त्याला आपल्या दरबारांत आश्रय देऊन त्याच्या मदतीने ग्रीसदेशावर पुनः स्वारी करण्याचें मनांत आणिलें. ह्या उद्देशाला अनुसरून त्यानें आपल्या सैन्याची तयारी केली आणि थेमिसटॉकलीज याला सांगून पाठविलें कीं, ''आपल्या सेनेचे आधिपत्य स्वीकारून ग्रीसदेशावर स्वारी करावयास चलावें.'' हा राजाचा निरोप कानी पडला तेव्हां त्याला मोठें संकट वाटलें. तो मनांत म्हणाला, ''राजाचा हुकूम तोडिला तर देहांतशासन व्हावयाचें; आणि तो मान्य करून स्वदेशावर शत्रूची सेना घेऊन मी गेलों असतां आपल्या देशबांधवांचा नाश केल्याचें पातक माथी येणार.'' ह्याप्रमाणें इकडे आड आणि तिकडे विहीर अशी त्याची अवस्था झाली. इराणच्या राजाच्या मर्जीप्रमाणें वागल्यानें त्याचें मोठें कल्याण झालें असतें हें उघड आहे. पण ह्या मोहाला वश होऊन आपल्या देशाशीं द्रोह करण्याचें अधम कर्म करण्यास तो तयार झाला नाहीं. त्यापेक्षां मरण बरें असें मनांत आणून त्यानें आत्महत्या केली. हा असा त्याच्या अंत झाल्याचें ऐकून ग्रीक लोकांस मोठा खेद वाटला; आणि इराणच्या राजालाहि त्याची निस्सीम देशभक्ति पाहून परम विस्मय वाटला.

## खरे धैर्य

दोन लहान मुलगे एके दिवशीं आपल्या एका मित्राच्या वाढदिवसानिमित्त त्याच्या घरीं गेले होते. घरून निघतांना त्यांच्या आईने त्याला बजावून सांगितले होतें कीं, संध्याकाळीं आठ वाजल्यावर तेथें रहाता कामा नये, घरीं निघून आलें पाहिजे. त्या मित्राच्या घरीं जाऊन पोंचल्यावर तेथें जमलेल्या दुसऱ्या सोबत्यांबरोबर त्यांनीं बागेंत इकडेतिकडे खिदळून व खेळ खेळून संध्याकाळ होईपर्यंत मोठ्या मौजेंत वेळ घालविला.

काळोख होऊं लागला तेव्हां ते मुलगे घरांत गेले. त्यांनी नाना प्रकारच्या करमणुका करण्याची योजना केली होती; मोठे मुलांना मेवामिठाई वगैरे खाण्याचे पदार्थ मांडण्याची तयारी करायची होती. चाकरमाणसे मिठाईचीं व फळांचीं तबके आंत आणूं लागलीं होतीं. इतक्यांत घड्याळांत आठांचा ठोका पडला. त्याबरोबर त्यां दोघां मुलांपैकी एकजण आपल्या जवळच्या एका सोबत्याच्या कानास लागून म्हणाला; ''आमच्या आईनें आम्हांस आठ वाजतां घरीं बोलाविलें आहे. म्हणून मला आणि माझ्या भावाला उपाहार होईपर्यंत थांबतां येणार नाही.''

हे त्याचे शब्द ऐकून तो सोबती खदाखदां हसून सगळ्या मुलांस उद्देशून म्हणाला: ''पाहा हो, हा कसा अरसिक आहे तो! अशा ऐन मौजेच्या वेळीं हा निघून जायाला पाहत आहे. म्हणे माझ्या आईनें मला आठ वाजल्यावर परत यावयाला सांगितलें आहे! काय मोठा आज्ञाधारक मुलगा पाहा!'' हें ऐकून सगळे मुलगे त्याची टवाळी करूं लागले. त्यांतला एकजण म्हणाला कीं, ''माझी आई अशी वेडी नाहीं. तिने मला नऊ वाजता परत ये म्हणून सांगितलें आहे.'' दुसरा मुलगा म्हणाला: ''मला माझ्या आईन कांहींच सांगितले नाहीं. मी केव्हांही घरीं गेलों तरी हरकत नाहीं.'' तिसरा एक अमळ दांडगा पोर होता. तो म्हणाला: ''आईचा असा गुलाम होऊन रहाणें आपणाला नाहीं बुवा खपायाचें.'' ह्या दोन मुलांच्या शेजारी एक मुलगा रहात असे, तो अमळ भितरा होता. तो त्यांजकडे येऊन म्हणाला: ''कृपा करून तुम्ही एवढ्यांत जाऊं नका. आणखी अर्धा तास थांबा. माझ्या आईनें मला साडेआठ वाजतां परत ये म्हटलें आहे. आपण उपाहार करूं, आणि बरोबरच जाऊं. मला एकट्याला टाकून जाऊं नका.'' इतक्यांत त्या घराची मालकीण तेथें येऊन त्यांला म्हणाली: ''मुलांनो, आणखी थोडा वेळ थांबून थोडं कांहीं खाऊन जा. थोडा उशीर झाला तर तुमची आई तुम्हांला रागें भरणार नाहीं.''

ह्याप्रमाणें त्या दोघां मुलांस आग्रह होऊं लागला; आणि अशा ऐन मौजेच्या वेळीं ते जावयास निघाले म्हणून त्यांच्या सोबत्यांनीं त्यांची थट्टा आरंभिली. पण त्या आज्ञाधारक मुलांनी त्याची परवा केली नाहीं. आपल्या आईच्या आज्ञेप्रमाणें वागणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे असें त्यांला वाटलें; आणि ह्या मोहाला गुंतून न रहाण्याचा निश्चय करून ते आपल्या टोप्या घेऊन घराबाहेर मोठ्या लगबगीनें पडले, आणि सारखे धावत सुटले. ते घरीं जाऊन पोंचले तेव्हां त्यांच्या आईबापांना समाधान वाटलें. आज्ञेप्रमाणें निघून यावयास आपणांला कसे अडथळे आले व केवढा मोह

टाळावा लागला, ते त्यांनीं आपल्या आईला सांगितलें. तेव्हां तिनें त्यांला कुरवाळून त्यांचे मुके घेतले. त्यामुळें त्या मुलांस जे समाधान व जें सुख झालें, तें तसल्या शंभर मौजांनीं झालें नसतें. अशा मोठ्या मोहास न जुमानिता आपण आईची आज्ञा पाळिल्याचें त्यांच्या मनांत येऊन त्यांला किती तरी सुख व आनंद वाटला! आणि त्यांच्या आईबापांलाही त्यांचा किती अभिमान व समाधान वाटलें!

## अंगांतले दोष घालविण्याचा उपाय

पारीसशहरानजीक एक मोठा श्रीमान् गृहस्थ रहात असे. त्यानें लष्करांत नोकरी केली असून तो तेथें मोठ्या हुद्द्यास चढला होता. पुढें ही नोकरी सोडून तो सुखवस्तु रहात असे. तो मोठा शूर, न्यायी व अब्रूदार होता. पण त्याच्या अंगांत दोन मोठे दोष होते: एक तापटपणाचा व दुसरा द्रव्यलोभाचा. तो क्षुल्लक कारणावरून चिडत असे. त्याची बायको सुस्वभावी व साधी होती. त्याच्या तापटपणामुळें ती फार कष्टी होत असे. तो तिच्यावर एवढ्यातेवढ्या कारणावरून संतापे व तिला शिवीगाळ करी. ह्यामुळे ती साध्वी बाई एकांती जाऊन मुळमुळ रडत बसे. तो रागास चढून आपणावर हात करायासही चुकणार नाहीं, अशी तिला नेहमीं धास्ती वाटे. ती खरी पतिव्रता व कोमळ स्वभावाची होती म्हणूनच त्याची ही वाईट वागणूक ती सोशीत असे; आणि तो गृहस्थही रागाची लहर गेल्यावर पस्तावा पावून तिच्याजवळ क्षमा मागण्यास तयार होई. असा त्याचा त्याला आपल्या ह्या वाईट वृत्तीबद्दल अनुताप वाटे. पण त्याला ती आवरतां आवरत नसे. तिच्या स्वाधीन झाला म्हणजे त्याला देहभान उरत नसे.एके दिवशीं त्यानें आपल्या घरीं कांहीं मित्रांला भोजनास बोलाविलें. तो ह्या मित्रमंडळींत बसला असतां कांहीं कारणावरून आपल्या बायकोवर पराकाष्ठेचा चिडला, व सगळ्या पाहुण्यांदेखत तिला शिव्याशाप देऊं लागला. मग तो त्या रागाच्या झटक्यासरशीं मंडळींतून उठून आपल्या खोलीत जाऊन बसला. हें त्याचें वर्तन पाहून त्याच्या पाहुण्यांस फार वाईट वाटलें; आणि त्यांपैकी एकानें त्याच्याशीं ह्या बाबतींत बुद्धिवाद करण्याचा निर्धार केला. तो त्याच्या मागून त्याच्या खोलींत जाऊन त्याला ह्या त्याच्या अन्यायाच्या व कठोर वागणुकीबद्दल पुष्कळ बोलला. हें त्याचें सगळें बोलणें निमूटपणें व शांतपणें त्यानें ऐकून घेतलें; आणि जागचा उठून, खालीं मान घालून व ओठ दाबून धरून तो खोलींत इकडूनतिकडे फिरूं लागला. कांहीं वेळाने तो त्या आपल्या मित्रास म्हणाला: ‘‘हा माझा तापटपणा व द्रव्यलोभ आवरण्याचा मीं अनेक वेळां प्रयत्न केला. पण तो कधींही सिद्धीस गेला नाहीं. पण आतां मला एक युक्ती सुचली आहे. ती केली असतां ह्या माझ्या दोन्ही दुर्गुणांला आळा पडेल अशी मला खात्री आहे. तर

ती मी करून पाहतोंच.'' असें म्हणून त्यानें आपली तिजोरी उघडून तींतली हजार फ्रॅन्कची एक नोट काढिली. ती हातीं धरून तिच्या एका शेवटास त्यानें काडी पेटवून लाविली, व ती साफ पेटून जावी म्हणून जमिनीवर टाकिली. तें त्याचें कृत्य पाहून त्या मित्राला मोठें आश्चर्य वाटलें; आणि ती नोट जळूं देऊं नये म्हणून तो ती उचलावयास धावला. पण तो गृहस्थ त्याला वारून म्हणाला: ''तुम्ही माझ्या ह्या युक्तीच्या आड येऊं नका.'' तो मित्र म्हणाला: ''अहो, ही केवढी हानि तुम्ही करून घेंतां आहां. तुम्हांला वेड तर लागले नाहीं.?'' तो म्हणाला: ''माझ्या तापटपणाबद्दल ही शिक्षा मी मला करून घेत आहे; आणि मीं इतःपर असा निश्चय केला आहे कीं, जेव्हाजेव्हा मी असा संतापून शिवीगाळ करण्यास प्रवृत्त होईन तेव्हांतेव्हां अशीच शिक्षा मी मला करून घेईन. अशानें माझ्या द्रव्यलोभाला व तापटपणाला असा दोहोंही अवगुणांला आळा पडेल.''

ह्या निर्धाराप्रमाणें तो गृहस्थ कांहीं दिवस वागत राहिला. त्यामुळें त्याचें बरेंच नुकसान झालें, पण शेवटीं त्याच्या स्वभावांत चांगला पालट होऊन तो शांत, क्षमाशील व उदार झाला. ह्या योगें तो सगळ्यांना विशेष आवडूं लागला, आणि त्याची सुशील बायको सुखी झाली.

## लायकरगसाची सहनशीलता

ग्रीसदेशांत प्राचीन काळीं स्पार्टा म्हणून एक स्वतंत्र संस्थान होतें. तेथले लोक मोठे शूर व स्वतंत्रताप्रिय होते. त्यांला कह्यांत ठेवून त्यांच्यावर अंमल चालविण्याचें काम अमळ बिकट असे. लायकरगस म्हणून एक मोठा शहाणा पुरुष त्यांच्यामध्यें होऊन गेला. त्यांच्यावर सत्ता चालविण्याचा अधिकार ह्या शहाण्या पुरुषाच्या हातीं आला, तेव्हां त्यानें लोकनियमनासाठीं मोठे कडक कायदे केले. ते लोकांला आरंभीं फार जड गेले. ते त्याच्या नांवानें खडे फोडूं लागले. जे ते त्याला शिव्या देऊ लागले. ते म्हणूं लागले कीं, ''आम्हीं अमुक इतकेंच खावें, अमुक इतकेंच ल्यावें, अमुक इतकेंच सामान घरांत ठेवावें, असले नियम करणारा हा कोण?'' हा त्याचा आपणांवर जुलूम आहे असें त्यांला वाटून ते त्याचा नाश करायास पाहूं लागले. एके दिवशीं तो रस्त्यांतून चालला असतां शेकडो लोक त्याच्या पाठीस लागले. तेव्हां तो जवळच्या एका देवळाकडे पळत सुटला. तेथें जाऊन पोंचण्यापूर्वीं एका तरुण गृहस्थानें त्याच्या डोक्यावर काठीचा फटका मारिला. त्यामुळें त्याला मोठी जखम होऊन तीतून भळभळां रक्त वाहूं लागलें तरी त्यानें त्या तरुण गृहस्थावर उलट प्रहार केला नाहीं. पण मागें परतून त्यानें आपलें रक्ताने भरलेलें डोकें आणि तोंड मागून धांवत येणाऱ्या लोकांच्या

झुंडीला दाखविलें. ती त्याची अशी अवस्था पाहून ते लोक लागलींच चरकले; आणि अशा थोर व योग्य माणसावर आपण बिथरलों हें बरोबर नाहीं, असें वाटून ते शरमिंदे झाले; आणि ज्या माणसाने त्याच्यावर तो टोला हाणिला होता त्याला पकडून त्यांनीं त्याच्याकडे आणिलें, आणि म्हटले कीं, ''हा दुष्ट मनुष्य तुमचा कैदी आहे. याला वाटेल तें शासन करा.'' असें म्हणून ते त्याला त्याच्या घरापर्यंत पोंचवायास गेले. आपल्या घराच्या दारांत गेल्यावर तो त्यांस म्हणाला: ''सज्जन हो, ह्याबद्दल मी तुमचा आभारी आहें. तुम्ही आतां शांतपणे आपआपल्या घरीं जा, आणि मला मारणाऱ्या माणसाला माझ्या स्वाधीन करा.'' त्याच्या सांगण्याप्रमाणें करून ते तेथून निघून गेले.

मग लायकरगसानें त्या तरुण माणसाला आपल्या घरांत नेलें. त्याला असा धाक पडला होता कीं, आतां हा आपणास मोठें शासन करील. पण लायकरगसानें त्याला कांहींएक शिक्षा केली नाहीं. फार काय, पण त्याच्या त्या कृतीबद्दल तो त्याला एक शब्दही बोलला नाहीं. त्याला त्यानें आपल्या घरीं कांहीं दिवस ठेवून घेतलें, व त्याच्याशीं मोठ्या स्नेहभावानें वागून त्याला तो आपलीं कामें सांगे; तीं तो तरुण गृहस्थ मन लावून करी. त्याच्या सहनशीलतेचा त्याच्या मनावर एवढा परिणाम झाला कीं, तो त्याला देवासारिखा मान देऊं लागला. शिवाय लायकरगस संस्थानाच्या व्यवस्थेसाठीं किती जिवापाड श्रम करीत असे, प्रत्येक इसमाशीं तो किती ममतेनें वागे, त्याची रहाणी किती साधी व नेमस्तपणाची असे, इत्यादि गोष्टी त्याच्या नजरेस पडून त्याची त्याच्या विषयींची आदरबुद्धि अतिशयित वाढली.

पुढे लायकरगसानें त्या माणसाला आपल्या घरीं जाण्याची परवानगी दिली. तेव्हां तो स्पार्टाशहरभर हिंडून लोकांला असें सांगू लागला कीं, ''लायकरगसासारखा सज्जन व थोर पुरुष सगळ्या स्पार्टाशहरांत नसेल. मीं त्याला मारिलें हा मजकडून अधमपणा घडला. त्याबद्दल मला नेहमीं वाईट वाटत असतें.''

ह्या गोष्टीवरून लायकरगसाच्या अंगीं सहनशीलता व मनोनिग्रह हे गुण किती अप्रतिम होते हें ध्यानांत येतें. लोकांचें कायद्यांनीं नियमन करण्याचें सामर्थ्य जसें त्याच्या अंगीं होतें, तसेंच आपलें मन आवरण्याचेंही सामर्थ्य होतें. अशी कल्पना करा कीं, त्या उद्दाम माणसानें त्याच्या डोकीवर काठी मारिली, त्या वेळीं लायकरगस संतापून रागाच्या आवेशांत त्याच्यावर उलट हात करिता किंवा आपल्या मागून धावणाऱ्या लोकांवर उलटून त्यांला शिवीगाळ करिता, तर ते लोक अधिकच चवताळून त्याला तेथल्या तेथें ठार करिते.

❑❑❑

### भाग पाचवा

# कर्तव्यपरता

## सिनेटची सभा आणि सूर्यग्रहण

अमेरिकेतील संस्थानें ब्रिटिशसत्तेखालून निघून स्वतंत्र होण्यापूर्वी स०१८८० सालीं कनेकटिकटनामक संस्थानाची राज्यव्यवस्था पाहणाऱ्या सिनेट नांवाच्या संस्थेची सभा भरली असतां एकाएकीं सूर्यग्रहण लागलें. तें खग्रास ग्रहण होतें. सूर्यबिंब सगळें झांकलें जाऊन जिकडेतिकडे काळोख पडला. तेव्हां कांहीं सभासद घाबरून जाऊन म्हणूं लागले कीं, ''जगाचा अंतसमय आला आहे असें वाटतें. हें मोठेंच संकट आहे. तरी आपण सभेचें काम तहकूब ठेवूं या. हा प्रसंग गुदरून गेल्यावर पुन: सभा भरवूं.'' हें त्यांचें भ्याडपणाचें म्हणणें त्या सभेंतील डेवनपोर्टनामक एका वृद्ध सभासदाला पसंत वाटलें नाहीं. त्यानें अशी सूचना केली कीं, ''आपण अतिमहत्त्वाच्या प्रश्नाचा विचार करण्यांत गुंतलों आहों. असल्या संकटास भिऊन आपलें कर्तव्य तहकूब ठेवणें मला इष्ट वाटत नाहीं. काळोख पडला आहे तरी मेणबत्त्या पेटवून आपला ऊहापोह पुढें चालवूं. यदाकदाचित् हा जगाचा अंतसमय असला तरी कांहीं चिंता नाहीं. आपण आपलें कर्तव्य करीत असतां सगळ्या जगाबरोबर आपलाही अंत झाला असें फारतर होईल.''

## रामलालाची कर्तव्यबुद्धि

ईस्ट इन्डिआ रेल्वेकंपनीच्या एका लाइनीवर रामलाल नांवाचा एक मनुष्य गाड्या ह्या लाइनीवरून त्या लाइनीवर नेण्याच्या कामावर होता. तो सन १९०९ सालच्या मार्च महिन्यांत एके दिवशीं आठ रिकामे डबे कोळशांच्या खाणीजवळील लाइनीवर नेत असतां तीन लहान मुलें लायनीच्या वळणावर खेळत असलेली त्याच्या दृष्टीस पडलीं. तेव्हां तीं गाडीखाली सांपडतील असें त्याच्या लक्ष्यांत येऊन त्यानें ब्रेकीवरून

उडी टाकिली, आणि मोठ्या वेगानें धावत जाऊन दोन मुलांस लाइनीवरून बाहेर उचलून ठेविलें; आणि तिसऱ्या मुलास तो उचलावयास गेला तों गाडी त्या मुलावरून जाऊन तें ठार झालें; आणि त्यासही गाडीचा धक्का लागून बरीच दुखापत झाली. लाइनीवरून गाड्या नेतांना कोणालाही इजा न होईल अशी व्यवस्थ्या ठेवावी, हे गाड्या चालविणारांचें कर्तव्य आहे. हें कर्तव्य त्यानें असें उत्तम रीतीनें केलें, व तें करीत असतां आपल्या जिवाचीही परवा केली नाहीं. या शौर्याच्या व दयेच्या कृत्याबद्दल त्याला आपले राजाधिराज पांचवे जॉर्ज बादशहा यांजकडून सुवर्णपदक मिळालें.

## पॉम्पी शहरांतला संत्री

इटली देशांत नेपल्स म्हणून एक शहर आहे. त्याजवळ व्हेसुविअस नांवाचा एक ज्वालामुखी पर्वत आहे. ह्या पर्वताच्या पायथ्याजवळ प्राचीन काळीं पॉम्पी नांवाचें एक विख्यात नगर होतें. सन ७९ सालीं ह्या ज्वालामुखी पर्वतांतून तप्त धातुरस, धोंडे, राख वगैरे बाहेर पडून तें सगळें शहर एकदम अगदीं साफ बुजून गेलें, व त्याचा मागमूसही उरला नाहीं. पुढें अठराव्या शतकांत तेथली जमीन खणून पाहता आंत त्या प्राचीन शहराची सगळी रचना बहुतेक जशीचीतशी राहिलेली दिसली. ह्या अतिघोर प्रसंगीं त्या शहरांतलीं माणसें निरनिराळ्या व्यवसायांत गुंतलीं असतां जागच्याजागीं भाजून मेलीं, त्यांचे पुष्कळ सांगाडे सांपडले. त्यांमध्यें शहराच्या वेशीपाशीं पहारा करीत असलेल्या संत्र्याचा उभा सांगाडा आढळला. त्यावरून तज्ज्ञ असा तर्क करितात कीं, धातुरसादिकांचा प्रचंड वर्षाव होऊं लागला तरी तो आपलें ठाणें सोडून पळाला नाहीं, किंवा यत्किंचितही डगमगला नाहीं. नाकातोंडांत तापलेली राख न जावी म्हणून त्यानें आपला हात त्यावर ठेविला होता, तो तसाच त्याच्या सांगाड्यांत राहिला होता! प्राचीन काळचा रोमन शिपाई आपल्या कर्तव्यास कसा तत्पर असे, याचा हा उत्कृष्ट दाखला राहिला आहे.

## खुणेच्या शब्दाचा विसर

फ्रान्सदेशांतल्या निरनिराळ्या ठाण्यांवर रखवालीसाठीं लष्कर ठेविलें असतें. त्यांवर एकएक कर्नल असतो. ह्या अंमलदाराच्या रहात्या घराच्या दरवाज्यावर संत्र्यांचा पहारा असतो. ह्या संत्र्यांला अशी ताकीद असते कीं, ठरलेला खुणेचा शब्द सांगितल्यावांचून कोणालाही रात्रीचा घरांत प्रवेश करूं देऊं नये.

अशा एका ठाण्यावरील एक कर्नल जलशाला गेला होता. त्याला परत यावयाला फार उशीर झाला. तो आपल्या घरापाशीं आला तेव्हां त्याला संत्र्याने अडविलें;

आणि खुणेचा शब्द सांगितल्यावांचून तो त्याला आंत जाऊं देईना; त्या कर्नलास तो शब्द कांहीं आठवेना. त्यानें त्या संत्र्याची पुष्कळ समजूत घातली, पण तो कांहीं केल्या ऐकेना. तेव्हां जवळच शिपायांचीं बिऱ्हाडें होतीं तेथें जाऊन त्याला खुणेचा शब्द विचारावा लागला. तो त्यानें सांगितला तेव्हां त्याला आपल्या घरांत जावयास मिळालें.

आपण हा असा कडकपणा दाखविला, याचा आपल्या अंमलदारास राग येऊन आपणाला तो शिक्षा करील, अशी भीति या संत्र्यास पडली होती. परंतु फर्माविलेल्या हुकमाप्रमाणे कसाही प्रसंग आला तरी वागणें हें आपलें कर्तव्य आहे, असा त्या संत्र्याचा दृढ निश्चय पाहून त्या कर्नलानें त्याची तारीफ केली.

## ऑर्फिअस जहाजावरील खलाशी

इंग्लंडचें ऑर्फिअस नांवाचें एक नवें लढाऊ जहाज होतें. त्यावर २५६ खलाशी होते. तें न्यूझिलंडच्या किनाऱ्याजवळ स. १८६३ त फेब्रुवारी महिन्याच्या १७ व्या तारखेस फुटलें. त्या वेळीं बंदरांत एक मोठे जहाज होतें, त्यावरच्या होड्या ह्या जहाजावरील माणसांच्या बचावासाठीं रवाना झाल्या. तेव्हां जहाजावरचे कामदार पहिल्यानें आपल्या माणसांला होड्यांत उतरूं लागले. पण कामदारांनीं प्रथम उतरावें असा खलाश्यांनीं आग्रह धरिला. त्यांस त्यांनीं असें निक्षून सांगितलें कीं, ''आमच्या हाताखालच्या सगळ्या माणसांचा बचाव पहिल्यानें करावा हें आमचें कर्तव्य आहे. तो होईपर्यंत आमच्या बचावाचा विचार आम्ही मुळीं करणार नाहीं.'' ह्यावरून त्यांच्या हाताखालचे लोक होड्यांत उतरूं लागले. होड्या थोड्या व लहान असल्यामुळें त्यांतून प्रत्येक खेपेस थोडेथोडे खलाशी जाऊं लागले; आणि फुटक्या जहाजांत तर भराभर पाणी भरून तें बुडण्याच्या अगदीं लागास आलें. तरी त्यावरील खलाश्यांनीं जरासुद्धां गडबड किंवा धांदल केली नाहीं. कामदार सांगत तेवढे माणूस होड्यांत उतरत. बाकीचे जागच्या जागीं स्थिर उभे रहात. असें करितांकरितां अवघे ७१ माणूस होड्यांनीं नेल्यावर तें जहाज पाण्याच्या तळाशीं गेलें, आणि बाकीचे सगळे खलाशी व ते कर्तव्यपरायण कामदार तेथें बुडून मेले. जहाज बुडतांना त्यांनीं दुःखाच्या आरोळ्या वगैरे मुळींच मारिल्या नाहींत; तर उलट त्यांनीं प्रचंड जयघोष केला!

## पालस एमिलस याची कर्तव्यपरायणता

रोमनगरींत प्राचीन काळीं पालस एमिलस नामेंकरून एक अतिविख्यात वीर होऊन गेला. त्यानें स्पेनदेशावर मोहीम करून तेथला बराच मुलूख काबीज केला. त्या देशांतलीं अडीचशें शहरें त्यानें हस्तगत केलीं असें सांगतात. त्या काळीं स्पेनदेश

मोठा समृद्ध होता; आणि एवढीं शहरें काबीज करणाऱ्या सेनापतीला अपरंपार द्रव्य मिळविण्याची संधि होती. पण परक्याच्या वित्ताचा अपहार करून गबर होण्याचें दुष्कर्म त्याला अगदीं बरें वाटलें नाहीं. द्रव्याचा लोभ धरून आपली मोहीम चालविली, तर आपल्या हातून आपलें कर्तव्य बरोबर व्हावयाचें नाहीं असें त्याला वाटून त्या स्वारींत तो तेथल्या एका तनसडीलाही शिवला नाहीं. ह्या अशा निर्लोभ वृत्तीमुळें त्याला आपलें कर्तव्य उत्तम प्रकारें बजावितां आलें; आणि त्याबद्दल त्याचा मोठा जयजयकार झाला. स्वदेशी आल्यावर त्याला तेथल्या उच्च अधिकाराच्या जागा मिळाल्या. त्या वहिवाटतांनासुद्धां त्यानें केवळ स्वकर्तव्याकडे पूर्ण लक्ष पुरवून आपली कामगिरी प्रामाणिकपणानें केली. अनन्वित मार्गानें धन मिळविण्याची बुद्धि त्याला कधींही झाली नाहीं. ह्या अशा कडकडीत व्रतामुळें हा थोर व पराक्रमी पुरुष आमरण निर्धन राहिला. तो मेल्यावर त्याच्या बायकोमुलांचा निर्वाह जेमतेम चाले इतकी मालमत्ता मागें राहिली होती. ह्या अशा निरपेक्ष बुद्धीनें स्वकर्तव्य बजाविल्यामुळें त्याचें नांव रोमच्या इतिहासांत परमपूज्य व अमर होऊन राहिलें आहे. कोणत्याहि ऐहिक लाभाची आशा न धरितां स्वकर्तव्य करणारीं माणसें जगाला सर्व काळ वंद्य होतात.

## एका मुलीची अलौकिक कर्तव्यबुद्धि

लंडनांत एक तेलाचा व्यापारी रहात असे. त्याचीं तीन लहान मुलें होतीं. त्यांचा संभाळ करण्याकरितां त्यानें एक तरुण बाई ठेंविली होती. तिचें नाव आलिस एरीज असें होतें. एके दिवशीं रात्रीं ती त्या तिघां मुलांस घेऊन अगदीं वरल्या मजल्यावर निजली असतां त्या घरास एकाएकी आग लागून तें सगळें पेटलें. तेव्हां रस्त्यांत लोक जमा होऊन त्या बाईला हाका मारून म्हणू लागले कीं, ''खालीं परांच्या गाद्या पसरल्या आहेत त्यांवर उडी टाकून आपल्या जिवाचे रक्षण कर. त्या वेळीं जी होती त्या मजल्यानेंही पेट घेतला होता. पण आपल्या ताब्यांतल्या मुलांचें रक्षण आपण अगोदर केलें पाहिजे, हें आपलें कर्तव्य आहे असें मनांत आणून एकएक मूल उचलून तिने खालच्या माणसांकडे फेंकिलें. ज्वालांनीं व धुरानें ती गुदमरून गेली व अगदीं कासावीस झाली. त्यामुळें तिला चक्कर येऊं लागली. मुलें खालीं सोडिल्यावर ती बारीवाटे खालच्या गाद्यांवर उडी टाकावयास म्हणून गेली. पण धुराच्या व ज्वालांच्या लोळांत तिला खालचें चांगलेंसें न दिसल्यामुळें तिची उडी गाद्यांवर पडली नाहीं. ती एका पाटीला अडकून खालच्या फरसबंदीवर पडली. त्यामुळें तिला जबर दुखापत झाली. तींतून ती बचली नाहीं. ह्याप्रमाणें तिला अल्पवयांत मरण आलें तरी ती फारशी कष्टी

झाली नाहीं. आपल्या हवालीं केलेल्या मुलांचा बचाव झाला हें पाहून तिला समाधान वाटलें; आणि ती म्हणाली कीं, ''माझें कर्तव्य करण्यांत मला असें मरण आलेंयाचें मला दु:ख वाटत नाही.''

## विश्वासू कुत्रा

लंडनांत रहाणारा एक गृहस्थ एके दिवशी खेड्यातल्या आपल्या घरीं दोन दिवस रहाण्यासाठीं गेला. तेथें गेल्यावर त्याला आठवण झाली कीं, शहरांतल्या घरीं लागणारी एक चावी आपण विसरतेपणीं बरोबर आणिली आहे. ती तेथल्या माणसांला मिळाली नाहीं तर त्यांचें फार अडेल मग त्यानें ती चावी आपल्या कुत्र्याच्या तोंडांत देऊन त्याला त्यानें शहरांतल्या घरीं ती नेऊन द्यावयास सांगितलें. ह्या कुत्र्याला त्यानें वस्तु नेण्याआणण्यास शिकविले होतें. यास्तव धन्याचा हुकूम त्याला चांगला कळून त्यानें शहराकडे धूम ठोकिली. तो असा दौडतांना पाहून वाटेत खाटकाच्या एका कुत्र्यानें त्याच्यावर हल्ला करून त्याला बरेंच हैराण केलें. पण तोंडांतली चावी सांडूं नये म्हणून त्या शत्रूचा मार सोसून जेमतेम त्याच्या तावडींतून सुटून तो घरीं गेला, आणि चावी तेथल्या माणसांच्या स्वाधीन करून माघारीं परतला; येतांना त्या खाटकाच्या दारापाशीं उभा राहून तो आपल्या त्या शत्रूचा सुगावा काढूं लागला. त्याबरोबर तो कुत्रा त्याच्यावर पुन: चालून आला. ह्या वेळीं त्याचें तोंड मोकळें असल्यामुळें त्याला त्या शत्रूचा खरपूस समाचार घेतां आला. ह्याप्रमाणे त्याला चांगली शिक्षा करून तो आपल्या धन्यापाशीं आला. ह्या लहानशा गोष्टींत कुत्र्यासारख्या मुक्या प्राण्याच्या ठायीं सुद्धां कर्तव्यदक्षता किती वसत असते हें लक्षांत येतें. आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजावण्याच्या कामीं कितीही त्रास किंवा गैरसोय सोसावी लागली तरी ती सोसण्यास तयार व्हावें यांतच खरी माणूसकी आहे.

## सगळी पलटण गारद होते

फ्रेंच लोक व स्प्यानिश लोक यांच्यांमध्यें सन १६४३ त शॅकरॉय येथें मोठी लढाई झाली. तींत स्प्यानिश लोकांची एक पायदळ पलटण समरांगणांत सगळीची सगळी ठार झाली. तींतला एकही शिपाई मागें हटला नाहीं. त्यांचा सेनापति काउन्ट डी फ्युनटीस नामेंकरून होता. तो मोठा शूर योद्धा होता. त्याने पुष्कळ लढाया मारून स्वदेशाला अनेक वेळां विजयश्री मिळवून दिली होती. ह्या युद्धाच्या समयीं तो वृद्धापकाळामुळें अगदीं डेंगला होता; इतका कीं, त्याला चालतां देखील येत नव्हतें. पण स्वदेशावर आलेला बिकट प्रसंग पाहून तो स्वत: सदरील पलटणीचा सेनापति

होऊन समरभूमीवर आला. तेथें त्याला खुर्चीवरून आणावें लागलें. हा असा वृद्ध व अशक्त झालेला सेनापति, स्वदेशाच्या रक्षणासाठीं आपल्या प्राणांची आहुति देण्यास सिद्ध व्हावें हें आपलें कर्तव्य आहे असें समजून युद्धाच्या जागीं आलेला पाहून त्याच्या पलटणींतल्या एकूणएक शिपायाच्या अंगांत आवेश संचरला, आणि रणांतून शत्रूला पाठ दाखवून बिलकूल माघारीं पाय घ्यावयाचा नाहीं असा सर्वांनीं कृतसंकल्प केला. ह्या संकल्पानुसार ते झाडून सारे वागले. ते सगळे रणामध्यें एकेच ठिकाणीं मरून पडलेले आढळले; आणि त्यांचा तो वृद्ध सेनापतिही खुर्चीवर होता तेथेंच गतप्राण झाला होता. ह्या लढाईत फ्रेंचांला विजय मिळाला; आणि त्यांच्या सेनापतीला त्या स्प्यानिश वृद्ध सेनापतीच्या अशा अत्यंत स्तुत्य मृत्यूची वार्ता कळली तेव्हां तो म्हणाला की, ''मला ह्या समयीं विजय प्राप्त झाला नसता तर मीं अशा रीतीनें मृत्यू यावा अशी इच्छा केली असती.'' मग त्यानें ती त्या कर्तव्यपरायण वृद्ध सेनापतीची खुर्ची आपल्याकडे राखून ठेविली.

## लहान मुलीची कर्तव्यबुद्धि

समुद्रांतील एका दीपगृहाच्या रखवालदाराची एके दिवशीं अन्नसामग्री संपली, ती आणण्यासाठीं तो होडींत बसून किनाऱ्यावर गेला. बाजारांत जिनसा खरेदी करण्यांत तो गुंतला असतां तिसऱ्या प्रहराच्या सुमारास एकाएकीं मोठें वादळ झालें; आणि समुद्र पराकाष्ठेचा खवळून मोठ्या प्रचंड लाटा उसळूं लागल्या. अशा वादळांतून आपणास दीपगृहांत परत जातां येत नाहीं हें पाहून तो अगदीं चिंतातुर झाला. रात्रीं दिवे पेटले नाहींत तर पुष्कळ जहाजें सुरक्षित मार्ग न उमगून फुटून नाश पावतील हा विचार मनांत येऊन तो अतिशयित खंती झाला. संध्याकाळ झाला तरी वादळाचा जोर कमी न होतां उलटा वाढत चालला; आणि तो किनाऱ्यावर येऊन अगदीं अस्वस्थचित्त होऊन दीपगृहाकडे पाहत राहिला. इतक्यांत त्यांतले सगळे दिवे पेटून त्यांचा उजेड चोहोंकडे फाकला. तो पाहून त्याच्या जिवांत जीव आला, आणि त्याला मोठें समाधान वाटलें. दुसरे दिवशीं वादळ बंद होऊन समुद्र अमळ शांत होतांच तो दीपगृहांत गेला; आणि पाहतो तों त्याची एक लहान मुलगी दीपगृहांत एकटीच होती, तिनें एका उंच खुर्चीवर पुस्तकें एकावरएक रचली व त्यांवर चढून ते दिवे पेटविले असें त्याला कळून आलें. दीपगृहांतून जाण्यापूर्वीं त्यानें सगळे दिवे पुसून, तेल घालून तयार करून ठेविले होते म्हणून बरें झालें. नाहीं तर ते रात्रभर पेटले नसते हें उघड आहे. रात्रीचे दिवे पेटत ठेवणे हें आपल्या बापाचें कर्तव्य आहे, तें त्याच्या मागें

अवश्य केलें पाहिजे, नाहीं तर मोठा घात होईल. हें त्या लहान मुलीच्या लक्षांत येऊन तिनें दिव्यांला आपले हात पोंचतीलसें करण्याची वरील युक्ती योजिली; आणि शेकडो हजारो माणसांचे जीव तिने वाचविले. ही कर्तव्यबुद्धि त्या मुलीच्या हृदयांत अशा लहान वयांत चांगली बिंबली होती ह्यांचे आपण कौतुकच केलें पाहिजे.

## सर टॉमस फाबेल याची गोष्ट

अठराव्या शतकांत ब्रिटिश लोकांच्या वसाहतींत गुलाम बाळगण्याची चाल होती. ती बंद करण्याच्या कामीं ज्या सत्पुरुषांनीं जिवापाड श्रम केले त्यांमध्यें सर टॉमस फाबेल याची गणना प्रमुखत्वानें करितात, त्याची लहानपणची एक गोष्ट सांगतात, ती अशी:

तो ज्या गांवांत रहात असे, तेथला एक डुकरेंविक्या कांहीं डुकरें घेऊन जवळच्या शहरांत विकावयास गेला. फाबेलच्या वडिलांस ह्या डुकरेंविक्याला कांहीं काम सांगावयाचें होतें. त्याची आठवण त्यांला तो गांवांतून निघून गेल्यावर झाली. तेव्हां तो निरोप त्याला पोंचतो कसा अशी त्यांला पंचाईत पडली. तीं गरीब स्थितींत असल्यामुळें त्यांच्या पदरीं चाकर नव्हता. म्हणून त्यांला आपल्या ह्या मुलास त्या डुकरेंविक्याच्या मागून धावत जाण्यास सांगावें लागलें. हा त्या वेळीं पांचसहा वर्षांचा होता. पण वडिलांची आज्ञा पाळावी हा आपला धर्म आहे हें त्याला अशा अल्पवयांतही चांगलें कळत होतें. म्हणून त्यांची आज्ञा होतांच तो डुकरेंविक्याच्या मागून धावत सुटला. वाटेंत बराच चिखल होता, त्यामुळें त्याला लौकर चालतां येईना. एके ठिकाणीं तर त्याच्या पायांतला जोडा चिखलांत रुतून पडला. तो तेथेंच टाकून तो अनवाणी पुढें चालता झाला. ह्याप्रमाणें दौड करीत त्यानें त्या डुकरेंविक्याला शहरांतल्या बाजारांत गांठिलें; आणि त्याला वडिलांचा निरोप सांगून तो तसाच माघारी परतला. एवढ्या लहान वयांत त्याच्या ठायीं अशी कर्तव्यनिष्ठा विकास पावली आहे हें पाहून त्याच्या वडिलांस केवढे समाधान वाटलें असावें बरें! अशाच स्वकर्तव्यदक्ष माणसांच्या हातून परोपकाराचीं व थोर कृत्यें होण्यासारखीं असतात, हें उघड आहे.

## बादशहा आणि पहारेकरी

फ्रान्सदेशांत नेपोलियन नावाचा एक पराक्रमी बादशहा होऊन गेला. त्याच्या एका मोहिमेत त्याला मोठा विजय मिळून तो आपल्या सेनेसहवर्तमान एके जागीं तळ देऊन राहिला. तेथें तो एका पडक्या इमारतींत मुक्कामास राहिला, आणि त्याच्या आसपास त्यानें संत्र्यांचा सक्त पहारा ठेविला. त्यानें पहारेकऱ्यास अशी ताकीद दिली होती कीं, कोणीही इसम एकाद्या लष्करी अंमलदारास बरोबर घेतल्यावांचून आला असतां

त्याला त्या इमारतींत प्रवेश करू देऊ नये. एके दिवशी सायंकाळी काळोख पडत चालला असतां, एक ठेंगणा माणूस तपकिरी रंगाचा मोठा झगा लेवून, एका पहारेकऱ्याच्या अंगावरून बेधडक चालत येऊन त्या इमारतीकडे जाऊं लागला. त्याबरोबर पहारेकऱ्यानें आपल्या बंदुकीची संगीन पुढें करून मोठ्याने म्हटलें: ''पुढे जाऊं नका.'' तें त्याचें हटकणें मनास न आणून हा इसम पुढें चालला. तेव्हां त्या पहारेकऱ्यानें मोठ्यानें ओरडून त्याच्या अंगांत संगीन खुपसण्यासाठीं पुढें चाल केली. इतक्यांत बाहेर गलबला झालेला ऐकून एक लष्करी अंमलदार तेथें धावत आला; आणि त्यानें बादशहाला ओळखून त्या पहारेकऱ्याला वारिलें. मग त्या शिपायाला गारदीच्या ठाण्यावर नेलें. आपण मोठी भयंकर आगळीक केली आहे, आतां आपणाला देहांतशासन खास होणार असें त्या शिपायाला वाटलें. इतक्यांत बादशहानें त्याला आपल्यासमोर आणावयास सांगितलें. त्याप्रमाणें तो बादशहासमोर मरणभीतीनें थरथरां कांपत उभा राहिला असतां, तो त्याला म्हणाला: ''माझ्या लष्करांतल्या शिपायांनीं हुकमाबरहुकूम वागण्यास तुझ्याप्रमाणें तत्पर रहावें हें मला फार पसंत वाटतें. तुझ्या ह्या कर्तव्यपरतेबद्दल तुला चांगलें बक्षीस दिलें पाहिजे. तर आजपासून तुला अंमलदाराचा दरजा प्राप्त झाला आहे.

## देशबांधवांसंबंधाचें कर्तव्य

पूवकाळीं स्कॉटलंडदेशांत पार्लमेन्टचे सभासद निवडण्यासंबंधाची अशी चाल होती कीं, एकाएका टापूंत सभासद निवडण्याचा हक्क चारचार पांचपांच असामींला असे. असे निवडणारे जेथें चौघेच असत, तेथें दोघांनी एका उमेदवाराला व दोघांनीं दुसऱ्या उमेदवाराला मते दिलीं असतां त्यांपैकीं एकाला दोन मते देण्याचा हक्क दिला असे. हा हक्क त्या चौघां असामींला पाळीपाळीनें प्राप्त होत असे. त्यामुळें कोणाचीहि तक्रार न उरून बहुमताची भानगड रहात नसे.

नवीन पार्लमेन्टाची निवड स.१८०७ त झाली, तेव्हां चौघां मतदारांच्या अशा एका टापूमध्यें दोन असामींनीं एका उमेदवाराला व दुसऱ्या दोघांनीं दुसऱ्या उमेदवाराला मतें दिल्यामुळें दोन मते देण्याची पाळी त्यांपैकीं एकावर आली. तेव्हां एका उमेदवाराच्या वतीनें खटपट करणाऱ्या माणसांनीं त्या मतदाराकडे जाऊन त्यानें आपल्या उमेदवाराच्या तर्फेनें दुसरें मत द्यावें म्हणून त्याची मनधरणी केली. हा मतदार लोहार होता. तो घरचा गरीब होता. यास्तव तो पैशाच्या लालचीनें वळेल असें वाटून त्यांनीं त्याला पुष्कळ पैसे देऊं केले, व त्याच्या मुलांच्या शिक्षणाची व रोजगाराची सोय करून देण्याचें

वचन दिलें. पण ह्या लालचींने तो मुळीं वळला नाहीं. त्यांनीं त्याला हजारांपासून पंधराशेपर्यंत पौंड रोख देतों म्हणून सांगितलें. तरी तो त्यांच्या म्हणण्यास कबूल झाला नाहीं. त्या गरीब लोहारानें त्यांस असें निक्षून सांगितलें कीं, ''मला मत देण्याचा जो हा हक्क मिळाला आहे, त्यापासून माझ्या देशबांधवांचें वास्तविक हित होईल अशाच रीतीनें त्याचा उपयोग मला केला पाहिजे. माझ्या मनाची अशी पक्की खात्री झाली आहे कीं, त्या दुसऱ्या उमेदवाराच्या तर्फेनें मीं आपलें मत दिल्यानें आमच्या लोकांचे हित होण्याचा विशेष संभव आहे. ह्या माझ्या समजुतीप्रमाणे मीं वागावें हें माझें कर्तव्य आहे. माझ्या देशबांधवांच्या हिताविरुद्ध मत देऊन माझा एकट्याचा फायदा करून घ्यावा हें अत्यंत नीच कर्म आहे.'' ह्याप्रमाणें त्या गरीब पण प्रामाणिक मतदारानें आपलें वास्तविक कर्तव्य ओळखून दुसऱ्या उमेदवाराला मत दिलें. ह्या उमेदवाराकडून त्याला एक छदामही मिळण्याची आशा नव्हती. ही अशी स्वकर्तव्याविषयींची अढळ बुद्धि किती वर्णनीय आहे!

## गार्डिअन तारवाच्या कप्तानाची कर्तव्यनिष्ठा

इंग्लंडच्या तिसऱ्या जॉर्ज राजाच्या कारकीर्दींत परराष्ट्रांशी युद्धप्रसंग चालले असतां गार्डिअन नांवाचें एक लढाऊ गलबत दक्षिणमहासागरांतून चालले होतें. ते दिवस हिंवाळ्याचे असल्यामुळें एके दिवशीं एकाएकीं दाट धुके पडलें; आणि आसपासचे काहीएक दिसेनासे झालें. अशा स्थितींत तें तारूं असतां एक प्रचंड हिमनग तरंगत येऊन त्याला तें घासले. तेव्हां खलाशी पाणी उपसायाला लागले. पण त्याला तें आटपेना, आणि तारूं खास बुडतें असें सगळ्यांला वाटूं लागलें. मग जो तो आपला जीव बचतो कसा ह्या विचारांत पडला. किनारा तर तेथून फारच दूर होता. तरी तारवावरच्या होड्या पाण्यांत ढकलून त्यांत बसावें, आणि साधल्यास किनारा गांठावा असा विचार करून त्यांनीं होड्या पाण्यांत लोटिल्या, आणि कप्तानाला होडींत उतरण्याची विनंति केली. तो म्हणाला, ''ज्यांला आपला जीव प्यारा असेल त्यांनीं हवें असल्यास होड्यांत बसून जावें. मला तारवाचा बचाव कर्तव्य आहे. याचें रक्षण करण्याचा प्रयत्न मजकडून होईल तेवढा मी शेवटपर्यंत करीत रहाणार; आणि माझा सगळा प्रयत्न फुकट जाऊन तारूं बुडालेंच तर त्याबरोबर मीही बुडणार. माझ्या हवालीं केलेलें हें सुंदर तारूं जिवाच्या भीतीनें मी सहसा सोडून जाणार नाहीं. माझें कर्तव्य मी अखेरपर्यंत करीत रहाणार.'' हे त्याचे निर्वाणीचे व निश्चयाचे शब्द ऐकून कांहीं खलाशी त्याच्याबरोबर तारवावर राहून आपलें दिला. आंतल्या शिपायांनीं मोठ्या शौर्यानें लढून शत्रूला बरेच

दिवस झुलविलें. इकडे हा वेढा उठविण्यासाठीं हावलॉक याला मोठें सैन्य देऊन रवाना केलें. त्यानें मोठ्या शौर्यानें व युक्तीनें शत्रूशी अनेक सामने करून लखनौपर्यंत मजल झेपिली. पण अशा झटापटी करितांकरिता त्याचे बरेच शिपाई खलास झाले. तेव्हां शहराबाहेरील शत्रूशीं थोड्याशा लोकांनिशीं गांठ घालणें ठीक नाहीं, असें वाटून त्यानें कुमक मागितली. ती पाठविण्याचें ठरून सर जेम्स आउटराम याला मोठें सैन्य देऊन पाठविलें, आणि असा हुकूम केला कीं, सगळ्या सेनेचा ताबा त्यानें घेऊन शत्रूवर चाल करावी. त्या व्यवस्थेप्रमाणें अर्थात आउटराम मुख्य सेनापति होऊन हावलॉक याला त्याचा दुय्यम म्हणून काम करावें लागणार होतें. पण आउटराम हा थोर मनाचा पुरुष होता. त्यानें असा पोक्त विचार केला कीं, हावलॉक यानें इतके दिवस हातावर शिर घेऊन शत्रूशीं टक्कर दिली आहे; आणि येथवर मजल खेटली आहे. तेव्हां लखनौशहराचा वेढा उठवून आंतील लोकांस शत्रूच्या तावडींतून सोडविल्याचें यश त्यालाच मिळावें हें योग्य आहे. तरी त्याच्या हातचा ताबा काढून घेऊन त्याला निरुत्साह करणें कांहीं बरोबर होणार नाहीं. आपल्या हक्काकडे दृष्टि पुरवून आपल्या देशाच्या कार्यास व्यत्यय येईल असें करणें ठीक नव्हे. तर आपलें कर्तव्य करावयाचें तें कोणत्याहि दरजांत राहून आपणाला करितां येईल. असें मनांत आणून तो हावलॉकच्या हाताखालीं राहून आपल्या कर्तव्यास जागरूक राहिला; आणि त्या उभय सेनापतींच्या हुशारीमुळें व शौर्या पुढें बंडखोरांचा निभाव न लागून ते वेढा उठवून पळून गेले, आणि लखनौशहरांतल्या ब्रिटिश लोकांचा बचाव झाला. देशकार्यासाठीं झटणें हा आपला धर्म आहे; त्याप्रमाणें वागतांना मानापमान किंवा लाभालाग कांहींएक पाहावयाचा नाहीं, अशा निर्धाराचे पुरुष ग्रेटब्रिटनांत आजपर्यंत पैदा झाले आहेत, म्हणूनच त्याची सत्ता चोहोंकडे पसरली आहे.

## बर्कनहेड तारवावरील शिपाई व खलाशी

बर्कनहेड नांवाचे तारू इंग्लंडहून निघून आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरून चाललें असतां रात्रीच्या समयीं एका खडकाला लागून फुटलें, आणि त्यांत भराभर पाणी शिरूं लागलें. त्यामुळें खालीं खोल्यांतून कित्येक निजलेलीं माणसें पाण्यांत गुदमरून मेलीं. धक्का जोराचा बसल्यामुळें सगळीं माणसें जागीं झालीं. इतक्यांत कप्तानानें सगळ्या माणसांला तारवाच्या वरल्या भागीं जमा व्हावयास सांगितलें. ह्या तारवावर एकंदर ६३८ माणसें होतीं. त्यांपैकीं ४६५ लष्करी शिपाई आणि खलाशी होते. कप्तानाच्या हुकमाप्रमाणें सगळीं माणसें वर आलीं. इतरांप्रमाणें शिपाई व खलाशीही आले. पण

ते अशा व्यवस्थेनें व शिस्तीनें शिड्या चढून आले कीं, त्यांनीं कोणासही धकाबुकी केली नाहीं. जीव सगळ्यांलाच प्यारा असतो. पण हे शिपाई अशा प्राणांवरील संकटाच्या वेळीं भित्र्या माणसांसारखे वागले नाहींत. कप्तानानें त्यांच्यापैकीं साठ असामींला भरत चाललेलें पाणी बाहेर काढण्यासाठीं पंप चालवायाची आज्ञा केली, आणि दुसऱ्या साठ असामींला तारवावरील होड्या पाण्यांत लोटून त्यांत बायकांस व मुलांस उतरविण्याची आज्ञा केली. ह्या आज्ञेप्रमाणें त्यांनीं मुकाट्यानें केलें; आणि होड्यांत बायकामुलांस उतरिलें, तेव्हां कोणी असें बोलला कीं, ज्यांला पोहतां येत असेल त्यांनीं पाण्यांत उड्या टाकून होड्यांच्या कांठाला धरून राहावें.'' हे शब्द ऐकितांच कप्तानानें सगळ्यांला दरडावून अशी ताकीद केली कीं, ''असें कोणींही करितां कामा नये. तुमच्या भारानें होड्या उलटून बायकामुलें बुडून मरतील.'' कप्तानाचा हा हुकूममान्य करून सगळे जागच्याजागीं स्तब्ध राहिले; आणि त्या होड्याकिनाऱ्यास सुखरूपपणें लागल्या.

अशा अतिबिकट समयीं ह्या तारवावरच्या शिपायांनीं व खलाश्यांनीं आपली कर्तव्यबुद्धि अशी अप्रतिम रीतीनें दाखविली हें त्यांस व एकंदर ब्रिटिश राष्ट्रास परम भूषण होय. खरें म्हटलें असतां ह्या बळकट शिपायांनीं व खलाश्यांनीं अशा प्राणांतसमयीं कप्तानाचा हुकूम न जुमानून बायकामुलांस मागें लोटून होड्यांत उड्या टाकाव्या. पण आपल्या वरिष्ठाची आज्ञा पाळावी, व आपल्याहून दुबळ्या माणसांच्या प्राणांचें रक्षण आधीं करावें, हें आपलें कर्तव्य आहे, असें त्यांच्या मनांत उत्तम प्रकारे बिंबले असल्याकारणानें त्यांनीं यत्किंचित्‌ही गडबड किंवा धांदल केली नाहीं. तारवांत भरपूर पाणी भरून तें तळाला जाईपर्यंत ते आपल्या जागचे हालले नाहींत. ह्या त्यांच्या कर्तव्यपरतेची व मर्दुमकीची वाखाणणी करावी तितकी थोडीच आहे. ह्या घोर संकटांतून ६३८ माणसांपैकीं अवघीं १९३ सुखरूपपणें किनाऱ्यास लागलीं असें म्हणतात.

## कर्तव्यकर्म आणि स्नेहभाव

अमेरिकेंत संयुक्त संस्थानें म्हणून एक मोठा देश आहे. तो प्रथम ब्रिटिशसरकारच्या ताब्यांत होता. पण तेथल्या ब्रिटिश वगैरे युरोपियन लोकांस स्वतंत्र व्हावें अशी इच्छा होऊन त्यांनीं आपल्या सरकाराविरुद्ध बंड केलें. त्याचें पुढारीपण जॉर्ज वॉशिंग्टन याजकडे होतें. ह्या पुरुषानें मोठा पराक्रम करून शेवटीं तेथल्या लोकांस स्वातंत्र्य मिळवून दिलें. ह्यानंतर ह्या देशांत प्रजासत्ताक राज्यव्यवस्था सुरू झाली, ती अद्यापि चालू आहे. ह्या राज्याचा पहिला अध्यक्ष तेथल्या लोकांनीं वॉशिंग्टन यास निवडिलें.

हा थोर पुरुष तेथली राज्यव्यवस्था पाहत असतां त्याच्या हाताखालची एक मोठी जबाबदारीची जागा रिकामी झाली. ती आपणास मिळावी म्हणून वॉशिंग्टनाच्या एका मोठ्या निकट स्नेह्यानें अर्ज केला. हा स्नेही वर सांगितलेल्या राज्यक्रांतीच्या युद्धांत वॉशिंग्टनाच्याबरोबर आरंभापासून असून अनेक वेळां त्याच्या उपयोगीं पडला होता. यास्तव त्याला अशी खात्री होती कीं, ती जागा आपल्यावांचून दुसऱ्या कोणास मिळणार नाहीं.

परंतु ह्याच जागेसाठीं दुसऱ्या एका गृहस्थानें अर्ज केला होता. हा गृहस्थ वॉशिंग्टनाच्या उलट पक्षांतला असून त्याच्या विरुद्ध जेव्हां तेव्हां वागे. ह्यावरून लोकांची अशी अटकळ होती कीं, ह्या विरुद्ध पक्षाच्या इसमाला ती जागा वॉशिंग्टन सहसा देणार नाहीं. पण लोकांची ही अटकळ अगदीं खोटी ठरली. वॉशिंग्टनानें त्या विरुद्ध पक्षाच्याच मनुष्याला ती जागा दिली. हें पाहून अर्थात् सर्व लोकांस मोठा चमत्कार वाटला; आणि त्याच्या त्या स्नेह्याची तर अगदीं निराशा झाली. वॉशिंग्टनाची ही कृति पाहून त्याच्या एका मित्रानें त्याला पुसलें: ''तुम्ही आपल्या पक्षाचा व आपल्या कृपेंतला माणूस सोडून उलट पक्षाच्या माणसाला ती जागा दिली याचें कारण काय?'' वॉशिंग्टनानें त्याला असा जबाब दिला कीं: ''माझा तो परम स्नेही आहे हें खरें. तथापि त्याच्या हातून त्या हुद्याचें काम चांगले होणार नाहीं, अशी माझी खात्री आहे. आतां उलट पक्षाचा मनुष्य नेमिला आहे तो शुद्ध वर्तनाचा, प्रामाणिक आणि वक्तशीर काम करणारा असून आणखी त्या जागेला हवा तसा लायक तोच आहे. यास्तव ही नेमणूक करितांना माझा खासगी स्नेहसंबंध मी मनांत आणावा हें कदापि योग्य नव्हे. तर मी संयुक्त संस्थानांचा अध्यक्ष आहें ही गोष्ट मला ध्यानांत वागविली पाहिजे; आणि त्यास अनुसरून माझें कर्तव्यकर्म मला केलें पाहिजे. माझे जे कोणी इष्टमित्र असतील त्यांच्या उपयोगीं पडण्यास मी माझ्या सामर्थ्याप्रमाणें सर्व काळ झटेन; पण संस्थानांचा अध्यक्ष ह्या नात्यानें ज्या कांहीं नेमणुका करावयाच्या, त्या देशाचें वास्तविक हित लक्षांत आणून मला केल्या पाहिजेत.''

## एका तरुण शिपायाची निःसीम कर्तव्यपरता

फ्रान्स देशांत पुष्कळ वर्षांपूर्वीं दोन सैन्यांचा सामना होऊन लढाईस आरंभ व्हावयाचा समय आला. तीं सैन्यें परस्परांवर चालून येऊन एका दाट अरण्यापाशीं थबकलीं; आणि रात्रीचा समय आला म्हणून एकमेकांपासून थोड्या अंतरावर तीं तळ देऊन राहिलीं. फ्रेंच सेनेच्या तळावर चोहोंकडे मोठमोठे जाळ करून उजेड पडेसा केला

होता. याचा उद्देश अर्थात् असा होता कीं, शत्रूने काळोखातून पुढें येऊन त्यांच्यावर अचानक हल्ला करूं नये. शिवाय त्यांनीं आपल्या तळासभोंवार सैन्यांचा सक्त पहारा ठेविला होता. ह्या पहारेकऱ्यांस अशी ताकीद होती कीं, त्यांनीं कोणाही इसमास आपल्या तळानजीक येऊ देऊं नये, आणि शत्रूची कांहीं हालचाल दिसल्यास त्यांनीं पुकारा करून सैन्यास इशारा द्यावा. हे मंत्री नेमलेल्या ठाण्यांवर मागेंपुढें फिरत राहिले होते. बरीच रात्र उलटून जाईपर्यंत चोहोंकडे अगदीं सामसूम होतें. मध्यरात्रीच्या सुमारास त्या संत्र्यापैकीं एका तरुण शिपायाला कांहीं आवाज ऐकू आला. तेव्हां तो थांबून कानोसा घेऊं लागला, तों तो ऐकूं येईनासा झाला. म्हणून तो पुन: गस्त घालूं लागला. इतक्यांत पुनः तसाच आवाज त्याच्या कानीं आला. तेव्हां त्याला पक्का वहीम आला, आणि आपल्या सोबत्यांला खुणावून आवाज जिकडून आला तिकडच्या दाट झाडींत बेधडक शिरला. त्याबरोबर शत्रूकडील पांचसहा शिपाई त्याच्याजवळ धावत येऊन त्याच्या हातची बंदूक उडवून देऊन हाणाले: ''यत्किंचित् पुकारा केलास कीं, प्राणास मुकशील;'' आणि आपल्या संगिनी त्याच्या उरावर टेकून ते उभे राहिले. त्याप्रमाणें तो तरुण पण शूर शिपाई शत्रूच्या तावडीत सांपडला; आणि क्षणभर सचिंत उभा राहून त्यानें आपल्या मनांत असा विचार केला की,''आपल्या पहाऱ्यावर पूर्ण विश्वास ठेवून आपले हजारों सोबती तळावर निश्चिंतपणे झोपीं गेले आहेत. त्यांच्या प्राणांवर हें भयंकर संकट आलें आहे. तें निवारण्यास झटणे हें आपलें परमपवित्र कर्तव्य आहे. शिवाय आपल्या राजाशीं जें आपलें कर्तव्य आहे, त्यासही आपणास ह्या समयीं जागलें पाहिजे. हें कर्तव्य बजावण्याच्या कामी आपल्या प्राणांचा बळी पडला तरी कांहीं चिंता नाहीं.'' असा विवेक करून, त्यानें ऊर वर करून व दीर्घ श्वास घेऊन पराकाष्ठेच्या नेटानें असा पुकारा केला कीं, ''फ्रेंच सैनिक हो, शत्रूचा घाला आला!'' हे शब्द त्यानें उच्चारितांच शत्रूच्या शिपायांनीं त्याच्या उरांत संगिनी खुपसून त्याचा तत्काळ प्राण घेतला. पण त्या शूर व कर्तव्यपरायण शिपायाच्या पुकाऱ्यानें त्याच्याबरोबरच्या दुसऱ्या संत्र्यांनीं सावध होऊन इशाऱ्यादाखल आपल्या बंदुका झाडिल्या. त्याबरोबर सगळें फ्रेंच सैन्य गलबलून जागें होऊन शत्रूशीं लढण्यास सिद्ध झालें; त्यामुळें त्याचा बेत फसला, आणि हजारों लोकांचा बचाव झाला.

## अप्रतिम कर्तव्यपरता

जेम्स मॅक्सवेलनामक एक नावाडी क्लाइडेल नांवाच्या तारवावर नोकरीस होता. सुकाणूं फिरविण्याचें काम त्याजकडे होतें. हें तारूं एके समयीं ग्लासगो शहराच्या

बंदरांतून माल घेऊन आयर्लंडच्या पश्चिम किनाऱ्याकडे चाललें असतां कांहीं जळाल्याची घाण जेम्सला आली. त्यानें कप्तानाला ती कसली आहे तें हुडकून काढण्यास सांगितलें. त्यानें त्याचा अगदीं बारकाईने बराच वेळ शोध केला, पण त्याला कांहींएक सुगावा लागेना. इतक्यांत तारवाच्या पिछाडीच्या बाजूला मोठा जाळ झालेला त्याच्या नजरेस पडला. त्याबरोवर तो जेम्सकडे येऊन म्हणाला: ''ह्या बाजूला आग लागून भडका झाला आहे. आतां काय करावें?'' जेम्स म्हणालाः ''घाबरण्याचें कांहीं कारण नाहीं. आगीचा केवढाही भडका झाला तरी मी अखेरपर्यंत सुकाणूं धरून रहातों: आणि ह्या जवळच्या किनाऱ्याकडे तारूं वळवितों. हा किनारा खडकाळ आहे खरा, पण त्याकडे तारूं नेलें तरच माणसे बचावण्याची कांहीं तरी आशा आहे.'' असें म्हणून त्यानें वर डोळे केले आणि ''हे देवा, ह्या घोर संकटप्रसंगीं मला आपलें कर्तव्य शेवटपर्यंत करीत रहाण्याचें धैर्य दे!'' अशी देवाची प्रार्थना केली. मग तो मोठ्या निश्चयानें व नेटानें सुकाणूं धरून राहिला. जहाजावरचीं सगळी माणसें नाळीजवळच्या भागीं एकवट झालीं. कारण आगीचा डोंब काय तो मागल्या बाजूसच झाला होता. खलाश्यांनीं व कांहीं मजबूत उतारूंनीं आग विझविण्याचा हरप्रयत्न केला; पण तिचा भडका अधिकाधिकच होऊं लागला. जेम्स उभा होता त्या खालच्या भागाने पेट घेतला; आणि त्याच्या पायांखालची तक्तपोशी अगदीं तापून गेली. चोहोंकडून ज्वाला व धूर उसळून त्याचें सगळे अंग होरपळू लागलें. तरी पण तो सुकाणूं सोडून गेला नाहीं. त्याच्या हातचें सुकाणूं सुटलें असतें तर जहाज कोणीकडच्या कोणीकडे जाऊन किनारा गांठतां आला नसता. जेम्सनें ह्या वेळीं असा निर्धार केला कीं, आपला प्राण जाईंपर्यंत सुकाणूं हातचें सोडावयाचें नाहीं. त्याचें अंग सगळें तप्त होऊन तो पराकाष्ठेचा कासावीस झाला. तरी त्याची त्यानें बिलकूल परवा केली नाहीं. शेंकडो माणसांचे जीव बचावण्याचें काम आतां आपल्या हातीं आहे; तें शेवटपर्यंत नेटानें करण्यांतच आपल्या जीविताचें सार्थक्य आहे, असें त्याला वाटून त्यानें आगीच्या तापामुळे होत असलेल्या सगळ्या वेदना मोठ्या धैर्यानें व निश्चयानें सोशिल्या. ह्या त्याच्या अलौकिक कर्तव्यपरायणतेमुळे तें जहाज किनाऱ्याला एकदाचे जाऊन पोंचलें, आणि त्यावरून सगळी माणसें सुखरूपपणे जमिनीवर उतरली. हा अप्रतिम धैर्याचा व कर्तव्यपरायण सुकर्णधारही किनाऱ्यावर जीवंत उतरला. पण त्याचें सर्व अंग अगदी होरपळून गेलें होतें. त्याचे केश, अंगांतील कपडे व जोडे साफ जळून गेले होते. तो मोठा सशक्त व जोमदार होता. पण त्या थोड्या तासांच्या प्रचंड होमांत सांपडून तो अगदीं क्षीण व

दुबळा झाला. पण आपल्या अशा आत्मयज्ञानें शेंकडो माणसांचे जीव वांचले, हें पाहून तो थोर मनाचा पुरुष आपली सर्व खराबी विसरून गेला. ब्रिटिश राष्ट्राचे समुद्रावर जें साम्राज्य गाजत आहे तें अशा शौर्यशाली व कर्तव्यपरायण पुरुषांच्याच कर्तबगारीनें प्राप्त झालें आहे.

## कर्तव्यकर्माची खरी ओळख

इराणचा एक बादशहा एके समयीं शिकारीस गेला असतां एका खेड्यांत एक वृद्ध मनुष्य अक्रोडाचें झाड लावीत आहे असे त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां बादशहानें त्याच्याजवळ जाऊन त्याला त्याचें वय विचरिलें. तो कुणबी म्हणाला: ''खावंद सरकार, माझें वय चार वर्षांचे आहे.'' हें त्याचें उत्तर ऐकून बादशहाचा एक हुजऱ्या म्हणाला: अरे मुर्खा, तूं कोणासमोर बोलत आहेस याचा कांहीं सुमार तुला आहे काय? असें वेड्यासारखें उत्तर द्यायाला तुला लाज वाटत नाहीं?'' तो म्हातारा म्हणाला: ''मला असा विनाकारण दोष लावूं नका. मीं विचार केल्यावाचून उत्तर दिलें नाहीं. कारण मनुष्याच्या जो काळ हुचेपणांत व आपल्यापुरतें पाहण्यांत जातो, तेवढे त्याचे आयुष्य व्यर्थ गेलें असून त्याची गणना त्याच्या आयुर्दायांत करणें बरोबर नाहीं, असें ज्ञाते पुरुष म्हणतात. यास्तव माझा जो काळ देवाच्या सेवेत व माझ्या देशबांधवांच्या संबंधाचे माझें कर्तव्य करण्यांत जात आहे, तेवढेंच माझें खरें वय होय; आणि ही अशी उपरति मला गेल्या चार वर्षांपासून झाली आहे; म्हणून मीं म्हटलें कीं, माझें वय अवघें चार वर्षांचें आहे. यांत मीं सरकारांचा कांहीं उपमर्द केला असें मला मुळीं वाटत नाहीं.''

हें त्याचें समर्पक पण चमत्कारिक उत्तर ऐकून बादशहा थक्क झाला; आणि त्यानें त्याला पुनः म्हटलें: ''पण तुम्ही हें झाड लावीत आहां, तें फळास आलेलें पाहण्याची कांहीं तुम्हांला मुळीं आशा नाहीं.'' त्यानें उत्तर केलें: ''नाहीं खरी; पण ज्या अर्थीं आम्हांला फळें खायाला मिळावीं म्हणून दुसऱ्यांनी झाडे लावून ठेविलीं आहेत, त्या अर्थीं आमच्या मागून होणाऱ्या लोकांसाठी आपण झाडें लावून ठेवावीं हें आपलें कर्तव्य आहे!'' हें त्याचें उत्तर ऐकून बादशहा खुश होऊन म्हणाला: ''शाबास!''

आतां ह्या बादशहाचा असा रिवाज होता कीं, कोणाला त्यानें शाबासकी दिली म्हणजे त्याला त्याच्या सेवकांनीं मोठें इनाम द्यावें. ह्या रिवाजाप्रमाणें ह्या वेळीं सदरील शहाण्या कुणब्याला राजसेवकांनीं एक हजार मोहरा बक्षीस दिल्या. त्या हातीं पडतांच तो कुणबी बादशहाचे आभार मानून म्हणाला, ''सरकार, दुसरे लोक अक्रोडाचीं झाडें

लावितात, त्यांला चाळीस वर्षांनी फळें येतात, आणि मीं हे झाड आतां लाविलें तोंच त्याला अशीं उत्तम फळें आलीं आहेत!'' हे त्याचे शब्द ऐकून बादशहा पुनः संतोष पावून म्हणाला, ''वाहवा! '' तेव्हां अर्थात् राजसेवकांनीं त्या कुणब्याला दुसऱ्या आणखी हजार मोहरा दिल्या. त्या हातीं पडतांच तो पुनरपि म्हणाला, ''राजाधिराज, दुसऱ्यांनीं लाविलेल्या झाडांला वर्षांतून एकदांच फळें येतात, आणि मी लाविलेल्या ह्या झाडांला तर एका दिवसांत दोन वेळां फळें आलीं!'' हें ऐकून बादशहा पुन: म्हणाला: ''फार उत्तम!'' हे शब्द बादशहाच्या तोंडून निघतांच राजसेवकांनीं त्याला पुन: आणखी हजार मोहरा बक्षीस दिल्या; आणि बादशहा त्याला म्हणाला : म्हातारेबुवा, तुम्ही मोठे चतुर व मान्य आहां. तुमच्याशीं बोलत मी येथें आणखी कांहीं वेळ राहीन तर माझा सगळा खजिना खलास होईल.'' असें म्हणून तो तेथून घोडा भरधाव काढून चालता झाला.

## अढळ कर्तव्यदक्षता

स्पेनदेशाच्या दक्षिणेला एक लहानसा द्वीपकल्प आहे. तो सगळा खडकाळ आहे. त्याला जिब्रालटरचा खडक म्हणतात. अडीचशें वर्षांपूर्वी ग्रेटब्रिटन व स्पेन यांच्यामध्यें मोठें रण माजून राहिलें होतें. ह्या युद्धाच्या वेळीं ब्रिटिश लोकांनीं हा जिब्रालटरचा खडक काबीज करून त्यावर मोठा भक्कम किल्ला बांधिला आहे; आणि त्या खडकांतून भेगा पाडून त्यांत मोठमोठ्या तोफा ठेविल्या आहेत. ह्या किल्ल्यावर ब्रिटिश सैन्य ठेविलेलें असतें. हें अटलांटिक महासागर व भूमध्यसमुद्र यांचें नाकें आहे. येथें आफ्रिका व यूरोप यांचे किनारे अगदीं जवळ आले असून त्यांच्या दरम्यान जिब्रालटर नांवाची एक अरुंद सामुद्रधुनी आहे. ही अशी नाकेबंदी ब्रिटिशसरकारानें केल्यामुळें समुद्रावरील बऱ्याच व्यापारावर त्याचा शह बसला आहे.

हें ठाणे पुनः हस्तगत करून ब्रिटिश लोकांला तेथून हाकून देण्याच्या इराद्यानें स्पेनदेशानें फ्रान्साची मदत घेऊन त्याजवर दीडशें वर्षांपूर्वी मोठ्या निकराचा हल्ला केला होता. शत्रूंचा असा वेढा त्या किल्ल्यास पडला असतां त्यावरील सुभेदाराच्या हाताखाली थोडेसे ब्रिटिश व जर्मन शिपाई होते. तेवढ्या लोकांनिशीं त्या सुभेदारानें तो किल्ला मोठ्या शौर्यानें व नेटानें बरेच दिवस लढविला. एके दिवशीं हा सुभेदार तोफखान्याची व्यवस्था कशी काय आहे तें पाहण्यासाठीं फिरत असतां एके जागी आला, तेव्हा तेथल्या संत्र्यानें आपली बंदूक उचलून त्याला सलामी दिली नाहीं. हा त्याचा बेशिस्तपणा पाहून सुभेदाराला त्याचा राग आला, आणि तो त्याला म्हणाला:

''अरे संत्र्या, मी कोण आहें हें तुला ठाऊक नाहीं काय? आणि ठाऊक असल्यास मला सलामी का दिली नाहींस?'' तो शिपाई जर्मन होता. त्यानें मोठ्या अदबीनें असा जबाब दिला कीं, ''सेनापतिसाहेब, मी तुम्हांला चांगला ओळखितों. पण काय करूं! मला माझ्या हातांनीं बंदूक उचलून धरवत नाहीं. कारण थोड्या पळांपूर्वी शत्रूकडून आलेला गोळा लागून माझ्या उजव्या हाताचीं बोटे साफ उडालीं आहेत. त्यामुळें मला बंदूक उचलून धरितां येत नाहीं, ह्याबद्दल मी लाचार आहे!'' सुभेदार म्हणाला, ''तर मग तूं छावणींत जाऊन आपली जखम बांधून कां घेत नाहींस?'' शिपाई म्हणाला: ''जर्मनी देशाचा असा कायदा आहे कीं, दुसरा कोणी सोडवायाला येई तोंपर्यंत शिपायानें आपली जागा बिलकूल सोडितां कामा नये.''

हें त्याचें उत्तर ऐकून तो सुभेदार घोड्यावरून खालीं उतरला आणि म्हणालाः ''मित्रा, तुझी बंदूक मजकडे दे; मी तुझ्या जागीं रहातों. तूं जाऊन आपल्या जखमेला मलम वगैरे लावून घे.'' हा त्याचा हुकूम त्या शिपायानें ऐकिला; आणि बंदूक त्याच्या हवालीं केली. पण वैद्याकडे जाण्यापूर्वीं त्यानें गार्दींच्या मुक्कामावर जाऊन तेथून एका शिपायाला सेनापतीच्या हातची बंदूक घेण्यासाठीं पाठवून दिलें; आणि मग तो हॉस्पिटलांत गेला.

त्या शिपायाच्या हाताला अशी दुखापत झाल्यामुळें तो लढाईच्या कामास अगदीं नालायक झाला; म्हणून त्याला इंग्लंडास रवाना केलें. तो तेथें जाऊन पोंचण्यापूर्वींच त्याच्या ह्या शौर्याची व कर्तव्यपरतेची बातमी सगळ्या इंग्लडभर पसरली होती. खुद्द तिसरा जॉर्जराजा त्याला पाहावयास गेला, आणि त्याच्या अशा इमानदारीबद्दल त्याला त्यानें अंमलदाराच्या रांगेस चढविलें.

## ब्रुटसची निःसीम कर्तव्यपरता

इसवी सनापूर्वीं ५३४ व्या वर्षीं रोमन लोकांचा टार्क्विननामक राजा होता. यांने चोवीस वर्षें राज्य केलें. यानें आपल्या प्रजेला अतिशयित नाडिलें. यानें व त्याच्या मुलानें रोमनगरींत अनन्वित अनाचार केले. त्यामुळें रोमन लोकांस संताप येऊन ते त्याच्यावर उठले; आणि त्यांचे पुढारी ब्रुटस व व्हालेरिअस हे झाले. त्यांनीं ह्या जुलमी व दुराचारी राजाला हाकून देऊन रोमनगरींत प्रजासत्ताक राज्य स्थापिलें. तें पुढें पांचशें वर्षे कायम राहिलें.

ह्या टार्किन राजाच्या पक्षाचे कांहीं लोक रोमनगरीत होते. त्यांनीं कट करून ब्रुटस वगैरे पुढारी लोकांस ठार मारावें आणि टार्क्विन यास पुनः गादीवर बसवावें, असा गुप्त

बेत केला. ह्या कटांत त्यांनीं खुद्द ब्रुटसच्या दोघां मुलांस सामील करून घेतलें. ह्या कटवाल्यांनीं एका रिकाम्या घरांत जमून आणभाक केली. हा त्यांचा गुप्त बेत चालला होता, तो एका गुलामानें दडून ऐकला; आणि त्या कटवाल्यांत ब्रुटसचे दोघे मुलगे आहेत हें पाहून तो अगदीं चकित झाला. ह्या कटाची बातमी वेळींच दिली नाहीं तर रोमच्या प्रमुख व थोर गृहस्थांचा नाश होऊन टार्किनसारख्या दुष्ट व जुलमी राजाचा पुनः रोमशहरावर अंमल होईल असें त्याच्या मनांत येऊन तो लागलींच व्हालेरिअसाकडे धावत गेला; आणि त्या कटाची माहिती त्यानें त्याला देऊन सांगितलें कीं, ''सगळ्या कटवाल्यांच्या सह्यांचें पत्र घेऊन एकजण टार्किनकडे जाणार आहे. तो आज आक्किलीच्या घरीं वस्तीस आहे.''

हें वर्तमान कानीं पडतांच व्हालेरिअस कांहीं लोक घेऊन आक्किलीच्या घरीं गेला. जातांना त्यानें त्या गुलामास सांगितले कीं, तूं माझ्या येथेंच रहा, कोठें जाऊं नको; आणि आपल्या बायकोला त्याच्यावर सक्त नजर ठेवायाला सांगितलें. आक्किलीच्या घरांत अचानक शिरून त्याचा त्यानें झाडा घेतला, त्यांत तें पत्र त्याला सांपडलें. कटवाल्यांस ह्या गोष्टीच्या सुगावा लागून ते त्याला हरकत करावयाला आले. पण त्यांचें कांहींएक न चालून उलट त्या सगळ्यांला त्यानें कैद केलें. मग सिनेटसभा भरवून शहराचे मुख्य अधिकारी जे दोघे कॉन्सल होते त्यांला बोलाविलें; आणि त्यांच्यापुढें त्या कटवाल्यांस हजर केलें. त्या कॉन्सलांपैकीं एक ब्रुटस हा होता. कटवाल्यांमध्यें आपले दोघे मुलगे आहेत हें पाहून त्याला पराकाष्ठेचा खेद वाटला. दुसऱ्या कॉन्सलच्या तर डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. सदरील मुद्याचें पत्र वाचिल्यावरून कटवाल्यांच्या गुन्ह्याविषयीं पुरी खात्री झाली, आणि त्यांस देहांतशिक्षा देण्याचें ठरलें. ही शिक्षा ब्रुटसनें स्वत: सांगितली. ती सांगण्यापूर्वीं त्यानें आपल्या मुलांस विचारिलें कीं, ''ह्या गुन्ह्याचा परिहार करण्यासाठीं तुम्हांला कांहीं बोलावयाचें आहे काय?'' त्याला त्यांनीं कांहींएक जबाब दिला नाहीं. म्हणून इतरांबरोबर त्यांलाही शिक्षा भोगावी लागली. सिनेटच्या सभासदांचें व इतर लोकांचें असें म्हणणें होतें होतें कीं, ब्रुटसनें आपल्या मुलांस देहांतशासन देऊं नये; फार तर हद्दपार करावें. पण ब्रुटस म्हणाला: ''मी जो यांचा न्याय करीत आहें, तो कांहीं यांचा बाप म्हणून करीत नाहीं, तर ह्या संस्थानाचा कॉन्सल ह्या नात्यानें करीत आहें. सगळ्या संस्थानाच्या हिताची व रक्षणाची जी गोष्ट असेल, ती यथान्याय करावी, हें माझें कर्तव्य आहे. तें करितांना मी खासगी नातें मनांत आणणें बरोबर नाहीं. असा पक्षपात मी करीन तर माझ्या हुद्यासंबंधाच्या कर्तव्यास मी मुकलो असें होईल.''

## हलगरजीपणा

इंग्लंडांत राज्यव्यवस्था पाहायाला एक प्रधानमंडळ नेमितात. ह्या मंडळाचा एक चिटणीस असतो त्याला सेक्रेटरी ऑफ स्टेट म्हणतात. ह्या अधिकाऱ्याचा एक मदतनीस असतो, त्याला अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट म्हणतात. ह्या कामदारानें प्रधान मंडळाचे सगळे हुकूम अंमलांत आणावे असें असतें. असा एक अंडरसेक्रेटरी एके दिवशीं रात्रीं बिछान्यावर पडला असतां त्याला कांहीं केल्या झोंप येईना. अकरा वाजल्यापासून दोन वाजत तोंपर्यंत तो लोळत होता, पण त्याचा डोळा लागेना. तेव्हां शेवटीं तो कंटाळून उठला, आणि पेहराव करून बाहेर फिरायास निघाला. ते दिवस उन्हाळ्यांतले असल्यामुळें दिशा उजळू लागल्या होत्या. कारण तिकडे उन्हाळांत सुर्योदय पहाटेस दोनतीन वाजतां होत असतो.

हा कामदार फिरत फिरत आपल्या कचेरीच्या दरवाज्यावरून चालला असतां तो उघडून आंत जावें, अशी त्याची लहर लागली. तिची किल्ली त्याच्या खिशांत होतीच. ती लावून दरवाजा उघडून तो आत गेला. तेथें एका कारकुनाच्या मेजावर एक चोपडी उघडी पडली होती. तीवर त्यानें सहज नजर टाकिली, अणि तींतील एक नोंद तो वाचूं लागला. कांहीं गुन्हेगारांस त्या दिवशीं फासावर चढविणार होते. ती त्यांची शिक्षा तहकूब करण्यासाठीं हुकूम पाठविण्यासंबंधाची ती होती. ती वाचितांच त्याला अशी आठवण झाली कीं, हा हुकूम पोंचल्याबद्दलची पावती आपल्या हातीं आली नाहीं. मग ह्या बाबतींत कांहींतरी गफलत झाली असावी, असा त्याला वहीम येऊन तो आपल्या हाताखालच्या मुख्य कारकुनाच्या घराकडे मोठ्या लगबगीनें गेला, आणि त्याला उठवून त्यानें विचारिलें: ''कालचा शिक्षेच्या तहकुबीचा हुकूम रवाना झाला काय?'' तो कारकून म्हणाला: ''तो हुकूम पाठवायाचें काम ज्या कामदाराचें आहे त्याजकडे तो पाठविला आहे.'' त्यानें पुनः विचारिलें. ''पण तो त्यानें पाठविल्याबद्दलची पावती किंवा दाखला तुम्हांकडे आला आहे काय?'' कारकून म्हणाला: ''नाहीं.''

मग ते दोघे त्या दुसऱ्या कामदाराकडे गेले. हा कामदार गाडींत बसून लंडनाबाहेरल्या आपल्या एका वाडींत जाण्यासाठीं तयार होऊन बाहेर आला होता. हे दोघे कामदार एवढ्या पहाटेस आपल्याकडे आल्याबद्दल त्याला मोठे आश्चर्य वाटलें; आणि त्यांनीं आपलें येण्याचें कारण सांगितलें, तेव्हां तर तो अगदीं घाबरून गेला. तो म्हणाला: ''तो हुकूम माझ्या टेबलांतच राहून गेला आहे!'' मग त्यानें कचेरीत जाऊन तो आणिला; आणि त्यांनीं तो एका विश्वासू व चपळ माणसाच्या हातीं देऊन त्याला

यॉर्कशहराच्या कोतवालास तो तत्काळ नेऊन द्यावयास सांगितलें. त्या काळी आगगाडीचा किंवा तारायंत्राची सोय नव्हती म्हणून त्यांला असा माणूस पाठवावा लागला. तो यॉर्क शहरांत अगदीं वेळेवर जाऊन पोहोंचला. त्याला थोडा उशीर झाला असता तर त्या गुन्हेगारांस फासावर चढविलें असतें. तो तेथें गेला तेव्हां त्यांस फाशीं देण्याच्या जागीं नेण्याकरितां गाडींत बसवीत होते! ह्याप्रमाणें एका कामदारानें आपलें कर्तव्य बजावण्याच्या बाबतींत थोडासा हलगरजीपणा केल्यामुळें कित्येक गुन्हेगार प्राणांस मुकणार होते. ह्यावरून हें लक्षांत येते कीं, आपणांला जें कांहीं करावयाचें तें जेव्हांचें तेव्हां करावें. तें घालघसरीवर घातलें असतां त्याचा कधीकधी मोठा भयंकर परिणाम होतो.

## कर्तव्यनिष्ठा

ग्रेटब्रिटनच्या किनाऱ्यापासून कांहीं अंतरावर उत्तरसमुद्रांत एक खडकाळ बेट आहे. त्याला उल्का रॉक असें म्हणतात. ह्याच्या आसपास पाण्याखालीं खडकाच्या मोठमोठ्या रांगा आहेत. त्यांचा इशारा देण्यासाठीं ह्या बेटावर एक दीपगृह बांधिलें आहे. कांहीं वर्षांपूर्वी ह्या दीपगृहाच्या रखवालीचें काम डेविड मॅनर्स नांवाच्या मनुष्याकडे होतें. तो त्या खडकावर आपल्या बायकोसह रहात असे. त्याच्या बायकोचें नांव मेरी असें होतें. हीं दीपगृहाच्या पायथ्याशीं रहात असत. एके दिवशीं रात्रीं तीं आपल्या खोलीत शेगडीपाशीं शेकत बसलीं असतां दिवा फिरायाचा बंद झाला आहे असें मेरीच्या दृष्टीस पडलें. त्याबरोबर तीं दोघे वर यंत्राच्या खोलीत धावत गेलीं. मेरीनें हातांत कंदील धरिला, आणि डेविड यंत्र बंद कां पडलें तें पाहूं लागला. तेव्हां काय बिघडलें तें त्याच्या लक्षांत येऊन तो तें यंत्र चालू करण्यासाठीं ठोकाठोक करूं लागला, तों त्याचा हात एका कळीच्या चाकांत सांपडून त्यानें मोठ्यानें किंकाळी मारिली. त्याबरोबर मेरी घाबरून शिडी उतरून त्याच्याजवळ गेली अणि त्याचा हात सोडविण्याची खटपट करूं लागली. पण तो म्हणालाः ''मेरी ही वेळ माझा हात सोडवीत बसण्याची नाहीं. वर जा आणि दिवा फिरवीत रहा. कारण तो फिरता राहिला नाहीं तर खलांश्याला तो दिवा आहे असें कळणार नाहीं. तो ताराच आहे असा त्यांला भ्रम होऊन ते बेलाशक खडकाकडे आपलीं जहाजें आणितील; व त्यांचा आणि त्यांबरोबर शेकडो मनुष्यांचा नाश होईल. अशा लोकांचे जीव राखण्याचें काम आपल्यावर सोपिलें आहे. तर आधीं वर जा आणि दिवा फिरवूं लाग.'' पण मेरी कांहीं त्याच्याजवळून हालेना. त्याला तसा तेथें इवळत पडलेला सोडून जाण्याचें तिच्या जिवावर आलें. तेव्हां त्यानें

तिला पुनः निक्षून सांगितलें कीं, ''माझी काळजी तूं ह्या वेळीं करूं नको. आपलें कर्तव्य आधीं कर; जा. आम्हीं आपलें कर्तव्य करण्यासंबंधानें हलगरजीपणा केला तर शेंकडोहजारो माणसांचे जीव धोक्यांत पडण्याचा संभव आहे. तर येथें रेंगाळू नको. वरती धावत जा आणि दिवा फिरवीत रहा. उजाडलें म्हणजे माझा हात सोडवायाला ये. तोंपर्यंत मी येथें असाच पडून राहीन.''

हें असें नवऱ्यानें निक्षून सांगितल्यावरून ती वर गेली, आणि दिवा यंत्राच्या कळीपासून सोडवून मोठ्या प्रयासानें फिरवीत राहिली. पण तिचा सगळा जीव नवऱ्याकडे लागला होता. ती त्याला मधूनमधून हाका मारून, ''मी तुम्हांला सोडवायाला येऊ काय?'' असें विचारी. पण तो कर्तव्यनिष्ठ रखवालदार तिला म्हणे कीं, ''उजाडल्यानंतर ये. तेथपर्यंत दिवा फिरवीत रहा.'' त्यामुळें निरुपाय होऊन मोठ्या अस्वस्थ चित्तानें ती तेथें दिवा फिरवीत राहिली; आणि उजाडलें तेव्हां ती नवऱ्यापाशीं धावत आली. मग त्यानें सांगितल्याप्रमाणें युक्ती योजून तिनें त्याचा हात सोडविला. एवढ्या दगदगीनें ती अगदीं थकून जाऊन मूर्च्छा येऊन धाडकन पडली. तेव्हां डेविडानें तिला सावरून धरिलें. अमळशानें ती सावध झाली; आणि ती आपल्या खोलींत आलीं. तेथें त्या पतिनिष्ठ बाईनें त्याच्या हाताच्या जखमेस साध्य होते तेवढे उपचार केले.

ह्या धांदलीच्या रात्रीं अनेक तारवें त्या मार्गानें गेलीं. त्यांपैकीं एकावरच्या कप्तानानें बंदराच्या अधिकाऱ्यांकडे अशी लेखी तक्रार केली कीं, ह्या रात्रीं दिवा नेहमी फिरतो तसा फिरत नव्हता. ह्या तक्रारीमुळें अधिकाऱ्यांनीं ह्या गोष्टीची चौकशी केली. तेव्हां त्याला खरा प्रकार कळून आला; आणि त्यांनीं त्या कर्तव्यपरायण दंपत्याची मोठी तारीफ केली.

## धनगराच्या मुलाची कर्तव्यबुद्धि

जर्मनींत एका गांवीं एक धनगराचा मुलगा कुरणांत मेंढरें राखीत बसला असतां एक पारधी त्याच्याजवळ येऊन म्हणाला: ''मुला, येथून शहर किती दूर आहे?'' मुलानें उत्तर केलें; ''सहा मैल आहे. पण त्याला जायाची वाट अमळ बिकट आहे. ती वाट केवळ मेंढरें व गुरें जाण्यासाठीं केली आहे, आणि तिला मधूनमधून फांटे फुटले असल्याकारणानें तुम्हांला शहराची वाट उमगणें कठीण जाईल.'' तें ऐकून त्या पारध्याची मुद्रा खरकन उतरली; आणि तो म्हणाला: ''बाळा, हें पाहा, मी रानांत वाट चुकून भटकतांभटकतां अगदीं थकून गेलों आहें, आणि भुकेनें फार व्याकुळ झालों आहें. तरी तूं आपली मेंढरे येथें सोडून मला वाट दाखवायाला येशील तर मी तुला

चांगलें इनाम देईन.'' तो मुलगा म्हणाला : ''महाराज, मला माझीं मेंढरे सोडून येववत नाहीं. तीं मी सोडून गेलों तर तीं रानांत शिरून कोणीकडच्या कोणीकडे जातील. लांडगे तीं मारून खातील किंवा चोर तीं चोरून नेतील.'' पारधी म्हणाला: ''त्याची तुला काय पंचाईत? हीं मेंढरे काही तुझीं नव्हत; आणि एकादें दुसरें मेंढरू गमावलें तर त्यांत तुझ्या धन्याचें एवढें नुकसान तें काय होणार? हीं अशीं मेंढरे राखीत बसून एका सगळ्या वर्षांत जेवढें वेतन तूं मिळविणार आहेस, तेवढें मी तुला आता देतो.'' मुलगा म्हणाला: ''कांहीं झालें तरी मला मेंढरें सोडून येववणार नाहीं. माझा धनी मेंढरें राखण्याबद्दल मला वेतन देत असतो; आणि मला त्याचें काम दिवसभर केलें पाहिजे. शिवाय त्याचें एकादें मेंढरू गमावलें तर तें मी चोरिल्याप्रमाणें होईल, व त्याबद्दल मला त्याचा ठपका येईल.'' पारधी म्हणाला: ''बरें. मी तुझीं मेंढरे येथें राखीत बसलों तर तूं गांवांत जाऊन माझ्यासाठी कांहीं खायाला व एकादा वाटाड्या घेऊन येशील काय?'' तो मुलगा मान हालवून म्हणाला: ''तुमचा शब्द मेंढरे ओळखणार नाहींत, आणि-'' एवढें बोलून तो थांबला. तेव्हां पारध्यानें त्याला विचारिलें: ''काय, मजवर विश्वास ठेवण्यास तूं तयार नाहींस? मी तुला चोरसा दिसतों काय?'' मुलगा म्हणाला: ''तसें नव्हे. पण माझ्या धन्यास दिलेलें वचन मीं मोडावें म्हणून तुम्हीं नुकताच प्रयत्न केला नाहीं काय? तेव्हां तुम्ही तरी आपलें वचन पाळाल याचा काय भरंवसा?''

हें त्या मुलाचें बोलणे ऐकून तो पारधी निरुत्तर झाला, आणि त्याला म्हणाला: ''तूं मोठा विश्वासू व आपल्या कर्तव्यास जागणारा आहेस. तुझ्यासारखे विश्वासू व कर्तव्यदक्ष नोकर मला मिळतील तर मी आपलें मोठें भाग्य समजेन. बरें तर, आतां मेंढरांची वाट कोणती ती मला दाखीव; त्या वाटेनें मी शहर गांठण्याचा प्रयत्न करितों.' मुलगा म्हणाला: ''तुम्ही आतां म्हणालां कीं, आपणांला फार भूक लागली आहे. तर माझ्याजवळ भाकरी आहे, तींतली थोडी हवी असल्यास मी तुम्हांला देतों. ती खाऊन अमळ हुशार व्हा, आणि मग जा.'' तो पारधी अगदीं भुकेला होता, म्हणून त्यानें त्याच्याकडची जाडीभरडी भाकर घेऊन मोठ्या रुचीनें खाल्ली.

ह्याप्रमाणें तो त्या गरीब मुलाकडची भाकरी खात बसला असतां रानांतून मोठी आरोळी झाली; आणि क्षणार्धांत कांहीं पारधी घोडे फेंकीत तेथें आले. त्यांनीं त्याला पाहून आनंदाच्या आरोळ्या देऊन म्हटलें: ''महाराज सरकार, आपण वाट चुकून कोठच्याकोठें गेलां असाल किंवा आपणांस श्वापदांनीं इजा केली असेल अशी आम्हांस धास्ती पडली होती. आपण सुरक्षित आहां हें पाहून आमच्या जिवांतजीव आला

आहे.'' हे शब्द त्या मुलाच्या कानीं पडले, तेव्हां आपली भाकरी खात बसलेला कोणी सामान्य मनुष्य नव्हे, तर ह्या देशाचा राजा आहे, असें त्यास कळून येऊन तो लटलटां कापूं लागला. हा राजा आतां आपणास मोठी शिक्षा करील अशी त्याला भीति पडली. पण त्या थोर मनाच्या राजाने तसें कांहींच केले नाहीं. त्यानें त्याची सगळ्यांदेखत अतिशयित तारीफ केली; आणि आपल्या राजधानींत गेल्यावर कांहीं दिवसांनीं त्यास बोलावून आणून राजवाड्यांत नोकरीस ठेविंले. ह्याप्रमाणें त्या प्रामाणिक व कर्तव्यदक्ष मुलाची किंमत ओळखून त्या गुणग्राही राजानें त्याला सुखी केलें.

## कर्तव्यदक्ष कामदार

स्मर्नानामक शहरांत किराणे जिन्नस विकणारा एक दुकानदार होता. त्याचा एक मुलगा चांगला हुशार निपजला. तो सुशिक्षित होऊन मोठ्या हुद्द्याला चढला. मुसलमानी राज्यांत शहरांचा बंदोबस्त ठेवण्यासाठी अधिकारी नेमितात त्याला काजी म्हणतात; आणि त्यांच्या हाताखालच्या अधिकाऱ्यांला नायब म्हणतात. हा नायबाचा हुद्दा सदरील वाण्याच्या मुलास मिळाला. नायबाचें काम असें असतें कीं, त्यानें बाजारपेठेवर देखरेख ठेवावी, व दुकानदारांचीं मापें व वजनें वळोवेळां तपासून पाहावीं. ही कामगिरी बजाविण्यासाठीं तो कामदार पेठेंतून हिंडूं लागला. तेव्हां व्यापाऱ्यांला दहशत पडून ते आपली वजनें व मापें चोख ठेवूं लागले. पण त्याचा बाप ह्या बाबतींत अगदी बेफिकीर राहिला. त्याच्या शेजाऱ्यांनी त्याला सांगितलें कीं, ''तूं आपलीं खोटीं मापें व वजनें दडवून ठेव आणि खरीं वापरायास काढ.'' हा त्यांचा बुद्धिवाद त्या लबाड वाण्यानें मनास आणिला नाहीं. तो अशा घमेंडींत होता कीं, देखरेख करणारा कामदार आपला मुलगा आहे. तो आपलीं मापें व वजनें तपासणार नाहीं. व अपिली फजिती करणार नाहीं. अशा भरंवशावर जाऊन तो आपल्या दुकानांत बेफिकीरिपणें बसून राहिला.

इकडे हा नायब एकाएका दुकानाची तपासणी करीत आपल्या बापाच्या दुकानापाशीं येऊन थडकला. आपला बाप कांहीं सच्चा माणूस नाहीं; तो खोटीं मापें व वजनें वापरून लोकांना फसवीत असतो अशी त्याची पक्की खात्री होती. म्हणून त्याची ठकबाजी उघडकीस आणून त्याला योग्य शिक्षा करावी असा त्यानें निर्धार केला होता. त्यास अनुसरून तो आपल्या बापास म्हणाला: ''भल्या गृहस्था, आपलीं वजनें बाहेर आण; तीं आम्हांस तपासून पाहूं दे.'' हा त्याचा हुकूम त्यानें मानिला नाहीं, आणि तो आपली थट्टा करीत आहे असें समजून तो हसूं लागला. पण त्या न्यायी नायबानें आपल्या बरोबरच्या नोकरांस त्याचें दुकान तपासण्याचा हुकूम केला. त्याप्रमाणें

त्यांनीं त्याचीं वजनें बाहेर काढून पाहिलीं, तीं सगळीं खोटीं ठरलीं; आणि त्यांनीं तीं फोडूनतोडून टाकिलीं. हा प्रकार पाहून तो वाणी अगदीं चकित झाला; आणि आतां एवढेच करून आपला मुलगा थांबेल, आपणास शिक्षा वगैरे कांहीं करणार नाहीं, असें त्याला वाटलें. पण हाही त्याचा भ्रम लौकरच फिटला. त्या नायबानें त्याला पन्नास मोहरा दंड केला, आणि त्याच्या पायांच्या तळव्यांवर पन्नास फटके तेथल्यातेथें देवविले!

ही एवढी कडक शिक्षा केल्यावर तो नायब घोड्यावरून खालीं उतरला; आणि आपल्या बापाच्या पायांवर डोकी ठेवून ते त्यानें आसवांनीं न्हाणिले, आणि म्हटले: ''बाबा! माझा राजा, माझा देव आणि माझा हुद्दा ह्यांसंबंधाचें माझें कर्तव्य मीं बजाविले आहे. आतां तुम्ही माझे जन्मदाते वडील आहां, यास्तव तुमचे ऋण माझ्या माथीं आहे, तें आपल्या पायीं शरण येऊन व आपल्याविषयीं पूज्यत्वबुद्धि प्रगट करून फेडूं द्या. बाबा, न्यायदेवता अंध आहे. ती ह्या भूतलावर अवतीर्ण झालेली देवाची सत्ता आहे. ती पितापुत्रादि संबंध लेखीत नाहीं. देवाच्या आज्ञा आणि आपल्या देशबांधवांचे हक्क यांपुढें नैसर्गिक नात्यांचा लेखा मुळींच नाहीं. तुम्हीं न्यायदेवतेच्या आज्ञांचा भंग केला, यास्तव तुम्हाला हें शासन योग्य होतें. तें तुम्हांस कधीं ना कधीं कोणाहीकडून अवश्य झालें असतें. तें मजपासून तुम्हांस मिळावें असें तुमच्या नशिबीं होते, याचा मला अतिशयित खेद वाटतो. माझें दिल मला अन्यथा वर्तूं देईना, त्याला माझा इलाज नव्हता; तर आतां इन:पर चांगल्या रीतीनें वागा; आणि मला माझें कर्तव्य अशा प्रकारें बजावणें भाग पडलें याबद्दल माझी कींव करा. मला दोष देऊं नका.''

ह्याप्रमाणें आपल्या पित्याचें समाधान करून तो नायब पुढें चालता झाला. त्याचा हा असा अलौकिक न्यायीपणा पाहून शहरांतले सगळे लोक त्याची वाहवा व जयजयकार करूं लागले. ही त्याची गोष्ट सुलतानाच्या कानावर गेली, तेव्हां त्यानें त्याबद्दल त्याची तारीफ करून त्याला मोठ्या हुद्द्यास चढविलें.

## राजपुत्र आणि न्यायाधीश

इंग्लंडच्या एका राजाचा एक पुत्र होता. त्याचें नांव हेन्री असें होतें. हा राजपुत्र मोठा शूर व बळकट होता. पण ख्यालीखुशाली व बदफैली करण्याचा त्याला नाद लागून त्यानें आपल्यासारख्या वाईट वर्तनाच्या तरुण माणसांशी मैत्री केली. ह्या आपल्या बदफैल मित्रांच्या संगतीनें त्यानें पुष्कळ निरपराध लोकांना अनेक प्रकारीं भंडावून सोडिलें होतें. एके दिवशीं ह्या राजपुत्रानें आपल्या सोबत्यांच्या संगतीनें एके

जागीं फारच धामधूम केली. तेव्हां त्याच्या सोबत्यांला शिपायांनी पकडून अटकेंत ठेविलें. त्यांनीं राजपुत्राला मात्र पकडिलें नाहीं. दुसरे दिवशीं या दंगेखोरांला न्यायासनापुढें आणून त्यांची चौकशी चालविली. इतक्यांत तो राजपुत्र न्यायकचेरींत येऊन न्यायाधिशाला दरडावून म्हणाला: ''ह्या गुन्हेगारांला सोडून द्या.'' न्यायाधीश स्वकर्तव्यदक्ष व धीट होता. तो म्हणाला: ''मी त्यांला सोडून देणार नाहीं. त्यांची पुरी चौकशी करून त्यांच्यावर गुन्हा शाबीत झाल्यास त्याला मी शिक्षा केल्यावांचून रहाणार नाहीं. असल्या दुर्वृत्त माणसांची संगति आपल्यासारख्या थोर पदवीच्या तरुणांनीं धरावी ही मोठी शरमेची गोष्ट आहे.'' हें त्याचें बोलणें ऐकून त्या मानी राजपुत्राला पराकाष्ठेचा राग आला. आपण राजपुत्र, आपली अशी अवमानना व निर्भर्त्सना करण्याचा अधिकार कोणालाही नाहीं, असें त्याला वाटलें; आणि रागाच्या सपाट्यासरशीं न्यायासनावर चढून जाऊन त्यानें त्याला एक गुद्दा दिला. त्याबरोबर न्यायाधिशानें त्याला कैद करण्याचा हुकूम शिपायांला केला त्यांनीं त्याला तत्काळ चतुर्भुज केले.

मग तो न्यायाधीश मोठ्या गंभीर स्वरानें त्याला बोलला. ''महाराज, तुम्हीं जो आतां प्रहार केला, तो मजवर केला नाहीं. तो तुमचे तीर्थरूप राजेसाहेब यांजवर केला आहे. रयतेला कायदे पाळावयास लावावें म्हणून राजेसाहेबांनीं स्वतांच्या जागी माझी योजना केली आहे. तुम्हीं त्यांचे कायदे मोडिले एवढेंच नव्हे, तर त्यांनीं नेमिलेल्या न्यायाधिशावर तुम्हीं हात केला. हा तुमचा मोठा गुन्हा आहे. ह्याबद्दल तुह्यांला तुरुंगांत नेऊन ठेवण्याचा हुकूम करितों.''

ह्या वेळीं त्या राजपुत्राचा राग बराच निवाला होता; आणि आपण मोठी गैरशिस्त गोष्ट केली असून तीबद्दल आपणास शासन व्हावे हें योग्य आहे, असें त्याला वाटलें. तो परम लज्जित होऊन स्तब्ध उभा राहिला; आणि शिपायांनी त्याला तुरुंगाकडे चालविलें तेव्हां तो त्यांच्याबरोबर मुकाट्यानें गेला. हा प्रकार राजाच्या कानीं गेला, तेव्हां तो म्हणाला: ''प्रसंगीं राजाच्या मुलासही शासन करण्यास न डगमगणारा असा न्यायाधीश माझ्या पदरीं आहे याबद्दल मी आपणास धन्य समजतों; त्याप्रमाणेंच कायद्याची आज्ञा पाळण्याइतका शहाणा मुलगा मला आहे, याबद्दलही मी आपणास धन्य लेखितों.

पुढें हा राजा मरण पावला, आणि त्याचा हा व्रात्य मुलगा गादीवर बसला. तेव्हां रीतीप्रमाणें राज्यांतले मोठमोठे अमीरउमराव व शेठसावकार त्याचें अभिनंदन करण्यास व त्याचें अभीष्ट चिंतण्यास गेले. इतरांबरोबर हा न्यायाधीशही गेला. ह्या नवीन राजानें

त्या सगळ्यांच्या मुलाखती घेतल्या. ह्या वेळीं त्या न्यायाधिशाला असें वाटलें होतें कीं, आपल्याविषयीं त्याच्या मनांत आकस वागत असून तो आपणास आपल्या कामावरून दूर करील. पण आपलें कर्तव्य आपण केलें असून आपल्या हातून गैरशिस्त असें काहींएक झालें नाहीं, अशी त्याच्या मनाची पक्की खात्री होती. राजासमोर जाण्याची त्याची पाळी आली तेव्हां राजानें उठून त्याला ताजीम घेतली, आणि त्याचा हात धरून म्हटलें: ''तुम्हीं त्या समयीं अप्रतिम धैर्य, न्यायानुवर्तन व कर्तव्यपरता हे गुण दर्शविले ह्याबद्दल तुम्ही खरोखर स्तुतीस पात्र आहां. तुम्हीं त्या वेळीं मला शिक्षा केली, म्हणून मी तेव्हांपासून सुधरून चांगल्या मार्गास लागलों आहें. तुमच्याइतका लायक न्यायाधीश मला कोठेंही मिळावयाचा नाहीं; म्हणून त्या हुद्द्यावर आपली कायमची नेमणूक करितो. मी तुम्हांस आपल्या पित्यासारखें लेखीन हे तुमच्या सल्ल्यानें वागेन.''

## कर्तव्यपरतेची पारख

एक मुसलमान राजा होता. तो मोठा न्यायी, चतुर व प्रजावत्सल होता. त्याची प्रजा त्याजवर अतिशयित प्रेम करी. तो वृद्धापकाळामुळें अशक्त झाला तेव्हां आपल्यामागें आपला राज्यभार आपला कोणता मुलगा वाहण्यास योग्य आहे हें पाहावें, असें त्याच्या मनांत आलें. त्याला तीन मुलगे होते. ते सगळे शूर व पराक्रमी होते. त्यांचें वर्तनही चांगले होतें. तेव्हां त्यांतून अमुक एकाचीच निवड करणें कठीण होतें. म्हणून त्यानें त्यांला आपल्याजवळ बोलावून आणून म्हटले: ''माझ्या प्रिय मुलांनों, माझा अंतसमय आतां जवळ आला आहे. तर माझ्यामागें माझा राज्यकारभार चालविण्यास तुमच्यापैकीं कोण लायक आहे हें मला पाहावयाचें आहे. तर मला सांगा पाहूं, तुम्हा तिघांपैकीं कोणाची प्रीति मजवर विशेष आहे ती.'' वडील मुलगा म्हणाला: ''बाबा, माझी तुम्हांवर समुद्रासारखी अमर्याद व अगाध प्रीति आहे.'' दुसरा म्हणाला: ''बाबा, तुमच्याहून मला ह्या साऱ्या भूमंडळांत कांहींएक थोर किंवा प्रिय नाहीं.'' सगळ्यांत धाकटा मुलगा म्हणाला: ''बाबा, पित्यावर पुत्राची जितकी प्रीति असावयास हवी, तेवढी माझी तुमच्यावर आहे. याहून अधिक तें मी काय सांगणार?''

ह्याप्रमाणे त्या मुलांची बोलणीं ऐकून घेऊन त्यानें त्यांस ममतेच्या शब्दांनीं गौरविलें. मग कांहीं दिवसांनीं तो आपल्या प्रधानाला म्हणाला: ''मक्केच्या यात्रेस जावें असें माझ्या मनांत आलें आहे. ह्या यात्रेला उघड्या माथ्यानें व अनवाणी एकटा जाण्याचा मीं निश्चय केला आहे. ह्या यात्रेंत माझा अंत झाला तर माझ्या तिघां मुलांस माझ्याऐवजी राज्यकारभार चालवूं दे.'' ह्याप्रमाणें निरवानिरव करून तो राजा यात्रेस

निघून गेला. तो गेल्यानंतर एका वर्षीनें, तो वाटेंत मरण पावला, अशी बातमी आली. ही त्याच्या मृत्यूची वार्ता ऐकून त्याची सगळी प्रजा फार हळहळली, आणि प्रधानानें त्याच्या आज्ञेप्रमाणें राज्यसूत्रें त्याच्या त्या तिघां मुलांच्या हातीं दिलीं.

ही अशी व्यवस्था केल्यास एक वर्ष लोटले असतां एके दिवशीं एक म्हातारा फकीर राजधानीच्या वेशीपाशीं आला. तो वाट चालून थकला होता, म्हणून तो वेशीच्या दरवाजापाशीं विसावा घेण्यासाठीं बसला. तो असा तेथें टेंकला असतां जवळच एक तरुण पुरुष आक्रोश करीत बसला होता, त्याच्याकडे त्याची नजर गेली. त्या पुरुषाच्या अंगावर फाटके कपडे होते, व तो मोठे उसासे टाकून ऊर बडवीत होता. त्याचा तो शोक पाहून ह्या फकिरानें त्याला पुसलें: ''बाबा, तूं असा शोक करीत आहेस तो कां म्हणून?'' तो दुःखी पुरुष म्हणाला: ''माझ्या पित्याच्या मृत्यूबद्दल मी शोक करीत आहें. माझा पिता ह्या देशाचा राजा होता. तो अत्यंत दयाळू व न्यायी होता. त्याच्यावर माझी पराकाष्ठेची प्रीति होती.'' फकीर म्हणाला: ''तुझें आपल्या पित्यावरील हें अप्रतिम प्रेम खरोखरीच प्रशंसनीय आहे. बरें, तुझे बंधुही तुजप्रमाणेंच शोक करीत असतात काय?'' तो म्हणाला: ''माझा थोरला बंधु आहे, त्याला बापाच्या मरणाबद्दलच्या दुःखाचा विसर लौकरच पडला. तो ख्यालीखुशालींत व मृगयादि करमणुकींच्या प्रकारांत मन घालून आपला काळ चैनींत घालवीत असतो. माझा धाकटा भाऊ आहे, तो राज्यकारभाराची सगळी जबाबदारी आपल्या शिरीं घेऊन मोठ्या दगदगींत काळ घालवीत असतो. आपल्या पित्याच्या ज्या कांहीं योजना होत्या, त्या अमलांत आणून प्रजा सुखी ठेवण्यास तो सर्वकाळ जपत असतो. तो रावापासून रंकापर्यंत सगळ्यांला सारखा न्याय देत असतो. त्याच्या हातून पक्षपात असा मुळीं होत नाहीं. ह्यामुळें सगळे प्रजाजन त्याजवर प्रेम करितात.''

हें त्याचें भाषण ऐकून त्या फकिरानें राजधानींत प्रवेश केला, आणि प्रधानास भेटून आपली ओळख दिली. तेव्हां तो आपला राजा यात्रा करून परत आला आहे अशी प्रधानाची खात्री होऊन त्याला अत्यानंद झाला. मग त्या राजानें फकिराच्या वेश टाकून राजवेश धारण केला, आणि आपल्या सगळ्या अमीरउमरावांस दरबारास बोलावून असें सांगितले कीं, ''मी तुमचा राजा यात्रा करून परत आलों आहें. तरी ह्यापुढें राज्यकारभार पाहावा अशी मला मुळीं इच्छा नाहीं. माझा कनिष्ठ पुत्र माझी गादी चालविण्यास सर्वस्वीं लायक आहे. राजाच्या कर्तव्याची खरी ओळख अशी केवळ त्यालाच आहे; आणि हें कर्तव्य करण्यास तो सर्व प्रकारीं योग्य आहे अशी

तुम्हां सर्वांला प्रतीति आलीच आहें. तर त्यानें माझ्या गादीवर बसावें अशी माझी इच्छा आहे.'' असें बोलून तो गादीवरून खालीं उतरला; आणि आपल्या त्या कर्तव्यदक्ष कनिष्ठ पुत्रास त्यानें आपल्या हातांनीं गादीवर बसविलें.

## राजा आणि अरण्यरक्षक

इंग्लंडचा एक राजा एके दिवशीं आपल्या दरबारच्या मानकऱ्यांसह वर्तमान शिकारीस गेला होता. शिकारीच्या नादानें दौड करितांकरितां तो कोणीकडच्या कोणीकडे भटकत गेला; आणि त्याचा घोडा अगदीं थकून मृतप्राय होऊन पडला. इतक्यांत रात्र होऊन चोहोंकडे काळोख पडून कोठच्या वाटेनें कोणीकडे जावयाचें तें त्याला कांहींच कळेना. असा तो अगदीं भांबावून रानांतून वाट फुटली तिकडे भटकत चालला. इतक्यांत बंदुकीचा आवाज त्याच्या कानीं पडला. तेव्हां तर तो फारच घाबरला. त्याला वाटलें कीं, कोणी तरी लुटारू लोक आपल्या मागावर येत आहेत. आतां काय करावें, अशी त्याला चिंता पडली. आपल्या बचावाचा उपाय त्याला कांहींएक सुचेना.

असा तो चिंतातुर झाला असतां त्याच्याजवळ त्या रानाचा रक्षक येऊन म्हणाला: ''मीं तुला भलें पकडिलें. तूंच ना तो ठक?'' राजा म्हणाला: ''मी ठक नव्हें.'' रक्षक म्हणाला: ''ठक नव्हस तर साव असशील. पण आतां बंदूक कोणी झाडिली बरें?'' राजानें उत्तर केलें: ''मीं नाहीं झाडिली.'' रक्षक म्हणाला: ''तूं खोटें बोलतोस.'' राजा म्हणाला: ''मी खोटें बोलत नाहीं.'' रक्षक म्हणाला: ''आपला गुन्हा कबूल कर. तूं नुकतीच बंदूक झाडून राजाच्या ह्या रानांतलें हरिण मारिलें आहे.'' हा असा आरोप त्यानें त्याच्यावर केला तेव्हां तो गोंधळून गेला. पण आपली ओळख त्याला देऊं नये असा निर्धार करून तो त्या रक्षकास म्हणाला: ''बाबा, हें अरण्य राजाचें आहे हें मला ठाऊक आहे; आणि राजाला मी तुझ्याहून जास्त मान देत असतों. तुझ्याप्रमाणें मींही बंदुकीचा आवाज ऐकिला खरा. तो ऐकून कोणी तरी चोर जवळपास असावा अशी मला धास्ती पडली.'' त्या रक्षकाला राजाचें तें म्हणणें खरें वाटलें नाहीं. त्यानें त्याला त्याचें नांव विचारिलें. तें तो सांगेना. तेव्हां तर त्याला त्याचा अधिकच वहीम आला, आणि तो म्हणाला: ''तूं आपलें नांवगांव कांहीं सांगत नाहींस तर तुला मी नेईन तिकडे चाललें पाहिजे.'' हे शब्द ऐकून राजाने त्याला विचारिले: ''तुला हा असा अधिकार कोणीं दिला आहे?'' तो म्हणाला: ''मला राजानें ह्या अरण्याचा रक्षक नेमिलें आहे; आणि जो कोणी ह्या रानांत शिरून शिकार करील त्याल पकडून ठेवण्याचा अधिकार मला आहे. तर आतां मी तुला येथून जाऊं देणार नाहीं. नाहीं तर

तूं आपली खरी माहिती काय असेल ती सांग.'' हें त्याचें बोलणे ऐकून राजाला त्याचें मोठे कौतुक वाटलें, आणि त्यानें त्याला असें सांगितलें कीं, ''मी राजाच्या दरबारांतला एक मानकरी आहे. मी त्याच्याबरोबर शिकारीस आलों होतों, तो रानांत वाट चुकून असा येथें आलों आहें. माझा घोडा होता तो थकून पडला आहे; आणि मला ह्या काळोख्या रात्रीं ह्या रानांत चांचपडत भटकावें लागलें आहे. तर मला नॉटिंगहॅम शहराची वाट दाखीव. तें शहर येथून दूर असल्यास मला तुझ्या घरीं घेऊन चल. ह्या तुझ्या उपकारांबद्दल हें घे थोडेंसें बक्षीस. हें तुला पुरेंसें वाटत नसल्यास उजाडलें म्हणजे मी तुला आणखी देईन.'' असें म्हणून राजानें त्याच्या हातावर पैशांची थैली ठेविली. ती पाहतांच त्या रक्षकाला त्याचा तिटकारा वाटला, आणि तो त्यास म्हणाला: ''तूं राजदरंबारांतला आहेस याविषयीं माझी आतां खात्री झाली. लोकांला लांचलुचपत देण्याचा परिपाठ दरबारच्या लोकांचा असतो, हें मला ठाऊक आहे. पण मी असल्या लालचीला भुलणारा माणूस नव्हें. मी माझें कर्तव्य करण्यास सर्वदा तत्पर असतों. अशा लांचाची आशा मी कधींही करीत नसतों. तर ही घे आपली पिशवी परत. नॉटिंगहॅम शहर येथून बारा मैल दूर आहे. तुला रात्रीची ह्या दाट रानांत वाट उमगावयाची नाहीं; आणि मला तूं हवे तें दिलें तरी मी कांहीं माझें येथलें काम सोडून तुझ्याबरोबर येणार नाहीं. तुझी मर्जी असल्यास माझ्या झोंपडींत चल. माझ्या सामर्थ्याप्रमाणें मी तुझा पाहुणचार करीन, आणि उजाडलें म्हणजे तुला नॉटिंगहॅमशहरीं पोंचवीन.''

असें त्यांचें बोलणे चालले आहे तो राजाचा एक मानकरी तेथें आला, आणि त्याला मुजरा करून म्हणाला: ''खावंद सरकार, आम्ही आपला शोध करितांकरितां अगदीं थकून गेलों. सरकार सुरक्षित आहेत ना?'' हे त्याचे शब्द ऐकतांच तो रक्षक अगदीं गांगरून गेला. तो गुडघे टेकून हात जोडून राजाची क्षमा मागूं लागला. तेव्हां राजानें म्यानांतून तरवार बाहेर काढिली. ती पाहून तर तो अगदीच गर्भगलित झाला आणि म्हणाला: ''महाराज, माझ्या हातून आपला अपमान केवळ न कळत घडला आहे, त्याची दासाला क्षमा व्हावी. मज गरिबाचा प्राण घेऊं नये.'' राजा म्हणाला: ''तुझ्या हातून कांहींएक गुन्हा घडला नाहीं. तुझ्यासारखा इमानी व कर्तव्यदक्ष नोकर मला मिळाला आहे याचें मला समाधान वाटत आहे. तर ऊठ आणि ही माझी तलवार तुला घे. ही तुझ्या इमानदारीची यादगिरी समज. आजपासून तूं सरदाराच्या पदवीस चढला आहेस; आणि तुला सरकारांतून प्रतिवर्षीं हजार क्रौन वेतन मिळत जाईल.

□□□

### भाग सहावा

# उद्योगशीलता

## योग्य निवड

इंग्लंडात एक श्रीमंत बाई रहात असे. तिला मूलबाळ कोणी नव्हतें. यास्तव आपल्या गरीब नातलगांपैकीं एकादी मुलगी दत्तक घ्यावी असा तिनें विचार केला; आणि तिचे नातलग रहात असत त्या गांवीं ती गेली. तिचा हा उद्देश तेथल्या सोयऱ्याधायऱ्यांस कळून तिच्या सभोंवतीं बऱ्याच तरुण मुलींचा गराडा पडला; आणि त्या सगळ्या तिच्याशीं आपलें नातें आहे असें सांगू लागल्या. मग त्यांपैकीं जी कोणी उद्योगी व साधी मुलगी असेल ती निवडावी असा तिनें निश्चय करून त्या सगळ्यांच्या हातांवर कांहीं पैसे ठेविले, आणि त्यांनां म्हटलें: ''उद्यां जवळच्या गांवांत जत्रा आहे. तेथें जाऊन तुम्हांला आवडतील त्या वस्तु विकत आणा.'' हे पैसे हातीं पडतांच त्या मुली जत्रेस गेल्या, आणि आपआपल्या आवडीप्रमाणें निरनिराळ्या वस्तु खरेदी करून परत आल्या. मग त्यांनीं त्या सगळ्या त्या बाईला दाखविल्या. तेव्हां तिच्या नजरेस असें आलें कीं, त्यांनीं मोठ्या मौजेच्या व शोभेच्या वस्तु घेण्यांत आपले पैसे वेंचिले आहेत; व एका मुलीनें मात्र एक चरकी व कांहीं चात्या सूत काढण्यासाठीं आणिल्या आहेत. हें पाहून तिनें त्या शानशोकीच्या वस्तु आणणाऱ्या सगळ्या मुलींस नापसंत ठरविलें आणि चात्या आणणाऱ्या मुलीस आपल्याबरोबर नेलें. कारण ती मुलगी उद्योगी व साधी आहे अशी तिची खात्री झाली.

## श्रमानें अन्नाला रुचि येते

एका गरीब कुटुंबांतली मुलगी सकाळची न्यहारी करावयास बसली असतां तिच्यापुढें वाढिलेली भाजीभाकर तिला रुचकर लागेना. ती आईला म्हणाली: ''ही भाजी मला

बरी लागत नाहीं. आणि भाकरीलाही चव नाहीं. मला ही नको.'' आई म्हणाली: ''बाळे, आतां दुसरी करायाला मला वेळ नाहीं. आतां आम्हांला मळ्यांत काम करायाला गेलें पाहिजे. संध्याकाळीं फुरसद झाली म्हणजे मी तुला चांगली भाजीभाकर तयार करून वाढीन.'' तो बटाटे काढायाचा हंगाम होता. त्या मायलेकी मग मळ्यांत गेल्या. तेथें त्या मुलीस आईबरोबर सगळा दिवस काम करावें लागलें. काम संपवून त्या घरीं आल्यावर आईनें तिला पुनः भाजीभाकर वाढिली. ती तिने मोठ्या आवडीनें खाल्ली; आणि ती तिला म्हणाली: ''आई, ही भाजीभाकर सकाळच्यापेक्षां कितीतरी चांगली आहे! सकाळची इतकी कशी वाईट झाली होती ग?'' तिचे ते शब्द ऐकून आई हसून म्हणाली: ''बेटा, ही मीं आतां तयार केली नाहीं. ही सकाळचीच आहे. तूं सगळा दिवस पुष्कळ काम केलें, त्यामुळें तुला भूक चांगली लागली; आणि हें अन्न तुला आतां रुचकर लागलें. ह्यावरून असा बोध घे कीं, अंग मोडून मेहनत केली तर भूक चांगली लागून कसलेही अन्न असलें तरी तें रुचकर लागतें; आणि जीं आळसांत सगळा वेळ घालवितात, त्यांच्यापुढें उत्तम पक्वान्न ठेविलें तरी त्याची त्यांला चव लागत नाहीं.''

## कलमी आंबा

एक गृहस्थ आपल्या नातवंडांस बरोबर घेऊन आपल्या फळबागेंत गेला. तेथें एका आंब्याच्या झाडाला पुष्कळ आंबे लागले होते, त्यांतले पिकलेले आंबे काढून त्यानें आपल्या नातवंडांस दिले. ते खाऊन त्या मुलांस मोठा आनंद झाला, आणि तीं त्या झाडाची वाखाणणी करूं लागलीं. तेव्हां तो म्हणाला: ''मुलांनो, हें आंब्याचें झाड येथें कसें लागलें ते मी तुम्हांला सांगतों. चाळीस वर्षांपूर्वी मीं ह्या जागीं उभा राहून माझ्या एका शेजाऱ्यास म्हटलें: ''माझें वर्षाला दोनशें रुपये उत्पन्न वाढेल तर मला कसलीच ददात उरणार नाहीं.'' तो शेजारी म्हणाला: ''दोनशें रुपये मिळवायाला लांब जायाला नको. ते तुझ्या पायांखालच्या जमिनींत आहेत. ती खणून पाहा, म्हणजे तुला ते सापडतील.'' हें त्याचें म्हणणे मला खरें वाटून मीं त्या रात्रीं ही जमीन खणून पाहिली; पण मला हींत कांहींएक सापडलें नाहीं. दुसरे दिवशीं तो शेजारी माझी ती कृति पाहून पोट धरून हसला, आणि मला म्हणाला: ''वेड्या मुला, पैसे काय जमीन खणून मिळतात? आतां या खणलेल्या खड्यांत मी देतो तें आंब्याचे कलम लाव, आणि त्याला चांगले पाणीखत घालून त्याची योग्य मरामत कर. म्हणजे थोड्या वर्षांनीं त्याला फळें येऊन तुला त्याचे पैसे मिळतील.'' त्या दयाळू व शहाण्या

शेजाऱ्यानें दिलेलें कलम मीं लाविलें, त्याचें हें आज एवढें झाड झालें आहे, व याचें मला प्रतिवर्षी बरेंच उत्पन्न मिळतें. त्या वेळेपासून मी आणखी अशींच फळझाडें लावून त्यांपासून पुष्कळ उत्पन्न काढूं लागलों आहें. मीं इतकीं वर्षें श्रम केले नसते, तर ह्या बागेंत आज तुम्हांला दिसत आहेत तेवढी फळझाडें झालीं नसतीं.''

## उद्योगानें मातीचें सोनें होतें

एक गरीब विधवा बाई आपल्या दोघां मुलांस बरोबर घेऊन काटक्या गोळा करण्यास रानांत गेली होती. तेथें ती तें काम करीत असतां एक श्रीमंत व्यापारी तिकडून चालला होता, त्याच्याकडे जाऊन ती कांहीं मागूं लागली. तेव्हां त्या व्यापाऱ्यानें तिच्या हातावर कांहीं पैसे ठेवून म्हटलें; ''बाई, अशी भीक मागण्याची तुला गरज पडूं नये असें तुला वाटत असल्यास मी सांगतों तें ऐक. हे तुझे दोन्ही मुलगे माझ्या स्वाधीन कर. मी त्यांला ह्या गवतापासून व शेवाळीपासून सोनें निर्माण करण्याची युक्ती शिकवितों.'' हे त्याचे शब्द त्या बिचाऱ्या बाईला थट्टेसारखे वाटले. पण तो व्यापारी तिला म्हणाला: ''बाई, मी तुझी थट्टा करीत नाहीं. मी म्हणतों तसें तुला खचीत करून दाखवीन.'' मग त्या बाईनें आपले ते मुलगे त्या व्यापाऱ्याच्या हवालीं केले. त्यानें त्यांला शेवाळीच्या टोपल्या व गवताच्या टोप्या करावयास शिकविलें. हें काम ते मुलगे तीन वर्षें शिकून त्यांत चांगले हुशार झाले. मग ते आपल्या आईपाशी परत येऊन टोपल्या व टोप्या करावयास लागले. ते त्या नेऊन त्या दयाळू व्यापाऱ्याला विकीत. पुढें एके दिवशीं त्यांनीं पुरविलेल्या सगळ्या मालाचे पैसे घेऊन तो व्यापारी स्वत: त्या बाईच्या झोंपडींत आला, आणि तिच्यापुढें कांहीं पौंड मोजून ठेवून म्हणाला: ''बाई, हे पाहा तुझ्या मुलांच्या कमाईचे पैसे. हे त्यांनीं गवत आणि शेवाळ रानांतून आणून त्यांवर आपलें कसब चालविलें म्हणून त्यांला मिळाले आहेत. हें त्यांच्या उद्योगाचें व करामतीचें फळ आहे. ह्यावरून मीं मागें म्हटलें होतें तें खरें झालें आहे असें तुझ्या प्रत्ययास आलें ना?''

## राजाचें दर्शन

ग्रेटब्रिटनचा तिसराजॉर्ज राजा फार साधा होता. त्याला डामडौल किंवा धामधूम मुळीं आवडत नसे. तो आपल्या राज्यांत फिरावयास जाई तेव्हां त्याच्याबरोबर मोठा परिवार नसे; व लोकांपुढें मिरविण्याचा त्याला वीट असे. तो असा फिरत असतां एका शहरांत गेला. शहरांत राजाची स्वारी आली असून ती अमुक वेळीं अमुक रस्त्यानें जाणार आहे, असें तेथल्या लोकांना कळलें, आणि राजा कसा आहे तो पाहण्याच्या

उत्कंठेनें ते त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूंस जमा झाले. इकडे लोकांची अशी गर्दी त्या रस्त्यावर झाल्याचें कळल्यावरून राजानें आपल्या गाड्या, स्वार वगैरे त्या रस्त्यानें जाऊं दिले, आणि आपण स्वत: एका आडवाटेनें पायांनीं गेला. तो फिरत फिरत एका शेतांत गेला. तेथें एक बाई काम करीत होती, तिच्यापाशीं जाऊन तो तिला म्हणाला: ''बाई, तूं राजा पाहायाला गेली नाहींस काय? सगळीं माणसें रस्त्यांत जमलीं असतां तूंच तेवढी काम करीत राहिली आहेस हें कसें?'' त्या बाईनें उत्तर केलें: ''बाबा, मी फार गरीब आहें. माझीं चार मुलें आहेत, त्यांचें पोट मला चालवायाचें आहे. मी काम सोडून गेलें तर मला मजुरी कमी मिळेल; आणि माझ्या मुलांस पोटभर अन्न मिळणार नाहीं. राजाला पाहून मला काय मिळणार?'' हे तिचे शब्द ऐकून राजाला तिचा कळवळा आला; आणि एवढा मोह प्राप्त झाला असूनही ती आपलें काम सोडून गेली नाहीं, हा तिचा उद्योगीपणा व कुटुंबवात्सल्य पाहून त्यानें तिची वाखाणणी केली, आणि म्हटलें: ''बाई, राजा म्हणतात तो मीच बरें. तुझ्या शेजारचीं माणसें परत आलीं म्हणजे त्यांला सांग की, 'तुम्ही राजा पाहायाला गेलां होतां, पण तो स्वत: मला भेटायास आला होता.' आणि ह्या माझ्या भेटीची यादगिरी म्हणून मी तुला हा पौंड देतों तो घे.'' असें म्हणून तिच्या हातावर एक पौंड ठेवून तो पुढें चालता झाला.

## कांहीं तरी करावयास पाहिजे

पोलंडदेशांतल्या एका बड्या सरदारावर रशिआच्या बादशहाविरुद्ध कट केल्याचा वहीम येऊन त्याला कैद केलें; आणि त्याची चौकशी होऊन त्याला कारागृहांत ठेविले. त्याची ही कैदेची शिक्षा सहा वर्षांची होती. इतकीं वर्षें त्याला अंधारकोठडींत पडून काढावयाचीं होतीं. एवढा काळ काळोखांत बसून कंठावा कसा याचा त्याला मोठा विचार पडला. कांहींएक काम न करितां असें कोंडवाड्यांत पडून राहिल्यानें आपल्या बुद्धीला भ्रंश होईल, किंवा आपली प्रकृति लौकरच साफ बिघडून आपला अंत होईल, अशी त्याला दहशत पडली. पण त्याच्या अंगांत अंगरखा होता, त्याच्या खिशांत त्याला पाचसहा टाचण्या सांपडल्या. त्या घेऊन त्यानें आपला वेळ कांहींतरी काम करण्यांत घालवण्याची युक्ती योजिली. ती अशी: तो त्या टांचण्या अंधारकोठडींत चोहोंकडे फेकी, आणि मग त्या चाचपूनचाचपून शोधी. त्या सगळ्या हातीं आल्या म्हणजे पुनः त्या फेंकी आणि शोधी. त्या सगळ्या शोधून काढायाला त्यास कधीकधी आठआठ दिवस लागत. कारण खोलीत निबिड अंधार असल्यामुळें त्याला त्या हातांनीं चाचपाव्या लागत. ह्याप्रमाणें त्यानें आपलीं सहा वर्षें घालविलीं. शेवटीं

त्याची मुदत भरून त्याला त्या कोठडींतून बाहेर काढायास लोक आले त्या वेळीं एक टांचणी सांपडत नव्हती, ती शोधण्यांत तो गुंतला होता.

तुरुंगांतून बाहेर आल्यावर त्या टांचण्या त्यानें जपून ठेविल्या. त्यांनीं आपल्या प्राणांचें रक्षण केलें असें मानून त्यांचा त्यानें एक डागिना करविला. सोन्यारत्नांचें एक शिरोभूषण करून त्यांत त्यानें त्या लावून ठेविल्या. हा डागिना त्याची बायको मोठ्या प्रेमानें घाली. ती म्हणे: ''ह्या टांचण्यांनीं माझ्या पतीच्या प्राणांचें रक्षण केलें आहे, तरी मी यांना क्षणभरही विसंबणार नाहीं.''

## उद्योगाचें फळ

एका तरुण मनुष्याची एक झोंपडी होती. तिच्या सभोंवार त्याच्या मालकीची थोडीशी जमीन होती. त्याचा बाप होता तोंपर्यंत त्या जमिनींत चांगली लागवड होत असे. तो मरण पावल्यानंतर ह्या मुलानें तींत कसलीच लागवड केली नाहीं. त्याला शेतकीचा धंदा हलका वाटे. पण त्याला दुसरें कोठे कांहीं काम मिळेना. म्हणून त्याला निर्वाह चालविण्याची पंचाईत पडूं लागली. एके दिवशीं तो आपल्या झोपडी जवळील झाडाखालीं स्वस्थ पडून राहिला असतां, तिकडून एक उद्योगी शेतकरी हातगाडींत धान्य भरून घराकडे नेत होता. या धान्याकडे पाहून त्या तरुण आळशी माणसाला त्याचा हेवा वाटला; अणि तो त्याजकडे आशाळभूत नजरेनें पाहूं लागला. त्या शेतकऱ्याला त्याची स्थिति चांगली माहीत होती. त्यानें त्याला हाक मारून म्हटलें: ''अरे, तुझ्यासारख्या तरुण माणसानें आळसांत वेळ घालवावा हें कांहीं बरोबर नाहीं. अशानें तुझे फार हाल होतील. तुझी एवढी जमीन असतां तूं उपाशीं मरत आहेस याची तुला लाज वाटत नाहीं काय? तुझा बाप ह्या एवढ्या जमिनींतच खपून आपल्या कुटुंबाचा निर्वाह चांगल्या रीतीनें चालवी, आणि तूं भला धट्टाकट्टा असून ह्या तुझ्या जमिनींत आतां कांटेझाडें व रान माजावें, व ही अगदीं निरुपयोगी होऊन रहावी, याची तुला शरम वाटत नाहीं काय? अरे, ही तुझी जमीन फार नामी आहे. हींत हवी ती जिन्नस होण्याजोगी आहे. तर ऊठ, आळस झाड. लोक आपल्या जमिनींत खपून कसल्या प्रकारची लागवड करितात तें पाहा, आणि तसें तूं करूं लाग. असा सुस्तपणें पडून विनाकारण विपत्ति भोगूं नको.''

हा त्याचा बोध त्या तरुण मनुष्यास ह्या वेळीं पसंत वाटला; आणि तो सगळी लज्जा व आळस सोडून देऊन इतर शेतकऱ्यांप्रमाणें जमिनींत कष्ट करूं लागला. त्यानें तींतलें रान सगळें खणून ती चांगली साफ केली, आणि तींत नाना प्रकारच्या जिनसांची

लागवड केली. त्यांचें त्याला महामूर फळ आलें; आणि त्याची ददात मिटून तो तेव्हांपासून सुखी झाला.

## उद्योग आणि काटकसर

एका गांवांत एक विधवा बाई होती. तिला दोन मुली होत्या. तिचा नवरा होता तोपर्यंत त्यांचें चांगलें चाललें होतें. तो मेल्यानंतर त्याच्या कमाईचें कांहीं होते तें सगळें खाऊन त्या कफल्लक झाल्या; आणि पुढें निर्वाह कसा चालेल याची त्यांला भ्रांति पडली. पूर्वी चांगल्या स्थितींत दिवस गेले असल्यामुळें त्यांला कसलाच श्रम करण्याची सवय झाली नव्हती; आणि आतां कांहीं कामधंदा करून पोट भरावयास लागावें तर त्यांत कमीपणा आहें असें त्यांस वाटूं लागलें. एके दिवशीं ती बाई शेजारच्या एका बाईपाशीं कांहीं पैसे उसने मागावयास गेली. ती शेजारीण गरीब होती. पण ती सगळा दिवस मेहनत करून बरेच पैसे मिळवी. ती ह्या विधवा बाईस म्हणाली: ''बाई, तुमची ददात पाहून मला भारीं वाईट वाटतें. तुमचें चांगलें चाले तेव्हां मीं तुमच्या घरीं कांहीं दिवस मोलकरणीसारखें काम करून पोट भरिलें आहे. आतां तुह्मांला माझ्याजवळ पैसे उसने मागायाची पाळी यावी याचें मला दुख वाटतें. मी तुह्मांला ह्या वेळीं पैसे तर देतें. पण तुम्ही अशा बडेजावीवर जाऊन तुमचे व तुमच्या मुलींचे हाल होऊं देऊं नका. तुमच्या मुली व तुम्ही चांगल्या निरोगी व हुशार आहां. तुम्ही माझ्याप्रमाणें कांहीं तरी कामधंदा करा, म्हणजे तुम्हांला निर्वाहास पुरेसें मिळण्यास हरकत पडणार नाहीं. दुसरें असें कीं, तुमचा मागला काळ चांगल्या स्थितींत गेला असल्याकारणानें तुमचा खाण्यापिण्याचा व चिरगूटपांघरुणाचा वगैरे खर्च मोठा आहे. त्यांत आतां काटकसर करा. तुम्ही कष्ट करून जें कांहीं मिळवाल त्यांतलें थोडें राखून ठेवाल व हात राखून खर्च कराल, तर एकादे वेळीं कोठें कांहीं काम मिळालें नाहीं, किंवा तुमची प्रकृति बिघडली तर तुम्हांला दुसऱ्याच्या मदतीची गरज लागणार नाहीं.'' हा त्या शेजारणीचा मोठ्या कळकळीचा उपदेश ऐकून ती बाई लागलींच शुद्धीवर आली, आणि तेव्हांपासून आपल्या मुलींसह मिळेल तें काम करण्यास तयार झाली. त्यामुळें तिची स्थिति लौकरच सुधरून ती सुखी झाली.

## श्रीमंतीपेक्षां उद्योगीपणा श्रेष्ठ आहे

एका गांवांत एक श्रीमंत कुटुंब होतें. त्यांतला एक मुलगा विद्याहुन्नर कांहींएक न शिकतां आपला सगळा वेळ खेळण्याबागडण्यांत व हुच्चेपणांत घालवी. त्याला वाटे कीं, आपल्या बापाची मोठी दौलत आहे. आपणास कोणत्याही गोष्टीची कधींही वाण

पडणार नाहीं. ह्या कुटुंबाच्या शेजारीं दुसरें एक गरीब कुटुंब रहात असे. त्यांतले सगळे मुलगे उद्योगी होते. ते कांहीं ना कांहीं धंदा करून आपल्या निर्वाहाचा बोजा आपल्या आईबापांवर पडूं देत नसत. त्यांपैकीं एक मुलगा टोपल्या तयार करण्याच्या कामांत हुशार झाला होता. तो एके दिवशीं टोपल्यांसाठीं शेवाळ मिळविण्याकरितां खाडीच्या बाजूला हिंडत होता; आणि वर सांगितलेला श्रीमंताचा मुलगा खाडीच्या कांठावर बसून पाण्यांत गळ टाकीत होता. इतक्यांत जवळ एक पडाव होता, त्यांतल्या चांच्यांनीं ह्या दोघां मुलांस पकडून पडावावर चढविलें, आणि तो हाकारून ते चालते झाले. ह्या मुलांस गुलाम म्हणून विकून पैसे करावे असा त्या चांच्यांचा इरादा होता. पण त्यांस वाटेंत मोठें तुफान होऊन त्यांचें तारूं खडकावर लागून फुटलें, आणि त्यांतले सगळे चांचे बुडून मेले. हे दोघे मुलगे तेवढे मात्र बचावून किनाऱ्यास लागले. तेथून ते पुढें एकादा गांव लागल्यास पाहावा म्हणून जाऊं लागले, तों त्यांच्या भोंवतीं काळे रानटी लोक जमा झाले. ते मूर होते. त्यांला त्या मुलांनीं आपलें संकट खुणांनीं कळविलें. तेव्हां त्यांनीं त्यांस आश्रय दिला. मग त्या गरीब व उद्योगी मुलानें तेथें शेवाळ मिळवून तिच्या टोपल्या विणून त्या लोकांला देण्याचा उद्योग सुरू केला. त्या पाहून ते फार खुश झाले; आणि त्या मुलाच्या खाण्यापिण्याची व रहाण्याची त्यांनीं चांगली सोय केली; आणि त्या श्रीमंताच्या मुलास कसलेंच काम करितां येत नाहीं असें पाहून त्याचे ते हाल करूं लागले. तें पाहून तो गरीब मुलगा त्यांस म्हणाला: ''ह्या माझ्या मित्रास छळूं नका. याला माझ्या स्वाधीन करा. हा माझें काम करून राहील.'' अशी त्याच्यासंबंधानें त्या गरीब मुलानें रदबदली केल्यामुळें त्याचा बचाव झाला, आणि टोपल्या तयार करण्याचें काम तो शिकला.

## कांहीं तरी उद्योग शिकावा

युरोपांत खिळे करण्याचीं यंत्रे निघण्यापूर्वीं लोहार हातांनीं खिळे करीत. असा एक लोहार तिकडील एका गांवीं खिळे करण्यांत मोठा हुशार होता. तो सगळा दिवस आपल्या कामांत गढला असे. त्याच्या गांवांत एक मोठा सधन गृहस्थ होता. त्याचा तरुण मुलगा रमतरमत त्या लोहाराच्या दुकानीं जाई आणि त्याचें तें काम पाहत उभा राही. लोहारानें एके दिवशीं त्याला म्हटलें: ''अहो छोटे महाराज, असे स्वस्थ उभे राहून माझें काम तुम्ही जेव्हांतेव्हां पाहत असतां, तरी हें काम तुम्ही शिकाना. यांत तुम्हांला थोडीशी करमणूक होईल, आणि ह्याचा तुम्हांला एकादे वेळीं उपयोगही होईल.'' हें त्याचें सांगणें त्या तरुण मुलास बरें वाटून तो त्याच्याजवळ बसून तें खिळे करायाचें काम केवळ मौजेखातर शिकला; आणि त्या कामांत तो लौकरच तरबेज झाला.

पुढें कांहीं वर्षांनीं हा श्रीमंताचा मुलगा बापाच्या दौलतीचा मालक झाला. पण तिचा उपभोग त्याला फार दिवस घडला नाहीं. त्या देशांत चोहींकडे लढाईची मोठी धामधूम होऊन त्याची सगळी दौलत गेली, आणि तो कंगाल होऊन परागंदा झाला. परदेशांत गेल्यावर तेथें त्याला अन्न मिळण्याची पंचाईत पडूं लागली. त्याला विद्याहुन्नर वगैरे कांहींएक येत नसल्यामुळें त्याला तेथें कांहीं काम मिळेना. असा कंगाल होऊन तो एका गांवीं वस्तीस राहिला. तेथले बहुतेक लोक जोडे तयार करणारे होते. त्याला जोड्यांसाठीं लहान खिळे लागत, ते त्यांला जवळच्या शहरांतून विकत आणावे लागत; आणि तेही त्यांला कधींकधीं पुरतसे न मिळून त्यांचें काम अडून राही. त्यांची ती नड पाहून ह्या तरुण गृहस्थाला असें वाटलें कीं, आपणास खिळे करितां येत आहेत तर त्या कसबाचा उपयोग येथें करून पाहावा. मग त्यानें त्या लोकांस म्हटले: ''तुझी येथें मला लहानसा कारखाना काढून द्याल तर मी तुम्हाला हवे तितके खिळे तयार करून देईन.'' हें त्याचें म्हणणें त्या लोकांनीं मोठ्या खुशीनें कबूल करून त्याला सगळें साहित्य आणून दिलें; आणि तो तें काम मोठ्या नेटानें व एकसारखें करूं लागला. त्यामुळें त्याची ददात मिटून तो तेथें सुखानें राहिला. ह्याप्रमाणें जें काम तो केवळ मौजेसाठीं शिकला होता, त्याचा त्याला अशा संकटसमयीं उपयोग झाला.

## मनोराज्यापेक्षां उद्योग करणें बरें

एका गरीब बाईचा एक मुलगा होता. तो फार आळशी होता. कोठें तरी पडून लोळून असावें, काम कांहीं करूं नये, असा त्याचा क्रम असे. त्याची आई फारच गरीब असल्यामुळें त्याला धड वस्त्रही मिळत नसे. आपल्या अंगावरचे फाटके कपडे पाहून त्याला फार दु:ख होई. तसेंच आपल्या आईचे हाल पाहूनही तो कष्टी होई. पण आंग मोडून उद्योग करण्याची बुद्धि त्याला होईना. एके दिवशीं एका झाडाच्या छायेंत सुस्तपणें पडून तो आपल्या मनाशी असें म्हणू लागला कीं, ''मला शंभर पौंड मिळतील तर मी माझ्या आईला चांगली नवीं वस्त्रें घेऊन देईन व मीही चांगले कपडे घेईन, व पायांत एक चांगला जोडाही घालीन.'' अशा मनोराज्यांत तो गर्क झाला असतां एक पक्षीण चारा चोचींत धरून आपल्या घरट्यांत शिरतांना त्यानें पाहिली. ती आंत शिरतांच तिच्या पिलांनीं एकच किलबिलाट केला. तिनें त्यांला तो चारा चारून पुन: घरट्याबाहेर भरारी मारिली. ही त्या पक्षिणीची कृति पाहून हा आळशी मुलगा आपल्या मनाशीं पुनः म्हणाला: ''ही पक्षीण माझ्याप्रमाणें स्वस्थ पडून आपल्या पिलांना व आपणाला खायाला कसें मिळेल असा विचार करीत बसत नाहीं, तर ती

जिकडेतिकडे उडून चारा मिळविते. तर आपणही हिच्याप्रमाणेंच केलें पाहिजे. मी चांगला धट्टाकट्टा असून असा आळशी बसून राहतों याची मला लाज वाटली पाहिजे.'' असें मनांत आणून तो चटकन उठला आणि कोठें कांहीं काम मिळतें काय पाहूं लागला. त्याच्या शेजारीं एक बागवान होता. त्याच्या बागेंत कांहीं झाडांचीं फळें पिकून पडत होतीं. तीं वेंचायाला त्यास कोणीतरी मुलें हवीं होतीं, हें त्याला ठाऊक होतें. मग तो त्या बागवानाकडे जाऊन त्याचें तें काम करण्यास तयार झाला. त्यानें त्याला तें काम देऊन, 'दिवसाला जितक्या टोपल्या तूं भरिशील तितक्या पेनी तुला देईन.' असें सांगितलें. तेव्हां जास्त पेनी मिळविण्याच्या आशेनें तो सगळा दिवस मोठ्या हुशारीनं व चपळतेने काम करूं लागला. हा असा त्याचा उद्योग पाहून शेजारचा दुसरा एक बागवान त्याला जास्त मजुरी देऊन आपल्या कामावर ठेवण्यास तयार झाला. पण पूर्वीचा बागवान त्याला सोडायास तयार होईना. त्यानें त्याला जास्त मजुरी देण्याचे ठरवून आपणाकडे ठेवून घेतलें.

ह्याप्रमाणें हा मुलगा पुढें मोठेपणी मेहनती व हुशार निपजून चांगल्या योग्यतेस चढला; आणि त्याला व त्याच्या वृद्ध आईला कसलीच ददात उरली नाहीं.

## जादुगिरीचा आरोप

प्राचीन काळी इटलीदेशांतील तुका गांवीं क्रेजीन नांवाचा एक शेतकरी होता. तो मोठा उद्योगी व हुशार होता. त्याचें शेत नेहमीं चांगलें असे. त्याचीं गुरें बळकट व पुष्ट असत. त्याच्या घरीं दाणावैरण सर्वदा महामूर असे. ती त्याची सुबत्ता पाहून त्याच्या गांवांतले दुसरे शेतकरी त्याचा हेवा करीत. ते अडाणी असल्यामुळें त्याला वाटे कीं, हा शेतकरी कांहीं तरी जादू करीत असावा. त्याचा उत्कर्ष न साहून त्यांनीं शेवटीं न्यायाधिशापुढें अशी तक्रार केली कीं, 'हा शेतकरी जादुगार आहे. हा जादूच्या योगानें आपल्या शेतांत चांगलें पीक आणितो.'

त्या काळीं तेथील लोकांचा जादूटोण्यावर विश्वास असे; आणि जे कोणी जादुगिरी करीत त्यांला तेथल्या कायद्यानें शिक्षा होत असे. म्हणून न्यायाधिशानें त्या शेतकऱ्याला कचेरींत बोलावून आणून त्याच्यावर जादुगिरीचा आरोप ठेविला. त्या वेळीं त्यानें आपण निरपराध आहें हें दाखविण्यासाठीं आपलीं गुरें, आपलीं आउतें आणि आपली एक तरुण व बळकट मुलगी अशीं न्यायाधिशापुढें आणून म्हटलें: ''महाराज, माझ्या गुरांची मी चांगली निगा ठेवितों म्हणून हीं अशीं धष्टपुष्ट आहेत; आणि त्यांच्या मदतीनें मला शेताची नांगरणी चांगली करितां येते. हीं माझीं आउतें पाहा कशीं नामी

आहेत. त्यांच्यायोगानें मला शेतांतलें सगळें काम चांगलें करितां येतें. तशीच माझी ही मुलगी पाहा. ही माझ्याप्रमाणें सारा दिवस शेतांत खपून त्यांत माजलेलें रान बेणून टाकिते. मी माझ्या शेताची नांगरणी फार चांगली करितों; आणि ह्या गुरांपासून मला खत मिळतें, तें मी उभे वर्ष राखून ठेवून शेतांत घालितों, त्यामुळें चांगले पीक येतें. ही माझी सगळी जादू आहे. नेहमीं मनापासून कष्ट करावे, गुरांवासरांची चांगली जोपासना करावी व आपली आउतें नीट ठेवावीं, ह्यापलीकडे मला आणखी कसलीही जादू ठाऊक नाहीं. महाराज, आपण माझ्या शेजाऱ्यांची गुरें, आउतें वगैरे पाहाल तर तीं माझ्या इतकीं चांगली मुळीं आढळणार नाहींत. त्यांच्या शेतांची नांगरणी, राबणी व बेणणी माझ्या शेतांतल्यासारखी अगदीं नाहीं, असें तुमच्या नजरेस येईल. त्याप्रमाणेंच माझी मुलगी व मी शेतांत दररोज जितका वेळ खपतों तितका माझा कोणीही शेजारी खपत नाहीं, असें आपल्या प्रत्ययास येईल. असें आहे तर त्यांच्या शेतांत माझ्यासारखें पीक येत नाहीं त्यांत दोष कोणाचा?'' हा त्या शेतकऱ्याचा वाका ऐकून घेऊन न्यायाधिशानें त्याला निर्दोषी ठरविलें, आणि त्याच्या उद्योगाची व शहाणपणाची तारीफ केली.

## मधमाशा पाळणे

ख्रिस्तीलोकांचीं देवळें असतात, त्यांवर धर्माधिकारी नेमितात, आणि त्यांच्या ताब्यांत लहानमोठे टापू असतात. ह्या अधिकाऱ्यांचे उच्चनीच दरजे असतात; आणि त्या मानानें त्यांस कमीजास्त वेतनें मिळतात. ह्या धर्माधिकाऱ्यांवर एक मुख्य असतो, त्याला बिशप म्हणतात. त्याच्या ताब्यांत मोठा प्रांत असतो, व त्यांतल्या सगळ्या देवळांची व्यवस्था त्याच्या हातीं असते. अगदीं कनिष्ठ दरजाच्या धर्माधिकाऱ्याला क्युरेट म्हणतात. याला अर्थात् अगदीं थोडें वेतन असतें.

फ्रान्सांतल्या अशा एका क्युरेटाला त्याच्यावरच्या बिशपानें एकदां असा निरोप पाठविला कीं, ''मी आज तुमच्या घरीं जेवायास येणार आहें. मजसाठीं कांहीं विशेष तयारी करूं नका. बेत अगदीं साधा व नेहमींचा ठेवा.'' पण त्या क्युरेटानें त्याचें तें सांगणें मनास आणिलें नाहीं. त्यानें त्याच्यासाठीं मोठ्या मेजवानीचा थाट केला. वरिष्ठ धर्माधिकारी ठरलेल्या वेळीं येऊन पाहतो तर त्यानें पुष्कळ खर्च करून भोजनाची वगैरे उत्तम तयारी केली आहे. तेव्हां त्यानें त्याला मोठा दोष देऊन म्हटलें कीं, ''असा उधळेपणा करूं नका म्हणून मीं तुम्हांला बजाविलें असून माझ्या एका दिवसाच्या पाहुणचारासाठीं तुम्हीं आपल्या एका वर्षाचें वेतन खर्चिलें हें अगदीं बरोबर नाहीं.''

तो म्हणाला: ''महाराज, ह्याबद्दल तुम्ही रागावूं नका. मेजावर जे पदार्थ मांडिले आहेत, ते कांहीं माझ्या वेतनांतून आणिले नाहींत. माझें सगळें वेतन मी गोरगरिबांला मदत करण्यांत वेंचीत असतों.'' बिशप म्हणाला: ''तर मग तुमची कांहीं तरी वडिलार्जित मिळकत असावी?'' त्यानें उत्तर केले: ''नाहीं, महाराज, मी घरचा अगदीं गरीब आहें.'' बिशप म्हणाला: ''असें आहे तर तुमचा हा खर्च चालतो कसा?'' तो म्हणाला: ''महाराज, आपण पहिल्यानें भोजन करा, म्हणजे मग मी आपणांस माझ्या उत्पन्नाची बाब दाखवितों.''

भोजन आटपल्यावर त्यानें त्या बिशपाला आपल्या घरामागल्या आवारांत नेऊन मधमाश्यांची पोळीं दाखविलीं आणि म्हटलें: ''माझें काम करून मला वेळ मिळतो, तो सगळा मी ह्या उद्योगांत घालवितों. ह्या मधमाश्यांच्या पोळ्यांपासून मला प्रतिवर्षी शंभरसवाशें पौंड मिळतात. त्यांवर माझा चांगला गुजारा चालतो, व मला माझ्या पाहुण्यांचा व गोरगरिबांचाही चांगला परामर्ष घेतां येतो. ''हें पाहून तो बिशप थक्क झाला. त्याच्या तो उद्योग पाहून त्याला मोठा संतोष वाटला, आणि त्यानें त्याची तारीफ केली.

## शेतकऱ्याचा मुलगा

एक लहान मुलगा कोठे तरी काम लागावें म्हणून फिरतफिरत एका मोठ्या शेतकऱ्याच्या दाराशीं आला आणि म्हणाला: ''कांहीं काम मिळावें म्हणून मी आज सगळा दिवस भटकत आहें. चालतां चालतां माझे पाय अगदीं थकून गेलें आहेत. कांहीं खायाला मिळालें नाही म्हणून मी भुकेनें अगदीं व्याकुळ झालों आहें. आतां सांज झाली आहे, अणि गार वारा सुटून मी थंडीनें गारठून गेलों आहें. माझा बाप मेला, आणि आई अगदीं गरीब व अशक्त आहे. मला आणखी चार भावंडे आहेत. तीं सगळीं माझ्याहून लहान आहेत. त्यांचा निर्वाह कसा होईल याची माझ्या आईला पंचाईत पडली आहे. मी शेतांतलें कसलेंही काम करण्यास तयार आहे. मीं लहान आहें, तरी मी माझ्या शक्तीप्रमाणें काम करण्यास कधींही आळस करणार नाहीं. तर मला तुमच्या पदरीं ठेवा. मी तुमचें काम इमानानें करीन. मी लहान आहें म्हणून मला तुमच्या कामावर ठेवावेंसें तुम्हांस वाटत नसलें तर आजची रात्र तुमच्या घरीं मला आसरा द्या. उजाडलें म्हणजे मी काम शोधीत पुढें जाईन.'' हे त्याचे केवीलवाणे शब्द ऐकून शेतकऱ्याच्या बायकोला त्याची दया आली, आणि ती आपल्या नवऱ्यास म्हणाली: ''ह्या मुलास आपल्या घरीं ठेवून घ्या. ह्याचा आपणांस उपयोग होईल. ''

त्या शेतकऱ्याची एक लहान मुलगी होती, तिला तर त्याची ती अवस्था पाहून अतिशयित गहिंवर आला, आणि तिच्या डोळ्यांतून टपटपां आसवें गळूं लागलीं. ती आपल्या बापाला म्हणाली: ''बाबा, हा गरीब मुलगा आहे. हा हवें तें काम करण्यास तयार आहे. अशा मुलाचे हाल व्हावे हें कांहीं बरोबर नाहीं. ह्याला तुम्ही आपल्याकडे ठेवाच.''

त्या शेतकऱ्यानें त्या मुलास आपल्या घरीं ठेवून घेतलें. तेथें तो मोठ्या इमानानें व हुशारीनें पडे तें काम करी. कोणत्याही कामांत तो कधींही आळस करीत नसे. त्याचें एकंदर वर्तनही फार चांगलें असे. त्यामुळें त्याजवर त्या शेतकऱ्याची फारच प्रीति जडली. तो त्याला आपल्या पुत्राप्रमाणें लेखी. त्यानें त्याला आपल्या घरीं कायम ठेवून घेतलें. तेथें तो लहानाचा मोठा होऊन त्या शेतकऱ्याचा सगळा व्यवहार मोठ्या दक्षतेनें पाहूं लागला. पुढें त्या शेतकऱ्यानें त्याचें; आपल्या मुलीशीं लग्न करून दिलें; आणि तो मरण पावला तेव्हां त्याच्या सगळ्या वतनवाडीचा तो मुलगा मालक झाला.

## उद्योगी राजा

रशिआचा बादशहा पिटर दि ग्रेट हा मोठा उद्योगी होता. आपला देश उद्योगधंद्यांच्या बाबतींत अगदीं मागें आहे हें ध्यानांत आणून ते वाढविण्याचा त्यानें फारच मोठा प्रयत्न केला. तो स्वत: निरनिराळे धंदे शिकण्यास नेहमीं तयार असे. आपल्या राज्यांत चोहींकडे फिरून तेथें चालू असलेले कारखाने तो स्वतः बारकाईनें पाही, आणि त्यातं कांहीं सुधारणा होण्यासारखी असल्यास ती करण्याविषयीं तो त्या त्या कारखानदारांला उत्तेजन देई. त्याप्रमाणेंच नवे उद्योगधंदे सुरू होण्याजोगे असल्यास ते चालविण्यास तो लायक माणसांला योग्य मदत करी. कोणतेंहि काम स्वत: हाताने करण्याची त्याला मुळीं लाज वाटत नसे, तर उलट त्यांत त्याला भूषण वाटे. आपण एवढा मोठा राजा असून हलकींसलकीं कामे स्वत: करावयास शिकावें कसें, हा विचार त्याच्या मनांत कधींही येत नसे. त्यानें आपल्या अशा वर्तनानें सगळ्या दरजांच्या लोकांच्या लक्षांत असें आणून दिलें कीं, कसलेंही उपयोगी काम करण्यांत कोणाला कधींही कमीपणा येत नाहीं.

हा उद्योगप्रिय बादशहा वर सांगितलेल्या उद्देशाने आपल्या राज्यांत फिरत असतां इस्तियानामक शहरीं आला. तेथें एक लोखंडाचा मोठा कारखाना होता, त्यांतलें काम नीट बारकाईनें पाहावे म्हणून त्यानें तेथें एक महिना मुक्काम केला. तेवढ्या अवधींत त्यानें त्या कारखान्यांतल्या सगळ्या प्रकारच्या कामाची माहिती मिळविली; इतकेंच नव्हे तर तेथलीं कांहीं कामे तो आपल्या हातांनीं करावयास शिकला. एके दिवशीं

त्यानें त्या कारखान्यांत सगळा दिवस खपून अठरा कांबी ठोकून तयार केल्या. तो हें काम करीत असतां भाता फुंकायाला व कोळसे वगैरे साहित्य जमवायाला त्याचे तैनातीचे मानकरी सरदार लागले होते. हे अठरा नग तयार करून त्यांवर त्यानें आपली खूण केली, आणि ते त्या कारखान्याच्या मालकाला दाखवून म्हटलें: ''ह्या एवढ्या कामाबद्दल तुम्ही किती मजुरी देतां?'' कारखानदार म्हणाला: ''प्रत्येक कांबीला दोन आणे मी देत असतों.'' बादशहा म्हणाला: ''तर मला ह्या एवढ्या कांबीचे किती होतील ते पैसे द्या.'' हें ऐकून तो कारखानदार त्याला अठरा रुपये देऊं लागला, ते बादशहा घेईना. तो म्हणाला: ''दुसऱ्या कामकऱ्यांला जेवढी मजुरी देण्याचा तुमचा परिपाठ आहे, तेवढीच मला द्या. मला अधिक नको. तुमच्याकडून मिळेल तेवढ्या मजुरीचे मला जोडे विकत घ्यावयाचे आहेत. माझ्या पायांतले जोडे जुने झाले आहेत.'' तेव्हां त्या कारखानदाराला अगोदर सांगितलेली मजुरी बादशहाच्या हातावर ठेवावी लागली. ती घेऊन त्यानें तिचे नवे जोडे विकत घेतले, आणि ते लोकांनां दाखवून तो म्हणे: ''हे जोडें माझ्या कमाईचे आहेत. हे मला अतिमोलाचे वाटतात!''

## जा आणि ये

एक मोठा जमीनदार होता. त्याची मोठी जमीन होती. ती तो स्वत: घरीं लावीत असे. पण तिच्या उत्पन्नावर त्याचें भागत नसे. त्यामुळें त्याला लोकांचें बरेंच देणें झालें होतें. सावकारांचा त्याच्या पाठीशीं नेहमीं तगादा असे; आणि कित्येक तर त्याच्या दाराशीं देण्यासाठीं धरणें धरून बसत. अशी त्याची तारंबळ होऊं लागली, तिला तो अगदीं त्रासला; आणि आपली अर्धी जमीन विकून टाकून तो सगळ्यांच्या कर्जांतून एकदांचा मोकळा झाला. मग बाकीची अर्धी जमीन एका कुळाकडे लावून देऊन त्याच्याकडून मिळणाऱ्या उत्पन्नावर तो कसाबसा निर्वाह करूं लागला.

ज्या शेतकऱ्याच्या हातीं त्यानें आपली उरलेली जमीन लागवडीसाठीं दिली, तो मोठा मेहनती होता. तो तिची चांगली सुधारणा करून तींत बरेंच उत्पन्न काढूं लागला. तो आपल्या धन्याचा मक्ता वेळच्या वेळीं देई. असा क्रम कित्येक वर्षें चालू ठेवून एके दिवशीं तो शेतकरी त्या जमीनदाराकडे जाऊन म्हणालाः ''तुमची ही उरलेली अर्धी जमीन विकायाची असल्यास माझ्याशिवाय दुसऱ्या कोणास तीं विकूं नका. ती विकत घेण्यापुरते पैसे मजपाशीं जमले आहेत. तुमच्या जमिनींत इतके दिवस खपलों आहें; तिची सुधारणा माझ्या श्रमानें झाली आहें; आणि तींत मला चांगली बरकत आली आहे. मजपाशीं आज पैसे जमले आहेत ते सगळे तुमच्या जमिनींत खपूनच मीं

मिळविले आहेत. तरी ती हाताबाहेर जाऊं नये अशी माझी इच्छा आहे. म्हणून मी तुम्हांस ही विनंति करीत आहें, ह्याबद्दल मला क्षमा करा.'' हे त्याचे शब्द ऐकून तो जमीनदार अगदीं थक्क झाला आणि त्यास म्हणाला: ''अरे, असें होईल तरी कसें? मी माझें सगळें शेत घरीं लावीं, तरी मला माझ्या कुटुंबाचा गुजारा होण्याची अडचण पडे; आणि तूं तर माझें अर्धें शेत लावीत असून मला मक्ता भरीत असतोस. असें असतां एवढ्या वर्षांत तुझ्यापाशीं तें शेत विकत घेण्यापुरते पैसे जमले आहेत असें म्हणतोस; आणि ते सगळे माझ्या शेतावर मिळविले असें सांगतोस. हें होईल तरी कसें?'' तो उद्योगी शेतकरी म्हणाला: ''धनीसाहेब, तुमच्यामाझ्यामाध्यें एक मोठा फरक आहे. तुम्ही घरीं शेत करीत असां तेव्हां त्यावर काम करायाला माणसें लावून त्यांला कामावर जा म्हणत असां. तुम्ही स्वत: त्यांवर देखरेख ठेवायाला जात नसां. माझी रीत तशी नाहीं. मी दररोज स्वतः कंबर बांधून कामावर जायाला तयार होतों, आणि माझ्या माणसांला तयार करून मजबरोबर या म्हणतों; आणि तीं काम करीत असतां त्यांच्यावर योग्य नजर ठेवून मी जातीनें त्यांच्याबरोबर मेहनत करीत असतों. ह्यामुळें तुमच्या माणसांच्या हातून काम नीट होत नसे; आणि माझीं माणसें माझ्या देखरेखीखालीं आपआपलीं कामें दक्षतेनें व जेव्हांचीं तेव्हां करीत असतात. म्हणून मला चांगली प्राप्ति होते.''

## उद्योग आणि करमणूक

दोन मुलगे एका शाळेंत जात असत. ते शेजारी होते, म्हणून ते दोघे बरोबर शाळेंत जात. त्यांतला एक मुलगा होता. तो अमळ आळशी व अल्लड होता. त्याला अभ्यास करीत बसावेंसें वाटत नसे. कांहीं तरी खेळ खेळून किंवा गोष्टी बोलून वेळ घालवावा असें त्यास वाटे. पण त्याचा सोबती तसा नव्हता. तो आपले शाळेंतले धडे पहिल्यानें मन लावून तयार करी, आणि मग वेळ मिळाला तर खेळे. त्याचा हा आळशी सोबती त्याची जेव्हांतेव्हां थट्टा करी आणि म्हणे, ''अरे, सगळा दिवस वाचीत लिहीत बसण्याचा तुली कंटाळा वाटत नाहीं काय? एवढे श्रम करण्याची काय जरूर आहे? यांत तुला काय सुख वाटत असेल तें असो. पुस्तक पाहिलें कीं माझें तर बुवा डोकें दुखायाला लागतें.'' तो उद्योगी मुलगा म्हणालाः''म्हणूनच तूं असा निर्बुद्ध राहिला आहेस. तुझ्यामागून शाळेंत आलेले मुलगे तुझ्यापुढे गेले. याची तुला लाज नाहीं वाटत?'' आळशी मुलगा म्हणाला: ''त्याची मी परवा करीत नाहीं. मला कांहीं शिकावेंसें वाटत नाहीं; आणि मी कांहीं शिकलो नाहीं तरी मी लौकरच जाणता होऊन

कसला तरी उद्योगधंदा करायाला लागेन.'' उद्योगी मुलगा म्हणाला: ''पण तूं मोठा झालास. आणि तुला कांहीं लिहितांवाचतां आलें नाहीं, तर सगळे लोक तुला हसतील, व हलका माणूस समजतील. शिवाय तुला कामही हलक्या प्रतीचें मिळून तुझी प्रतिष्ठा वाढणार नाहीं. तुला निर्बुद्धच रहावयाचें असेल तर तुझा हा उनाडपणा असाच चालूं दे. मला यांत कांहीं फायदा दिसत नाहीं. मी आपला अभ्यास मन लावून करणार, आणि माझ्या वडिलांस व इष्टमित्रांस आनंद वाटेल असें वर्तन करणार. तूं कांहीं शिकला नाहींस, तर तुझे आईबाप व सोयरींधायरीं तुजवर प्रीति करणार नाहींत. तुला पुष्कळ चांगल्या गोष्टी कळणार नाहींत. तूं चांगला व सुखी मनुष्य होणार नाहींस. तुझा कोणालाही उपयोग होणार नाहीं. तुला आपला प्रपंच नीट चालवितां येणार नाहीं. तूं कोणाला आवडणार नाहींस, आणि तूं अडचणींत किंवा संकटांत पडलास तर तुला कोणी मदत करणार नाहीं.''

हा आपल्या सोबत्याचा बोध ऐकून तो खेळाडू मुलगा म्हणाला: ''बरें आहे तर मीही तुझ्यासारखा अभ्यास करीन. पण मला पहिल्यानें थोडेंसं खेळूं दे.'' तो उद्योगी मुलगा म्हणाला: ''असें नाहीं. पहिल्यानें आपले धडे चांगले तयार कर, आणि मग हवें असल्यास खेळ. आधीं आपला उद्योग करावा आणि मग करमणूक करावी, यांतच खरें सुख आहे. आपलें काम वेळच्या वेळीं केलें नाहीं तर आपणांला बोल लागतो. तेणेंकरून आपलें मन खट्टू होतें. त्यामुळें खेळ खेळून मिळालेलें सुख सगळें नाहींसें होऊन मनाला दु:ख होतें. तर आपण आपला अभ्यास पहिल्यानें करावा हें आपलें कर्तव्य आहे. अभ्यास केल्यावर खेळायाला हवा तितका वेळ मिळतो.'' हें त्याचें बोलणें ऐकून तो आळशी मुलगा शुद्धीवर आला, आणि त्या चांगल्या सोबत्याच्या मदतीनें आपले धडे मन लावून करूं लागला.

## कार्लाइलचा ग्रंथ

कार्लाइल नांवाचा एक विख्यात ग्रंथकार इंग्लंडांत होऊन गेला. अठराव्या शतकाच्या अखेरीस फ्रान्सदेशांतल्या लोकांनीं राजसत्ता नाहींशी करून प्रजासत्ताक राज्यपद्धतीची स्थापना केली. या राज्यक्रांतीचा उत्तम इतिहास कार्लाइल यानें लिहला आहे. ह्या ग्रंथाचा कांहीं भाग लिहून झाल्यावर तो छापायास देण्यापूर्वी आपल्या एका थोर व विद्वान् मित्राला तो त्यानें वाचावयास दिला. मित्राला तो इतका आवडला कीं, तो त्याला केव्हां वाचून टाकीन असें झालें, आणि एके दिवशीं रात्र बरीच उलटून जाईपर्यंत हा हस्तलेख वाचीत तो एका आरामखुरचीवर पडला. वाचतांवाचतां त्याला

डुलकी आली, म्हणून तो लेख तेथेंच जमिनीवर ठेवून तो निजावयास गेला. सकाळीं तो उठण्यापूर्वीं घरच्या मोलकरणीनें त्याची खोली झाडून साफ केली. तिला तो हस्तलेख सांपडला; आणि तो जमिनीवर टाकिलेला पाहून तिला वाटलें कीं, हे रद्दी कागद आपल्या धन्यानें असे फेकिले आहेत. म्हणून तिनें ते उचलून इतर कागदांबरोबर शेगडींत टाकून दिले. तेथें ते साफ जळून गेले. हा गृहस्थ उठून तो लेख पुढें वाचण्यासाठीं पाहूं लागला. पण तो त्याला कोठें सांपडेना. तेव्हां ते जमिनीवरचे कागद कोठें गेले याचा तपास त्यानें केला तेव्हां त्यांची दशा काय झाली तें त्याला कळले. तें ऐकून त्याला पराकाष्ठेचें वाईट वाटलें. ही अत्यंत खेदकारक गोष्ट कार्लाइल यास सांगण्याचें त्याला धैर्य होईना. पण हस्तलेख परत पाठवून देण्याविषयीं त्यानें ह्या मित्राला तगादा लाविला. तेव्हां त्याला आपल्या हस्तलेखाचा नाश झाल्याचे कळले.

हें ऐकून त्याला अतोनात दुख झालें. इतक्या दिवसांचे आपले श्रम अशा रीतीनें व्यर्थ गेले हें पाहून तो अगदीं बेदिल झाला. त्याला कांहींएक सुचेना. तो अगदीं उदास झाला. पण त्याचें मन थोर असल्यामुळें आपल्या त्या मित्रास ह्या बाबतीत तो चकारशब्द बोलला नाहीं. तो ग्रंथ पुनः लिहून काढावा असें मनांत आणून त्यानें तो लिहावयास अनेक वेळां आरंभ केला; पण त्याला मुळीं कांहीं सुचू नये; व जें जें तो लिही, तें तें त्याच्या मनास न येऊन तें तो खोडून टाकी. त्याची चित्तवृत्ति बावरून गेल्यामुळें तो अगदी बावचळल्यासारखें करूं लागला. अशा मनाच्या वाईट स्थितीमध्यें तो एक दिवस अगदीं उदासीन व खिन्न होऊन बसला असतां, एक भव्य इमारतीचें काम चाललें होतें, त्याकडे त्याची सहज नजर गेली. तिच्या भिंती उभारण्याचें काम गौंडी करीत होते तें तो पाहत राहिला. ते विटेवर वीट रचून धिमेपणानें मोठ्या उंच भिंती घालीत होते, तें पाहून त्याच्या मनांत असा विचार आला कीं, हे कारागीर असा सतत उद्योग करून प्रचंड इमले उभारितात, तर आपणही आपल्या कामाची इमारत अशीच नेटानें व निश्चयानें कां उभारू नये? हा सुविचार मनांत येतांच त्याची वृत्ति तत्काळ प्रसन्न झाली. त्याचा सगळा उदासीनपणा निघून गेला; आणि तो मोठ्या उत्साहाने व निश्चयानें पुनः तो ग्रंथ लिहून काढण्याच्या कठीण उद्योगास लागला. ह्या त्याच्या दीर्घ प्रयत्नाच्या योगानें त्याला त्या कामांत पुरें यश आलें; आणि त्याच्या हातून तो महत्त्वाचा ग्रंथ तयार होऊन फ्रान्सदेशांतल्या राज्यक्रांतीसंबंधाच्या सगळ्या पुस्तकांत त्याला अग्रमान मिळाला.

## उद्योगाचें फळ

दोन मुलगे एका सुताराच्या कारखान्यांत काम शिकावयाला ठेविलें होते. त्यांतला

एकजण मोठा उद्योगी होता. त्याला सांगावें तें काम तो लक्षपूर्वक करी. त्यांतल्या खुब्या चांगल्या समजून घेऊन त्या तो ध्यानांत ठेवी. तो एकदां कामास लागला म्हणजे तो थोडासुद्धा वेळ व्यर्थ घालवीत नसे. किंवा हातचे काम सोडून कोणाबरोबर गोष्टी बोलत नसे. कामावरून घरीं गेल्यावर तो फावल्या वेळीं कांहींतरी वाचीत लिहीत बसे. रिकामा वेळ असा तो मुळींच घालवीत नसे. आतां त्याचा दुसरा सोबती होता, तो आळशी व बेफिकीर असे. त्याचें हातच्या कामावर मुळीं लक्ष नसे. शिवाय इकडेतिकडे रेंगाळण्यांत व गप्पा मारण्यांत त्याचा बराच वेळ जाई. कोणतेंही काम मन लावून करण्याची त्याला मुळीं सवय नसे. तो कामावरून सुटला म्हणजे दुसरे सोबती बरोबर घेऊन खेळण्याबागडण्यांत आपला वेळ तो घालवी. त्याला लिहिण्यावाचण्याचा नाद अगदीं नसे. असें दोघांच्या वर्तनांत अंतर होतें.

पुढें एके दिवशीं वर्तमानपत्रांत अशी जाहिरात आली कीं, सरकाराला एक मोठी इमारत बांधावयाची आहे; तिचा उत्तम नकाशा तयार करून पाठविणारास चारशें पौंड इनाम मिळेल. ही जाहिरात वाचून त्या उद्योगी मुलाच्या मनांत आलें कीं, आपण हा नकाशा तयार करावा. मग इमारत बांधावयाची ती कोणत्या प्रकारची असावयाला पाहिजे, अशा प्रकारच्या दुसऱ्या इमारतींची रचना कशी आहे वगैरे गोष्टींचा नीट तपास करून तो त्या कामास लागला. त्यानें फुरसतीच्या वेळीं शिल्पकलेवरील पुस्तकें वगैरे बरींच वाचून तिचा चांगला अभ्यास केला होता. यास्तव त्याला हा नकाशा तयार करितां आला. तो त्यानें पाठवून दिल्यावर कांहीं दिवसांनीं एक मोठा कामदार त्या सुताराच्या दुकानीं येऊन, ''उइल्बर फोर्स नांवाचा कोणी शिल्पी तुमच्या दुकानांत आहे काय?'' म्हणून विचारूं लागला. सुतार म्हणाला: ''ह्या नांवाचा शिल्पी तर येथें कोणी नाहीं, पण एक काम शिकणारा मुलगा मात्र ह्या नांवाचा आहे.'' कामदार म्हणाला: ''त्याला बाहेर बोलावा.'' मग तो मुलगा तेथें आला; आणि आपणच तो नकाशा तयार करून पाठविला होता, असें त्यानें सांगितल्यावर तो कामदार म्हणाला: ''तुझा नकाशा पसंत ठरून तुला ठरलेलें बक्षीस मिळणार आहे. इतकेंच नव्हे, तर तुझ्या नकाशाबरहुकूम इमारत उठवावयाचें कामही तुलाच सांगावे असा मंडळीचा विचार ठरला आहे.'' हें ऐकून त्या मुलास किती आनंद झाला असेल बरें!

त्या सुताराला तर ह्या गोष्टीचें मोठेंच नवल वाटलें. आपल्याकडे काम शिकत असलेल्या यःकश्चित् मुलाच्या अंगीं असा गुण असावा याचें त्याला आश्चर्य वाटलें. मग त्यानें त्या मुलास त्या इमारतीचें काम करावयास जाऊं दिलें. हा उइल्बर फोर्स पुढें

सगळ्या इंग्लंडांत मोठा हुशार व कुशल शिल्पी असल्याबद्दल चोहोंकडे ख्याति झाली; आणि कित्येक मोठमोठ्या व सुंदर इमारती त्याच्या हातच्या आहेत असें म्हणतात. सतत उद्योगाचें फळ मनुष्याला कधींकधीं असें उत्कृष्ट मिळतें.

## चित्रें कोरणारा मुलगा

विलायतेंत एका खेडेगांवीं एक लाकुडतोड्या रहात असे. तो गरीब असल्यामुळें त्याला आपल्या कामावर आपल्या मुलांसही न्यावें लागत असे. त्याचा एक लहान मुलगा होता, तो बापाला लाकडें तोडण्याच्या कामीं आपल्या शक्तीप्रमाणें मदत करी, आणि फावल्या वेळीं लाकडाचे लहान तुकडे कोरून त्यांच्या बाहुल्या वगैरे करी. हा खेळ खेळतांखेळतां त्यांत तो चांगला हुशार झाला. त्यानें कोरिलेलीं चित्रें त्याची आई बाजारांत नेऊन विकी.

नाताळाच्या आदल्या दिवशीं हा मुलगा आपल्या दुसऱ्या भावडांबरोबर रानांत गेला असतां, बाकीची मुलें सणाच्या दिवशीं आपलें घर शोभिवंत करण्याकरितां झाडांच्या फांद्या, फुलें, पाने वगैरे तोडण्यांत गुंतली; आणि हा मुलगा एका मोठ्या ओकझाडाच्या बुंधाशीं बसून तें कोरूं लागला. इतक्यांत त्या वाटेनें एक बडा गृहस्थ आला. तो सहल करावयास निघाला होता. तो मुलगा झाडाच्या मुळाशीं बसून काय करीत आहे हें पाहण्याकरितां त्याच्यासमोर जाऊन तो उभा राहिला. पण मुलगा आपल्या कामांत अगदीं गढून गेला होता. त्यानें त्याच्याकडे पाहिलें नाहीं. मग तो बडा गृहस्थ जवळ येऊन त्याला म्हणाला: ''मुला, हें तूं काय करीत आहेस?'' त्यानें उत्तर केलें: ''मी याचा एक कुत्रा कोरून काढीत आहें. लाकूड अंमळ कठीण आहे, तरी मी कुत्रा कोरिल्यावांचून सोडणार नाहीं.'' त्यानें पुसलें: ''तुला हें कसब कोणीं शिकविलें? आणि हें तूं किती दिवस शिकत आहेस?'' मुलानें उत्तर केलें: ''मला कोणीं शिकविलें नाहीं. माझा बाबा ह्या रानांत लाकडें तोडायाचें काम करीत असतो. त्या कामीं त्याला मी सगळा दिवस मदत करीत असतों; आणि वेळ फावला म्हणजे असला कांहीं तरी खेळ खेळत असतों. चित्रें कोरण्याचें काम एक वर्ष करीत आहे.'' त्यानें विचारिलें: ''तूं चित्रे कोरितोस त्यांचें काय करितोस?'' तो म्हणाला: ''माझी आई गरीब आहे, ती तीं बाजारांत नेऊन विकिते.''

हें असें त्या दोघांचे भाषण चाललें होतें, तरी तो मुलगा आपलें काम हातानें करीतच होता. हा असा त्याचा उद्योगीपणा व हुशारी पाहून तो गृहस्थ फार खुश झाला आणि म्हणाला: ''मुला, हें चित्र कोरिलेंस म्हणजे मजकडे घेऊन ये. त्याचे तुला मी पैसे देईन.'' असें बोलून व आपला पत्ता सांगून तो गृहस्थ पुढें चालता झाला.

असें आश्वासन मिळाल्यामुळें त्या मुलास विशेषच उत्तेजन आलें; आणि त्यानें आपलें काम मोठ्या नेटानें चालविलें. इकडे त्याचीं भावंडें फुलेंपानें जमा करून घरीं जावयास निघालीं आणि त्याला बोलावूं लागलीं. पण तो तेथून हालेना. तो म्हणाला: ''माझा कुत्रा कोरून झाल्यावांचून मी कांहीं घरीं येणार नाहीं.'' तेव्हां त्याला सोडून तीं गेलीं. त्यानें आपलें काम पुरें करून कोरिलेला कुत्रा त्या गृहस्थाकडे नेला. तो पाहून त्यानें त्याचें कौतुक केलें, आणि त्याला त्याचे कांहीं पैसे देऊन म्हटलें: ''तुझ्याकडे आणखी कांहीं अशीं चित्रें असतील तर तीं घेऊन ये. त्याचे मी तुला पैसे देतों.'' त्यावरून त्या मुलानें त्याला आणखी कांहीं चित्रें नेऊन दिलीं. मग त्याची अशी हुशारी पाहून त्या गृहस्थानें त्याच्या बापाला बोलावून आणून सांगितलें कीं, ''तुझा मुलगा चांगला कारागीर होण्याजोगा आहे. त्याला मीं एका हुशार कारागिराकडे शिकावयास ठेवण्याचें योजिलें आहे. तर त्याला तुझी संमति असावी.'' तें ऐकून तो गरीब मनुष्य आनंद पावून त्याच्या म्हणण्यास कबूल झाला. मग तो मुलगा त्या गृहस्थाच्या खर्चानें शिकून त्या कलेंत निपुण झाला; आणि लाकडाचें कोरीव काम करण्याच्या कसबांत त्याचा हात धरणारा सगळ्या देशांत कोणी राहिला नाहीं.

## खिळे करण्याचें यंत्र

सतराव्या शतकाच्या अखेरीस इंग्लंडांत खिळे करण्याचें यंत्र निघाले नव्हतें; म्हणून ते हातांनीं करावे लागत. स्टोअरब्रिज नांवाच्या शहरांत एका लोहाराचा खिळे करण्याचा कारखाना होता. ह्या कारखान्यांत जवळच्या खेड्यांतल्या एका गरीब शेतकऱ्याचा मुलगा काम शिकायाला जात असे. हा मुलगा मोठा उद्योगी होता. त्या कारखान्यांत राहून तो तेथलें सगळें काम लक्ष लावून शिकला, व त्यांत चांगला तरबेज झाला. या कलेशिवाय त्याला आणखी सारंगी वाजविण्याचें कसब चांगलें साधलें होतें. फावल्या वेळीं तो सारंगीवर गाणीं गाऊन मोठमोठ्या रसिक लोकांला रिझवी आणि त्यांच्याकडून पैसे मिळवी. या सारंगीच्या कसबामुळें तो तेथल्या सगळ्या लोकांस फार प्रिय झाला.

पुढें त्या लोहाराचा धंदा अगदीं बसण्याच्या लागास आला. त्यानें आपल्या कारखान्यांतल्या सगळ्या कामकऱ्यांस एके ठिकाणीं जमवून सांगितलें कीं, ''आपला धंदा चालण्यासारखा नाहीं; तरी तुम्ही दुसरें कांहीं तरी काम पाहा. मला हा कारखाना बंद करण्याची पाळी येणार आहे.'' हें त्याचें निराशेचें बोलणे ऐकून तो सारंग्या कामकरी त्यास म्हणाला: ''आपल्या धंद्यास बरकत नसण्याचें कारण काय असावें बरें?'' लोहार म्हणाला: ''स्विडन देशांत खिळे करण्याचीं यंत्रे निघाली आहेत.

त्यामुळें तेथल्या कारखानदारांला थोड्या श्रमानें पुष्कळ खिळे तयार करून आमच्याहून स्वस्त दरानें विकितां येतात. म्हणून आमच्या खिळ्यांला गिऱ्हाईक नाहींसें झालें आहे.'' सारंग्यानें विचारिलें: ''आमच्या इकडे तसलीं यंत्रे कां होऊं नयेत बरें? आमचे लोक एवढे हुशार व कसबी असतां त्यांला तसलीं यंत्रे तयार करितां येऊं नयेत?'' लोहार म्हणाला: ''तीं यंत्रें कसलीं आहेत हें येथें कोणालाही माहीत नाहीं. तीं पाहायासाठीं कित्येकजण त्या देशीं गेले होते. परंतु तेथल्या कारागिरांनीं तीं त्यांला दाखविलीं नाहींत. त्यांनीं ती आपली युक्ती अगदीं गुप्त ठेविली आहे. ती कळण्याचा मार्ग मुळीं नाहीं.''

हे त्याचे निराशेचे शब्द ऐकिल्यावर कांहीं दिवसांनीं हा सारंग्या कामकरी स्विडन देशास गेला. त्याच्याजवळ वाटखर्चाला पैसे नव्हते. तरीं वाटेनें जातांजातां प्रत्येक गांवांत जाऊन तो तेथल्या लोकांस सारंगी वाजवून दाखवी, आणि त्यांच्याकडून जे कांहीं मिळे त्यावर निर्वाह करी. असा फिरतफिरत तो हलशहरीं गेला. तेथून एक जहाज स्विडनास जावयास निघालें होतें. त्याच्या कप्तानास भेटून त्यानें अशी विनंती केली कीं, ''मला स्विडनदेशापर्यंत घेऊन चला. नोरापुरते पैसे मजपाशीं नाहींत. तरी मला होण्यासारखें जहाजावरचें वाटेल तें काम सांगा. मी तें मन लावून करीन.'' त्या कप्तानानें ती त्याची विनंती मान्य केली. ह्याप्रमाणें स्विडनची राजधानी स्टॉकहोम येथें तो जाऊन पोंचला. तेथें तो सारंगी वाजवून लोकांस करमणूक करूं लागला. तेव्हां त्याच्या त्या कसबाला मोहित होऊन ते लोक त्याला फार चाहूं लागले. मग तेथल्या लोखंडाच्या कारखान्यांतल्या लोकांशीं ओळख करून त्यांला तो आपलें कसब दाखवूं लागला. त्या लोकांला तो प्यारा होऊन ते त्याला आपल्या कारखान्यांत बिनदिक्कत बोलावून त्याची सारंगी ऐकूं लागले. तेव्हां त्याला त्यांचें खिळे पाडण्याचें यंत्र यथेच्छ पाहायास मिळूं लागलें. ते कामकरी त्याला तेथें नित्य बोलावीत. आणि तो त्यांच्याकडे जायाला मुळीं चुकत नसे. अशा रीतीनें त्या अपूर्व यंत्राची सगळी घटना लक्षांत घेऊन तो स्वदेशीं आला. येतांनासुद्धां त्याला एका इंग्रज कप्तानाशीं पूर्वीप्रमाणें बोली करावी लागली. स्वदेशीं आल्यावर तो स्टोअरब्रिज येथील आपल्या धन्याकडे गेला; आणि आपण त्या यंत्राची माहिती कशी मिळविली तें त्याला त्यानें सांगितलें. मग त्या लोहारानें त्याच्या सांगण्याप्रमाणें एक यंत्र तयार केलें. पण त्यांत कांहीं दोष राहिल्यामुळें तें चालेना. तेव्हां त्या कारखान्यांतल्या लोकांनी त्याची टेर उडविली. ही अशी त्याची युक्ती फसली तरी तो निराश झाला नाहीं. पुनः स्टॉकहोम येथें जाऊन तें यंत्र पाहून येण्याचा त्यानें निर्धार केला; आणि पूर्वींसारखाच तो तिकडे

गेला. त्याला पाहून त्या कारखान्यांतल्या लोकांस मोठा हर्ष झाला; आणि त्याची सारंगी ऐकण्यास आतुर होऊन ते त्याला आपल्या कारखान्यांत दररोज बोलावूं लागले. ह्याप्रमाणें त्याला तें यंत्र पुनरपि विशेष बारकाईनें पाहावयाची संधि मिळाली. नंतर तो परत आपल्या गांवीं आला; आणि पूर्वी तयार केलेल्या यंत्रांत जें कांहीं चुकलें होतें, तें नीट करून त्याने तें चालवून दाखविले. तेव्हां अर्थात् त्याची वाहवा झाली; आणि त्या लोहारानें त्याला आपला भागीदार करून खिळे पाडण्याचा धंदा मोठ्या जारीनें चालविला. त्यांत त्यांला पुष्कळ किफायत झाली; आणि तो गरीब शेतकऱ्याचा मुलगा लौकरच मोठा सधन झाला.

## पांढरी चिमणी

जर्मनींत एक शेतकरी होता. त्याची वतनवाडी मोठी होती. तरी त्याला नेहमीं ओढगस्त असे. त्याचें उत्पन्न त्याच्या कुटुंबाला पुरत नसे. त्यामुळें त्याला कर्ज झालें होतें. सावकार त्याला देण्यासाठी नेहमी तगादा लावीत. त्यामुळे तो अगदीं टेकीस आला. त्याचे मित्र त्याला म्हणत कीं, ''तूं आपल्या वतनाची व्यवस्था नीट लाविशील तर तुझी ददात सहज नाहींशी होईल.'' पण तो जात्या आळशी असल्यामुळें त्याला कसलीच दगदग करवत नसे. आपलें सगळें काम तो चाकरमाणसांवर सोपवून स्वत: आयदीपणांत काळ घालवी. त्याच्या मित्रांनीं त्याला पुष्कळ सांगून पाहिलें: पण त्याचा क्रम कांहीं केल्या बदलेना. तेव्हां त्यांनीं त्याला बोलायाचें सोडून दिलें.

ह्या शेतकऱ्याचा एक जिवलग मित्र होता. त्यानें त्याला सुधारण्याची एक चांगली युक्ती योजिली. ती अशी:- एके दिवशीं तो त्याच्याकडे येऊन चिमण्यांविषयी सहज बोलूं लागला. त्या पक्ष्यांचे गुण तो वर्णूं लागला. तें ऐकून शेतकरी म्हणाला: ''चिमण्यांची तुम्ही वाखाणणी करितां खरी, पण त्या माझ्या शेताची नेहमीं नासाडी करितात; त्यामुळें मला फार थोडें उत्पन्न मिळतें.'' ह्या त्याच्या म्हणण्यावर कांहींएक न बोलतां तो मित्र आणखी म्हणाला: ''तूं पांढरी चिमणी पाहिली आहेस काय? अशी चिमणी वर्षांतून एकादीदुसरी पैदा होते. तिला पाहून दुसऱ्या चिमण्या तिच्यावर झडप घालून तिला ठार मारण्याचा प्रयत्न करितात. म्हणून ती प्रातःकाळी सगळ्यांच्या अगोदर घरट्याबाहेर पडून दाणा टिपून दुसऱ्या चिमण्या बाहेर पडण्यापूर्वी आपल्या घरट्यांत जाऊन बसते. तेथें ती सगळा दिवस लपून राहते.'' शेतकरी म्हणाला: ''तूं कांहीं तरी सांगत आहेस. मीं अद्यापि पांढरी चिमणी अशी मुळीं पाहिली नाहीं.'' मित्र म्हणाला: ''ती तुला दिसेल कशी? तूं आधीं सकाळीं लौकर उठत नाहींस; आणि उठलास तरी घराबाहेर पडून आपल्या शेतवाडीवर कधीं फिरायास जात नाहींस.''

हें त्या मित्राचें म्हणणें खरें वाटून त्यानें असा बेत केला कीं, सकाळीं लौकर उठून आपल्या शेतवाडीवर फिरायास जावयाचें, आणि पांढरी चिमणी कसली असते ती पाहावयाची. ह्या निश्चयाप्रमाणे तो दुसरे दिवशीं सकाळी लौकर उठून शेतावर गेला; आणि पांढरी चिमणी पाहूं लागला. त्यानें झाडांपेडांतून हिंडून तिचा शोध केला; पण ती त्याला कोठे आढळेना.

अशा नादानें शेतांतून व वाडींतून फिरतां फिरतां दिवस बराच वर आला. पण त्यांत काम करायाला नेमिलेलीं माणसे कोणीच आलीं नाहींत हें त्याच्या नजरेस आलें. तेव्हां तो त्यांच्यावर फार रागावला. इतक्यांत मांगराच्या मागल्या दारानें त्याचा एक नोकर कांहीं बोजा घेऊन बाहेर जाताना त्याच्या दृष्टीला पडला. तेव्हां त्याला हाक मारून त्यानें पुसले, ''रे, तें काय घेऊन चालला आहेस? थांब, मला दाखीव काय तें.'' मग त्याच्या पाठीवरचा तो बोजा त्यानें पाहिला. तो गव्हांचा असून तो नोकर दारूच्या दुकानांत तो घेऊन चालला होता असें त्याला आढळून आलें. ही अशी चोरी केल्याबद्दल त्यानें त्या नोकरास तत्काळ कामावरून दूर केलें. मग तो तडफडत गोठ्याच्या बाजूला गेला, तों गाईचें दूध काढण्यासाठीं ठेविलेली मोलकरीण दुधानें भरलेलें एक भांडें बारीवाटे एका परक्या बाईच्या डोकीवर चढवीत आहे असें त्याच्या नजरेस आलें. ही चोरी पाहून तर तो अधिकच संतापला. मग तो तेथून तडक आपल्या घरीं गेला, आणि बायको अजून बिछान्यावर घोरत पडली होती, तिला जागी करून म्हणाला: ''आमच्या घरीं सगळीच अंदाधुंद आहे. चाकरमाणसें आपलें काम वेळच्या वेळीं व प्रामाणिकपणानें करीत नाहींत, अशी आज माझी पक्की खात्री झाली आहे. ही अंदाधुंद मोडिली पाहिजे. मीं तर आजपासून असा निर्धार केला आहे कीं, आजच्याप्रमाणें दररोज पहाटेस उठून शेतवाडीवर जावें, आणि चाकरमाणसें कसें काम करीत असतात तें सगळा वेळ पहात रहावें; तसेंच जे कोणी नीट इमानानें काम करणार नाहींत, त्यांला काढून टाकून दुसरी चांगलीं माणसें ठेवावीं.

ह्या निर्धाराप्रमाणें तो शेतकरी दररोज पहाटेस उठून आपल्या शेतांत व वाडींत हिंडून जातीनें देखरेख करूं लागला. त्यामुळें त्याची सगळी चाकरमाणसें विशेष काळजीने व हुशारीने आपली नेमिलेलीं कामे करूं लागलीं. अशा त्याच्या देखरेखीमुळें त्याचें सगळें काम चोख व वेळच्यावेळीं होऊं लागलें, आणि त्याचें उत्पन्नही बरेंच वाढलें. त्यामुळें त्याची ददात साफ मिटून त्याची सगळी काळजी दूर झाली. त्याप्रमाणें त्याच्या मित्रानें पांढरी चिमणी पाहण्याचा नाद त्याला लावून मोठ्या खुबीनें वाटेवर आणिलें.

❒❒❒

### भाग सातवा

# दीर्घ प्रयत्न

## पक्ष्याचा प्रयत्न

एका मोठ्या शहरांतल्या एका वाटग्यांत एक लहान पक्षी घरटे बांधण्याच्या कामांत गुंतला होता. घरट्याकरितां काड्या, धागे वगैरे गोळा करण्यासाठीं चोहोंकडे भराऱ्या मारीत असतां त्यानें एका जुन्या घरट्यांतून लोंबत असलेला एक धागा पाहिला. तेव्हां तो काढावा म्हणून त्यानें खटपट चालविली. तो चोचीत धरून मोठ्या जोराने त्याला तो हिसके देऊं लागला. पण तो कांहीं केल्या निघेना. तो घरट्यांत गुरफटून गेला होता. त्याचें एक शेवट चोंचींत मजबूत धरून त्यानें खालीं उडी घालून पाहिलें, तरी तो सुटेना किंवा तुटेना. ही युक्ती त्यानें पुनःपुनः करून पाहिली, पण कांहीं जमेना. असें झालें तरी तो निराश झाला नाहीं. सगळे उपाय हरले तेव्हां तो त्या घरट्यांत शिरला, आणि तो धागा आतून सोडवूं लागला. असा उद्योग त्यानें बराच वेळ केल्यावर त्याला त्यांत यश आलें, आणि त्या निश्चयी पक्ष्यानें तो मोठ्या हर्षाने तोंडांत धरून आपल्या नव्या घरट्याकडे भरारी मारिली. एक युक्ती अनेक वेळां करून हरली, तर दुसरी योजावी, आणि तीही हरली तर तिसरी योजावी; पण मनांत योजिलेलें काम तडीस नेल्यावांचून सोडूं नये, असा निर्धार करावा, ही गोष्ट ह्या लहान पक्ष्याच्या वर्तनावरून लक्षांत घ्यावी.

## यत्न सोडूं नको

एके समयीं एक गृहस्थ रस्त्यानें चालला असतां त्याच्या कानीं कांहीं गोंगाट आला. तो कसला आहे हें पाहतां, जवळच एक शाळा होती ती त्याच्या नजरेस पडली. तेव्हां ती पाहावी म्हणून तो सहज तींत गेला. तेथल्या एका वर्गातली मुले धडे पाठ करीत असलेलीं त्याला दिसलीं; आणि त्यांपैकीं एक मुलगा वर्गांत एके बाजूस

उभा राहिला होता, त्याच्याकडे त्याची दृष्टि गेली. तो मुलगा अगदीं खिन्न व उदास दिसला. त्या गृहस्थानें शिक्षकाला विचारिलें: ''तो मुलगा असा एकीकडे कां उभा आहे? आणि तो खट्टू कां दिसतो?'' शिक्षकानें उत्तर केलें: ''तो अगदीं मंद आहे. त्याला धडा होत नाहीं म्हणून असा उभा केला आहे. तो अगदीं निरुपयोगी आहे. त्याला विद्या होणार नाहीं.'' हें ऐकून त्या गृहस्थास फार वाईट वाटलें. पहिल्यानें त्या सगळ्या मुलांस उद्देशून दोन ममतेचे शब्द तो बोलला, आणि मग त्या मंद मुलाकडे जाऊन व त्याच्या मस्तकावर मोठ्या ममतेनें हात ठेवून म्हणाला: 'माझ्या बाळा, निराश होऊं नको आणि खेद करूं नको. तूं नेटानें उद्योग कर. यत्न सोडूं नको. धडा पाठ होईपर्यंत तो सारखा करीत रहा. तूं निश्चयानें उद्योग करिशील तर तूं हुशार विद्यार्थी होशील, आणि चांगला विद्वान् निपजशील.''

हे त्याचे ममतेचे व उमेदीचे शब्द ऐकून त्या मुलाच्या मनाचा एकदम पालट झाला. आळस सोडून देऊन नेटानें उद्योग करीत रहावें असा त्यानें तेव्हांपासून निश्चय केला; आणि त्याप्रमाणें वागून तो पुढें खरोखरीच मोठा विद्वान् पुरुष झाला.

## इटालियन चितारी

इटालीदेशांतल्या एका अतिविख्यात चिताऱ्याकडे एक मुलगा चित्रकला शिकावयासाठीं येऊन राहिला. ह्या मुलाचे ह्या कलेकडे मुळापासून चांगलें लक्ष होतें. म्हणून त्याच्या बापानें त्याला त्या कुशल कारागिराकडे नेऊन ठेविलें. पुढें हा मुलगा त्या कलेंत चांगला प्रवीण झाला, आणि त्याची चोहोंकडे बरीच वाहवा झाली. त्याच्या गुरूचाही त्याजवर पराकाष्ठेचा लोभ जडला. ह्या गुरूची एक मुलगी होती, तिचें व ह्या तरुण कारागीराचें प्रेम जडलें. मग तिच्याशीं विवाह करण्याचें मनांत आणून त्यानें आपल्या गुरूची त्याविषयीं परवानगी मागितली. तो गुरु म्हणालाः ''माझ्या बाळा, तूं आपल्या कलेंत माझ्याइतका निष्णात झालास म्हणजे माझ्या मुलीशीं लग्न करण्यास मी तुला खुषीनें संमति देईन.'' हें आपल्या गुरूचें वचन ऐकून तो पूर्वींपेक्षां अधिक नेटानें स्वकलेचा अभ्यास करूं लागला. असा सतत उद्योग करून तो त्या कलेंत विशेष प्रवीण झाला. मग आपल्या अंगीं किती प्रवीणता आली आहे हें आपल्या गुरूस दाखविण्याची त्यानें पुढील युक्ती योजिली. त्याचा गुरु एक मोठी छबी तयार करीत होता. तिच्या नाकावर त्यानें माशीची आकृति काढून ठेविली. गुरु त्या चित्राशीं काम करावयास येऊन पाहतो तो त्याच्या नाकावर जीवंत माशी बसल्याचा भास त्याला झाला, आणि ती तो झाडून टाकूं लागला. पण ती कसची

जाते! तेव्हां त्याला झालेल्या भ्रमाचा उलगडा होऊन ती अशी हुबेहूब माशी काढिल्याबद्दल त्यानें त्या आपल्या शिष्याची तारीफ केली आणि म्हटलें: ''तूं दीर्घ परिश्रम करून माझ्याइतका कुशल झाला आहेस यांत कांहीं शंका नाहीं; तर आतां तूं माझा जांवई होण्यास सर्वथा लायक आहेस.''

## रॉबर्ट ब्रूस आणि कोळी

रॉबर्ट ब्रूस हा प्राचीन काळीं स्कॉटलंडदेशाचा राजा होता. हा इंग्लंडच्या राजाचा मांडलिक होता. पण इंग्लंडच्या पहिल्या एडवर्ड राजाच्या मनांत दुसऱ्याच मनुष्यास स्कॉटलंडच्या गादीवर बसवावे असें आलें. त्यामुळें रॉबर्टला आपल्या हक्काच्या रक्षणासाठीं इंग्लंडच्या राजाशीं लढाई करावी लागली. तींत त्याचा पहिल्यानें अगदीं मोड होऊन तो जेरीस आला. तेव्हां तो निराश होऊन एका झोंपडींत लवंडला आणि पुढें काय करावें ह्या विचारांत गढून गेला. त्याला ह्या वेळीं असें वाटूं लागलें होतें कीं, आपला शत्रु प्रबळ आहे; त्याच्यापुढें आपला निभाव लागावयाचा नाहीं; तरी आपण आपल्या गादीची आशा सोडून कोठें तरी दडून राहून दिवस काढावे. इतक्यांत एक कोळी कडीपाटावरून खालीं भुईवर पडतांना त्याच्या दृष्टीस पडला. त्या कडीपाटापाशीं त्या प्राण्याचे जाळें होतें. तेथें तो आतां कसा जातो हें तो राजा पाहूं लागला. कोळी एका तणाव्यासकट खालीं आला होता. त्याच्या आधारानें तो वर चढूं लागला. थोडासा वर गेला नाहीं तों तो पुनः खालीं पडला. पण तो निराश न होतां पुन: वर चढूं लागला; आणि पुनरपि खालीं आला. असा वर चढण्याचा प्रयत्न त्यानें नऊ वेळां केला. दरखेपेस तो अधिकाधिक उंचीवर जाऊन खालीं कोसळे. दहाव्या खेपेस तो एकदाचा आपल्या जाळ्यांत जाऊन पोंचला. हा त्या कीटकाचा दीर्घ प्रयत्न पाहून त्या राजाला नवा हुरूप आला. तो आपल्या मनाशीं म्हणाला: ''हा असा अतिक्षुद्र प्राणी जर पुनःपुनः प्रयत्न करून शेवटीं आपल्या ठिकाणीं सुखरूप जाऊन पोंचला, तर मी विचारी मनुष्यानें हिंमत सोडून असें हातपाय गाळून व निराश होऊन बसावें हें योग्य नाहीं. आपणही पुन: नेटाचा प्रयत्न करावा.'' असा निश्चय करून त्यानें चोहोंकडे पांगलेले आपले लोक पुन: एकवट करून शत्रूशीं मोठ्या नेटाचा सामना केला; आणि त्यांत त्याला अखेरीस यश आलें.

## दृढ निश्चय

फ्रान्सदेशांत बर्नार्ड पालिसी नांवाचा एक मोठा शोधक गृहस्थ होऊन गेला. त्याचे आईबाप अतिशयित गरीब होते, इतके कीं त्यांला त्या मुलास शाळेंत पाठवून

शिकविण्याचें सामर्थ्य नव्हतें. पण त्याला समजूं लागलें तेव्हां तो स्वतांच्या प्रयत्नानें थोडेंसें लिहिणेंवाचणें शिकला; व त्यानें चित्रकलेचाही थोडासा अभ्यास केला. मग तो कांचेवर चित्रें वगैरे रंगविण्याचा उद्योग करून आपला निर्वाह चालवूं लागला. पुढें त्याचें लक्ष चिनीमातीच्या भांड्यांवर मिना चढविण्याच्या कलेकडे गेलें. ही कला आपण शिकावी असा त्यानें निश्चय केला. मग तो नाना प्रकारचे रांधे तयार करून, ते मातीच्या भांड्यांवर लावून, तीं भट्टीत घालून भाजूं लागला. पण त्याला यश येईना. भट्ट्या पेटवून त्यांत रांधा चढविलेलीं भांडीं भाजण्याखालीं त्याच्या जवळचें सगळे द्रव्य खलास झालें. रात्रंदिवस भट्टीपाशीं तापून व जागून त्याची प्रकृति अगदीं बिघडली. तो फार रोड झाला. तरी पण त्यानें आपला प्रयत्न सोडिला नाहीं. ह्या नादांत त्याची सगळी पुंजी संपली; तेव्हां त्यानें आपला नेहमींचा धंदा विशेष उत्साहानें व एकसारखा करून पुनः थोडासा पैसा जमविला, आणि भट्टीसाठीं लागणारें बरेंच सरपण त्यानें सांठविलें. ह्याप्रमाणें भट्टी पेटविण्याची सोय होतांच त्यानें आपले प्रयोग फिरून सुरू केले. पुन: पुन: भट्टी पेटवून त्यानें रांधा कढवून तो भांड्यांवर चढविण्याचा प्रयत्न केला. पण त्यांत यश म्हणून येईना. त्यानें गोळा केलेलें सरपण व रांध्याचीं द्रव्यें संपत आली. तेव्हां तो अगदीं निराश होण्याच्या लागास आला. पण पुन: एकवार धैर्य करून, आणखी एक प्रयोग करून पाहण्याचा त्यांने निर्धार केला. रांधा तयार करून तो भट्टींत घालून तीपाशीं तो नेटानें बसून राहिला. ह्या वेळीं त्याच्याजवळचें सगळें सरपण खलास झालें. तेव्हां त्यानें जवळपास जें कांहीं लाकूडसामान होतें तें फोडूनतोडून भट्टींत घातलें. त्याचा ह्या वेळीं असा बेत झाला होता कीं, भट्टी साधेल तितका वेळ चांगली पेटत ठेवून पाहावयाचें. शेवटीं सगळीं लाकडेंबिकडें खलास झाल्यावर त्यानें घरांतल्या खुरच्या, मेजें, कबाटें, पेट्या वगैरे सामान फोडून भट्टींत टाकण्याची सुरुवात केली. ती त्याची कृति पाहून त्याचीं बायकोमुलें अगदीं घाबरून गेलीं. त्याला वेड लागलें आहे असें त्यांला वाटलें. तीं आरडाओरड करीत घराबाहेर पळून गेलीं. पण त्यांच्याकडे अगदीं दुर्लक्ष करून त्यानें आपला क्रम चालू ठेविला. ह्याप्रमाणें घरांतलें सगळें लाकूडसामान त्यानें भट्टींत टाकिलें. ह्या त्याच्या अत्यंत निग्रहाच्या व निश्चयाच्या प्रयत्नाचें फळ त्याला ह्या वेळीं आलें. मिन्याचा रांधा कढून तो भांड्यांवर चांगला चढला. कारण त्याला हवी तितकी आंच मिळाल्यामुळे तो चांगला कढला. ह्या अशा दीर्घ प्रयत्नाअंतीं त्याला जय मिळाला तेव्हां तो आनंदानें नाचूं लागला. घरांतलें सामान जळून गेल्याचें त्याला कांहींच वाटलें नाहीं. ही जी भांड्यांवर मिना चढविण्याची युक्ती त्यानें काढिली, ती त्याच्या नांवानें आज प्रसिद्ध आहे.

## मुलगा आणि गोगलगाय

एक मुलगा एके दिवशीं हातीं पुस्तक घेऊन आपल्या ओटीवर बसला होता. त्याची मुद्रा खिन्न होती आणि डोळे आसवांनीं भरले होते. इतक्यांत त्याची आई तेथें आली. त्याचें तें रडवें तोंड पाहून त्याला तिनें विचारिलें: ''तूं असा खट्टू कां दिसतोस? तुला कोणी कांहीं बोललें काय?'' तो म्हणालाः 'आई, आम्हांला शिक्षकांनीं एक कविता पाठ करायाला दिली आहे. ती फार कठीण आहे. ती जो चांगली म्हणेल त्याला ते इनाम देणार आहेत. मला ती पाठ होईलसें वाटत नाहीं. माझ्या वर्गांतले मुलगेही म्हणतात कीं, मी मंद आहें; मला ती मुळीं व्हावयाची नाहीं. इनाम मिळविण्याची तर मला आशा नाहींच. पण ती पाठ करावी अशी माझी इच्छा आहे.'' हें त्याचें बोलणें ऐकून आई म्हणाली: ''बाळा, तूं असा निराश होऊं नको. तुझ्या सोबत्यांचें बोलणें तूं मनास आणूं नको. तूं मंद असलास तरी नेटानें उद्योग केलास तर तुला ती पाठ व्हावयाला मुळीं हरकत नाहीं. तुझा निश्चय कायम ठेव, आणि ती दररोज थोडीथोडी पाठ कर. ही पाहा गोगलगाय. ही भिंतीवर चढत आहे. हिची गति अगदी मंद आहे. पण ही भिंतीच्या शेंड्याला जाऊन खात्रीनें पोंचणार आहे. तर हिजकडे लक्ष ठेवून तूं आपली कविता कर. हुशार मुलांना ती लौकर पाठ होईल; आणि तूं मंद आहेस तर तुला ती उशिरां पाठ होईल. पण केव्हां ना केव्हां ती पाठ झाल्यावांचून रहाणार नाहीं. तर निराश होऊं नको. ती पाठ करायाला लाग.''

हे त्या प्रेमळ आईचे शब्द ऐकून त्या मुलास उमेद आली; आणि त्यानें ती कविता पाठ करण्यास आरंभ केला. ती गोगलगाय भिंतीच्या शेंड्याला जाऊन पोंचेपर्यंत आपली कविता पाठ करून टाकावयाची असा त्यानें निश्चय केला. हा त्याचा निश्चय शेवटास गेला. पुढें कविता पाठ म्हणून घेण्याचा दिवस आला. शिक्षक एकाएका मुलास ती पाठ म्हणावयास सांगूं लागला. कांहीं मुलांनी ती म्हटल्यावर त्या मंद मुलाची पाळी आली. तो ती पाठ म्हणावयास उठला तेव्हां सगळे मुलगे हसले. कारण त्यांला ठाऊक होते कीं, त्याला ती म्हणतां यावयाची नाहीं. पण त्यांच्या हसण्याकडे लक्ष न देता त्यानें ती बिनचूक म्हटली. मग उरलेल्या मुलांची ती म्हणून घेतल्यावर शिक्षक म्हणाला: ''ह्या मुलास आपण मंद म्हणत होतों. पण ह्यानें ही कविता सगळ्यांपेक्षा चांगली म्हटली आहे, म्हणून ह्याला मी इनाम देणार.'' असें सांगून त्यानें त्या मंद मुलास पुसलें: ''मुला, तूं ही कविता इतकी चांगली पाठ कशी केलीस?'' त्यानें उत्तर केलें: ''गुरुजी, मला ती अशी पाठ करावयास भिंतीवरील गोगलगाईनें

शिकविलें. माझ्या आईने मला भिंतीवर चढत असलेली गोगलगाय दाखवून सांगितलें कीं, तिची गति अतिमंद आहे, तरी ती भिंतीवर चढून जाणार. तेव्हां मी निश्चयानें व नेटाने पाठ करीत राहिलों. तर मलाही ही कविता खात्रीनें पाठ होईल. ह्या तिच्या सांगण्याप्रमाणें मीं प्रयत्न केला; आणि ती गोगलगाय भिंतीच्या वरल्या भागीं जाऊन पोंचते तों माझी कविता पाठ झाली.''

## पुनः यत्न कर

एक मुलगा शाळेंतला धडा पाठ करीत बसला असतां अमळशानें कंटाळून पुस्तक खालीं ठेवून कागदाचा पतंग करीत बसला. त्याचा बाप जवळच होता, त्यानें त्याला विचारिलें: ''मुला, तुझा तो धडा झाला काय?'' त्यानें उत्तर केलें: ''नाहीं, बाबा; धडा फार कठीण आहे. मला तो पाठ व्हावयाचा नाहीं. माझी स्मरणशक्ति फार कमी आहे. मीं तो पाठ केला तरी मला तो आठवायाचा नाहीं.'' बाप म्हणाला: ''मुला, तुझी ही सबब बरोबर नाहीं. तूं प्रयत्न करिशील तर तुला तो खचीत पाठ होईल. दुसऱ्यांला जर तो पाठ होईल, तर तुलाच तो कां होऊं नये?'' मुलगा म्हणाला: ''मीं यत्न केला, तो तूं पाहिला नाहीं काय?'' बाप म्हणाला: ''मुला, पुनः यत्न कर; असा निराश होऊं नको. तूं नेटाने व मनापासून यत्न करिशील तर तुला तो खात्रीने पाठ होईल. ह्यासंबंधाची तुला मी एक गोष्ट सांगतों, ती ऐक:

''तीस वर्षांपूर्वीं एका खेड्यांतल्या शाळेंतला एक मंद मुलगा आपला धडा पाठ म्हणण्यासाठीं शिक्षकाकडे गेला. पण त्याला तो येईना. तेव्हां शिक्षकानें त्याला रागावून म्हटले: 'नीघ येथून! आपल्या जागेवर जाऊन बस. तूं आपले धडे लक्ष लावून शिकणार नाहींस तर तूं अगदीं कुचकामाचा होशील.' हे शब्द ऐकून तो मुलगा खिन्न झाला आणि आपल्या जागेवर हळूच चोरासारखा जाऊन बसला. मग तो पुनः खालीं मान घालून धडा करूं लागला. पण तो होणार नाहींसें वाटून त्यानें आपल्या शेजारच्या मुलास हळूच म्हटलें: 'मला हा मुळीं पाठ व्हावयाचा नाहीं. तर आणखी प्रयत्न करण्यांत कांहीं हाशील दिसत नाहीं.' ते त्याचे निराशेचे शब्द ऐकून तो मुलगा म्हणाला, 'अरे, असा नाउमेद होऊंनको. पुनः मनापासून प्रयत्न कर. तो तूं झटून पाठ केलास तर तुला तो खात्रीनें होईल.'

हे त्याचे उमेदीचे शब्द ऐकून त्या मुलास पुनः हुरूप आला, आणि त्यानें आणखी एक वेळ मोठ्या नेटानें प्रयत्न केला. तो सिद्धीस जाऊन त्याचा सगळा धडा पाठ झाला; आणि शिक्षकाकडे जाऊन त्यानें तो बिनचूक पाठ म्हणून दाखविला. तेव्हां

शिक्षकाला त्याबद्दल मोठा संतोष झाला. त्या वेळेपासून तो मुलगा आपले धडे मनापासून शिकूं लागला. आणि त्याला मंद हें विशेषण मिळालें होतें तें जाऊन तो वर्गातल्या हुशार मुलांत मोडूं लागला. पुढें तो मोठा विद्वान होऊन चांगल्या योग्यतेस चढला; आणि आजन्म विद्याव्यासंगांत गुंतून राहिला. तोच आज आपल्या मुलास सांगत आहे कीं, यत्न सोडूं नको. एक यत्न फसला तर पुन:पुन: यत्न करून आपलें हातीं घेतलेलें काम सिद्धीस नेण्याचा निर्धार कर.''

बापाने ह्याप्रमाणें गोष्ट संपविली तेव्हां त्या मुलानें विचारिलें: ''बाबा, तो मंद मुलगा म्हणजे तुम्हीच काय?'' बाप म्हणाला: ''होय, मुला, तो मीच बरें. तर आतां तूं माझ्याप्रमाणें झटून मेहनत करिशील तर तुला कोणताही धडा किंवा उद्योग कठीण जाणार नाहीं.'' बापाचा हा स्वतांचा अनुभव ऐकून तो मुलगा तेव्हांपासून विशेष उत्साहानें व नेटानें विद्याभ्यास करून त्याच्यासारखा हुशार व मान्य झाला.

## रिचर्ड आर्कराइट

कापसाच्या गिरण्यांत सूत काढण्याचें यंत्र असतें, तें पहिल्यानें रिचर्ड आर्कराइट याने प्रचारांत आणिलें. हा एका गरीब कुटुंबातला होता. त्याला शिक्षण अगदीं बेताचे मिळाले होतें. घरची पराकाष्ठेची गरिबी असल्यामुळें त्याला लहान वयांतच पोटाचा कांहीं तरी उद्योग पहावा लागला. त्यानें पहिल्यानें हजामत करण्याचा धंदा पतकरिला. त्यांत त्याला म्हणण्यासारखे गिऱ्हाईक मिळतना, म्हणून त्यानें हजामतीचा दर कमी केला. तेव्हां त्याला बरेच गिऱ्हाईक मिळूं लागले. ह्यामुळें त्याच्या धंद्यांतल्या दुसऱ्या लोकांला त्याचा मनस्वी राग येऊन ते त्याची निर्भर्त्सना व निंदा करूं लागले. पण त्यानें आपला क्रम सोडिला नाहीं. त्यामुळें त्यांलाही आपले दर त्याच्याइतके करावे लागले. तेव्हां त्यानें ते आणखी कमी केले. अशी चढाओढ त्या धंद्यांत त्यानें कित्येक वर्षे केली. पण त्यांत कांहीं फायदा नाहीं असें पाहून त्यानें केश विकण्याचा धंदा पतकरिला. तो त्यानें बरीच वर्षे चालविला, व त्यात त्याला बराच पैसा मिळून तो घरदार करून राहिला.

त्या काळीं कापसाचीं वस्त्रें तयार करण्यास लागणारें सूत हातानें काढीत असत. तें पुरेंसें न मिळाल्यामुळें वस्त्रे विणणारांचा उद्योग हवा तसा चालत नसे. सूत मिळाले नाहीं म्हणजे त्यांला आपले माग बंद ठेवावे लागत. ही अडचण आर्कराइट याच्या लक्षांत येऊन तो सूत काढण्याचें यंत्र तयार करण्याच्या प्रयत्नास लागला. त्याला लहानपणापासून यंत्रकलेचा नाद होता. फावल्या वेळीं तो ह्या कलेची माहिती मिळवीत

असे. त्या वेळीं प्रचारांत असलेल्या सगळ्या प्रकारच्या यंत्रांची त्याला चांगली माहिती होती. ही अशी त्याची पूर्वींची तयारी असल्याकारणानें वर सांगितल्यासारखें नवे यंत्र तयार करण्याची धमक त्याला वाटली, यांत कांहीं नवल नव्हतें. तो ह्या प्रयत्नास मोठ्या उत्साहानें लागला. त्यासाठीं लागेल तो खर्च करण्यास तो तयार झाला. ह्या नादांत त्याचा बराच वेळ जाऊं लागला. त्यामुळें त्याचा धंदा नीट न चालून त्यांत त्याला बूड आली. तिची त्यानें परवा केली नाहीं. हातीं घेतलेलें काम कांहीं झालें तरी सोडावयाचे नाहीं असा त्यानें निश्चय केला. नाना प्रकारचे नमुने वगैरे तयार करण्याकडे त्याचे पुष्कळ पैसे खर्च होऊं लागले. तेव्हां त्याचा संसार नीट चालेना. जवळ थोडी पुंजी होती ती सगळी त्यानें ह्या प्रयत्नांत वेंचिली; आणि तो अगदीं कफल्लक झाला. हा त्याचा वेडा नाद पाहून त्याच्या बायकोला अतिशयित वाईट वाटे. ती याला तो नाद सोडून देण्याविषयी वारंवार सांगे. पण त्यानें तो सोडिला नाहीं; आणि पुढें खाण्यापिण्याचे वगैरे हाल होऊं लागले तेव्हां ती त्याच्यावर रुष्ट होऊन त्याच्याशीं भांडूं लागली. अशी स्थिति झाली तरी तो आपला नाद सोडीत नाहीं असें पाहून एके दिवशीं तिने त्याचे सगळे नमुने फोडून मोडून टाकिले. त्याचा त्याला मनस्वी राग येऊन त्यानें तिला सोडचिठी दिली.

ह्याप्रमाणें हातीं धरिलेलें काम शेवटास न्यावयाचा संकल्प करून त्यानें कोणत्याही संकटांस किंवा कष्टांस जुमानिलें नाहीं. पैशाच्या अडचणीमुळें त्याचे फार हाल होऊं लागले. त्याला खायाला अन्न व ल्यायाला वस्त्रही धड मिळेना, अशी त्याची अवस्थ्या झाली. पण त्याची त्यानें मुळीं परवा केली नाहीं; आणि शेवटीं त्यानें त्या कामांत यश मिळविलें. त्यानें कृतसंकल्पाप्रमाणें सूत काढण्याचें यंत्र तयार केलें. पुढें त्याला तें उपयोगांत आणण्याची पंचाईत पडली. पण लौकरच त्याला एका भांडवलवाल्याचें साहाय्य मिळून त्याच्या यंत्राचा उपयोग लोकांच्या अनुभवास आला. त्यानें सूत काढण्याचा मोठा कारखाना उभारिला. पण पहिल्यापहिल्यानें लोक त्याचें सूत घेईनात. म्हणून त्यानें त्या सुताचीं वस्त्रे विणण्याचा कारखानाही घातला. ह्याप्रमाणें त्या धंद्यांत चांगली सुधारणा करून त्यानें पुष्कळ द्रव्य मिळविलें.

## मी यत्न करीन

लंडन शहरांत उइलिअम रॉस नांवाचा एक प्रख्यात चित्रकलाकुशल गृहस्थ होऊन गेला. तो बारा वर्षांचा असतां एके दिवशीं आपल्या आईला म्हणाला: ''येथें लौकरच चित्रांचे प्रदर्शन भरणार आहे. त्यांत ज्यांचीं चित्रें उत्तम ठरतील त्यांस बक्षिसें देणार

असें ऐकितों.'' ती म्हणाली: ''हें पाहा, उइलिअम, अशा प्रदर्शनांत चित्रें ठेवितात, तीं मीं पाहिलीं आहेत. त्यांतली कांहीं तुझ्या चित्रांहून कमी लायकीचीं असतात.'' तो म्हणाला: ''तर मग मलाही वाटतें कीं, आपलीं एकदोन चित्रें ह्या प्रदर्शनांत ठेवावीं.'' ती म्हणाली: ''आणि एकादें बक्षीस मिळविण्याचा प्रयत्न तूं कां करूं नये?'' तो म्हणाला: ''मला बक्षीस मिळेलसें तुला वाटतें?'' ती म्हणाली: ''यत्न करून पाहायाला काय हरकत आहे? तूं नेटाने आणि निश्चयानें उद्योग केलास तर कदाचित् तुला यश मिळेल.'' तो म्हणाला: ''तर मग, आई, मी यत्न करितोंच. एकाद्या ऐतिहासिक गोष्टीसंबंधाचें उत्तम चित्र काढणाराला बक्षीस देण्याचें त्यांनीं ठरविलें आहे. माझ्या डोक्यांत एक गोष्ट घोळत आहे. ती कोणती म्हणशील तर दुसऱ्या रिचर्ड राजाच्या कारकीर्दींत वाट टायलर नांवाच्या एका इसमानें बंड केलें होतें. त्याला पकडून राजापुढे नेलें, तेव्हां त्यानें तेथें उद्दामपणाचें वर्तन केल्यावरून राजाच्या मानकऱ्यांनीं त्याला तेथल्या तेथें ठार केलें. ह्या देखाव्याचें चित्र काढावें असें मला वाटतें.'' ती म्हणाली: ''हा विषय फार बिकट आहे. पण तुझा उत्साह कमी करावा असें मला वाटत नाहीं. तर हें चित्र तयार कर.'' तो म्हणाला: ''आई, यांत मला यश आलें नाहीं आणि बक्षीस मिळालें नाहीं तर काय अडलें आहे? मी पुढल्या खेपेस पुनः यत्न करीन. त्यांत काय आहे?''

ह्याप्रमाणें त्या लहान मुलानें चित्र तयार करण्याचा निश्चय केला; आणि त्या ऐतिहासिक गोष्टीची चांगली माहिती मिळविण्याच्या उद्योगास तो लागला. त्या जुन्या काळच्या लोकांचे, सरदारांचे वगैरे पेहराव कसे होते याची त्यानें चांगली माहिती मिळविली. मग त्या देखाव्याचें चित्र काढण्याच्या कामास तो लागला. चित्राचा आराखडा पहिल्यानें तयार करावा लागतो, तो त्यानें अनेक वेळां करून रद्द केला. कारण तो त्याच्या मनाजोगा तयार होईना. त्यानें हा प्रयत्न अनेक वेळां केला. चांगला आराखडा जमेना म्हणून एकदोन वेळां तर तो बराच निराश झाला. पण त्याच्या आईनें त्याला उत्तेजन दिल्यामुळें, व त्याचा स्वतांचा निश्चयही बळकट असल्यामुळें त्यानें पुन: पुन: प्रयत्न करून एकदांचा मनाजोगा आराखडा तयार केला; आणि तो चित्रपटावर घेऊन चित्र रंगविण्याच्या कामास तो लागला. ह्या कामाला लागणाऱ्या रंगांची योजना व मिश्रण चांगले मजेदार करण्याचा त्यानें मनापासून उद्योग केला; आणि शेवटीं त्यानें तें चित्र तयार करून प्रदर्शनांत नेऊन मांडिलें.

पुढें एका महिन्यानें परीक्षकांनीं प्रदर्शनांत आलेल्या चित्रांची परीक्षा करून उत्तम कोणांचीं ठरलीं तें जाहीर करण्याचा दिवस नेमिला. त्या दिवशीं मोठी सभा भरवून

तीपुढें बक्षिसें मिळविणारांचीं नांवें वाचण्यांत आलीं. सभेचा अध्यक्ष एक बडा सरदार होता. त्या सभेला तो मुलगा आणि त्याची आई हीं अर्थात गेलीं होतीं. अध्यक्षानें उठून सांगितलें कीं, ऐतिहासिक चित्राबद्दलचें बक्षीस वाट टायलरच्या मृत्यूसंबंधाचें चित्र काढणाराला देण्यांत आलें आहे. हे त्याच्या तोंडचे शब्द ऐकतांच त्या प्रेमळ आईला अतिशयित हर्ष झाला. तिच्या नेत्रांतून आनंदाश्रु वाहू लागले. त्या मुलाचें नांव पुकारलें तेव्हां तो बक्षीस घेण्याकरितां पुढें आला. त्याला पाहून सगळ्या लोकांला मोठा अचंबा वाटला. त्या बक्षिसासाठीं मोठमोठ्या कुशल कारागिरांनीं प्रयत्न केला असतां एवढ्याशा लहान मुलानें त्यांच्यावर सरशी केल्याबद्दल त्यांला मोठें नवल वाटून त्यांनीं टाळ्यांच्या गजराने सगळे सभागृह दणाणून टाकिलें. अध्यक्षानें त्या मुलास जवळ बोलावून शाबासकी दिली आणि म्हटलें: ''बाळा, तूं हा आपला उद्योग नेटाने पुढें चालविशील तर तूं मोठा कुशल कारागीर होऊन चांगल्या योग्यतेस चढशील.'' हे त्याचें भविष्य या मुलानें खरें केलें. त्यानें निश्चयानें दीर्घप्रयत्न करून व सतत उद्योग करून पुढें मोठा नांवलौकिक मिळविला, व त्यास सरकारांतून मोठी पदवी मिळाली.

## दीर्घ प्रयत्नाचें फळ

लिव्हरपूल शहरांतल्या एका पुस्तकवाल्याच्या दुकानांत प्रेस्टन नांवाचा एक गृहस्थ कांहीं पुस्तके पाहत असतां, एक बारातेरा वर्षांचा गरीब मुलगा त्या दुकानांत आला. त्याच्या अंगावरचे कपडे अगदीं फाटके होते. त्या मुलानें दुकानदारास भूगोल आहे काय, म्हणून विचारिलें. त्यानें म्हटलें: ''हवे तितके आहेत.'' त्याची किंमत विचारितां ती अडीच शिलिंग आहे असें त्याला समजलें. तेव्हां तो म्हणालाः ''इतकी किंमत असेलसें मला वाटलें नव्हतें.'' असें बोलून तो परत जावयास निघाला; पण पुनः मागें परतून त्यानें दुकानदारास पुसलें: ''मजजवळ अवघे अठरा पेन्स आहेत. तेवढे घेऊन मला तें पुस्तक देता काय? बाकीचे पैसे मी मागाहून देईन.'' दुकानदारानें नाहीं म्हणून सांगितलें. तेव्हां त्या मुलास अमळ वाईट वाटलें; आणि जातां जातां त्यानें प्रेस्टनच्या तोंडाकडे सहज हसल्यासारखें करून पाहिलें.

तो मुलगा दुकानांतून बाहेर पडला तेव्हां प्रेस्टनला त्याचें अमळ कौतुक वाटून तोही त्याच्या मागोमाग गेला, आणि त्याला वाटेंत गांठून म्हणालाः ''आता तूं काय करशील?'' मुलगा म्हणाला: ''मी दुसऱ्या दुकानांत जाऊन विचारीन.'' तो गृहस्थ म्हणाला: ''मी तुझ्याबरोबर येऊं का, तुला कोठें पुस्तक मिळतें तें पाहायाला?'' हा त्याचा प्रश्न ऐकून या मुलास आश्चर्य वाटलें, आणि तो म्हणाला: ''तुमची मर्जी

असल्यास या.'' मग तो मुलगा आणखी चार दुकाने हिंडला; आणि तेवढ्या ठिकाणांहून निराश व खिन्न होऊन तो माघारींफिरला. त्याच्या जवळच्या तेवढ्या पैशांला कोणी त्याला पुस्तक देईना. तो गृहस्थही त्याच्याबरोबर तेवढ्या दुकानांत गेला. अशी त्याची निराशा झाली तेव्हां त्या गृहस्थाने त्याला विचारलें: ''तूं आणखी दुकानें हिंडून पाहणार काय?'' मुलानें उत्तर केलें: ''मी सगळ्या दुकानांत जाऊन पाहणार. मला तें कोठेंच मिळणार नाहीं हें कशावरून?'' मग तो मुलगा पांचव्या दुकानांत शिरला; आणि बिलकूल न घाबरतां दुकानदाराकडे जाऊन तें पुस्तक आहे काय म्हणून त्यानें विचारिलें, आणि आपल्याकडे किती पैसे आहेत तेही त्याला सांगितलें.

दुकानदार–तुला त्या पुस्तकाची अगदीं गरजच आहे काय?

मुलगा–होय, फार गरज आहे.

दुकानदार–तुला तें कशाला हवें?

मुलगा–मला तें पाठ करायाला पाहिजे. मला शाळेत जाऊन शिकण्याचें सामर्थ्य नाहीं. मी घरीं शिकत असतों. सगळ्या मुलांकडे भूगोल आहेत, आणि माझ्याकडे तो नसेल तर ते माझ्यापुढें जातील. शिवाय माझा बाप खलाशी होता. म्हणून तो ज्या ज्या ठिकाणीं जात असे त्याची थोडीशी माहिती करून घ्यावी अशी माझी इच्छा आहे.

दुकानदार–तुझा बाप अजून त्या ठिकाणीं जात असतो काय?

मुलगा–नाहीं. तो मरण पावला. पण मलाही खलाशी व्हावयाचें आहे.

दुकानदार–खरेंच का?

मुलगा–मी जगलों वांचलों तर खात्रीनें खलाशी होईन.

दुकानदार–ठीक आहे, माझ्या बाळा, मी तुला भूगोलाचें नवें पुस्तक देतों. बाकीचे पैसे देववतील तेव्हां दे; अगर तुला मी एक जुनें पुस्तक देतों. त्याचे तुला पंधरा पेन्स पडतील.

मुलगा–जुन्या पुस्तकांत सगळीं पानें आहेत काय? आणि तें नव्या पुस्तकासारखेंच आहे काय?

दुकानदार–होय. तें अगदीं नव्या पुस्तकासारखें आहे.

मुलगा–तर मग तें मला चालेल. माझे तीन पेन्स उरतील ते मला दुसरें एकादें पुस्तक घ्यायाला होतील.

त्या दुकानदारानें त्याचें तें बोलणे ऐकून प्रेस्टनच्या तोंडाकडे पाहिले. तेव्हां त्यानें त्याला त्या मुलाची पाहिलेली सगळी हकीकत सांगितली. ती ऐकून त्याला मोठे कौतुक वाटलें; आणि त्यानें आंत जाऊन तें पुस्तक आणिलें; आणि त्याबरोबर थोडे कोरे कागद व एक नवी पेन्सील हीं आणिलीं. मग त्यानें तें पुस्तक त्या मुलाच्या हातीं देऊन म्हटलें: ''बाळा, तुला हें फुकट देतों. तुझ्या दीर्घ प्रयत्नाबद्दल तुला हें बक्षीस आहे. तूं असाच धैर्यानें व निश्चयानें वागत जा. म्हणजे तूं मोठी योग्यता पावशील.'' तें हातीं घेऊन मुलानें त्याचे मनापासून आभार मानिले. मग प्रेस्टननें त्या मुलाच्या हातावर दहा पौंडांची एक नोट ठेवून म्हटले: ''माझ्या बाळा, तुला आणखी कांहीं पुस्तकें हवी असल्यास ह्या पैशांचीं घे.'' एवढे पैसे पाहून त्या मुलास मोठा हर्ष झाला. त्याचे डोळे आनंदाश्रूंनी भरून गेले. त्यानें त्याचे मनापासून आभार मानिले, आणि म्हटलें कीं, ''हे पैसे परत देण्याचें सामर्थ्य मला कधींतरी येईल अशी मला उमेद आहे.'' मग त्यानें त्या दयाळू गृहस्थाचें नांव विचारून घेतलें, व आपलें त्याला सांगितलें.

ह्या गोष्टीला सुमारें तीस वर्षें लोटल्यावर तो प्रेस्टन एका जहाजावरून अमेरिकेस चालला होता. त्याचा बहुतेक प्रवास मजेचा झाला. पण शेवटीं मोठें वादळ होऊन जहाजाला मोठी चील पडली, आणि पाणी आंत भरूं लागलें. जहाजावरील सगळे खलाशी व कामदार फार हुशार व मेहनती होते. त्यांनीं पाणी उपसण्याचा सपाटा सुरू केला. पण सगळी रात्र सक्त मेहनत करून पाणी मुळीं कमी ते होईना, उलटें वाढतच चाललें. तेव्हां खलाशी हताश होऊन होड्या पाण्यात सोडण्यास पाहूं लागले. इतक्यात त्याचा कप्तान तेथें येऊन त्यांस दरडावून म्हणाला: ''पाणी उपसण्याचें काम सोडून कोणींही जातां कामा नये; शेवटपर्यंत तें उपशीत राहिलें पाहिजे.'' हा त्याचा सक्त हुकूम ऐकून सगळे खलाशी पुन: त्या कामास नेटानें लागले. इकडे सगळे उतारू कप्तानासभोंवतीं गर्दी करून जहाज बचावण्याची कांहीं आशा आहे काय, म्हणून विचारूं लागले. त्यानें त्यांला असें निक्षून सांगितलें कीं, ''जहाजाचा वरला मजला एक इंच पाण्यावर आहे तोपर्यंत तें बचावण्याची आशा आहे. इतकें पाणी चढेपर्यंत मी हें जहाज सोडून जाणार नाहीं, आणि माझ्या खलाशांलाही जाऊं देणार नाहीं. जहाज बचावण्यासाठीं सुचतील तेवढे सगळे उपाय आम्ही करून पाहणार. तुम्ही मात्र सगळे पाणी उपसायाला लागा. पंपांकडून कोणी बिलकूल हालतां कामा नये.

हें असें पाणी उपसायाचें काम सगळा दिवस एकसारखे चालू होतें. पण पाणी कांहीं कमी होईना. एवढ्या अवकाशांत ते लोक तीन वेळां निराश होऊन पाणी

उपसण्याचें सोडून देण्यास तयार झाले. पण तितक्याही वेळां कप्तानानें त्यांला धमकावून कामास लाविलें. सगळ्यांचें धैर्य सुटलें होतें, पण तो कप्तान बिलकूल डगमगला नव्हता. शेवटपर्यंत यत्न करायाचा सोडूं नये असा त्याचा अढळ निर्धार होता. त्यानें त्या सगळ्या लोकांस पुरे कह्यांत राखून त्यांच्याकडून पाणी उपसण्याचें काम शेवटपर्यंत मोठ्या नेटानें कराविलें. त्यानें त्यांना असें आश्वासन दिलें कीं, ''तुम्ही धैर्य न सोडितां मर्दासारखे वागाल तर मी तुम्हांला न्यूयार्कशहरच्या बंदरांत सुरक्षित नेऊन पोंचवितों.'' अशा रीतीने ह्या एका पुऱ्या धैर्याच्या व निश्चयी मनुष्याच्या योगानें तें जहाज सदरील बंदरापर्यंत जेमतेम जाऊन पोंचलें, आणि त्यांतले सगळे उतारू किनाऱ्यावर उतरल्यानंतर तें बुडालें. एकंदर उतारू किनाऱ्यावर जात तोंपर्यंत तो कप्तान त्या जहाजावर उभा होता. ह्या त्याच्या सत्कृत्याबद्दल सगळ्या उतारूंनीं त्याचे मनःपूर्वक आभार मानिले. इतरांप्रमाणें प्रेस्टनही आभार मानावयाला त्याच्याजवळ गेला. तेव्हां त्याला ओळखून तो कप्तान म्हणाला: ''महाराज, मला तुम्हीं ओळखिलें नाहीं. तीस वर्षांपूर्वी लिव्हरपूल येथील पुस्तकवाल्याच्या दुकानीं जो मुलगा तुम्हीं पाहिला होतो, व ज्याला तुम्हीं कृपावंत होऊन पुस्तकें घेण्यासाठीं पैसे दिले होते, तो मी. तुम्हीं त्या वेळीं मला उत्तेजन दिलें, त्यामुळें मी आज ह्या स्थितीस येऊन पोंचलों आहें. याबद्दल मीं तुमचा अत्यंत ऋणी आहें.'' प्रेस्टन म्हणाला: ''देव तुझें कल्याण करो. तीस वर्षांपूर्वी भूगोलाचें पुस्तक मिळविण्याच्या बाबतींत जो दीर्घप्रयत्नाचा गुण तूं दाखविला होतास, त्याच्याच योगानें आज एवढ्या माणसांचे प्राण वांचले आहेत.''

❑❑❑

## भाग आठवा

# आळसाचे वाईट परिणाम

## आळशी मोलकरणी

एका कुटुंबांत दोनतीन मोलकरणी नोकरीस होत्या. त्यांना घरधनीण कोंबडा आरवतांच हाका मारून कामाकाजाला उठवी. घरधनिणीचा हा त्रास त्यांला साहेना. त्यांना पहाटेची साखरझोप घ्यावयाला मिळेना. म्हणून त्यांनीं असा विचार केला कीं, कोंबडा आरवला म्हणजे आपली घरधनीण जागी होऊन आपणांस हाका मारिते. तरी आपण घरातला कोंबडा मारून टाकावा, म्हणजे तिला पहाट केव्हां झाली तें कळणार नाहीं. असा बेत करून त्यांनीं त्या कोंबड्याचा प्राण घेतला. तेव्हांपासून असें होऊं लागलें कीं, त्यांच्या घरधनिणीला पहाट केव्हां होई तें न समजून मध्यरात्र उलटे न उलटे तो ती त्यांला हाका मारीत सुटे. कारण ती वयातीत झाली असल्या कारणानें तिला गाढ झोप येत नसे. ह्या गोष्टीचा त्या आळशी मोलकरणींला मोठा पस्तावा झाला, आणि कोंबड्याचा जीव घेण्याची बुद्धि आपणांस कोठून सुचली असें त्यांस होऊन गेलें.

## एक कामकरी आणि त्याची बायको

फ्रान्सांतील कांहीं कामकरी एके दिवशीं कामावर न जातां एका उपहारगृहांत जाऊन तेथें जवळ कांहीं पैसे होते त्यांवर ताव मारून मौज करीत होते. इतक्यांत एक बाई आंत येऊन त्यांपैकीं एकास हाक मारून म्हणाली: ''तुम्ही आज घरीं जेवायाला येणार नाहीं असें दिसतें. तरी मी तुमचे जेवण आणिलें आहे, हें घ्या.'' असें म्हणून एक पुडकें त्याच्यापुढें ठेवून ती निघून गेली. ही अशी त्याची काळजी त्याच्या बायकोनें घेतल्याबद्दल त्यांना हसूं आलें. मग त्यांतला एकजण म्हणाला: ''तिनें काय आणिलें आहे तें सोडून आपण खाऊं या.'' तें त्याचें म्हणणें त्या इसमानें खुशीने मान्य

केल्यावर त्यांनीं तें सोडून पाहिलें, तों त्यांत कित्येक रिकाम्या बशा त्यांला आढळल्या. त्या बशांत एक चिठी होती. तींत असें लिहिलें होतें कीं, ''हें जेवण तुम्हांला गोड लागेल अशी मला उमेद आहे. घरीं मुलांस व मला असलेंच जेवण केलें होतें!'' हा मजकूर वाचून त्या आळशी माणसाला काय वाटलें असेल हें कांहीं सांगावयास नको.''

## आळशी विद्यार्थी

एका शिक्षकानें आपल्या वर्गांतल्या मुलांस अशी ताकीद केली कीं, ''कोणींहि गमूं नये, आपल्या पुस्तकांकडे लक्ष लावावें. जो कोणी दुर्लक्ष करील त्याला शिक्षा होईल. तुमच्यापैकीं कोणी दुर्लक्ष करितांना आढळला तर त्याचें नांव मला सांगा.'' ही अशी शिक्षकाची आज्ञा झाली तेव्हां त्यांतल्या एका मुलाने असा बेत केला कीं, आपलें ज्या मुलाशीं नुकतेंच भांडण झालें आहे, त्याजवर आपण नजर ठेवावी, आणि तो दुर्लक्ष करितांना आढळला कीं त्याचें नांव शिक्षकाला सांगून त्याला शिक्षा करवावी. हा त्याचा बेत लौकरच सिद्धीस गेला. तो मुलगा पुस्तकावरची नजर काढून दुसरीकडे पाहूं लागतांच त्यानें त्याचें नांव शिक्षकाला सांगितलें. तेव्हां शिक्षक म्हणाला: ''त्यानें दुर्लक्ष केलें हें तुला रे कसें कळले?'' त्यानें उत्तर केलें: ''मी त्याच्याकडे पाहत होतों.'' शिक्षक म्हणाला: ''ह्यावरून त्याच्याकडे पाहत असतांना तुझें स्वतांचें लक्ष पुस्तकाकडे नव्हतें हें सिद्ध झालें. तर आता ह्याबद्दल तुलाच पहिल्यानें शिक्षा केली पाहिजे.'' असें म्हणून शिक्षकानें त्या मुलास चांगली शिक्षा केली.

## आळशी चांभार

जर्मनींतल्या एका गृहस्थ्यानें एका चांभाराला आपणासाठीं जोडे तयार करावयाला सांगितलें. त्यानें ते अमुक दिवशीं तयार करून आणितों असें कबूल केले होतें. पण तो चांभार पराकाष्ठेचा आळशी होता. ठरलेल्या मुदतींत त्यानें ते तयार केले नाहींत. जोडे मागायाला त्या गृहस्थाचा चाकर आला तेव्हां त्यानें कांहीं तरी सबब सांगून उद्यां ते तयार करितों असें वचन दिलें. पण आपल्या ह्या वचनाप्रमाणें तो वागला नाहीं. त्या गृहस्थाचा चाकर दुसऱ्या दिवशीं आला तेव्हां त्यानें आणखी एका दिवसाचा वायदा सांगितला. पण तोही टळला. अशा प्रकारें तीनचार वायदे टळले. तेव्हां त्या गृहस्थानें असा निर्धार केला कीं, ह्या चांभाराला एकसारखा तगादा लावून याच्याकडून जोडे तयार करून घ्यावे. मग त्या आळशी चांभाराने केलेल्या वायद्याप्रमाणें त्यानें आपल्या चाकरास त्याच्याकडे पाठविलें असतां, त्यानें नेहमींप्रमाणेंच पुन: वायदा केला. पण त्या गृहस्थानें त्याच्याकडे आणखी पावतासानें पुन: मनुष्य पाठविला, आणि दुसरा

पावतास लोटला नाहीं तों दुसरा मनुष्य पाठविला. ह्याप्रमाणें सगळ्या दिवसभर प्रत्येक पावतासाला त्या चांभाराकडे त्यानें माणूस पाठविला. हा असा सारखा तगादा लागलेला पाहून तो आळशी चांभार शेवटीं अगदीं त्रासून गेला; आणि त्याचे जोडे रातोरात तयार करून एकदाचे देऊन टाकावे असा त्यानें निश्चय केला; आणि त्याप्रमाणें त्या कामास नेटानें बसून त्यानें उजाडण्यापूर्वीं ते तयार केले आणि त्या गृहस्थाकडे पाठवून दिले.

## आळशी धनीण आणि उद्योगी दासी

एका कुटुंबांत एक तरुण मुलगी होती. ती चांगली देखणी होती, पण थोडी आळशी होती. तिला तागाचें सूत काढायाला सांगत. तें काढितांना एकादी गांठ किंवा गुंतागुंत लागली असतां ती तेवढा धागा तोडून टाकी. गुंतागुंत सोडवीत बसण्याचा तिला कंटाळा असे. तिनें हा असा तोडून टाकिलेला ताग तिच्या घरांत काम करणारी एक दासी नेहमीं जमा करून ठेवी, आणि फावल्या वेळीं तो सोडवून त्याचें सूत काढी. असे करितां करितां तिने बरेंच सूत काढून त्याचीं वस्त्रें विणिलीं.

पुढें त्या गांवांतल्या एका तरुण गृहस्थाचें मन त्या मुलीवर बसून त्यांचा विवाह ठरला. एके दिवशीं तीं परस्परांशीं प्रीतीच्या गोष्टी बोलत फिरत असतां, तिच्या घरांतली ती दासी त्या सुताचीं विणलेलीं वस्त्रे लेऊन मोठ्या आनंदाने आपल्या दुसऱ्या सोबतिणींबरोबर खिदळतांना त्यांच्या दृष्टीस पडली. तेव्हां त्या नवरीमुलीनें आपल्या प्रियकराला ती दासी दाखवून म्हटलें कीं, ‘‘ती पाहा आमची दासी; मीं टाकिलेल्या तागाचीं वस्त्रें लेऊन ती कशी मिरवीत आहे!’’ त्यानें म्हटलें: ‘‘तूं काय म्हणतेस तें मला समजत नाहीं.’’ तेव्हां तिनें सांगितलें कीं, ‘‘मी सूत काढीत असतां कोठें गुंतागुंत किंवा गांठी लागल्या तर त्या सोडविण्याचा कंटाळा येऊन त्या मी टाकीं. पण ती आमची दासी त्या सगळ्या जपून ठेवी, आणि त्या सोडवून त्यांचें सूत तयार करी. असें करितां करितां तिनं पुष्कळ सूत काढून त्याचीं तीं वस्त्रें तयार केलीं आहेत.’’

हें ऐकून त्या तिच्या प्रियकराला विचार पडला. तो मनांत समजला कीं, ‘‘आपण हिच्याशी लग्न करावयास तयार झालों आहें खरा, पण ही मोठी आळशी आहे. अशी मुलगी आपली बायको झाली असतां आपला संसार चांगला चालावयाचा नाहीं. त्यापेक्षां त्या गरीब दासीशीं आपण लग्न केलें तर बरें.’’ असा विचार करून त्यानें तिला सोडून त्या दासीला आपली बायको केली.

## दरवेशी आणि ससाणा

एक दरवेशी एका रानांतून चालला असतां एक ससाणा त्याच्या नजरेस पडला. तो पक्षी तोंडांत मांसाचा तुकडा धरून एका झाडावर घिरट्या घालीत होता. तो असें कां करीत आहे, हें पाहण्यासाठीं दरवेशी तेथें उभा राहिला. त्या झाडावरील एका घरट्यांत एक कावळ्याचें पिल्लूं होतें. त्याला अजून पंख फुटले नव्हते. त्याच्या तोंडांत तो ससाणा तो मांसाचा तुकडा घालीत होता. हा त्या ससाण्याचा दयाळूपणा पाहून तो दरवेशी आपल्याशी म्हणाला: ''देवाची सगळ्या प्राण्यांवर पाहा कशी दया आहे ती! निर्माण केलेल्या सगळ्या प्राण्यांच्या पोषणाची तरतूद त्यानें करून ठेविली आहे. हें पक्ष्याचें पिलू दुर्बळ व निराधार असतां त्याच्या निर्वाहाची देवानें पाहा कशी तजवीज केली आहे! अशी जर तो सगळ्या प्राण्यांची काळजी वाहतो, तर मीच तेवढा अन्नासाठीं दारोदार हिंडत आहें, याचें काय प्रयोजन आहे? मी कोठें तरी पडून राहीन.'' असें म्हणून तो एका गुहेंत जाऊन स्वस्थ पडून राहिला. तो तेथें तीन दिवस निजून राहिला. तेवढ्या वेळांत त्याला कांहींएक खायाला मिळाले नाहीं. भुकेनें त्याचे प्राण व्याकुळ झाले. त्याला वाटलें होतें कीं त्या कावळ्याच्या पिलाप्रमाणें आपणासही पडल्या ठिकाणी कोठून तरी आयते खायाला मिळेंल. पण ती त्याची आशा व्यर्थ होती. आतां काय करावें, अशा चिंतेंत तो पडला असतां त्याला झोप लागून स्वप्न पडलें. त्यांत देवानें येऊन त्याला म्हटले: ''हे माझ्या भक्ता. ह्या जगांतले सगळे व्यापार सकारण आहेत. माझी दया अमर्याद आहे. पण ज्याला जें साधन मीं दिलें आहे, त्याचा त्यानें चांगला उपयोग करावा अशी माझी आज्ञा आहे. तूं त्या कावळ्याच्या पिलाचें अनुकरण केलें, तें बरोबर नाहीं. त्या ससाण्याचें अनुकरण करण्याचें सामर्थ्य तुझ्या अंगांत आहे. तर दुसऱ्यांनीं श्रम करावा, आणि आपण स्वस्थ बसून खावें, अशी दानत धरूं नको. स्वतांच्या कष्टाने कांहीं तरी मिळवून त्यावर आपला निर्वाह चालीव, आणि त्यांतलें कांहीं दुसऱ्याला देण्याची बुद्धि धर.''

## आळशी चाकर

एक राजा आपल्या राज्यांत हिंडून, प्रजेची स्थिति कशी काय आहे, व आपले कामदार आपआपलीं कामे कोणत्या प्रकारें करितात, तें पाहत असे. तो एके दिवशीं असा फिरावयास निघाला असतां, एक मनुष्य समोरून लंगडत येतांना त्याच्या दृष्टीस पडला. राजाने त्याला थांबवून विचारिले: ''बाबा, तुझी अशी दशा कशामुळे झाली?'' त्यानें उत्तर केलें: ''महाराज, काय सांगूं! माझ्या धन्यानें मला काठीनें झोडून शिव्याशाप

दिले, आणि तुझा आठ दिवसांचा पगार कापीन, अशी आणखी धमकी दिली.'' राजानें विचारिलें: ''त्यानें तुला उगांच मारिलें नसेल? तूं कांहीं तरी अन्याय केला असावा?'' तो म्हणालाः ''महाराज, मी स्वस्थ निजलों असतां तो मजवर एकदम काठी घेऊन धाऊन आला. मीं त्याचा कांहींएक अन्याय केला नव्हता.'' राजानें विचारिलें: ''तूं न्यायाधिशाकडे जाऊन कां फिर्याद केली नाहीं?'' तो म्हणाला: ''न्यायाधीश! तो कसली माझी दाद घ्यायाला!'' राजा म्हणाला: ''तर मग तूं राजाकडे जाऊन आपलें गाऱ्हाणे करावयाचे होतें.'' तो म्हणाला: ''राजा तरी त्याच मासल्याचा आहे; किंबहुना त्याच्याहून वाईट आहे.''

हें त्याचें बोलणे ऐकून राजाला मुळींच राग आला नाहीं. त्यानें त्या माणसाशीं विशेष ममतेनें बोलून व त्याला उलटसुलट प्रश्न करून त्याच्या तोंडून त्याचा अपराध वदविला. मग राजानें त्याच्याशीं बुद्धिवाद केला आणि म्हटले: ''तूं आळस करितोस आणि काम चोरितोस, म्हणून तुझा धनी तुला शिक्षा करितो. याबद्दल तूं त्याला किंवा दुसऱ्या कोणांला दोष लावावा आणि आपला अपराध मनात आणूं नये, हें कांहीं बरोबर नाहीं. तूं ह्याउपर नीट रीतीनें वागण्याचें वचन देशील तर तुला मी चांगलें काम लावून देतों.'' हे त्याचे मायेचे व बोधाचे शब्द ऐकून तो माणूस ओशाळला आणि म्हणाला कीं, ''मी ह्यापुढें आळस टाकून सांगाल तें काम करण्यास तयार आहे.'' मग राजानें त्याला आपल्याबरोबर नेऊन आपल्या एका कारभाऱ्यास हुकूम केला कीं, ''याला कांहीं काम सांगा, आणि तें हा कसें करितो तें मला कळवा.'' ह्या वेळीं हा राजा आहे, हें त्या माणसाच्या लक्षांत आलें, आणि त्यानें त्याच्यापुढें गुडघे टेकून व हात जोडून त्याची क्षमा मागितली. मग तो राजाच्या नोकरीस राहून मोठा उद्योगी व मेहनती चाकर ठरला.

## आळशी मुलगा

एका गृहस्थाचा एक मुलगा लहानपणापासूनच फार आळशी होता. त्याचा बाप त्याला नित्य छेडी, पण तो कांहीं आपली खोड टाकीना. तो सकाळीं लौकर उठत नसे. त्याची आई त्याला हाका मारमारून उठवी. अशा सुस्तीमुळें त्याचा शाळेंतला अभ्यास कधींच चांगला होत नसे. त्याचा शिक्षक त्याला पुष्कळ बोले व शिक्षाही करी. तरी त्याला त्याचें कांहींच वाटत नसे. असा तो अगदीं कोडगा बनला होता. त्याचे आईबाप त्यामुळें नेहमीं फार कष्टी होत.

एकदां त्याच्या बापाच्या मित्रांनीं वनभोजनाचा बेत केला आणि सकाळीं सात वाजतां गाड्या जोडून एका रानांत जावयाचें योजिलें. हें रान त्यांच्या गांवाहून बरेंच दूर

होतें. हा वनभोजनास जाण्याचा बेत झाला तो ह्या आळशी मुलास आदल्या रात्रीं कळला होता; व आईने त्याला सकाळी लौकर उठण्याविषयीं बजावून सांगितलें होतें. त्यानें निजते वेळीं निश्चय केला कीं, उद्या अगदीं पहाटेस उठून जाण्याच्या तयारीस लागावयाचें. पण त्याला बिछान्यावर सुस्तपणें लोळत रहाण्याची सवय लागली असल्यामुळें तो लौकर उठला नाहीं. त्याच्या आईनें त्याला एकदोन वेळां हाका मारिल्या, त्या त्यानें ऐकिल्या. पण आळस झाडून उठण्याचें त्याला झाले नाहीं. हा आळशी मुलगा आपला नेहमीचा वाईट क्रम आजही सोडीत नाहीं असें पाहून त्याच्या बापानें सगळ्या माणसांला ताकीद केली कीं, त्याला आतां कोणींही हाका मारूं नये. ह्याप्रमाणें तो आळशी मुलगा बिछान्यावर घोरत पडला असतां, गाड्या येऊन सगळीं माणसें निघून गेलीं. गाड्या बऱ्याच दूर गेल्यावर तो मुलगा जागा होऊन कानोसा घेऊं लागला, तों घरांत जिकडेतिकडे सामसूम झालें आहे, व सगळीं माणसें गेलीं आहेत असें त्याच्या लक्षांत आलें. मग तो लागलीच उठून कपडे घालून रस्त्यांत धावत गेला, आणि पाहतो तों गाड्या बऱ्याच दूर गेल्या असें त्याला दिसलें. तेव्हां तो त्यांमागून धावत जाऊन हाका मारूं लागला. पण त्या वेळीं वारा सोसाट्याचा सुटला असून आकाश धुळीनें भरून गेलें होतें. त्यामुळें त्याच्या हाका गाड्यांतल्या लोकांला ऐकू आल्या नाहींत. मग तो अगदीं खिन्न व निराश होऊन माघारीं परतला. अशा रीतीनें त्याच्या आळसाचें त्याला चांगलें फळ मिळालें.

## आळसाचें हाड

एका आळशी मुलास वडील माणसांनी कसलेंही काम सांगितलें, तर तो तें करण्याविषयीं टंगळमंगळ करी. आईनें किंवा बापानें माराचा धाक घातला तरच तो एकादी गोष्ट करी, आणि तीही आळसत आळसत करी. त्यामुळें ती त्याच्या हातून नीट अशी कधीं होत नसे. आजचें काम उद्यांवर, उद्यांचें परवांवर टाकावें, अशी चालढकल त्यानें नेहमीं करावी. तसेंच शाळेंतले धडे त्याच्या हातून कधींही होत नसत. त्यामुळें शिक्षक त्याजवर नेहमीं रागावे. तो त्याला आळशी म्हणे. ह्याप्रमाणें घरीं व शाळेंत त्याला हमेशा आळसाबद्दल बोलून घ्यावें लागे. त्यामुळें तो सर्वदा उदास व खिन्न असे. त्याच्याशीं प्रेमानें व ममतेनें कोणीच कधीं बोलत नसे. त्याचे संवगडीसुद्धां त्याची थट्टा करीत.

एके दिवशीं तो पुस्तक घेऊन धडा पाठ करीत बसला असतां, तो लौकर होईना म्हणून सारखा तडफडूं लागला, आणि शेवटीं पुस्तक रागाने मेजावर फेंकून देऊन

इकडूनतिकडे हात पांघरून फिरूं लागला. हें त्याचें सगळें करणें त्याच्या बापाबरोबर बोलत बसलेल्या एका वैद्यानें पाहिलें; आणि त्याचें त्याला फार वाईट वाटलें. मग त्या वैद्यानें त्या मुलास हाक मारून जवळ बोलाविलें आणि म्हटलें: ''हें पाहा, मुला, मी आज एका मुलीचा हात सोडवून पुनः नीट बसविणार आहें. थोड्या दिवसांमागें कांहीं अपघात होऊन तिचा हात मोडला होता, तो कोणीं नीट केला होता. पण तो वांकडा बसल्यामुळें तिलां हल्लीं त्या हातानें काम चांगलें होत नाहीं. ह्यासाठीं तो सोडवून पुन: नीट बसवावा असें मीं ठरविलें आहे.'' मुलगा म्हणाला: ''असें तुम्ही कराल तेव्हां तिला मोठी इजा होईल, नाहीं बरें?'' वैद्य म्हणाला: ''इजा तर होणारच. पण थोड्या दिवसांनीं तो बरा होऊन तिला कसलीच अडचण पडणार नाहीं. तिचा हाताचें हाड नीट बसले नाही तर तें तिला जन्माची इजा करणार आहे. आतां, माझ्या बाळा, तुझ्या अंगांतही एक हाड वांकडें बसलें आहे. ते काढून पुनः नीट सरळ बसविलें पाहिजे.'' हें ऐकून तो मुलगा घाबरला आणि म्हणाला: ''काय! माझ्या अंगांत वांकडें हाड आहे? मला कोठें दिसत नाहीं तें?'' वैद्य म्हणाला: ''तुला दिसत नसलें तरी मला तें दिसत आहे; आणि तें सरळ बसविल्यावांचून गति नाहीं.'' मुलगा म्हणाला:''माझ्यावर तुम्ही शस्त्रप्रयोग करून होणारें दु:ख नुसतें मनांत येऊन माझा एव्हांच थरकांप होऊं लागला आहे.'' वैद्य म्हणाला: ''बाळा, तुझ्या अंगांतलें वांकडें हाड सरळ बसवायाला वैद्याची किंवा दुसऱ्या कोणाची मुळीं गरज नाहीं; तें तुझें तुला सरळ करितां येईल. तुझ्या अंगांत आळस भरला आहे, हेंच मी वांकडें हाड म्हणतो. तें कांहीं वैद्याच्यानें सरळ व्हावयाचें नाहीं; आणि तें तुझ्या अंगांत एव्हांपासूनच घट्ट बसले तर तें तुला मोठेपणीं दु:खांत व विपत्तींत लोटून देईल. आणि तुझे हाल कुत्रें खाणार नाहीं. तरी तें सरळ करण्यास एव्हांपासूनच तुला झटलें पाहिजे.'' वैद्याच्या बोलण्याचा आशय समजून तो मुलगा ओशाळला, आणि खालीं मान घालून म्हणाला: 'वैद्यबुवा, मी आजपासून आळस टाकून उद्योग करण्यास झटेन. मला सगळ्यांनी आळशी म्हणावें, आणि माझा तिरस्कार करावा हें मला मुळीं बरें वाटत नाहीं.'' ह्याप्रमाणें त्या मुलास पस्तावा होऊन तेव्हांपासून तो झटून उद्योग करूं लागला.

## आळशी मुलगी

एक मुलगी फार आळशी होती. आईनें सांगितलेलें कोणतेंही काम ती चटदिशीं करीत नसे. तिला तें करायाला पुन:पुन: सांगावें लागे. ती सकाळीं लौकर तर कधीं उठत नसे. तिच्या आईने तिला एकसारख्या हाका माराव्या, तरी ती बिछान्यावर ह्या

कुशीची त्या कुशीला होऊन लोळत राही. अशीं ती अगदीं सुस्त असल्यामुळें तिच्या आईला तिचा फार कंटाळा आला. ती त्या मुलीवर जेव्हांतेव्हां रागावे. पण तिची खोड कांहीं केल्या जाईना.

तिच्या आईची बहीण गांवढ्यांत रहात असे, ती आपल्या ह्या बहिणीला भेटण्यासाठी शहरांत येऊन थोडे दिवस तेथें राहिली असतां ह्या मुलीची रीत तिच्या लक्षांत आली; आणि ती बहिणीस म्हणाली: ''आक्का, तुझ्या मुलीच्या अंगांतला हा दोष घालविण्याचा प्रयत्न तूं केला नाहींस तर मोठेपणीं तिच्या अंगांत तो खिळून जाऊन ती कोणालाही आवडेनाशी होईल; आणि ती ज्याच्या पदरीं पडेल त्याच्या संसाराची अगदीं माती करून सोडील. मग तिचे आणि तिच्या नवऱ्याचें न पटून त्यांचा नेहमीं कलह होईल. ह्याप्रमाणें ती खऱ्या संसारसुखाला मुकेल. ह्यासाठीं तिची खोड वेळींच मोडिली पाहिजे. तूं कबूल होशील तर मी एक युक्ती योजिली आहे, ती करून पाहतें.'' ह्या गोष्टीला तिनें रुकार दिला.

मग दुसरे दिवशीं त्या मुलीची मावशी तिला म्हणाली: ''हें पहा, मुली, मी उद्यां आपल्या गांवीं जाणार. तूं मजबरोबर येत असलीस तर चल. आमच्या घरीं तुला एक महिना नेवून ठेवावें, अशी माझी इच्छा आहे; आणि तुझ्या आईला ही गोष्ट मान्य झाली आहे. तर तुझी मर्जी काय आहे, बोल.'' ती म्हणाली: ''मावशी, तूं मला आपल्याबरोबर नेशील तर मी मोठ्या आनंदाने येईन.'' मावशी म्हणाली: ''तर मग उद्यां सकाळीं आठ वाजतां मजबरोबर निघण्यास तुला तयार असलें पाहिजे. गाडी आठ वाजतां बोलाविली आहे; आणि आगगाडी साडेआठ वाजतां स्टेशनांत येते. ती मला चुकवितां कामा नये.'' ती मुलगी म्हणाली: ''मी उद्यां लौकर उठून आठ वाजण्यापूर्वीं तयार होईन.''

मावशीबरोबर गांवढ्यांत जाऊन तेथें रानावनांत व नदीतीरानें हिंडून वनश्रीची शोभा पाहावयाची तिला पराकाष्ठेची हौस वाटत होती. म्हणून तिला त्या दिवशीं मोठा उल्हास वाटून दुसरा दिवस केंव्हा उजाडतो असें होऊन गेलें. ती त्या रात्रीं नित्यापेक्षां लौकर झोपीं गेली; आणि सकाळीं लौकर उठण्याचा तिनें निश्चय केला. दुसऱ्या दिवशीं उजाडतांच तिच्या आईनें तिला एक वेळ हाक मारून म्हटलें: ''मुली, तुला मावशीबरोबर जावयाचें असेल तर लौकर ऊठ.'' ती ह्या हाकेसरशी जागी तर झाली. पण तिला वाटलें कीं, आई पुन: एक वेळ हाक मारीपर्यंत आपण पडून रहावें. कारण तिची नेहमीची सवयच अशी होती कीं, आईनें तीनचार वेळां हाका मारिल्यावांचून

तिनें मुळीं बिछाना सोडूं नये. पण आदल्या दिवशीं तिच्या मावशीनें आपल्या बहिणीला सांगून ठेविलें होते कीं, मुलीस एक वेळ हाक मारावयाची, पुन: बिलकूल मारावयाची नाहीं. ह्यामुळें तिच्या आईनें तिला पुन: हाक मारिली नाहीं, आणि आठ वाजत तोंपर्यंत ती बिछान्यावर घोरत पडून राहिली. इकडे तिच्या मावशीची सगळी तयारी होऊन गाडी ठरलेल्या वेळीं दारांत आली; आणि तिचें सामान तीवर चढविण्याची गडबड झाली. त्यावेळीं ती मुलगी जागी होऊन पाहते तों तिची मावशी तयार होऊन गाडींत बसायला चालली आहे. तेव्हां ती झपदिशीं बिछान्यावरून उडी टाकून मावशीच्या मागून धावत गेली आणि तिला म्हणाली: ''मावशी, जरा थांब, मी हीच तयार होऊन आलें पाहा.'' तिने गंभीर स्वरानें उत्तर केले: ''मुली, मला आज गेलेंच पाहिजे. माझी गाडी चुकतां कामा नये. तर मी चाललें. तुझें उरकेपर्यंत मला खोळंबतां येत नाहीं.'' असें म्हणून ती निघालीच; आणि त्या मुलीची अगदीं निराशा झाली. ती सगळा दिवस अगदीं खिन्न व उदास होती. तिला आपल्या सुस्तपणाचा पुरा त्रास आला; आणि तिनें तेव्हांपासून कानास खडा लावून घेतला कीं, इतःपर आळस असा मुळीं करावयाचा नाहीं. हा तिचा निर्धार शेवटास जाऊन तीं पुढें मोठी उद्योगी बायको निपजली.

❑❑❑

### भाग नववा

# चालढकल

## जखमा लागून नालायक झालेला शिपाई

एका पलटणींतल्या एका शिपायास लढाईंत बऱ्याच जखमा लागून तो लष्करी नोकरीस अगदीं नालायक झाला. तेव्हां त्याला नोकरीवरून दूर केलें. त्यामुळें त्याला निर्वाहाची पंचाईत पडली. दुसरा कांहीं रोजगार त्याला मिळेना. म्हणून त्यानें असा विचार केला कीं, लढाईत जखमा होऊन आपण असा पंगू झालों आहें, तरी आपणास सरकारांतून पेन्शन मिळावें हें रास्त आहे. मग त्यानें लष्कराच्या मुख्य अधिकाऱ्याकडे अर्ज केला. पण त्याच्या अर्जाचा निकाल कांहीं लवकर होईना. त्यानें पुन:पुन: तगादा लाविला. तरी त्याला कांहींना कांहीं सबब सांगून त्याचें प्रकरण तो लांबणीवर टाकू लागला; आणि त्या गरीब मनुष्याचे हाल होऊं लागले. शेवटी त्याचा धीर मुळीं न निघून त्यानें प्रत्यक्ष राजापाशीं आपला अर्ज गुदरण्याचा निश्चय केला. मग त्यानें राजाला गांठून त्याच्या हातीं तो दिला; आणि आपली एकंदर हालहवाल त्याला कळविली. राजानें त्याचें प्रकरण ऐकून घेऊन म्हटले: ''ठीक आहे, मी तुझ्या अर्जाचा विचार करीन.'' शिपाई म्हणाला: ''खावंद सरकार, विचार करायाचा तो आतांच करा. दिरंगाईवर टाकूं नका. अन्न वस्त्रावांचून माझे फार हाल होत आहेत.'' असें म्हणून त्यानें आपलें अंग उघडें करून त्यावरच्या जखमांचे वण राजाला दाखविले. ते पाहून राजाचें मन द्रवलें; आणि त्यानें त्याला पेन्शन देण्याचा हुकूम तत्काळ केला.

## आईची अवज्ञा

एका बाईनें आपल्या बागेंत कोबी लाविल्या होत्या. त्यांला पानें फुटून त्या चांगल्या वाढीस येऊं लागल्या होत्या. तिची एक मुलगी होती. ती तिच्याबरोबर

बागेंत काम करी. ती बाई त्या मुलगीस एके दिवशीं म्हणालीः ‘‘मुली, ह्या कोबींच्या कोंवळ्या पानांखालीं हें पाहा काही पिवळे दिसते तें. हीं सुरवंटांचीं अंडीं आहेत. हीं सगळीं हुडकून काढून जेव्हांचीं तेव्हां चिरडून टाकिलीं पाहिजेत. हीं राहूं दिलीं तर त्यांपासून सुरवंट होऊन आपल्या कोबींची नासाडी करितील. तर तूं आजच्या आज सगळ्या कोबींवरचीं हीं अंडीं काढून टाक. ह्यांचा नाश केला तरच आमच्या कोबी चांगल्या होतील.’’ आईच्या ह्या आज्ञेप्रमाणें त्या मुलीनें लागलींच केलें नाहीं. ती आपल्या मनांत म्हणाली कीं, ही अंडीं आज काढून टाकिलीं काय, आणि उद्यां टाकिलीं काय, सारखेंच. असें म्हणून तिने तें काम दिरंगाईवर टाकिलें; अणि त्याची तिला नंतर आठवणच मुळीं झाली नाहीं. शिवाय तिच्या आईनें तिला हें काम करावयास सांगितलें त्याच दिवशीं ती आजारी झाली. ती आठदहा दिवस बरी झाली नाहीं. म्हणून तेवढे दिवस ती बागेंत मुळीं गेलीच नाहीं. ती बरी झाल्यावर बागेंत जाऊन त्या कोबी पाहूं लागली, तों त्या सगळ्यांत सुरवंट होऊन त्यांनीं त्यांचा अगदीं फन्ना उडविला आहे असें तिच्या नजरेस पडलें. ही आपली खराबी झालेली पाहून त्या बाईची कंबरच खचली. कारण त्या विकून जें कांहीं पैसे मिळणार होते, त्यांवर तिचा व तिच्या त्या मुलीचा निर्वाह चालावयाचा होता. तिची ती निष्काळजी मुलगी तिच्याबरोबर होतीच. ती तर अगदीं घाबरून व ओशाळून ओकसाबोकशी रडूं लागली. आई तिला म्हणालीः ‘‘पोरी, मीं सांगितल्याबरोबर तेवढे काम तूं केलें असतेस तर हें असें आपलें नुकसान आज झालें नसतें. तर इतःपर ध्यानांत वागीव कीं, आज जें काम करावयासारखे असतें तें उद्यांवर टाकण्याची सवय फार वाईट आहे. तीमुळें कधींकधीं मोठेमोठे अनर्थ गुदरतात.

## चालढकल करणारी मुलगी

एक लहान मुलगी होती. ती स्वभावानें फार चांगली होती. पण तिच्यांत एक वाईट खोड होती. तिला कांहीं काम करायाला सांगितलें, तर तें ती लागलींच करीत नसे, अमळशानें करितें असें म्हणे. ती एकादें पुस्तक वाचीत बसली असतां तिच्या आईने तिला कांहीं वस्तु आण म्हटलें तर तिने म्हणावे: ‘‘आई, एवढी ही गोष्ट वाचून आणितें बरें.’’ त्यामुळें आईच्या कामाची खोटी होऊन तिला तिचा राग येई. तिच्यासाठी पेल्यांत चहा ओतून तिला हाक मारिली असतां तिने म्हणावें: ‘‘हा एवढा धडा लिहून ही आलेंच पाहा.’’ त्यामुळें चहा थंड होई, आणि तिला तो तसलाच प्यावा लागे.

एके दिवशीं ती खोलींत पुस्तक वाचीत बसली होती. आणि तिनें पाळिलेला एक लहान पक्षी जमिनीवर फिरत होता. इतक्यांत कोणी खोलीचें दार उघडून बाहेर गेलें, आणि तें उघडें राहिलें. तें पाहून आई म्हणाली: ''मुली, दार लावून घे.'' तिनें नेहमींच्या सवईप्रमाणें म्हटलें: ''जरा थांब; ही गोष्ट संपवून दार लावितें.'' असें बोलून ती वाचण्यांत गर्क झाली, आणि दार तसेंच उघडे राहिलें. इतक्यांत एक मोठे मांजर आंत आलें, आणि त्यानें त्या पक्ष्यावर झडप घालून त्याला तोंडांत धरिलें. त्याबरोबर तिनें हातांतलें पुस्तक मेजावर फेंकून मांजराकडे धाव घेतली. पण मांजर चपळ असल्यामुळें तें तिच्या हातीं लागलें नाहीं. तें परसांत पळालें, आणि ती त्याच्यामागून धावत सुटली. अशी धावपळ करितांकरितां शेवटीं तिनें त्यास पकडिलें. पण एवढ्या अवकाशांत त्याच्या तोंडांतला तो पक्षी मेला होता. तो त्याच्या तोंडांतून काढून घेऊन ती घरांत आली, आणि त्याला सावध करण्याचे उपाय योजूं लागली. पण त्याचा प्राण अगदीं गेला असल्यामुळें तो कसचा सावध व्हावयाला! हें पाहून ती धायधाय रडूं लागली. कारण तो तिचा फार आवडता पक्षी होता. हें तिचे दु:ख पाहून तिची आई म्हणाली: ''मुली, मीं तुला सांगितलें होते तेव्हांच तूं दार लाविलें असतें तर तें द्वाड मांजर आंत आलें नसतें. तुला कोणतेंही काम सांगितलें तर तूं तें कधींही लागलींच करीत नाहींस. याचें हें फळ होय. तर इत:पर हें ध्यानांत ठेव कीं, आतांचें काम अमळशानें करीन असें म्हणणारास प्रपंचांत पदोपदीं अशी अद्दल घडण्याचा संभव असतो.

## खिळीवांचून फाटक

एका शेतकऱ्याचें मोठें परसूं होतें. त्याला एक फाटक होतें. ह्या फाटकाची खीळ मोडली होती, त्यामुळें तें खिळतां येत नसे. तो स्वत: आंतबाहेर जातांनां तें नीट लावून घेई. पण त्याच्या घरांतलीं माणसें त्याच्यासारखीं सावध नसत. तीं तें केव्हांकेव्हां उघडें टाकीत; शिवाय वारा जोराचा सुटला म्हणजे तें उघडून मागेंपुढें फडाफड वाजत राही किंवा साफ उघडें पडे. असें तें उघडें राहलें म्हणजे बाहेरल्या शेतांतलीं गुरें आंत येऊन झाडांपेडांची नासाडी करीत, आणि कोंबडी वगैरे बाहेर पडून शेतांत कोठल्याकोठें भटकत. तेव्हां त्याच्या मुलांना परसांत आलेलीं गुरें बाहेर काढून लावण्याचें व कोंबड्यांला आंत पिटून आणण्याचें काम सारा दिवस लागलें असे. हा असा नेहमींचा त्रास पाहून त्या शेतकऱ्याची बायको त्या फाटकाला खीळ लावून घेण्यास जेव्हांतेव्हां सांगे. पण त्यानें तें काम चालढकलीवर टाकिलें होतें. तो म्हणें: ''खिळीसाठीं आजच

चारसहा आणे खर्चण्याची काय जरूर आहे? मुलें कांहींएक करीत नसतात. त्यांला तरी कांहीं उद्योग हवाच कीं नाहीं?'' अशा सबबीवर त्यानें त्या फाटकाला खीळ लावायाचें लांबणीवर टाकिलें.

एके दिवशीं त्याच्या गोठ्यांतलें एक चांगलें पुष्ट वासरूं सुटून त्या फाटकावाटे बाहेर पडून जवळच्या शेतांत शिरल्याची अवई झाली. ती कानीं पडतांच , तो गोठ्यांत बैल बांधीत होता, त्याला सोडून तो परसाबाहेर धावला. त्याचे मुलगे आणि चाकर हे नुकतेच शेतांतून घरीं येत होते, तेही त्याच्या मागून धावायला लागले. शेतकऱ्याची बायको चुलीवर कढी ढवळीत होती, ती तेथेंच टाकून ती त्या वासराच्या शोधात निघाली. तिची मुलगी बंड्यांला इस्त्री करीत होती, त्या तशाच सोडून तीही आईमागून धावत गेली. वासरूं कोठल्या बाजूस गेलें तें कोणींही पाहिलें नसल्याकारणानें तीं सगळीं आसपासच्या शेतांतून बराच वेळ सैरावैरा धावत सुटलीं. शेवटीं तें वासरूं त्यांच्या चाकराच्या नजरेस पडलें; आणि त्याला आडवाटेंनें जाऊन पकडावें म्हणून त्यानें एका आवारावरून उडी टाकिली. त्यामुळें त्याचा पाय मोडला, आणि त्याला चालतां येईना. तेव्हां त्याला घरीं उचलून आणावा लागला. घरीं येऊन पाहतात तों त्यांच्या नजरेस असें पडलें कीं, गोठ्यांत मोकळे सोडलेल्या बैलांनीं परसांत शिरून चांगल्याचांगल्या भाजीपाल्याची व झाडांपेडांची धुळधाण केली आहे; चुलीवरची कढी उतास गेली आहे; आणि इस्त्री बंड्यांवरच राहिल्यामुळें त्या जळून गेल्या आहेत. ह्याप्रमाणें त्यांचें नुकसान होऊन आणखी तो चाकर पंधरादिवस घरांत पडून राहिल्यामुळें त्याच्याकडून तितक्या दिवसांचें काम झालें नाहीं. ह्याप्रमाणें चारसहा आण्यांची एक खीळ वेळींच  लाविल्यामुळें त्या शेतकऱ्यांचे एवढें मोठें नुकसान झालें.

## वकिलाचा सल्ला

फ्रान्सदेशांत रेनीज म्हणून एक शहर आहे. त्यांत प्राचीन काळीं चांगले हुशार वकिल असत. कायद्यासंबंधाचा सल्ला घ्यावयाचा असला म्हणजे लांबलांबचे लोक ह्या शहरांतल्या वकिलांकडे येत. एके दिवशीं जवळच्या खेड्यांतला एक शेतकरी ह्या शहरांत कांहीं कामाकरितां आला. त्याचें तेथलें काम आटपून त्याला बरीच फुरसद मिळाल्यामुळें शहरांतल्या एखाद्या वकिलाकडे जाऊन त्याचा सल्ला घ्यावा असें त्याच्या मनांत आलें, आणि तो एका हुशार वकिलाकडे गेला.

वकिलानें त्याला रीतीप्रमाणें काय प्रकरण आहे म्हणून विचारिलें. तो म्हणाला : ''माझा कोणावर दावा वगैरे कांहीं नाहीं. माझा कोणाशीं तंटाबखेडा मुळीं झालेला नाहीं.''

वकिल– तर मग तुला आपल्या वतनवाडीचा विभाग करून आपल्या नातलगांशीं फारखत करावयाची असेल?

शेतकरी– माझे नातलग आणि मी सुखानें व शांतीनें एकत्र नांदत आहों. त्यांचा माझ्याशीं कांहींएक तंटा नाहीं.

वकिल– तर मग तुला एकादें शेत खरेदी करावयाचें असेल, किंवा खरेदी घ्यावयाचें असेल?

शेतकरी–आणखी शेतजमीन विकत घेण्याइतकी माझी ऐपत नाहीं, किंवा माझें एकादे शेत विकण्याची मला पाळी आली नाहीं.

वकलि–तर मग माझा सल्ला तरी तुला कोणत्या प्रकरणीं हवा?

शेतकरी–वकिलसाहेब, मी तुम्हांला आरंभीच म्हटलें नाहीं काय कीं, मला तुमचा काहीतरी सल्ला हवा म्हणून? त्याबद्दल तुमची जी कांहीं फी असेल ती मी द्यावयास तयार आहें.

हें असें विलक्षण कूळ पाहून वकिलास हसूं आलें, आणि त्याची समजूत करण्यासाठीं त्यानें कागदलेखणी घेऊन त्याचें नांव, गांव, वय, धंदा वगैरे विचारून घेतला आणि कागदावर दोन ओळी लिहिल्या. मग तो कागद त्याच्या हातीं देऊन त्याबद्दल त्याच्याकडे त्यानें तीन रुपये फी मागितली. ती त्याला देऊन तो कागद खिशांत घालून तो शेतकरी आपल्या गांवीं गेला.

तो घरीं पोंचला तेव्हां संध्याकाळचे चार वाजले होते. वाट चालून थकल्यामुळें तो थोडा वेळ विश्रांति घ्यावी म्हणून पडला असतां त्याचा एक गडी घरांत येऊन म्हणाला: ''गवत कापिल्यास दोन दिवस झाले. तें चांगलें वाळलें आहे. तें वाड्यांत आणून भरावें काय?'' तें ऐकून त्या शेतकऱ्याची बायको म्हणाली: ''आतां सांज झाली ना? आतां गवत आणूं लागाल तर तें सगळें दिवसाउजेडीं आणून होणार नाहीं. तर तें उद्यांच कां आणाना?'' शेतकरी तें ऐकून बुचकळ्यांत पडला. त्याला काय करावें तें सुचेना. इतक्यांत त्याला वकिलाकडून घेतलेल्या सल्ल्याची आठवण झाली; आणि तो म्हणाला: 'थांबा अमळ. मीं एका हुशार वकिलाकडून सल्ला घेतला आहे.

त्याला तीन रुपये पडले आहेत. तर ह्या प्रसंगीं काय करावें तें त्यावरून कदाचित् कळेल.''मग तो कागद खिशांतून काढून त्यानें आपल्या बायकोच्या हातीं दिला आणि तिला म्हटलें: ''हस्ताक्षर तुला चांगलें वाचतां येतें. वकिलानें हें काय लिहिलें आहे तें वाच पाहूं. तिनें त्या कागदावर लिहिलेल्या दोन ओळी वाचिल्या. त्या अशा ''जें काम तुला आज होण्याजोगें असेल तें उद्यांवर सहसा टाकूं नको.''

हे शब्द ऐकून शेतकरी पटदिशीं वर उठून म्हणाला: ''हा सल्ला अगदीं बरोबर आहे. तर मुलांनों, मुलींनो, गड्यांनो, सगळींजणें मळ्यांत चला, आणि सारें गवत आजच्याआज वाड्यांत भरून टाका.'' असें म्हणून तो सगळ्यांच्या पुढें निघाला; आणि रात्र होण्यापूर्वीं त्यांनीं तें सगळें गवत वाड्यांत आणून रचून ठेविलें.

ह्या उत्तम सल्ल्याप्रमाणें त्या शेतकऱ्यानें वर्तन केल्याचें कसें फळ आलें तें पाहा. त्या रात्रीं हवेंत एकाएकीं पालट होऊन मोठा जोराचा पाऊस सगळी रात्र लागला; आणि नदीला अपरंपार पूर येऊन दुसऱ्या शेतकऱ्यांनी मळ्यांत वाळत घातलेलें सगळें गवत वाहून गेलें. ह्या शेतकऱ्याचें तेवढें सुरक्षित राहिलें. मग हा असा उत्कृष्ट सल्ला दिल्याबद्दल त्या वकिलाचे आभार मानून त्या शेतकऱ्यानें त्या वेळेपासून आपलीं सगळीं कामें वेळच्यावेळीं करण्याचा निर्धार केला, आणि त्याप्रमाणें वागून तो मोठा सुखी व संपन्न झाला.

❑❑❑

## भाग दहावा

# वेळेची किंमत

### वॉशिंगटन व त्याचा चिटणीस

अमेरिकेंत स्वतंत्र संस्थाने आहेत. तीं सगळी एका सत्तेखालीं असून त्यांचा राज्यकारभार लोकमतानें चालतो. ही संस्थानें जॉर्ज वॉशिंगटन वगैरे स्वतंत्रताप्रिय ब्रिटिश लोकांनीं स्वतंत्र केल्यावर त्यांचा पहिला अध्यक्ष जॉर्ज वॉशिंगटन हा सर्वानुमतें झाला. हा आपलीं सगळीं कामें वेळच्यावेळीं करी. त्याचा एक चिटणीस होता. तो एके दिवशीं उशिरां आला. तेव्हां वॉशिंगटनाने त्याला उशीर होण्याचे कारण विचारिले. तो म्हणाला: ''माझें घड्याळ मागे आहे.'' अध्यक्ष म्हणाला: ''तूं दुसरें चांगलें घड्याळ घे, नाहींतर मला दुसरा चिटणीस पाहावा लागेल.''

### वॉशिंगटन आणि घोड्यांचा व्यापारी

एका घोड्यांच्या व्यापाऱ्यानें कांहीं नामी घोडे विकावयास आणिले होते, त्यांतले दोन वॉशिंगटनास विकत घ्यावयाचे होते. त्या व्यापाऱ्याला त्यानें बरोबर पांच वाजतां घोडे घेऊन बोलाविलें होतें. पण तो पावतास उशिरां गेला. त्या वेळीं वॉशिंगटन आपल्या जागी नव्हता. त्याच्या सेवकांनीं त्या व्यापाऱ्याला सांगितलें: ''ते तुमची वाट पाहत पांच वाजत तोंपर्यंत येथें बसले होते. पण तुम्ही नेमिलेल्या वेळीं आला नाहीं, म्हणून ते दुसऱ्या कामाला निघून गेले. ते आतां लौकर येणार नाहींत.'' ह्याप्रमाणें त्या व्यापाऱ्याचा सौदा बुडाला, आणि त्याला खिन्न होऊन माघारीं जावें लागलें.

### सामान्य शिपाई प्रख्यात ग्रंथकार झाला

विलायतेंतला एक विख्यात ग्रंथकार तरुण वयांत एका पलटणींत सामान्य शिपायाची नोकरी धरून राहिला होता. तो घरचा अगदीं गरीब असून लहान वयांतच पोरका

झाला होता. त्यामुळें त्याला शाळेंतलें शिक्षण अगदीं थोडें मिळालें होतें. परंतु त्याला ज्ञान मिळविण्याचा हव्यास लागून तो फावल्या वेळीं ग्रंथ वाचीत असे. त्याला सगळा दिवस नोकरीमुळें फारसें फावत नसे. म्हणून तो पहाटेस लौकर उठून अध्ययन करीत असे. त्याचे बरोबरचे शिपाई उठण्यापूर्वी त्याचा अभ्यास दोनतीन तास होत असे. तसेंच आपल्या सोबत्यांशीं चकाड्या पिटीत बसण्याचा त्याला मुळीं नाद नसे. तो एकीकडे कोठें तरी बसून वाचीत असें. तो कोठेंही असला, किंवा कोठेंही जात असला, तरी त्याच्या हातांत एकादे पुस्तक असे. अशा रीतीनें काळाचा सद्व्यय करून त्यानें पुष्कळ विद्या अल्प वयातच संपादन केली. त्यामुळें तो वरिष्ठांच्या नजरेंत येऊन त्याजवर त्यांची मेहरबानी बसली; आणि त्याला झपाझप एकीहून एक बढतीच्या जागा मिळत गेल्या. त्याची बुद्धि, माहिती आणि हुशारी पाहून त्याच्या पलटणींतले सगळे अंमलदार व शिपाई त्याला चाहू लागले, आणि त्याला मोठा मान देऊं लागले. पुढें ग्रंथलेखनाच्या व्यवसायांत सगळा काळ घालवावा असा निर्धार करून त्यानें आपला मोठ्या पगाराचा लष्करी हुद्दा सोडला.

## मुलगा आणि शेतकरी

एका गरीब मुलास एक जिन्नस दुसऱ्या गावीं पोंचवायाची होती. हा गांव त्याच्या घरापासून तीन मैल होता. तेवढी मजल खेटून त्याला परत घरीं यावयाचे होतें. त्याच्या बापानें त्याला वाटेंत कोठें गमण्यांत वेळ घालवूं नको, असें निक्षून सांगितलें होतें. म्हणून तो मोठ्या लगबगीनें वाट चालत होता. रस्त्यांत त्याला पुष्कळ मौजेच्या वस्तु दिसल्या. पण त्या पाहत रहावें हें बरें नाहीं, असें त्याला वाटलें. असा तो झपाट्यानें चालला असतां त्याच्या मागून एक गाडी आली. तींत एक शेतकरी बसला होता. त्यानें त्या मुलास कोठे चालला आहेस म्हणून विचारिलें. त्यानें गांवाचें नांव सांगितल्यावरून तो शेतकरी त्यास म्हणाला: ''मुला, माझी गाडी त्याच गावावरून जाणार आहे. तर तूं माझ्यामागे येऊन बस. मी तुला त्या गांवीं नेऊन सोडितों.'' हे त्याचे ममतेचे शब्द ऐकून त्याला मोठा हर्ष झाला, आणि तो त्याच्या गाडींत चढून बसला. गाडी चालू झाल्यावर शेतकरी त्यास म्हणाला: ''मुला, तुला मी गाडींत घेतलें याचें कारण असें कीं, तूं आपल्या कामांत मोठा दक्ष आहेस असें माझ्या नजरेस आलें. तुला वेळेचें महत्त्व कळत आहे. तुझ्या वयाचीं मुलें म्हटली म्हणजे तीं वाटेनें कधीं नीट चालावयाची नाहींत. तीं रमतरमत जावयाची. पण तुझें तसें नाहीं. तूं वाटेनें नीट चालत होतास, आणि वेळ मुळीच न गमाविता आपलें काम उरकावें असा तुझा निर्धार दिसला. तो मला पसंत वाटला.''

## वेळेचा दुरुपयोग

एक गारुडी एका राजाच्या कारभाऱ्याकडे जाऊन म्हणाला: ''महाराज, मला एक उत्कृष्ट करामत येते. तशी करामत कोणीं कधीं पाहिली नसेल. ती मला राजासमोर करून दाखविण्याचा परवानगी मिळवून द्याल तर मज गरिबावर मोठे उपकार होतील.'' ही त्याची विनंती मान्य करून त्या कारभाऱ्यानें राजास विचारून त्याला राजवाड्यांत बोलाविलें व आणि आपली करामत करून दाखवावयास सांगितलें. त्याप्रमाणें तो तेथें गेला. जातेवेळीं भिजलेले वाटाणे त्यानें एका पेल्यांत नेले. मग एक सुई आपल्यासमोर धरावयास सांगून तो गारोडी तीवर वाटाणे मारूं लागला. ते तो असे अचूक मारी कीं, प्रत्येक वाटाणा सुईच्या अग्राला जाऊन लागे, आणि तींत अडकून राही. ही अशी त्याची कुशलता पाहून राजा त्यास म्हणाला: ''भल्या मनुष्या, तूं ही करामत अशी उत्तम रीतीनें साध्य करण्यासाठी पुष्कळ काळ घालविला असावा. तर हीबद्दल तुला मी आतां बक्षीस देतों.'' असें म्हणून तो आपल्या सेवकाच्या कानांत कांहीं पुटपुटला त्यासरशीं तो बाहेर गेला आणि एक जड पोतें घेऊन परत आला. तें पाहून त्या गारुड्याला वाटलें कीं, राजा खुश होऊन आपणास पोतें भरून सोनें देत आहे.

मग राजानें तें पोतें उघडावयास सांगितलें, तो त्यांत वाटाण्यांखेरीज दुसरें कांहीं नाहीं असें आढळून आलें. राजा त्या गारुड्याला म्हणाला: ''अरे, तूझी ही करामत कोणाच्या यत्किंचित्‌ही उपयोगाची नाहीं. ही शिकण्यांत तूं आपल्या काळाचा बराच अपव्यय केला आहे. म्हणून हीबद्दल तुला अगदीं भिकार बक्षीस द्यावयाचें. ही तुझी करामत करून दाखवावयास तुला वाटाणे मिळण्याची अडचण पडूं नये, म्हणून तुला हे देत आहों.''

## शाळेंतले सोबती

एका गृहस्थाला एका दरिद्री मनुष्यानें नांव घेऊन हाक मारिली, आणि कांहीं पैसे उसने देतोस काय, म्हणून विचारिलें. हा दरिद्री मनुष्य एवढ्या सलगीने हाक मारीत आहे, हा आहे तरी कोण तें पाहावे असा विचार करून तो थांबून त्याच्या तोंडाकडे न्यहाळून पाहूं लागला. पण तो त्याला ओळखेना. त्याच्या अंगांत जीर्ण झालेले व मळलेले कपडे होते; व त्याचे डोळे खोल गेले होते. हा गृहस्थ आपणाला ओळखीत नाहीं, असें पाहून तो दरिद्री मनुष्य म्हणाला : ''अरे, तूं आणि मी लहानपणीं एका वर्गांत होतों. माझें नांव हारी ब्राऊन. तुला आठवत नाहीं?'' तें नांव ऐकतांच त्या गृहस्थाला आठवलें कीं, ह्या नांवाचा एक श्रीमंताचा मुलगा आपल्या शाळेंत होता.

मग तो त्याला म्हणाला, ''गड्या, ह्या नांवाचा एक माझा शाळासोबती होता हें मला स्मरतें. पण तो मोठ्या श्रीमंताचा मुलगा होता. तोच जर तूं असशील, तर तुझी अशी दशा होण्याचें कारण काय? तुझ्या वडिलांची एवढी दौलत होती, ती काय झाली?'' तो दरिद्री मनुष्य म्हणाला: ''बाबा, माझ्या बापानें मला पुष्कळ दौलत ठेविली होती. पण ती माझ्या मूर्खपणामुळें सगळी गेली. मला वेळेचें महत्त्व न कळून मी माझा कोणताच व्यवहार वेळच्या वेळीं केला नाहीं. त्यामुळें मी आज असा कंगाल दशा पावलों आहें. माझ्या सगळ्या संपत्तीचा नाश होऊन आतां मला निर्वाहाची पंचाईत पडली आहे. मी माझ्या तरुण वयाचा चांगला उपयोग केला नाहीं. हुचेपणांत सगळा काळ घालवून मी आज अगदीं निरुपयोगी बनून राहिलों आहें. कोणताही हुन्नर किंवा धंदा मी मन लावून शिकलों नाहीं. ह्यामुळे मी आज असा विपत्तींत आहें. याचा मला मोठा पस्तावा वाटत आहे.'' ही त्याची हकीकत ऐकून त्या गृहस्थाचें मन द्रवलें, आणि त्याला आपल्या घरीं नेऊन त्याची अन्नवस्त्राची ददात त्यानें मिटविली. पुढें त्यानें त्याला चांगलें काम लावून देऊन आपल्या पायांवर उभें रहाण्याचें सामर्थ्य आणून दिलें.

## कधीं उशीर करूं नका

एक शिक्षक आपल्या वर्गांतला एकादा मुलगा घंटा वाजतांक्षणीं आपल्या जागीं येऊन बसला नाहीं तर भारी संतापे, आणि उशिरां येणाऱ्या मुलांस शिक्षा करी. त्याच्या वर्गांतला एक मुलगा अमळ आळशी असे. तो वारंवार उशीर करी आणि त्याबद्दल शिक्षा भोगी. ऐके दिवशीं तो बराच उशिरां आला म्हणून त्याला शिक्षकानें जबर शिक्षा केली. शाळा सुटल्यावर तो आपल्या एका सोबत्यास म्हणाला: ''आमचे गुरुजी कोणी उशिरां आला तर त्यावर एवढे कां बरें संतापतात?''

सोबती–हें पाहा, वर्गांतले धडे सुरू झाल्यावर एकादा मुलगा उशिरां आला म्हणजे त्याजकडे सगळ्या मुलांचें लक्ष जातें, त्यामुळें त्यांचें धड्याकडे दुर्लक्ष होतें; आणि त्या उशिरां आलेल्या मुलाचाही तेवढा धडा बुडतो. गुरुजी त्याच्यासाठीं म्हणून पुन: कांहीं तोच धडा सांगत नाहींत. त्यामुळें तो मुलगा बाकीच्या मुलांच्या मागें रहातो हें आमच्या गुरुजींला मुळीं आवडत नाहीं. ह्यावरून हें लक्षांत आणावयाचें कीं, ते आमच्या शिकण्याची भारी काळजी वाहतात. त्यामुळें त्यांला उशिरां येणाऱ्या मुलास बोलावें लागतें, आणि तो पुन:पुन: उशिरां येऊं लागला तर त्याला शिक्षाही करावी लागते. असें करण्यांत त्यांच्या मनाचा संताप होऊन बाकीच्या मुलांचें तेवढें नुकसान

होतें. कारण उशिरां आलेल्या मुलास शिक्षा करण्यांत जेवढा वेळ जातो, तेवढा वेळेवर आलेल्या मुलांच्या शिक्षणांत व्यत्यय येतो. उशिरां येणारा मुलगा ह्याप्रमाणें आपला व दुसऱ्यांचा नाहक तोटा करितो. शिवाय याला वक्तशीर येण्याची सवय लहान वयांत लागली नाहीं, तर तो मोठेपणीं आपल्या उद्योगावर नेमिलेल्या वेळीं जाणार नाहीं, त्यामुळें त्याचें पदोपदीं नुकसान होण्याचा संभव असतो.

आळशी मुलगा–गुरुजी वारंवार असेंच म्हणत असतात, तें मीं कधीं मनास आणिलें नव्हतें; पण आतां मला तें नीट समजलें आहे. तर आजपासून मी कधीं उशीर करणार नाहीं. शाळेंत वेळच्यावेळी येण्यास झटेन. तूं शाळेत जाऊं लागलास म्हणजे माझ्या दारावरून येऊन मला हाक मारीत जा. तूं आणि मी बरोबर शाळेत जाऊं.''

## वेळ फुकट घालविल्याबद्दल दंड

बेंजामीन फ्रान्कलीन नांवाचा एक अतिप्रख्यात पुरुष अमेरिकेंत होऊन गेला. हा मोठा उद्योगी व प्रामाणिक होता. आरंभीं हा एका छापखान्यांत काम करीत असे. पुढें हा स्वत: छापखान्याचा मालक होऊन एक वर्तमानपत्र काढूं लागला. त्याचें पुस्तकांचें दुकानही होतें. एके दिवशीं तो आपल्या छापखान्यांत वर्तमानपत्र छापण्याच्या घाईंत असतां एक इसम रमतरमत त्याच्या दुकानांत शिरला आणि पुस्तकें पाहूं लागला. असा एक तास पाहत राहिल्यावर त्यानें एक पुस्तक उचलून त्याची किंमत दुकानांतल्या नोकरास विचारिली. त्याचा एक डॉलर (तीन रुपये) पडेल, असें त्यानें सांगितलें. तेव्हां तें पुस्तक जागच्या जागीं ठेवून तो पुन: आणखी एक तास दुसरीं पुस्तकें पाहत राहिला; आणि पुन: तेंच पुस्तक उचलून त्याची त्यानें पुन: किंमत विचारिली. ती त्या नोकरानें अगोदरच्याइतकीच सांगितली. तेव्हां त्यानें त्याला विचारिले: ''फ्रान्कलीन घरीं आहेंत काय?'' नोकर म्हणाला: ''ते छापखान्यांत काम करीत आहेत.'' तो म्हणाला: ''त्यांना इकडे बोलाव. त्यांच्यापाशी माझें कांहीं काम आहे.'' नोकरानें जाऊन फ्रान्कलिनास बोलावून आणिलें. तो आला तेव्हां या मनुष्यानें या पुस्तकाची किंमत त्याला पुसली. तेव्हां फ्रान्कलिनानें तत्काळ म्हटलें: ''ह्याचा तुम्हांला सवा डॉलर पडेल.'' तो म्हणाला: ''अहो, तुमचा नोकर याची किंमत एक डॉलर आहे म्हणून सांगतो, आणि तुम्ही म्हणतां कीं, याचा सवा डॉलर पडेल. याचा अर्थ काय? तर नक्की किंमत काय पडेल ती सांगाना.'' फ्रान्कलीन म्हणाला: ''आतां याची किंमत दीड डॉलर पडेल.'' हें ऐकून तो मनुष्य अचंबा पावून म्हणालाः ''अहो, इतक्यांत याची किंमत दीड डॉलर झाली कशी?'' फ्रान्कलीन म्हणाला: ''मला माझें काम

सोडून येथें येऊन वेळ मोडावा लागला नसता तर त्याची तुम्हांला एक डॉलर किंमत पडली असती; पण माझा वेळ विनाकारण मोडिल्याबद्दल मी तुमच्याकडे पहिल्यानें पाव डॉलर जास्त मागितला. पण तुम्हीं पुनः घासाघीस करून माझा आणखी खोळंबा केला, म्हणून मी आतां याची किंमत तुम्हांकडून दीड डॉलर घेणार. माझ्या वेळेला कांहीं मोल म्हणून आहेच. तें घेतल्यावांचून हें पुस्तक मी तुम्हांला देणार नाहीं.'' हे शब्द ऐकून तो मनुष्य ओशाळला, आणि दीड डॉलर देऊन तें पुस्तक घेऊन तो मुकाट्यानें चालता झाला.

## उशीर केल्याबद्दल शिक्षा

एक मुलगा कोणतेंही काम वेळच्यावेळीं करीत नसे. त्याला शाळेंत जाण्यास नेहमीं उशीर होई. त्यामुळें त्याला शिक्षकाचें बोलणें सोसावें लागे. त्याच्या घरांतलीं वडील माणसें सुद्धां त्याला ह्या खोडीबद्दल वारंवार रागें भरत. पण त्याची वाईट सवय कांहीं केल्या जाईना. एके दिवशीं त्याच्या घरांतल्या सगळ्या माणसांनीं एका गांवीं जत्रेस जाण्याचा बेत केला. हा गांव दूर असल्याकारणानें त्यांला आगगाडींत बसून जावयाचें होतें. गाडी स्टेशनावरून बरोबर आठ वाजतां सुटावयाची होती. ती चुकली तर मग दुसरी गाडी संध्याकाळीं यावयाची होती. ती मुळीं सोईची नव्हती. ह्या मुलास त्याच्या आईनें आदल्या रात्रीं बजावून सांगितलें होते कीं, उद्यां साडेसात वाजतां निघण्याची तयारी झाली पाहिजे. तूं लौकर उठून बाकीच्यांबरोबर तयार असलें पाहिजे.'' ती जत्रा फार गमतीची असल्यामुळें त्या मुलास ती पाहण्याची फार उत्कंठा लागली होती; आणि जत्रेच्या निमित्तानें त्याच्या शाळेला सुटी असल्याकारणानें त्याचे दुसरे सोबतीही त्या दिवशीं जत्रेला जावयाचे होते. ह्यासाठीं त्या दिवशीं तो लौकर उठून आपल्या दुसऱ्या भावंडांबरोबर आंघोळ व न्यहारी करून तयार झाला. पण तेवढ्यांतच त्याला वाटलें कीं, निघण्यास अजून विलंब आहे, तर आपण बागेंत थोडें फिरून यावें. त्या लहरीप्रमाणें त्यानें बागेकडे धाव मारिली.

इकडे सगळ्यांची निघण्याची तयारी झाली. पण तो मुलगा कोठें दिसेना. तीं त्याला हाका मारूं लागलीं. पण तो ओ म्हणेना. तेव्हां त्याचा बाप म्हणाला: ''त्याला शोधीत रहाल तर तुमची सगळ्यांची गाडी चुकेल. गाडी कांहीं तुमच्यासाठीं थांबणार नाहीं. तो हवा तर येईल मागाहून.'' असें म्हणून तो आपल्या मुलांमाणसांस घेऊन स्टेशनावर गेला, आणि तिकिटा काढून त्या मुलाची आणखी थोडा वेळ वाट पहात राहिला. पण तो कोठेंच दिसेना, तेव्हां गाडी सुटतांसुटतां तीं सगळीं डब्यांत शिरलीं.

गाडी स्टेशनांतून निघत होती, तों तो मुलगा दुरून धावत येतांना दिसला. पण त्याच्या एकट्यासाठीं आगगाडी कोठून थांबायाला! ह्याप्रमाणें तो निराश व खिन्न होऊन माघारीं गेला, आणि त्याला घरीं सगळा दिवस एकटे रहावे लागलें. त्याची सगळी गमत बुडाली.

## पांच मिनिटांचा उशीर

जोनाथन नांवाचा एक मोठा श्रीमंत गृहस्थ होता. त्याला मूलबाळ कोणी नव्हतें. यास्तव त्याची सगळी दौलत त्याच्या पुतण्यांला मिळेल असें लोक म्हणत, आणि त्याचाही मनसुबा असाच होता. त्याचे एकंदर तीन पुतणे होते. त्या तिघांला आपली दौलत सारखी वांटून द्यावी, असा त्यानें आरंभी बेत केला होता; पण पुढें त्यांतल्या एका पुतण्याला त्यानें कांहींएक ठेविलें नाहीं. याचें कारण असें कीं, हा पुतण्या कोणतेंही काम वेळेवर करीत नसे: आणि तो श्रीमंत गृहस्थ तर आपली सगळी कामे वेळच्यावेळी करी. कोणत्याही कामाला थोडासुद्धा उशीर लागलेला त्याला बिलकूल खपत नसे. ह्या पुतण्यावर त्याची पहिल्यापासून मोठी मर्जी होती. पण तो वेळच्या वेळीं कसलेंच काम करण्यास तत्पर नसे, हें त्याच्या नजरेस आल्यामुळें त्याच्या मर्जींतून तो साफ उतरला.

ह्या गृहस्थाला एके दिवशीं बाहेर गांवीं जावयाचें होते; म्हणून त्यानें ह्या आपल्या आवडत्या पुतण्याला आपला थोडासा बोजा गाडीवर नेण्यासाठीं सकाळीं सात वाजतां बोलाविलें. पण त्याला कोणतेंच काम वेळेवर करण्याची सवय नसल्यामुळें तो नेमिलेल्या वेळीं आला नाहीं. त्याला पांच मिनिटें उशीर झाला. सात वाजतांक्षणीं त्याचा चुलता गाडीवर निघून गेल्यामुळें तो तेथपर्यंत धावत गेला. पण तेवढ्या अवकाशांत गाडी बरीच दूर निघून गेली होती. मग तो खट्टू होऊन माघारीं आला.

हा गृहस्थ एक महिना घरीं परत आला नाहीं. त्याचा परत निघण्याचा दिवस आला तेव्हां त्यानें ह्या आपल्या पुतण्याला आपण कोणत्या दिवशीं कोणत्या गाडीनें निघणार तें कळवून, आणखी असें लिहिलें कीं, ''घरून निघतांना तूं नेमिलेल्या वेळीं येऊन माझा बोजा नेण्यास मला साहाय्य केलें नाहीं, याबद्दल मला तुझा राग तर आला आहेच; तरी पण मी परत येणार त्या दिवशीं तूं माझा बोजा न्यावयास येशील तर तुजवरचा माझा राग नाहींसा होईल.'' हें चुलत्याचें पत्र वाचून त्याला धीर आला, आणि आतां त्याची मर्जी संपादण्याची ही संधि व्यर्थ घालवायाची नाहीं, असा त्यानें निश्चय केला. पण तो हाडाचाच आळशी असल्यामुळें त्यानें असा विचार केला कीं,

गाडी नेमिलेल्या वेळीं फार करून कधीं येत नसते. तिला पांचदहा मिनिटें उशीर हा आपला नेहमीं व्हावयाचाच. यास्तव अगदीं वेळेवरच तेथें गेलें पाहिजे असें नाहीं. दोनचार मिनिटे उशीर झाला तरी चालेल. असे मनात आणून तो गाडी येण्याच्या ठरलेल्या वेळेनंतर पांच मिनिटांनी तेथें जाऊन पोंचला, आणि पाहतो तों गाडी त्या दिवशीं अगदीं वेळेवर येऊन त्याचा चुलता बोजा घेऊन घरीं चालता झाला. हें पाहून त्याला अतिशयित खेद झाला; आणि त्याचा तो चुलता तर त्याच्यावर इतका रुष्ट झाला कीं, त्याच्याबरोबर तो मुळीं बोलेना कीं त्याजकडे पाहीना. ह्याप्रमाणें त्याचें घर त्याला वर्ज्य झालें. पुढें त्या गृहस्थानें आपलें मृत्युपत्र करण्याचा बेत केला; आणि आपल्या पुतण्यांला अमुक वेळीं आपल्याकडे यावें असें सांगून पाठविलें. दुसऱ्या दोघांबरोबर ह्या आळशी पुतण्यालाही त्यानें निरोप पाठविला, आणि बजाविलें कीं, ''आज तरी तूं वेळेवर येऊन मला भेट.'' हा निरोप कानीं पडताच तो चुलत्यास भेटायाला आतुर होऊन नेमिलेल्या वेळीं त्याच्या घरीं जावयास गेला. त्याच्या दाराशीं गेल्यावर तो घड्याळ काढून पाहतो तो नेमिलेला वेळ अगदीं भरला होता. पण तो वर जातो तों त्याला कोणी दार उघडीना. कारण त्याला यावयाला उशीर झाल्याकारणानें त्याच्या चुलत्यानें आपल्या चाकरांला असा हुकूम केला होता कीं, तो दाराशीं आला असतां त्याला आंत घेऊं नये. मग त्यानें आपलें घड्याळ तेथल्या घड्याळाशीं ताडून पाहतां आपलें घड्याळ पांच मिनिटें मागें आहे, असें त्याला आढळून आलें. हें पाहून तो पराकाष्ठेचा कष्टी झाला, आणि कपाळावर हात मारून दुःख करीत तेथून परतला. इकडे त्याच्या चुलत्यानें आपली दौलत त्या दुसऱ्या दोघां पुतण्यांला सारखी वांटून दिली. तींतला एक छदामही त्यानें त्या आळशी पुतण्यास ठेविला नाहीं!

❏❏❏

## भाग अकरावा

# सावधगिरी

## हत्तीचा सावधपणा

एका गृहस्थाचा एक हत्ती होता. त्याचा महात त्याला कधींकधीं शहरांत नेई. त्या गृहस्थाच्या घराजवळ एक नदी होती. तीवर एक लाकडी पूल होता. त्यावरून त्या हत्तीला तो नेई. तो हत्ती त्यावरून जाऊं लागला म्हणजे प्रथम तो मजबूद आहे कीं कसें, तें आपल्या सोंडेने अजमावून पाहत असे. एके दिवशीं नेहमींच्या क्रमाप्रमाणें याचा महात त्याला त्या पुलावरून नेऊं लागला. पण तो कांहीं केल्या यावर पाय ठेवीना. तेव्हां महाताने रागावून त्याच्या गंडस्थळावर अंकुशाचा असा सपाटून मार दिला कीं तो रक्तबंबाळ झाला. तेव्हां निरुपाय होऊन तो त्या पुलावर चढला. पण तो अर्धावर गेला न गेला तों तो पूल कोसळला आणि तो महातासकट नदीत पडला. त्यामुळें महात तत्काळ ठार झाला, आणि हत्तीला मोठी दुखापत झाली. त्याप्रमाणें त्या मुक्या प्राण्यानें सावधपणा दाखवून या अनर्थाचा इशारा त्या महातास दिला असतां, त्यानें त्याची परवा केली नाहीं, याबद्दल त्याला देहांतशिक्षा मिळाली.

## मुंग्यांचा सावधपणा

अमेरिकेंतल्या एका शहराच्या लगत्यास एके ठिकाणीं कांहीं मुंग्या ट्रामची रेल ओलांडून पलीकडच्या झाडांत भक्ष्यासाठी नित्य जात असत. त्या अशा रेलीवरून जात असतां तिकडून गाडी आली म्हणजे तिच्या चाकांखाली चिरडून त्यांपैकीं पुष्कळ मरत. हा असा धोका पाहून त्या मुंग्यांनीं रेलीच्या खालून पोखरून पलीकडे जाण्यास वाट केली. एके दिवशीं एक गृहस्थ त्या वाटेने सहल करीत असतां, मुंग्यांनी केलें तें विवर त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां त्यानें तें दगडमाती घालून बुजवून टाकिलें;

आणि त्या मुंग्या कोठल्या वाटेनें जातात तें पाहत तो तेथें उभा राहिला. त्या मुंग्या त्या विवराजवळ येऊन पाहतात तों तें बंद झालें आहे असें त्यांनां आढळून आलें. तरी त्या वेळीं त्यांनीं रेलीवरून जाण्याचें धाडस केलें नाहीं. त्यांनीं लागलींच दुसरें विवर पाडण्यास सुरुवात केली. त्यांला त्यापूर्वीं अनेक वेळां घडलेली अद्दल चांगली आठवत असून पुनः तशा संकटांत न पडण्याचा त्यांनीं निर्धार केला होता, हें स्पष्ट होतें.

## तीन गाडीवान

एका गृहस्थाचा गाडीवान मरण पावला असतां त्यानें आपणाला एक गाडीवान पाहिजे अशी जाहिरात दिली. ती पाहून एक मनुष्य त्याच्याकडे ती नोकरी मागायास आला; आणि त्यानें पूर्वीं काम केल्याचे दाखले त्याला दाखविले. तेव्हां त्यानें त्या मनुष्याला असा प्रश्न केला कीं, ‘‘तुला कड्याच्या बाजूनें जाणाऱ्या रस्त्यावरून गाडी हाकावयाची असली तर तूं ती कड्यापासून किती अंतरावरून सुरक्षितपणें हाकून नेशील?’’ तो म्हणाला: ‘‘कड्यापासून एक तसू अंतरावरून ती मी नेईन.’’ तें त्याचें उत्तर ऐकून त्या गृहस्थानें त्याचें नांव पत्ता वगैरे विचारून घेऊन म्हटलें:‘‘तुझी मला गरज लागल्यास मी तुला बोलावीन.’’ पुढें एकदोन दिवसांनीं दुसरा एक माणूस त्याच्याकडे ती नोकरी मागावयास आला. त्यालाही त्यानें तोच प्रश्न विचारिला, तेव्हां त्यानें असा जवाब दिला कीं, ‘‘मीं कड्यापासून अर्धा तसू अंतरावरून गाडी हाकीन. अशी मीं अनेक वेळां हाकिली आहे.’’ हें त्याचें उत्तर ऐकून त्यानें त्याचेंही नांवगांव विचारून त्याला रजा दिली. शेवटीं तिसरा एक माणूस त्याच उद्देशानें त्या गृहस्थाकडे आला. त्यालाही त्यानें तोच प्रश्न विचारिला. तेव्हां तो म्हणाला: ‘‘महाराज, असलें धाडस मीं जन्मांत कधीं केलें नाहीं, व यापुढें करणार नाहीं. असल्या ठिकाणावरून गाडी मी कधींही नेणार नाहीं आणि न्यावी लागलीच तर ती कड्यापासून जितकी दूर राखववेल तितकी राखण्याची मी खबरदारी घेईन.’’ हें त्याचें शहाणपणाचे उत्तर ऐकून त्या गृहस्थाच्या पसंतीस तो उतरला, आणि त्याचे पूर्वींचे दाखले वगैरे पाहून त्याला त्यानें आपल्या नोकरीस ठेविलें.

## जोडे साफ करणारा मुलगा

एका श्रीमंत व्यापाऱ्याच्या घरीं एक लहान मुलगा चाकरीला होता. जोडे साफ करण्याच्या व चिठीचपाटी पोंचविण्याच्या कामावर त्याची नेमणूक होती. हें काम तो अगदीं मन लावून व जपून करी. त्याच्या कामाला नांव ठेवण्याचा प्रसंग त्या व्यापाऱ्याला किंवा त्याच्या घरांतल्या इतर माणसांला कधींही येत नसे. शिवाय तो चांगला बुद्धिमान्

व चाणाक्ष असल्यामुळें त्याला कसलेही काम सांगितले तरी तें तो हुशारीनें व दक्षतेनें करी. असे त्याच्या अंगचे गुण पाहून त्या व्यापाऱ्याच्या लक्षांत आलें कीं, हा मुलगा घरांतल्या हलक्यासलक्या कामांहून विशेष मोठीं कामे करण्यास लायक आहे. मग त्यानें त्याला आपल्या पेढीवर नोकरीस ठेविलें; तेथेंही तो सांगावें तें काम मोठ्या काळजीनें करी. त्यामुळें तेथल्या सगळ्या लहानमोठ्या कामदारांचा त्याजवर लोभ जडला. शिवाय त्या मुलानें फावल्या वेळीं उपयुक्त ग्रंथ वाचून आपलें ज्ञान व माहिती बरीच वाढविली. हे पाहून त्याला या पेढीवरचीं एकामागून एक मोठींमोठीं कामे मिळत गेलीं. तीं तो मोठ्या दक्षतेने करून सारखी बढती मिळवीत गेला. त्याप्रमाणेंच व्यापारास लागणारा सगळा अनुभव त्याला क्रमाक्रमानें मिळत जाऊन स्वतंत्रपणें व्यापार करण्याची धमक त्यास आली, आणि तो थोड्याच अवकाशांत मोठा सधन व वजनदार व्यापारी झाला. कारण आपले हरएक काम मोठ्या दक्षतेनें व जपून करण्याची त्याची सवय वयमानाप्रमाणें बळावत जाऊन त्याला आपल्या धंद्यांत एकसारखी बरकत येत गेली; आणि प्रामाणिकपणा, करारीपणा, दक्षता इत्यादि गुणांविषयीं त्याचा लौकिक चोहोंकडे होण्यास विलंब लागला नाहीं.

हा नवीन संपन्न व्यापारी एके दिवशीं आपल्या मुलांसह एका जलशाला गेला असतां, त्याच्या पूर्वीच्या धन्याचे तरुण मुलगे आपल्या समवयस्क स्नेह्यांसह त्याच्या मागल्या रांगेंत बसून गलबला करीत होते. त्यांतल्या एका मुलाची नजर त्या व्यापाऱ्याकडे जाऊन तो त्यास हिणविण्याच्या दुष्ट उद्देशानें लोकांला ऐकूं येईसें मोठ्यानें म्हणाला: ''हा आपल्यापुढें बसलेला माणूस एके वेळीं माझे जोडे साफ करावयास होता.'' हे त्याचे शब्द ऐकून तो व्यापारी मागें वळून म्हणाला: ''होय, महाराज, मी आपले जोडे साफ करीत असें हें खरें; पण ते मी चांगले जपून साफ करीत नसें काय?'' हें ऐकून तो तरुण मुलगा ओशाळून आणखी एकही शब्द बोलला नाहीं.

## एक मुलगा पाहिजे

एका शहरांत एक मोठा दुकानदार होता. त्याच्या दुकानाच्या खिडकींत कित्येक दिवसपर्यंत ''एक मुलगा पाहिजे'' अशा शब्दांची जाहिरात होती. एकादे दिवशीं ती जाहिरात थोडा वेळ नसे; आणि मग पुन: ती लाविलेली दिसे. याचें कारण असे कीं, त्या दुकानदारास मनाजोगा माणूस मिळत नसे. एकादा मुलगा नोकरीस रहाण्यासाठीं आला म्हणजे त्याची तो परीक्षा करी, आणि तो कसोटीस उतरला नाहीं म्हणजे त्याला नको म्हणून सांगे. त्याची कसोटी पाहण्याची तऱ्हा येणेंप्रमाणें होती: कोणी मुलगा

नोकरीस रहावयास आला म्हणजे त्याला प्रथम दुकानांतलें कांहीं सटरफटर काम थोडा वेळ तो सांगे, आणि मग त्या दुकानाला एक माळा असे त्यावर त्याला पाठवी. त्या ठिकाणीं एक मोठी पेटी असे. त्यांतल्या सगळ्या जिनसा नीट रचून ठेवावयास त्याला सांगे. हा माळा अमळ ठेंगणा असून त्यांत हवा व उजेड बेताचाच जाई; आणि त्यावर अनेक प्रकारचें जुनें सामान भरून ठेविलें असे. त्यामुळें तेथें गेलें म्हणजे गुदमरल्यासारखें होई. शिवाय त्या पेटींत खिळे, चाव्या वगैरे मोडकेंतोडकें, बारीक व जुनेंपुराणें सामान कचऱ्यासारखें भरून ठेविलें असे. तो सगळा कचरा बाहेर काढून पुन: नीट रचून ठेवण्याची दगदग करण्याचा नवीन मुलास त्रास येई, आणि तो आपल्याच्यानें हें काम होणार नाहीं व असला कचरा नीट लावून ठेवण्यांत मुळीं हांशील नाहीं, असें खालीं येऊन दुकानदाराला सांगे. मग दुकानदार त्याला म्हणे कीं, ''तुला असलें काम करावेंसें वाटत नाहीं, तर तुझी मला गरज नाहीं.'' अशा रीतीनें त्या दुकानदारानें बऱ्याच मुलांची पारख केली व त्यांला घालवून दिलें. शेवटीं एक मुलगा त्याच्या कसोटीस पूर्णपणें उतरला. त्याला त्या पेटींतले सामान चांगलें रचून ठेवण्यासाठीं पाठविलें असतां, त्यानें तें सगळें मोठ्या काळजीनें बाहेर काढून ठेवून पेटी चांगली झाडून झटकून साफ केली, आणि पुन्हा: तें सगळें रद्दी सामान त्यानें तींत उत्तम प्रकारे रचून ठेविलें. त्यांतली एक चूक किंवा चावी बाहेर राहू दिली नाहीं. अशा रीतीनें त्या पेटींतल्या सगळ्या लहानमोठ्या जिनसा बाहेर काढून पुनरपि आंत रचून ठेवीत असतां त्यांत त्यास सोन्याचा एक लहानसा तुकडा सांपडला. तो त्यानें त्या पेटींत ठेविला नाहीं, तो त्यानें आपल्या धन्याकडे आणून दिला. हें काम करण्यांत त्याचा सगळा दिवस मोडला. पण तो मुळीं त्रासला नाहीं; आणि त्याला खाणेपिणे कांहीं सुचलें नाहीं. त्या दुकानदारानें त्याला न्यहारीसाठीं व जेवणासाठीं हाका मारिल्या, तेव्हांच फक्त तो खालीं उतरला. असा त्याचा प्रामाणिकपणा, उद्योगीपणा, व काळजीनें काम करण्याचा निश्चय पाहून त्या दुकानदारास तो पसंत पडला; आणि त्यानें त्याला आपल्या नोकरीस ठेविलें. अशा रीतीनें पारखून ठेविलेला हा मुलगा पुढें उत्तम कामगार निपजला; आणि त्या दुकानदारानें त्याला आपला भागीदार केलें.

## जादूची डबी

एक मोठी श्रीमंत बाई होती. तिच्या घरीं चाकरप्यादे, गाड्यांघोडीं व गुरेंढोरें बरींच होतीं. पण तिचें हमेशा कांहीं ना कांहीं नुकसान होई. त्यामुळें तिची दौलत कमीकमी होत चालली. ही अशी आपली हानि होत आहे हें पाहून तिला मनस्वी विस्मय वाटे.

तेव्हां जवळच्या जंगलांत एक गोसावी होता त्याला आपली हानि कां होते तें विचारावें, असा विचार तिने केला. त्याप्रमाणें ती त्या गोसाव्याकडे जाऊन म्हणाली: ''गोसावीबावा, माझा नित्य कांहीं ना कांहीं तोटा होत असतो, त्यामुळें माझी संपत्ति खलास होत चालली आहे. माझ्यावर कोणाचा तरी जादू असावा. तो उडविण्याचा कांहीं उपाय असेल तर पाहा.'' तो गोसावी मोठा चाणाक्ष होता; आणि त्याचा स्वभाव अमळ गमती होता. त्यानें तिला क्षणभर थांबायाला सांगून आपल्या पर्णकुटिकेंतून एक डबी आणिली, आणि ती तिच्या हातीं देऊन म्हटलें: ''बाई, हींत जादू भरली आहे. ही डबी घेऊन दररोज दिवसास तीन वेळां व रात्रीस तीन वेळां आपल्या स्वयंपाकघरांत, कोठींत व तबेल्यांत जात जा. त्याप्रमाणेंच तुझ्या वाड्याच्या व बागेच्या प्रत्येक भागीं ही फिरवीत जा. हा नेम एक दिवससुद्धां चुकवूं नको. असें तूं करीत राहिलीस म्हणजे तुझा सगळा व्यवहार नीट चालेल, व तुझें कांहींएक नुकसान होणार नाहीं. असें तूं एक वर्ष कर, आणि मग ही डबी मजकडे आणून दे. ही परत द्यावयाला विसरूं नको.''

त्या बाईचा त्या गोसाव्यावर पूर्ण विश्वास असल्याकारणानें तिने तीं डबी जादूची समजून मोठ्या भाविकपणानें घरीं नेली; आणि त्याच्या सांगण्याप्रमाणें ती चोहींकडे फिरवूं लागली. असें ती करूं लागली तेव्हां चाकरांच्या पुष्कळ लबाड्या व चोऱ्या तिच्या नजरेस आल्या. तिच्या घरांतल्या चांगल्याचांगल्या वस्तु चोरतांना किंवा ह्यांवर ताव मारतांना तिने आपल्या नोकरास पकडिलें. घोडे व गुरें यांची निगा चाकर नीट करीत नाहींत, असें तिला आढळून येऊं लागलें. हा असा घोटाळा व बेबंदशाही पाहून ती नोकरांला शिक्षा करूं लागली. कित्येकांला तर तिला काढून टाकावें लागलें. अशी तिची करडी देखरेख होऊं लागली तेव्हां तिचे सगळे चाकरप्यादे आपआपलीं कामें विशेष काळजीनें व प्रामाणिकपणानें करूं लागले; आणि तिचें कसलेंहि नुकसान होईनासें झालें. ह्यावरून ती डबी मोठी गुणकारी आहे अशी तिची खात्री झाली. वर्षाची मुदत संपल्यावर तिने ती डबी गोसाव्याकडे नेऊन म्हटलें: ''गोसावीबावा, ह्या डबींत अजब गुण आहे. ही माझ्या हातीं आल्यापासून माझी हानि मुळीं झाली नाहीं. माझा सगळा कारभार यथास्थितपणें चालला आहे. तरी ही डबी मजकडे राहूं द्या.'' हे तिचे शब्द ऐकून तो गोसावी हसून म्हणाला: ''बाई, ही डबी तर मला परत हवी. पण हींत जी जादूची वस्तु आहे ती मी तुला देतों. या वस्तूंत किती गुण आहे हें तुला एका वर्षांच्या अनुभवानें कळून आलेंच आहे.'' असें म्हणून ती

डबी घट्ट बसवून बंद केली होती, ती उघडून तींत ठेविलेला एक कागद त्यानें तिच्या हातीं दिला. या कागदावर त्या येणेंप्रमाणें लिहिलें होतें, ''तुला ह्या संसारांत उत्कर्ष पावावयाचा असेल, तर तूं आपला सगळा व्यवहार नीट लक्ष लावून पाहत जा. यासंबंधानें हेळसांड करूं नको.''

## कोणतेंही काम असलें तरी तें चांगले करावे

एका बड्या गृहस्थाची मोठी बाग होती. तिला लाकडाच्या फळ्यांचें कुंपण केलें होतें. त्याचा कांहीं भाग मोडून पडला होता, तो दुरुस्त करण्यासाठीं त्यानें एका तरुण सुताराला बोलाविलें, आणि त्याला तो कुंपणाचा भाग दाखवून सांगितलें कीं, ''हा एवढा नीट करून दे. त्याला ह्या येथें फळ्या पडल्या आहेत त्या लाव. ह्या कामाबद्दल तुला मी सहा शिलींग देईन. एवढ्या मजुरींत हें काम तुला होईल काय?'' तो सुतार तेवढ्या मजुरींत तें करून देण्यास कबूल होऊन तें करावयास लागला. पहिल्यानें तो फळ्या चांगल्या तासून रोखून तयार करूं लागला. अमळशानें, तो कसें काय काम करीत आहे, तें पाहावयास तो गृहस्थ आला. तेव्हां तो त्या फळ्या मोठ्या काळजीनें रोखून तयार करीत आहे असें पाहून तो त्याला म्हणाला: ''मला असें चोख काम नको. ह्या फळ्या तासून रोखून उजू करण्यांत आपला वेळ घालवूं नको. त्या आहेत तशा कुंपणाला लावून दे. एवढ्या सफाईची जरुरी नाहीं. का कीं, कुंपणाचा बाकीचा भाग कांहीं इतका सफाईदार नाहीं. तूं यांत कितीही वेळ घालविला तरी मी तुला सहा शिलिंगांहून जास्त मजुरी मुळीं देणार नाहीं.'' सुतार शांतपणे म्हणाला: ''तुम्हांला सफाई नको खरी, पण मला ती हवी आहे.'' असें म्हणून तो आपलें काम पूर्वीप्रमाणेच जपून करीत राहिला; आणि तो गृहस्थ त्याला आणखी कांहींएक न बोलता तेथून निघून गेला. मग बराच वेळ गेल्यावर तो गृहस्थ त्याचें काम कोठवर आलें आहे तें पाहाण्यासाठी पुन: तेथें आला; आणि पाहतो तों आपलें काम चोख व सफाईदार करण्यांत तो अगदीं गढून गेला आहे, असें त्याच्या नजरेस पडलें. तें पाहून त्याला वाटलें कीं, हा मनुष्य मोठा तऱ्हेवाईक आहे; याला मीं ओबडधोबड काम असलें तरीं चालेल असें निक्षून सांगितलें असून हा आपला क्रम सोडीत नाहीं. मग तो त्याला पुनः म्हणाला: ''भल्या माणसा, आपला वेळ विनाकारण कां दवडीत आहेस? अरे, या कुंपणावरून द्राक्षवेल सोडायाचे आहेत. हें कांहीं शोभेसाठीं करावयाचें नाहीं. तूं तें कितीही शोभिवंत केलें तरी तें द्राक्षांच्या वेलांखालीं झांकलें जाऊन कोणाच्या नजरेंत यावयाचें नाहीं.'' तो सुतार म्हणाला: ''लोकांच्या दृष्टीस हें पडले नाहीं, तरीं मी हें

जेव्हातेव्हां पाहणार आहें ना? मग तें माझ्या दृष्टीनें तरी कां ओबडधोबड रहावें?'' अंसे त्याला उत्तर देऊन तो आपलें काम करीत राहिला.

शेवटीं त्यानें तें कुंपण दुरुस्त करून त्या गृहस्थाला दाखविलें, तेव्हां त्यानें त्याला विचारिलें: ह्या कामाच तूं किती पैसे घेणार?'' सुतार म्हणाला: ''किती म्हणून काय विचारितां? तुम्ही सहा शिलिंग द्यावयाचे ठरविलें आहें ना? तेवढेच द्या म्हणजे झालें.'' हें उत्तर ऐकून तर त्या गृहस्थाला अधिकच आश्चर्य वाटलें. तें काम करण्यांत त्यानें ठरावापेक्षां पुष्कळ जास्त वेळ खर्चिला असल्याकारणानें तो जास्त मजुरी मागेल असें त्याला वाटलें होतें. पण तसें त्यानें केलें नाही. मग तो गृहस्थ त्याला अधिक पैसे आपल्या खुशीने देऊं लागला, पण तो ते न घेतां आपलीं हत्यारें घेऊन चालता झाला.

पुढें सुमारें दहा वर्षांनी त्या शहरांत कांहीं सार्वजनिक इमारती बांधण्याचें काम निघाले त्या बांधण्याचा मक्ता घेण्यास कोणी तयार असतील त्यांनीं आपल्या दरांच्या याद्या पाठविण्याविषयीं जाहिराती लागल्या. त्याप्रमाणें बरेच मक्ते घेणारे पुढें आले. त्यापैकीं लायक मनुष्य निवडण्यासाठीं पंच नेमिले होते, त्यांमध्यें हा कुंपणवाला गृहस्थ होता. हें पंच आलेल्या मक्तेदारांस पाहत असतां त्यांमध्यें तो सुतार होता. त्याला ह्या गृहस्थानें तत्काळ ओळखिलें, आणि हा मक्ता ह्याच मनुष्याला मिळवून देण्याची खटपट करावयाची असा आपल्या मनांत निर्धार करून त्यानें त्याचा ती कुंपण दुरुस्त करण्यासंबंधाची गोष्ट आपल्याबरोबरच्या दुसऱ्या पंचांस सांगितली. तेव्हां या सगळ्यांला तो मनुष्य पसंत वाटून त्याला त्यांनीं तो मक्ता दिला. हें मक्त्याचें काम त्यानें उत्तम प्रकारें व प्रामाणिकपणानें केलें व त्यांत त्याला मोठी किफायत होऊन तो चांगला गबर झाला.

❑❑❑

## भाग बारावा

# प्रसंगावधान

### चोर पकडण्याची युक्ती

एक जर्मन ग्रंथकार होता. तो मोठा विसराळू व गैदी होता. त्याचीं मोठ्या किंमतीचीं व महत्त्वाचीं पुस्तकें चोरीस जाऊं लागलीं, आणि कधींकधीं त्याचे पैसेही जाऊं लागले. तेव्हां त्याला आपल्या चाकराचा वहीम आला. त्याला पकडण्याचा बेत करून तो बरेच दिवस टपत होता. पण तो कांहीं सांपडेना. मग त्याला पकडण्यासाठीं एके दिवशीं सोन्याच्या नाण्यांची पिशवी आपल्या टेबलावर विसरल्यासारखें करून तो खालीं आपल्या मित्रांशीं बोलावयासाठीं म्हणून गेला आणि चोर पकडण्याची आपण कोणती युक्ति केली आहे तें त्यांला सांगूं लागला. तेव्हां त्याच्या एका मित्रानें विचारिलें: ''त्या पिशवींत तूं किती पैसे ठेविले आहेस?'' तो गोंधळून म्हणाला: 'किती पैसे! ते तर मीं मोजिले नाहींत!''

### झग्याच्या ऐवजीं तुमान

एक ग्रंथकार अमळ भ्रमिष्ट होता. एके दिवशीं संध्याकाळीं तो नाटकास जावयास निघाला असतां नाटक सुरू होण्याची वेळ होऊन गेली म्हणून आपला गरम झगा लगबगीनें उचलून खांद्यावर टाकून गाडी दारांत उभी होती तींत जाऊन बसला. दिवस उकाड्याचे असल्यामुळें तो झगा खुरचीवर मागें टाकून तो खालीं बसला. त्याबरोबर जवळ बसलेली मंडळी मोठ्यानें हसूं लागली. ते हसतात कां, हे पाहाण्यासाठीं तो मागें वळला. तेव्हां आपण आणिला तो झगा नसून तुमान आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. त्याबरोबर त्याचें तोंड उतरलें. पण वेळ मारून नेण्याकरितां तोही बाकीच्यांबरोबर हसूं लागला.

### पिसाळलेला कुत्रा

एक बाई आपल्या दाराशीं उभी राहून, जवळच तिचीं मुलें खेळत होतीं, त्यांजकडे कौतुकानें पाहत होती. इतक्यांत एका मोठ्या पिसाळलेल्या कुत्र्याच्या मागें पुष्कळ

माणसें लागलेलीं तिनें दुरून पाहिलीं. तो कुत्रा थेट तिच्या अंगणाकडे धावत येत होता. ते पाहून त्या बाईला असें वाटलें कीं, आतां हा कुत्रा आपल्या मुलांस डसतो खास. त्याबरोबर त्या कुत्र्याच्या अंगावर धावत जाऊन आपल्या जाड झग्याखालीं त्याचें डोकें अशा शिताफीनें व जोरानें दाबून धरिलें कीं, त्या कुत्र्याला मुळीं हालतां किंवा चावा घेतां येईना. इतक्यांत त्याचा पाठलाग करणाऱ्या माणसांनीं तेथें येऊन त्याला साखळदंड लाविला.

## आपल्या नांवाचा विसर

एक गृहस्थ होता. त्याला एकादे वेळीं आपल्या नांवाचा विसर पडे, आणि त्यामुळें त्याची धांदल उडे. एके दिवशीं तो पोस्टआफिसांत जाऊन आपलीं पत्रें मागूं लागला. नांव काय म्हणून विचारितां त्याला तें मुळीं आठवेना! तेव्हां तो अगदीं खट्टू होऊन माघारी घराकडे चालला आणि जातांजातां आपल्या नांवाची आठवण करूं लागला. पण त्याला ती कांहीं केल्या होईना. इतक्यांत त्याचा एक मित्र त्याला वाटेंत भेटला, त्यानें त्याचें नांव घेऊन त्याला कुशल प्रश्न विचारिला. त्याबरोबर त्याला हवें होतें तें नाव मिळून तो त्याचा मोठ्यानें उच्चार करीत परत पोस्ट आफिसाकडे चालता झाला. त्या मित्राशीं बोलायास सुद्धां तो थांबला नाहीं! हें त्याचें चमत्कारिक वर्तन पाहून त्या मित्राला मोठें आश्चर्य वाटलें. मग त्यानें आपलें नांव सांगून पत्रें घेतलीं. हा त्याचा भ्रमिष्टपणा पाहून पोस्टांतल्या लोकांलाही मोठा चमत्कार वाटला.

## एका सरदाराची समयसूचकता

एक इंग्रज सरदार एका काळोख्या रात्रीं गाडींतून प्रवास करीत असतां एक वाटमाऱ्या घोडा पिटीत गाडीपाशीं आला आणि गाडीच्या बारींतून आंत पिस्तुल सारून तें त्या सरदाराच्या छातीवर रोखून म्हणाला: ''जवळ कांहीं पैसे असतील ते टाका, नाहींतर प्राणास मुकाल. मी ऐकितों कीं, आपणांला लुटण्याची कोणाही वाटमाऱ्याला छाती व्हावयाची नाहीं अशी वल्गना तुम्हीं करीत असतां. पण ही तुमची वल्गना अगदीं व्यर्थ आहे, हें मी तुह्मांला आतां दाखवून देतों.'' त्या सरदारानें खिशांत हात घालून म्हटलें: ''तो तुझ्या मागून कोणी डोकावीत आहे; तो जर नसता तर ह्या वेळीं तुझें मीं कांहींही चालूं दिलें नसतें.'' हे त्याचे शब्द ऐकून आपल्या मागें कोण आहे हें पाहण्यासाठीं तो चोर मागें वळला. तेवढ्यांत त्या सरदारानें खिशांतलें पिस्तुल काढून त्याच्यावर झाडिलें. त्यामुळें तो गतप्राण होऊन पडला!

## शूर शिपाई

युरोपांत आस्त्रिया नांवाचा एक देश आहे. त्याची व्हियनानामक राजधानी आहे. तेथें एके दिवशीं सैन्याची परड चालली होती. तेव्हां घोडदळाची एक पलटण भरधाव परडीच्या जागीं येत असतां तिच्या वाटेंत एक लहान मुलगा रेंगाळत चालला होता. त्याला पाहतांच त्या घोडेस्वारांला एकदम उभे रहाण्याचा हुकूम त्यांच्या सेनापतीनें केला. तो पहिल्या तुकडीच्या लोकांच्या कानीं पडतांच त्यांतले घोडेस्वार चटदिशीं डावे उजवे पांगले. पण मागून भरधाव सुटलेल्या सगळ्या घोड्यांस एकदम आवरणे दुरापास्त होतें. आतां हा मुलगा ठार होतो खास, असें पाहून पहिल्या तुकडींतल्या एका स्वारानें चटदिशीं घोड्यावरून खालीं ओणवून त्या मुलाच्या आंगड्याला धरून त्याला वर ओढून घेतलें आणि त्याला वाटेंतून दूर नेऊन खालीं सोडिलें. अशा रीतीनें त्यानें प्रसंगावधान दर्शविल्यामुळें त्याच्या सेनापतीनें त्याची पाठ थोपटली आणि त्याला बढतीची जागा दिली.

## भ्रमिष्टपणाची कमाल

इटालींतील एक सरदार मोठा विसराळू होता. त्याबद्दल त्याला अनेक वेळां अद्दल घडे. एके दिवशीं मनाला अमळ करमणूक व्हावी म्हणून तो नाटक पाहावयास गेला. नाटकगृहाच्या दरवाज्यावर एक वर्तमानपत्र विकत घेऊन तो आंत गेला. तें पत्र त्या दिवसाचें नव्हतें. तें गेल्या महिन्याच्या त्याच तारखेचें होतें. तें त्याला पत्रेंविक्या पोरानें लबाडीनें विकिलें. नाटक सुरू होण्यास थोडा अवकाश होता, म्हणून तो तें पत्र उघडून वाचू लागला, तों एके जागीं त्यानें असें वाचिलें कीं, ''आज नाटक बंद आहे. कारण नाटकगृहाची दुरुस्ती चालली आहे.'' हा मजकूर वाचून तो तेथून तडफडत उठला, आणि ''आज नाटक बंद असतां मी येथें आलों तरी कशाला!'' असें बोलत तो बाहेर निघून गेला. इतक्यांत नाटक सुरू होण्यापूर्वी वाद्यें वाजत असतात त्यांचा आवाज त्याच्या कानीं आला. पण तीं उगीच वाजत आहेत असें वाटून तो गाडींत बसून घरीं गेला!

## एक व्यवहारदक्ष इंग्रज गृहस्थ

एक इंग्रज गृहस्थ जर्मनींत प्रवासाला गेला होता. एके दिवशीं तो आगगाडीत बसून चालला असतां वरचेवर बारीवाटे डोकें बाहेर काढून हवा घेत असे. असें करितां करितां एकाएकीं सोसाट्याचा वारा सुटून त्याच्या डोकीची टोपी उडाली. त्याबरोबर त्यानें टोपी ठेवण्याची लहान पेटी होती ती टोपी जिकडे उडाली त्या

दिशेकडे फेंकून दिली, आणि मग आपल्या जागीं स्वस्थ बसून राहिला. ती त्याची कृती पाहून त्याच्याबरोबर प्रवास करणाऱ्या कांहीं जर्मन गृहस्थांला मोठी मौज वाटली, आणि ते खदखदां हसू लागले. त्यांनीं त्या इंग्रज गृहस्थाला विचारिलें: ''काय हो, तुम्ही त्या टोपीची पेटीही फेकून दिली त्याचें कारण काय? ती पेटी तुमची टोपी घेऊन येणार आहे काय?'' तो गृहस्थ म्हणाला: ''त्या टोपींवर माझें नांव नाहीं. पण त्या पेटीवर माझें नांव व पत्ता हीं आहेत. यास्तव ती पेटी त्या टोपीजवळ कोणाला सांपडली असतां त्या दोन्ही तो मजकडे घेऊन येण्याचा संभव आहे.'' तें ऐकून त्या जर्मन गृहस्थांचें हसें बंद झालें.

## नकाशेविक्याचा धूर्तपणा

अमेरिकेंतला एक नकाशांचा व्यापारी एकदां क्युबानामक बेटांत आपले नकाशे विकायासाठीं गेला असतां मार्गांत त्याला वाटमाऱ्यांनीं गांठिलें. त्यांनीं त्याचा घोडा अडवून धरून म्हटलें: ''जवळ कांहीं पैशे असतील ते मुकाट्यानें काढून दे, नाहींतर प्राणास मुकशील.'' तो नकाशेविक्या मोठा हुशार होता. त्यानें आपल्याबरोबर एक छदामही घेतला नव्हता. तेव्हां अर्थात् त्या लुटारू लोकांची निराशा झाली. तें पाहून तो व्यापारी त्यांला म्हणाला: ''मजपाशीं ह्या बेटाचे नकाशे आहेत. ते फार नामी आहेत. तुम्हीं म्हणत असलां तर ते मी तुम्हांला दाखवितो.'' तें ऐकून त्या वाटमाऱ्यांनी त्याला ते नकाशे दाखवायास सांगितलें. तेव्हां तो घोड्यावरून चटदिशी उतरून जवळचा एक नकाशा काढून त्यांला समजून सांगूं लागला. तें याचें वर्णन ऐकून त्या वाठमाऱ्यांला असली उपयोगी चीज आपल्यापाशीं अवश्य असावी असें वाटून प्रत्येकानें एकएक नकाशा त्याच्या जवळून घेतला, आणि त्याला त्यांची योग्य किंमतही दिली. अशा रीतीनें त्या चोरांच्या हातीं आपला ऐवज लागूं न देतां त्याला आपला माल विकून त्या संकटांतून तो मुक्त झाला.

## स्वतांचें मूल ओळखेना

एका पाठशाळेचा एक मोठा विद्वान् अध्यापक होता. तो सगळा वेळ विद्याध्ययनांत अगदीं निमग्न असे. त्यामुळें त्याला आपल्या मुलांमाणसांत बसून वेळ घालवावयास फारशी फुरसद नसे. त्याला सोळासतरा मुलें होतीं. पण त्यांच्याशीं बोलण्याखेळण्याला त्यांला फावत नसल्यामुळें तो त्यांला धड ओळखीतही नसे. एके दिवशीं तो सहल करावयास गेला असतां, वाटेंत एक मुलगा कावराबावरा होऊन रडत उभा राहिलेला त्यास आढळला. त्याला रडतांना पाहून ह्या गृहस्थाला दया आली आणि त्याच्याजवळ

जाऊन त्याला त्यानें ममतेचे शब्द बोलून उगी केलें; आणि तो मुलगा चुकला आहे, तर त्याच्या आईबापांचा पत्ता लागे तोंपर्यंत त्याला आपल्या घरीं न्यावें, असें त्याच्या मनांत आलें. त्या गोष्टीला तो मुलगा तयार झाला. त्याचें रडेंबिडें साफ बंद होऊन तो त्याच्याबरोबर मुकाट्यानें चालला. घरीं गेल्यावर त्यानें आपल्या बायकोला हाक मारून म्हटले: ''अग, हा पहा मीं एक मुलगा आणिला आहे. हा वाट चुकून रस्त्यांत रडत उभा होता. हा कोणाचा मुलगा आहे हें कळे तोंपर्यंत याला आपल्याकडे ठेवून घे, आणि खायाप्यायाला दे.'' ती म्हणाली: ''अहो, हें काय? हा तर आमचा मुलगा. तुम्हांला स्वतांच्या मुलाची सुद्धां ओळख नसावीना? तुमचा हा भ्रमिष्टपणा जाणार तरी कधीं!''

## चाकराची समयसूचकता

एका मोठ्या ख्रिस्ती देवळाच्या घुमटाच्या आंतल्या बाजूस चित्रें काढण्याचें काम एक मोठा चित्रकलाकुशल कारागीर करीत होता. त्याला उभें राहून काम करितां यावें म्हणून सभोंवतीं परांच्या बांधिल्या होत्या. त्यांवर उभा राहून तो एक चित्र काढण्यांत अगदीं गर्क झाला असतां, त्या नादांत तें दुरून कसें दिसते हें पाहण्यासाठीं तो मागें सरूं लागला. तें त्याचें कृत्य, त्याचा चाकर जवळच रंगपाणी वगैरे देण्यासाठीं बसला होता, त्याच्या नजरेस पडलें; आणि आतां आणखी एकदोन पावलें मागें सरला असतां परांचीवरून खालीं पडून तो खास ठार होतो, असें त्याच्या लक्षांत येऊन त्यानें जवळचें रंगाचें भांडें पटदिशीं उचलून त्यांतला रंग त्या चित्रावर झोकून दिला. तेव्हां ते असें अकस्मात् खराब करणाऱ्या त्या चाकराचा मनस्वी राग येऊन त्याला शिक्षा करण्याकरितां तो त्याच्या अंगावर धावून गेला. चाकरानें त्याला आपल्या त्या कृतीचें कारण सांगितलें, तेव्हां त्यानें त्याचे आभार मानिले, आणि त्याला अशी उत्तम युक्ती सुचल्याबद्दल त्याची वाहवा केली. कारण त्याला त्याच्या धोक्याचा इशारा देण्यासाठी तो चाकर नुसता ओरडला असता तर तो कदाचित् घाबरून जाऊन पाऊल सावरून पुढें सरकण्याऐवजीं खालीं पडला असता, संकटाच्या वेळीं घाबरून न जातां त्यांतून सुटण्याची कांही तरी युक्ती आणीबाणीच्या वेळीं सुचवण्यास लागणारा मनाचा स्थिरपणा व शांतपणा हे गुण फार थोड्या लोकांमध्यें आढळतात.

## उडी टाक नाहीं तर बंदूक झाडितों

एक जुन्या तऱ्हेचें लढाऊ गलबत एका बंदरांत ओरवा करून असतां, त्यावरील कप्तानाचा एक लहान मुलगा गमतीखातर शिडाच्या दोऱ्यांला धरून डोलकाठीवर

चढून गेला आणि तिच्या टोंकाशीं आडवी काठी होती तीवर जाऊन उभा राहिला. तेथें त्याला धरायाला कांहींएक नव्हतें. जहाजावरील खलाशांच्या नजरेस तो पडला तेव्हां त्यांची अगदीं गाळण उडाली. त्याला आतां खालीं आणावा कसा, अशी त्यांला पंचाईत वाटली. तेथपर्यंत चढून जाण्याची तर कोणाचीही छाती नव्हती. सगळीं माणसें त्याच्याकडे पाहत कांपत उभीं राहिलीं; इतक्यांत वादळाचीं चिन्हें दिसूं लागलीं. तेव्हां तर मुलगा हातीं लागण्याची मुळीं आशाच उरली नाहीं. त्याचा बाप खालीं होता. त्याला ती अत्यंत भयंकर गोष्ट कळतांच तो वर धावून आला आणि आपल्या परमप्रिय मुलाचें तें संकट पाहून तो अतिशयित कष्टी झाला पण त्या अतिबिकट समयीं त्याचें प्रसंगावधान सुटलें नाहीं. त्यानें मुकाट्यानें खालीं जाऊन आपली बंदूक आणिली; आणि ती आपल्या मुलावर रोंवून तो मोठ्यानें ओरडून म्हणाला: ''मुला, दूर पाण्यांत उडी मार, नाहीं तर ही पाहा बंदूक झाडितो.'' ही आरोळी ऐकून त्यानें ताडदिशीं पाण्यांत उडी मारिली. इतक्या उंचीवरून उडी टाकिल्यामुळें त्याला थोडासा धक्का तर बसलाच, पण तेथलें पाणी पुष्कळ खोल असल्यामुळें तो बराच खालीं जाऊन अमळशानें वर आला आणि जहाजाकडे सुखरूप पोहत आला.

## अप्रतिम प्रसंगावधान

स्कॉटलंडातल्या डोंगरपथारीच्या गांवांतल्या नद्यानाल्यांतून कधींकधीं अकस्मात् पाण्याचे मोठे लोंढे वाहूं लागतात. याचें कारण असें कीं, डोंगरावरून सांचलेलें बरफ वितळूं लागलें म्हणजे पावसाच्या मोठ्या सरीप्रमाणें पाण्याचे लोट खालीं येऊं लागतात. अशा समयीं एक शेतकरी व त्याचा नोकर गुरें वळीतवळीत एका नदीच्या तीरीं आले, आणि नदी ओलांडून पलीकडे जाऊं लागले. चाकर तरुण व चपळ असल्याकारणानें तो पलीकडच्या तीरास लौकर जाऊन पोंचला, आणि मागे वळून पाहतो तों आपला धनी अर्ध्या नदींत आला आहे, असें त्याला दिसलें. इतक्यांत दुरून घोघो असा ध्वनि होऊं लागलेला त्याच्या कानीं आला. तो कसला होता हें त्या चाकराला तत्काळ कळलें; आणि तो तीरावरील गवतांत पडून गडबडां लोळून मोठ्याने ओरडूं लागला कीं,''धावा, धावा लौकर, मला मदत करा, नाहीं तर मी मेलोंच समजा.'' ही त्याची अवस्था पाहून त्याच्या धन्यानें त्याच्याकडे मोठ्या वेगानें धाव घेतली; आणि तो तीरावर येऊन हे पोंचतो न पोंचतो, तों पाण्याचा प्रचंड लोट आला. त्याला नदींतून वर यावयाला एकदोन पळांचा उशीर लागला असता तर तो त्या लोंढ्यांत सांपडून वाहून गेला असता. मग आपण लगबगीनें नदींतून बाहेर यावें म्हणून आपल्या चाकरानें

आपणास कांहीं इजा झाल्याचें मिष केलें होतें हें कळून त्यानें त्याच्या प्रसंगावधानाची अतिशयित तारीफ केली व आपले प्राण वांचविल्याबद्दल त्याचे मनापासून आभार मानिले. त्या संकटाच्या वेळीं तो चाकर त्याला हाक मारून पाण्याचा लोट येत आहे असें सांगता, तर कदाचित् तो घाबरून तेथल्या तेथें गर्भगीळ झाला असता, आणि लोंढ्यांत सांपडून प्राणास मुकला असता.

## बायकोची युक्ती

कांहीं कामकरी एक मोठी उंच चिमणी उभारीत होते. ती उभारितां उभारितां इतकी उंच गेली कीं, तिच्या शेंड्यापर्यंत शिडी लावण्याची सोय राहिली नाहीं. तेव्हां तिच्या शेंड्याशीं कपी लावून दोरांच्या योगानें कामकरी वरखालीं जाऊं लागले. चुना, विटा वगैरेही दोरांनींच वर चढवूं लागले. असें करितांकरितां शेवटीं चिमणी पुरी झाली; आणि तीवरील कामकरी कपींतल्या दोराला लोंबकळून एकामागून एक खालीं उतरले. शेवटीं एक माणूस तेवढा वर राहिला. त्याला खालीं घेण्यासाठीं दोर खालींवर करूं लागले असतां भलतेंच शेवट खालीं ओढलें जाऊन सगळा दोर कपींतून निघून खालीं आला. तेव्हां आतां त्या वर राहिलेल्या माणसाला खालीं उतरावें कसें, हा पेंच येऊन पडला. हा असा तो माणूस त्या ठिकाणीं अडकून पडल्याची बातमी चोहोंकडे पसरून तेथें शेंकडो लोक जमा झाले. पण त्याला खालीं उतरण्याची युक्ती एकालाही सुचेना.

इतक्यांत त्या माणसाच्या बायकोला हें संकट कळून ती त्या ठिकाणीं धावत आली; आणि तिनें लागलींच आपल्या नवऱ्याला मोठ्यानें हाक मारून म्हटले: ‘‘तुमच्या एका पायातला जोडा व मोजा काढा आणि मोज्याचा धागा आंगठ्याच्या बाजूकडून हळूहळू सोडवा. तो सगळा सोडवून झाल्यावर त्याच्या एका शेवटाला विटेचा लहानसा तुकडा बांधून तो जपून खालीं सोडा.’’ बायकोच्या ह्या सांगण्याप्रमाणें त्यानें केलें; आणि तो धागा खालीं आला त्याला एक अमळ बळकट पण बारीक सणाची दोरी अडकवून ती त्याला वर ओढून घ्यावयास तिनें सांगितलें; आणि मग त्या दोरीला तो नेहमींचा जाडा दोर बांधिला. तो त्यानें वर ओढून घेऊन त्या कपींत घालून दिला. अशा रीतीनें दोर हातीं लागून तो माणूस सुखरूपपपणें खालीं आला. पुढें त्यानें मोज्याच्या त्या धाग्याची गुंडी करून आमरण आपल्यापाशीं ठेविली.

## सुटून जाण्याची नामी युक्ती

उत्तरअमेरिकेंत हिंवाळ्यामध्यें मनस्वी गारठा पडलो. त्या वेळीं नद्या व तलाव सगळे गोठून जातात. अशा समयीं एक युरोपियन गृहस्थ बरफावरून चालायाचे

लांकडी जोडे घालून आपल्या शेतवाडीवर फिरावयास गेला असतां, चालतांचालतां थकून तो एका मोठ्या नदीच्या तीरीं विश्रांति घ्यावयास बसला; आणि त्यानें आपल्या पायांतले जोडे काढून ठेविले. इतक्यांत त्याच्यावर कांहीं रानटी लोक धावून आले; आणि त्यांनीं आपल्या धनुष्यांस बाण लावून त्याला ठार करण्याचें योजिलें. हा त्यांचा अकस्मात् झालेला हल्ला पाहून तो गृहस्थ अगदीं न घाबरतां त्यांस विचारूं लागला कीं: ''माझ्या ह्या जमिनीवर तुम्ही कोणाच्या हुकमानें आलां?'' त्या रानटी लोकांनी उत्तर केले: ''ही सगळी जमीन आम्हांला आमच्या देवानें दिली आहे. हीवर तुम्हां गोऱ्या लोकांचा मुळीं हक्क नाहीं. असें असतां तुम्ही आमच्याकडून ही जबरीनें घेतली आहे.''

अशी त्यांची बोलाचाली चालली असतां त्यांतल्या एका रानटी माणसाचें त्या गृहस्थाच्या त्या लाकडी जोड्यांकडे लक्ष गेलें. ही काय चीज आहे म्हणून त्या रानटी मनुष्यानें त्याला विचारिलें. तेव्हां त्यानें सांगितलें कीं, ''ही वस्तु आम्हांला देवानें दिली आहे. ही पायांत घातली म्हणजे आम्हांला बरफावरून मोठ्या वेगानें चालतां येतें.'' हें ऐकून तो माणूस ते पायांत चढवूं लागला. तेव्हां त्या गृहस्थानें त्याच्या पायाला ते बसते करून त्याला चालावयास सांगितलें. मग तो अडखळत अडखळत चालूं लागला आणि एकदोन वेळां पडलाही. ती त्याची फजिती पाहून सगळेजण हसूं लागले. त्याला नीट चालतां येईना म्हणून त्यांनीं त्या गृहस्थाला कसें चालतात तें दाखवायास सांगितलें. तेव्हां त्यानें ते लागलींच पायांत घालून अमळ अडखळत चाललेंसें केलें आणि मग त्यांनीं त्याची बंदूक हिसकावून घेतली होती ती आधाराला म्हणून त्यांच्याकडून मागून घेऊन तो नदीच्या गोठलेल्या पात्रांतून बाणासारखा मोठ्या वेगानें निसटला, तो थोड्या पळांत त्यांच्या बाणाच्या टप्प्यापलीकडे जाऊन पार निघून गेला. ह्याप्रमाणें मोठ्या शिताफीनें तो त्यांच्या तावडींतून सुटला. तो त्यांला पाहून घाबरून जाता तर त्याला ही युक्ती सुचली नसती, हें उघड आहे.

❑❑❑

भाग तेरावा

# विद्याप्रीति

## सर आयझॅक न्युटन

हा एक मोठा ज्ञानी पुरुष इंग्लंडांत होऊन गेला. याला ज्ञानार्जनाचा हव्यास अतोनात होता. यानें पुष्कळ चांगले शोध करून मानवी ज्ञानांत उत्तम भर घातली आहे. तो विद्याभ्यासांत इतका गढून गेला असे कीं, त्यापुढें त्याला खाणेंपिणेंही सुचत नसे. कधीकधी कुटुंबांबरोबर बसून जेवण्यासही त्याला फावत नसे. ह्यासाठीं त्याचें जेवण त्याच्या अभ्यासाच्या खोलींत नेऊन ठेवावे लागे. एके दिवशीं त्याच्या स्वयंपाकिणीने एक अंडे व उकळत्या पाण्याचें भांडें चाकराच्या हातीं देऊन म्हटलें कीं, ‘‘धनी बसले आहेत तेथें जाऊन पाण्यांत हें अंडें घाल व दोनतीन मिनिटें त्यांत ठेवून काढ. मग तें धन्यांपुढें ठेवून ये.’’ त्याप्रमाणें तो चाकर न्युटनाच्या खोलींत तें साहित्य घेऊन आला. त्याला पाहून तो म्हणाला: ‘‘पाणी आणि अंडें येथें ठेवून जा. मी तें पाण्यांत घालितों.’’ तेव्हां तो चाकर निरुपाय होऊन निघून गेला. पण आपला धनी तें खावयास विसरेल ह्या भीतीनें तो पुनः त्याच्या खोलींत आला, आणि पाहतो तों न्युटन हातांत अंडें घेऊन उभा आहे आणि त्याचें घड्याळ पाण्यांत उकळत आहे, असें त्याला आढळून आलें! विद्याव्यासंगांत मनुष्य सर्वस्वीं गढला म्हणजे त्याला कांहींएक सुचत नाहीं. विद्यानंदाचा महिमाच असा आहे.

## आल्फ्रेड दि ग्रेट

इंग्लंडांत सॅक्सनराजे अकराव्या शतकापर्यंत राज्य करीत होते, त्यांचा हा एक मोठा पराक्रमी राजा होता. हा दहाव्या शतकाच्या आरंभापर्यंत इंग्लंडावर राज्य करीत होता. हा लहान वयांत अतिशयित चलाख होता. तो पांच वर्षांचा असतां त्याच्या

आईनें त्याला व त्याच्या दुसऱ्या भावंडांला एक मोठें मजेचें पुस्तक दाखविलें. ते हातानें लिहिलें असून लेखकानें प्रत्येक पानावरील पहिल्या अक्षरासभोंवतीं सुंदर चित्रें रंगविलीं होतीं. तीं पाहून त्या मुलांस मोठा हर्ष झाला. तेव्हां त्यांची आई म्हणाली: ''तुमच्यापैकीं जे कोणी ह्या पुस्तकांतील कविता पाठ करील त्याला हें मी देईन.'' हे शब्द ऐकून आल्फ्रेडनें तें तिच्या हातचें घेतलें, आणि आपल्या धर्मगुरूकडे जाऊन त्याच्याकडून तें पुनःपुनः वाचून घेतलें. तें लक्षपूर्वक ऐकूनऐकून त्यानें त्यांतल्या सगळ्या कविता पाठ केल्या, आणि आपल्या आईला त्या बिनचूक म्हणून दाखविल्या. तेव्हां अर्थात् तिनें त्याला तें वचनाप्रमाणें बक्षीस दिलें. त्याची अशी कुशाग्रबुद्धि पाहून त्याच्या बापानें त्याला रोमशहरीं विद्याभ्यासासाठीं पाठविलें. त्या वेळीं त्याचें वय अंवघें पांच वर्षांचे होतें. तरी आपल्या अशा चांगल्या व आवडत्या मुलास इतक्या दूर कसें पाठवावें हें त्याच्या आईबापांनीं मनांत आणिलें नाहीं.

## एका चित्रकाराचा परवाना

युरोपांत प्रवास करावयाचा असला म्हणजे सरकारी अधिकाऱ्यांकडून परवाना घ्यावा लागतो. तो जवळ असला म्हणजे प्रवाशांला हवें तेथें जातां येतें. एक चित्रकार असा परवाना घेऊन परदेशीं जावयास निघाला असतां, मार्गांत त्याचा तो परवाना कोठे सांडला. म्हणून एका शहराच्या कोतवालापाशीं जाऊन आपल्या नांवाचा नवा परवाना करून देण्याविषयीं त्याला त्यानें विनंति केली. त्यानें त्या प्रख्यात कारागिराचें नांव ऐकिलें होतें. पण तोच हा गृहस्थ आहे किंवा कोणी तोतया आहे याविषयी खात्री करण्यासाठीं त्यानें एक कागद व पेन्सिल त्याच्या हातीं देऊन म्हटलें कीं, ''आपण नांव सांगतां तेच गृहस्थ आहां, अशी खात्री करून देण्याची आपणांला अगदीं सोपी युक्ती आहे. हा कागद व ही पेन्सिल घेऊन आपणांला ह्या बाबतींत पुरावा करितां येण्याजोगा आहे.'' कोतवालाचा अभिप्राय समजून त्या कुशल कारागिरानें तें साहित्य घेऊन, जवळच्या खिडकींतून समोर बाजारपेठ दिसत होती, तिची देखावा झटदिशीं रेखाटून त्याच्या हातीं दिला. तो पाहतांच कोतवालाची खात्री होऊन त्यानें तत्काळ त्याच्या नांवाचा परवाना तयार करून दिला, आणि त्यानें रेखाटललें तें चित्र त्याच्या दर्शनाची यादगिरी म्हणून आपल्यापाशीं राखून ठेविलें.

## उइलिअम कॉबेट

हा एक मोठा विख्यात ग्रंथकार विलायतेंत होऊन गेला. हा घरचा गरीब असल्यामुळें याला लहानपणापासून पोटासाठीं काम करावें लागलें. तो अकरा वर्षांचा झाला तेव्हां

एका शेतकऱ्याकडे मजुरी करावयास राहिला. ह्या कामावर असतां त्याच्या मनांत असें आलें कीं, क्यू येथें सरकारी बाग आहे तो पाहावयास जावें. मग जवळ सहा पेनी होत्या त्या घेऊन तो तिकडे पायीं निघाला. वाटेत कांहीं खायाला घेण्यांत त्यानें तीन पेनी खर्चिल्या आणि बाकीच्या संध्याकाळीं कांहीं तरी विकत घेऊन खाण्यासाठीं राखून ठेविल्या. पण रिचमंडशहरांतून जातांना एका पुस्तकेंविक्याच्या दुकानांतल्या खिडकींत 'टेल ऑफ दि टब' नांवाचें एक लहानसें पुस्तक त्याच्या दृष्टीस पडलें, त्याचें चमत्कारिक नांव पाहून तें घेऊन वाचावें, असें त्याच्या मनांत आलें; आणि त्याची किंमत त्यानें विचारिली. ती तीन पेनी आहे असें कळताच त्यानें खिशातल्या उरलेल्या तीन पेनी देऊन तें पुस्तक घेतले, आणि तें वाचण्याची त्याला उत्कंठा लागल्यामुळें तो जवळच्या शेतांतल्या गवताच्या गंजीच्या अडोशास बसून तें वाचूं लागला. तें वाचण्यांत तो इतका दंग झाला कीं, दिसे तोंपर्यंत तें वाचीत तो तेथेंच बसला, आणि काळोख झाला तेव्हां त्या जागी लवंडून झोपीं गेला. पहाटेस जागा होऊन तो पुढें चालूं लागला; आणि चांगलें दिसूं लागतांच पुनः तें पुस्तक उघडून तो वाटेनें वाचीत गेला. ह्याप्रमाणें सरकारी बागेपाशीं जाऊन पोंचेपर्यंत त्यानें तें वाचून संपविलें. हें पुस्तक वाचिल्यापासून आपण भाषेचा चांगला अभ्यास करून अनेक ग्रंथ वाचून ज्ञान संपादन करावें व अशा तऱ्हेचीं पुस्तकें लिहिण्याचे सामर्थ्य अंगीं आणावे, असा त्यानें निर्धार केला, आणि तो मोठ्या निश्चयानें आणि परिश्रमानें शेवटास नेला. पुढें जिकडेजिकडे तो जाई तिकडेतिकडे तें पुस्तक तो नेई. शेवटीं तें ज्या पेटींत त्यानें ठेविले होतें, ती समुद्रांत पडली. त्यामुळें तें अर्थात त्याच्याकडून नाहीसें झालें. तें असें सांडल्याबद्दल त्याला अतिदु:ख झाले.

## विद्याभ्यास करण्याचा निर्धार

एक मुलगा अगदीं गरीब व निराधार होता. त्याचे आईबाप लहानपणींच गत झाले होते. त्याला अमळ समजूं लागलें तेव्हां त्याच्या मनांत असें आलें कीं, दुसरीं मुलें वाचतात लिहितात तसें आपणास आलें तर बरें होईल. पण त्याच्या शाळेचा खर्च करण्याचें सामर्थ्य त्याच्या नातलगांस नव्हतें. तरी आपली इच्छा पुरविण्याची त्या मुलानें एक युक्ती योजिली. ती अशी: त्याचा एक खेळगडी होता, तो शाळेंत जात असे, त्याला तो म्हणाला: ''मला तूं वाचायाला शिकविशील, तर तुला मी खेळायाच्या गोट्या देईन.'' त्याचा मित्र म्हणाला: ''तूं पुस्तक पैदा कर, म्हणजे मी तुला वाचायाला शिकवितो.'' तो म्हणाला: ''पुस्तक मिळण्याची तर आशा नाहीं; पण आपल्या त्या

स्मशानांतल्या थडग्यांवर व शिलांवर लेख कोरिले आहेत, त्यांवरून मला वाचायाला शिकीव.'' त्याच्या मित्राला त्याची ती युक्ती पसंत वाटली, आणि तो त्याच्याबरोबर स्मशानांत जाऊन त्याला ते लेख वाचायाला शिकवूं लागला. ह्याप्रमाणें त्याला बरेंच चांगले वाचता येऊ लागलें. तेव्हां तो एका धर्मार्थ शाळेंत गेला. तेथें शिक्षकानें, ''तुला वाचता येतें काय?'' असा प्रश्न केला. त्यानें होय असें उत्तर दिलें असतां, ''तूं वाचायाला कसें शिकलास?'' असा त्यानें पुनः प्रश्न केला. त्यावरून त्यानें आपली युक्ति त्या शिक्षकाला सांगितली. ती त्याला खरी वाटेना. पण त्याच्या संवगड्यांनीं त्याची गोष्ट खरी आहे अशी खातरी केल्यावरून त्या शिक्षकाला त्याच्या शिकण्याविषयींच्या उत्साहाचें मोठें कौतुक वाटलें. मग त्यानें त्या मुलाच्या हातीं बायबलाची एक प्रत देऊन म्हटलें कीं, ''यांतली एकादी ओवी वाचून दाखविशील तर मी तुला हें पुस्तक बक्षीस देईन.'' त्या मुलाने तें पुस्तक हातीं घेऊन त्यांतला कांहीं भाग वाचून दाखविला आणि तें पुस्तक मिळविलें. त्या मुलाची शिकण्याविषयीं उत्कट इच्छा पाहून या शिक्षकाची त्याजवर प्रीति जडली, आणि त्यानें त्याला शिकण्याच्या कामी चांगली मदत केली.

## ज्ञानाचा उपयोग

एका बादशहाची आपल्या वजिरावर इतराजी होऊन त्यानें त्याला जन्मठेपेची शिक्षा केली, आणि एका उंच मनोऱ्याच्या वरल्या दालनात कोंडून ठेविलें. ह्याप्रमाणें आपल्या प्रिय माणसांची आणि आपली आमरण तुटातूट झाल्याबद्दल तो पराकाष्ठेचा कष्टी झाला. तरी पण या अटकेंतून सुटून जाण्याचा कांहीं तरी उपाय काढावा असा निर्धार करून तो एकसारखा विचार करीत बसला, निराश होऊन पडला नाहीं. त्यानें निरनिराळ्या प्राण्यांचे व्यापार लक्षपूर्वक पाहिले असल्याकारणानें त्याला शेवटीं तेथून सुटून जाण्याची एक युक्ति सुचली, आणि ती योजून तो त्या बिकट अटकेंतून सुटून गेला. ती युति अशी: एके दिवशीं रात्रीच्या समयीं त्याची स्त्री त्या मनोऱ्याच्या पायथ्याशीं येऊन आक्रोश करीत बसली असतां, त्यानें तिला हाक मारून सांगितलें कीं, ''शोक करण्याचें कांहींएक कारण नाहीं. उद्यां रात्रीं येथें येशील तेव्हां एक झुरूळ (बीटल),थोडें लोणी, रेशमाचा बारीक धागा, सुताचा मोठा धागा, जाडी सुतळ व एक मोठा जाडा दोर एवढी सामग्री घेऊन ये, म्हणजे काय करावयाचें ते मी तुला सांगेन.'' ते उत्तेजनपर शब्द ऐकून त्यानें सांगितलेल्या सगळ्या वस्तु तिनें दुसरे दिवशीं तेथें आणिल्या. मग तो तिला म्हणाला: ''त्या झुरुळाच्या अंगाला तो रेशमी धागा बांध आणि त्याच्या तोंडाच्या वरती लोणी लाव. म्हणजे तो प्राणी वरल्या बाजूस

कांहीं तरी वासाचा पदार्थ आहे ह्या भ्रांतीनें एकसारखा वरवर चढत राहील. त्याप्रमाणें तिनें करितांच तो एकसारखा वर चढत राहिला, आणि तो वजीर बारीपाशीं होता तेथवर गेला. त्याला धरून त्याच्या अंगाला बांधिलेला रेशमाचा धागा त्यानें सोडून हातीं धरिला. मग त्या धाग्याला त्यानें सुताचा जाडा धागा बांधायाला सांगितलें, आणि तो वरती ओढून घेतला. त्या धाग्याला तिनें सुतळ बांधिली. ती त्यानें वर ओढून घेतल्यावर तिच्या शेवटाला तिनें जाडा दोर बांधिला. तो हातीं आल्यावर त्याचें एक शेवट बारीच्या गरादांला घट्ट बांधून तो त्याच्या आधारानें खालीं उतरून फरारी झाला.

## जॉन अडाम्स व लाटिन व्याकरण

अमेरिकेंतील संयुक्त संस्थाने ग्रेटब्रिटनापासून स्वतंत्र झाल्यावर तेथें प्रजासत्ताक राज्य झालें. त्यांचा पहिला अध्यक्ष जॉर्ज वॉशिंगटन झाला; आणि त्याच्या मागून जॉन अडाम्स हा अध्यक्ष झाला. त्याची लहानपणाची एक गोष्ट सांगतात ती अशी:-

त्याच्या बापानें त्याला शाळेंत घातलें असून त्याच्याकडून लाटिन भाषेचा अभ्यास करविला. ह्या भाषेचें व्याकरण बरेंच कठीण आहे. तें शिकण्याचा अडाम्सला कंटाळा आला. तें हातीं घेतलें म्हणजे त्याचें डोकें दुखायाला लागावें. असा तो अगदीं त्रासून एके दिवशीं आपल्या बापास म्हणाला: ''बाबा, मला हें व्याकरण व्हावयाचें नाहीं. हें शिकून मी पाठशाळेंत जावें अशी तुमची इच्छा आहे खरी. पण मला हा अभ्यास झेपावयाचा नाहीं. तुम्ही मला दुसऱ्या कसल्या तरी कामांत घाला.'' मुलाचे हे नाउमेदीचे शब्द ऐकून तो म्हणाला: ''तुला व्याकरण करवत नाहीं तर आमच्या कुरणासभोंवतीं एक खांच खणावयाची आहे ती खणण्याचें काम कर.'' बापाचें हें सांगणें त्याला बरें वाटलें, आणि तें रुक्ष व्याकरण टाकून तो कुरणांत खांच खणायाला गेला. पण त्याला आंगमेहनत करण्याची मुळींच सवय नसल्यामुळें त्याला तें खणण्याचें काम मोठें कष्टाचें वाटूं लागलें. तें एकदोन दिवस केल्यावर त्याचा त्याला पुरा वीट आला; व त्या खणण्याच्या श्रमानें त्याचें सगळें अंग दुखूं लागलें. पण पुनः लाटिन व्याकरण शिकत राहतों असें म्हटलें तर आपला पाणउतारा व उपहास होईल, असें त्या मानी मुलास प्रथम वाटलें. पण ती आंगमेहनत करण्याचा त्याला पुरा त्रास येऊन शेवटीं त्यानें बापाला म्हटलें: ''खांच खणीत रहाण्यापेक्षां मला व्याकरण पाठ करण्याचे श्रम पुष्कळ सोपे वाटतात. तर मी इतःपर त्या विषयाचा अभ्यास मन लावून नेटाने करीन.'' असें कबूल करून तो आपला शाळेंतला अभ्यास विशेष जोमानें व नेटानें करूं लागला.

# मायकल फारडे

हा एक अतिविख्यात पुरुष इंग्लडांत एकुणिसाव्या शतकाच्या पहिल्या अर्धांत होऊन गेला. हा एका गरीब लोहाराचा मुलगा होता. ह्याला लहान वयापासून निर्वाहासाठीं काम करावें लागलें. तो पहिल्यानें एका माणसाकडे वर्तमानपत्रें वांटण्याच्या कामावर राहिला; आणि तो अमळ जाणता झाला तेव्हां त्याला पुस्तकें बांधावयाचें काम शिकण्यास ठेविलें. ह्या अशा अगदीं हलक्या कामांत त्याचा बराच वेळ जाई. पण त्याला ज्ञान मिळविण्याचा अतिशयित हव्यास लागून तो फावल्या वेळीं उपयुक्त ग्रंथ वाचण्यांत आपला काळ घालवी. तो कोणतेंही काम करीत असला तरी तें अगदीं मनापासून व लक्षपूर्वक करावें, असा त्याचा नेम असे. त्याच्या वेतनापैकीं थोडेसे पैसे त्याचा बाप त्याला देई, ते सगळे तो पुस्तकें घेण्यांत खर्ची. त्याला शास्त्रीय विषयांची माहिती मिळविण्याचा अतोनात नाद लागला; आणि ह्या विषयासंबंधाचे प्रयोग करण्यासाठीं त्याला साहित्य मिळण्याची अडचण पडूं लागली. पण त्यामुळें तो नाउमेद असा कधीं झाला नाहीं. तो ज्या मजुरांबरोबर काम करी, त्यांस किंवा त्याच्या वडिलांस ह्या त्याच्या ज्ञानप्राप्तीच्या उद्योगाचें फारसें कांहीं वाटत नसे; व तोही आपल्या ज्ञानाचा गर्व मिरवीत नसे. एकदां एका शास्त्रीय विषयावर कोणीं व्याख्यानें देण्याचे योजून त्याबद्दल तिकिटा लाविल्या. फारडे याला ही व्याख्यानें ऐकण्याची इच्छा झाली. पण तिकीट विकत घेण्यापुरते त्याच्याजवळ पैसे नव्हते. त्यामुळें तो फार खिन्न झाला. हें पाहून त्याच्या एका भावाने त्याला ते दिले. तेव्हां त्याला तीं व्याख्यानें ऐकायाला मिळाली. ह्या अशा गरीब मुलास असले गहन विषय समजतात व ते ऐकण्याचा त्याला हव्यास आहे, हें पाहून तेव्हांचा प्रसिद्ध शास्त्रज्ञ सर हंप्रे डेवीयानें त्याला आपल्या प्रयोगशाळेंत काम दिलें. येथें ह्या ज्ञानाभिलाषी तरुण मनुष्यांला प्रयोग करून पाहण्याची उत्कृष्ट सवड मिळाली; आणि त्याची शास्त्रीय विषयांत अधिकाधिक गति होऊन तो मोठ्या योग्यतेस चढला. पुढें त्यानें मोठेमोठे शास्त्रीय शोध करून मानवी ज्ञानांत उत्कृष्ट भर घातली, आणि सगळ्या मनुष्यजातीला अक्षय ऋणी केलें. ह्यामुळें त्याची चोहोंकडे ख्याति होऊन तो सगळ्या विद्वान् लोकांच्या आदरास पात्र झाला. मोठमोठे राजे व मुत्सद्दी त्याच्या नांवाचा जयजयकार करूं लागले.खुद्द व्हिक्टोरिया महाराणीसाहेबांनीं त्याच्यासाठीं एक इमारत बांधवून त्यांत त्याला शास्त्रीय शोध करण्यासाठीं प्रयोगशाळादिकांचें उत्तम साहित्य जुळवून दिलें. फ्रेंच सरकारानें तर पारिस शहरांतल्या एका मोठ्या रस्त्याला त्याचें नांव दिलें.

ह्या अशा योग्यतेस व मान्यतेस तो चढला तरी त्यानें मानाच्या पदव्या वगैरेंचा लोभ धरिला नाहीं. त्या कोणी देऊं केल्यास त्यांचा तो स्वीकार करीत नसे. तो शेवटपर्यंत साध्या वृत्तीनें राहिला; आणि त्यानें आपला सगळा काळ विद्याव्यासंगांत घालविला.

## शेतकऱ्याचा मुलगा

विलायतेंतील एका मोठ्या शाळेचा मुख्य शिक्षक एके दिवशीं आपल्या खोलींत बसला असतां, एक गरीब शेतकऱ्याचा मुलगा आंत आला. त्याच्या अंगावरचीं वस्त्रें फाटकीं होतीं. पायांतला जोडा अगदीं जुना झाला होता, व डोकीची टोपी फाटकी होती. त्याला पाहून त्या शिक्षकानें काय पाहिजे म्हणून विचारिलें. मुलगा म्हणाला: ''महाराज, तुमच्या शाळेंत येऊन शिकावें अशी माझी उत्कट इच्छा आहे. पण तुमची फी द्यायाला मला सामर्थ्य नाहीं. तरी मजकडून वाटेल तें काम करून घ्या आणि मला शिकवा.'' तें ऐकून तो शिक्षक म्हणाला: ''तुला सांगण्यासारखें कांहींएक काम नाहीं.'' मुलगा म्हणाला: ''नाहीं म्हणूं नका. तुम्ही सांगाल तें काम करण्यास मी तयार आहें. मला कितीहि कष्टाचे काम तुम्ही सांगितले तरी तें करण्यास मी तयार आहें.''

त्याचा तो निग्रह व विद्या शिकण्याविषयींची उत्कंठा पाहून त्या शिक्षकाचे मन द्रवलें. पण त्याचा निग्रह अमळ कसून पाहण्यासाठीं तो म्हणाला: ''माझ्या बाळा, तूं म्हणतोस तें खरें; आणि तुझी इच्छा पुरवावी असें माझ्याही मनांत येतें. पण माझा कांहीं इलाज नाही. तूर्त तुझा आम्हांला कांहीं उपयोग होईलसें दिसत नाहीं.''

हें निराशेचें उत्तर ऐकून तो मुलगा अगदी खिन्न झाला. तो खालीं मान घालून कांहीं पळें स्तब्ध उभा राहिला. त्याचे डोळे आसवांनी भरले. ते हातानें चटदिशीं पुसून व त्याला नमन करून तो मागें फिरला. तो दार उघडून बाहेर पाऊल टाकतो आहे, इतक्यांत त्या शिक्षकानें त्याला हाक मारून परत बोलाविलें, आणि त्याला शाळेंतलें पडेल तें काम करण्यासाठीं म्हणून ठेवून घेतलें. हा असा गरिबाचा मुलगा विद्याभ्यास करण्यासाठीं म्हणून आला आहे, असें तेथल्या विद्यार्थ्यांला कळलें, तेव्हां त्या सगळ्यांला त्याचें कौतुक वाटलें. शिवाय तो अगदीं गरीब होता तरी उत्तम स्वभावाचा, मनमिळावू व नम्र असल्याकारणानें सगळ्या मुलांस तो आवडूं लागला. तें त्याला आपला वेळ मोडून शिकवूं लागले. अशा रीतीनें त्याची बरीच गति झाल्यावर त्या विद्यार्थांनी मुख्य शिक्षकाला त्यास वर्गांत बसून शिकूं द्यावें, अशी आग्रहाची विनंति केली. ती त्या शिक्षकानें तत्काळ मान्य केली; आणि तो गरीब मुलगा दुसऱ्या मुलांबरोबर मोठ्या उत्साहानें शिकूं लागला. शाळेंतला अभ्यास आटपल्यावर तो

पाठशाळेंत अशाच युक्तीनें गेला; आणि धर्माधिकाऱ्याचें काम शिकून मोठ्या योग्यतेस चढला. तो पुढें मोठा उत्कृष्ट वक्ता व विद्वान निपजून त्याची सर्वत्र ख्याति झाली.

## एका गुराख्याची विद्याप्राप्ति

फ्रान्स देशांत लॉरेन म्हणून एक प्रांत आहे. तेथें व्हालेनटाइन नांवाचा एक विख्यात धर्मगुरु होऊन गेला. हा मूळचा अगदीं गरीब होता. लहान वयांत हा एका शेतकऱ्याचीं गुरें राखायाला राहिला होता. त्याला लिहितां वाचतां येत असल्यावरून त्याला पुस्तकें वाचण्याचा हव्यास मनस्वी लागला. आपल्या गरिबीमुळें आपणास हवें तें पुस्तक वाचायाला मिळत नाहीं, तर पुस्तकें विकत घेण्यासाठीं आपण थोडेसे पैसे मिळविले पाहिजेत, असें त्याला वाटूं लागलें. तेव्हां ते कसे मिळवावे याचा त्याला विचार पडला. शेवटीं ते मिळविण्याची एक चांगली युक्ती त्याने योजिली. ती अशी: तो रानांत गुरें राखायाला गेला म्हणजे तेथले लहानलहान प्राणी मारून त्यांच्या कातड्या तो विकूं लागला. अशा रीतीनें त्याच्यापाशीं सवाशें फ्रांक (पाउणशें रुपये) जमले. तेव्हां तो जवळच्या शहरांतल्या एका पुस्तकवाल्याच्या दुकानीं गेला आणि त्याला म्हणाला: ''मला उपयोगीं पडतील अशीं कांहीं पुस्तकें सांगा. मला तीं विकत घ्यावयाचीं आहेत.'' दुकानदार भला माणूस होता. त्यानें त्या गरीब मुलाची उत्सुकता पाहून त्याला कांहीं पुस्तकांची नांवें सांगितलीं, आणि त्यांची यादी करून किंमत आकारिली, ती त्याच्या जवळच्या रकमेपेक्षां बरीच जास्त झाली. तेव्हां तो खट्टू होऊन व डोळ्यांत आसवें आणून म्हणाला: ''माझ्यापाशीं एवढी रकम नाहीं. ह्या यादींतलीं कांहीं पुस्तके कमी करा. मला आणखी पैसे मिळाले म्हणजे मी तीं घेऊन जाईन.'' हें ऐकून तो दयाळू दुकानदार म्हणाला: ''मुला, तूं हीं सगळीं घेऊन जा; आणि बाकीचे पैसे मागाहून आणून दे.'' मुलगा म्हणाला: ''पण, महाराज, तुम्ही मला ओळखीत नसून माझ्यावर एवढा इतबार कसा ठेवाल?'' दुकानदार म्हणाला: ''बाबा, तुझी मला ओळख नाहीं, तरी तुझ्या बोलण्याचालण्यावरून व तोंडवळ्यावरून तूं प्रामाणिक व विश्वासपात्र आहेस असें मला वाटतें.'' हें ऐकून तो मुलगा तीं सगळीं पुस्तकें मोठ्या हर्षानें घेऊन गेला; आणि बाकीचे पैसे त्यानें लौकरच आणून दिले.

हीं पुस्तकें मिळाल्यावर तो गुरें राखावयास गेला म्हणजे त्यांतलें त्या एकएक बरोबर नेऊन वाचीत असे. त्याला आणखी पुस्तकें मिळण्याचा योग लौकरच आला. तो असा: त्याला एक सोन्याचें सील वाटेंत सांपडलें. त्यावर त्या काळच्या रिवाजाप्रमाणें एका घराण्याची वंशचिन्हें होतीं. त्यांवरून तें कोणा मोठ्या मनुष्याचें आहे असें

त्याच्या लक्षांत येऊन त्यानें तें आपणास सांपडल्याची जाहिरात देऊन आपला पत्ता कळविला. ती वाचून त्या सिलाचा मालक त्याची झोंपडी शोधीत आला. तेव्हां त्या मुलानें त्या सिलावरील चिन्हांचें वर्णन करा म्हणून त्याला सांगितलें. तें वर्णन त्यानें बरोबर केल्यावरून तोच त्या सिलाचा मालक आहे, अशी त्याची खातरी होऊन त्यानें तें त्याच्या हवाली केलें. त्या मुलाचा असा प्रामाणिकपणा व हुशारी पाहून तो गृहस्थ थक्क झाला; आणि ''तूं चांगला बहुश्रुत दिसतोस. तुला एवढें शिक्षण कोठें मिळालें?'' असा त्यानें त्याला प्रश्न केला. त्याचें त्यानें असें उत्तर दिलें कीं, ''महाराज, मी कांहीं कोठच्या शाळेंत गेलों नाहीं, किंवा मला कोणीं शिकविलें नाहीं. मी श्रम करून पैसे मिळवितों आणि याचीं पुस्तकें विकत घेऊन फावल्या वेळीं वाचीत असतों. हीं पहा मजकडे किती पुस्तकें आहेत तीं.'' तो गृहस्थ म्हणाला: ''तुझीं हीं फार थोडीं पुस्तकें आहेत. मजकडे ये म्हणजे मी तुला पुष्कळ देईन.'' त्यावरून त्या गुहस्थाच्या घरीं जाऊन त्यानें आणखी पुस्तकें आणिलीं.

हा मुलगा एके दिवशीं रानांत एका झाडाखालीं बसून वाचीत असतां, तिकडून त्या प्रांताचा सरदार आला. गुराख्याचा मुलगा असा वाचण्यांत गढलेला पाहून त्याला नवल वाटलें, आणि तो त्याच्याजवळ जाऊन तो काय वाचीत आहे तें पाहूं लागला. त्या मुलानें त्याला पाहून ताडिलें कीं, हा कोणी तरी बडा मनुष्य असावा. इतक्यांत त्याच्या तैनातीचे सेवक तेथें आले, तेव्हां तर त्याची खातरीच झाली. मग त्याला ताजीम देऊन त्यानें लवून मुजरा केला. त्या सरदारानें त्याची सगळी हकीकत विचारून घेतली, तेव्हां त्याला त्याच्या विद्याप्रीतीचें चोज वाटलें, आणि त्यानें त्याला शाळेत व पाठशाळेंत घालून त्याचा सगळा खर्च स्वत: चालविला. हें साहाय्य मिळाल्यावर तो धर्माधिकाऱ्याचें काम शिकून त्यांत मोठी योग्यता व लौकिक पावला.

❑❑❑

## भाग चौदावा

# अज्ञानाचे वाईट परिणाम

## दोन गुलाम

एक श्रीमंत गृहस्थ एका ग्रीक तत्वज्ञाकडे जाऊन म्हणाला: ''माझ्या मुलास विद्या शिकविण्याचें काम स्वीकारा.'' तो तत्वज्ञ म्हणाला: ''ह्या कामाबद्दल मला पांचशें रुपये वेतनादाखल तुम्हांस द्यावे लागतील.'' ही रकम फार मोठी आहे असें त्या अज्ञान व लोभी गृहस्थाला वाटून तो म्हणाला: ''एवढ्याशा कामासाठीं तुम्हीं एवढी मोठी रकम मागावी हें कांहीं बरोबर नाहीं. एवढ्या रकमेचा मी एक चांगला भक्कम गुलाम विकत घेईन.'' तत्वज्ञ म्हणाला: ''ठीक आहे. जा तर; तेवढ्या रकमेचा एक गुलामच खरेदी कर, म्हणजे एकाच्या ठिकाणीं तुजपाशीं दोन गुलाम होतील.'' ह्या त्याच्या म्हणण्याचा अर्थ असा कीं, विद्याहीन मनुष्याचें जिणें गुलामाहून फारसें चांगलें नसतें.

## कांहीं तरी कामांत गुंतलें पाहिजे

एक विख्यात वनस्पतिशास्त्रज्ञ होता. तो फुलांसंबंधाने एक ग्रंथ लिहीत होता. त्यानें नाना जातींचीं फुलझाडें लाविलीं होतीं. तीं पाहत तो तासांचे तास बागेंत घालवी. ह्याप्रमाणें एकसारखें सतत काम करीत रहिल्यामुळें त्याची प्रकृति हळूहळू क्षीण होत चालली. ती त्याची अवस्था पाहून त्याच्या बायकोमुलांस चिंता उत्पन्न झाली. त्याची एक जाणती मुलगी होती, ती एके दिवशीं घरांतल्या एका मोलकरणीपाशीं आपल्या बापाच्या प्रकृतीविषयीं बोलत असतां, ती मोलकरीण म्हणाली: ''त्यांचें मन ज्यांत गुंतून राहील असें कांहीं तरी काम त्यांनीं करीत रहावें, म्हणजे त्यांची प्रकृति सुदृढ होईल. ते कधींकधीं तासांचे तास फुलें पाहत उभे असतात, हें कांहीं चांगले

नाहीं.'' त्या बिचाऱ्या अज्ञान बाईला फुलांच्या गुणधर्मींचें सूक्ष्म बुद्धीनें निरीक्षण करण्यास कांहीं मानसिक श्रम लागतात हें ठाऊक नव्हतें. त्याप्रमाणेंच फुलें तीं काय, आणि त्यांकडे असें वेड्याप्रमाणें एकसारखें पाहत तें काय रहावयाचें, असें तिला अज्ञानास्तव वाटलें.

## दगडाचें सोनें झालें

उत्तरअमेरिकेंतल्या एका लहान नदीच्या तीराजवळ कांहीं मुले खेळत असतां त्यांला एक मोठा पिवळा दगड सांपडला. तो चांगला चकचकीत दिसला म्हणून त्यांनीं सगळ्यांनीं मिळून तो उचलून घरीं आणिला. त्यांच्या बापानें तो पाहिला; पण त्याला त्याचें फारसे कांहीं वाटले नाहीं. तो त्या मुलांस म्हणाला कीं,''आपल्या दरवाजाला खीळ नाही. तर हा जड दगड त्याला लावायासाठीं ठेवून द्या.'' त्याप्रमाणें त्या पिवळ्या दगडाचा उपयोग रात्रीचा दरवाजा झांकल्यावर त्याला लावून ठेवण्याकडे व दिवसाचा दरवाजा उघडा राखण्याकडे होऊं लागला. असा तो दगड त्यांच्या दाराशीं कित्येक वर्षे पडून राहिला. पण शेवटीं तो निवळ सोन्याचा असून त्याची किंमत फार मोठी आहे असें सांगणारा मनुष्य त्यांला भेटला; आणि त्यामुळें त्या गरीब कुटुंबाचें दारिद्र नाहींसें झालें! पुढें हा दगड ज्या ठिकाणीं त्या मुलांस सांपडला होता, तें ठिकाण नीट पाहून तेथें सोन्याची खाण लागेल असें ठरविण्यांत आलें; आणि ती जागा खणून पाहतां हा अंदाज खरा ठरला. हल्लीं ह्या खाणींतून बरेंच सोनें निघत असतें.

## गारगोटीचा हिरा झाला

केपटाऊन येथें एक डच शेतकरी रहात असे. याचा एक मुलगा नदीच्या तीरावर चांगल्याचांगल्या गारगोट्या जमा करून खेळायासाठीं आणी. त्यांत एक चकचकीत गारगोटी त्याच्या आईच्या नजरेस पडली. ती अशी छानदार असल्यामुळें तिनें ती आपल्या शेजारच्या एका मनुष्याला दाखविली. त्याला असल्या मजेच्या वस्तु जमविण्याचा नाद असे. म्हणून तो तिच्याकडे ती विकत मागूं लागला. तेव्हां तिनें हसून म्हटले: ''ह्या गारगोटीचे पैसे का घ्यावयाचे? तुम्हांला ही हवी असल्यास ठेवून द्या.'' असें म्हणून तिनें त्याला ती दिली. ह्या माणसालाही पारख तितपतच होती. त्यानें ती आपल्या एका मित्राला दिली. त्यालाही तिची किंमत कळली नाहीं. त्यानें ती आपल्या एका मित्रास दिली. ह्या तिसऱ्या मनुष्याला ह्या वस्तूचे अमळ विशेष कौतुक वाटलें, आणि त्यानें ती एका खनिजपदार्थशास्त्रज्ञाकडे पाठवून दिली. त्यानें

तिची खरी पारख करून तो अस्सल जातीचा हिरा आहे असें ठरविलें; आणि स. १८६७ सालीं पारिस शहरांत भरलेल्या प्रदर्शनांत तो त्यानें मांडिला. तेथें शेवटीं तो पांचशें पौंडांला विकला!

## मौजेचा परवाना

मागल्या काळीं तुर्क सरकाराचा असा परिपाठ होता कीं, तुर्की राज्यांत कोणाला प्रवास करावयाचा असल्यास त्यानें सरकारी अधिकाऱ्यांकडून परवाना घ्यावा. हा असा परवाना देण्याचा अधिकार ज्यांला दिला असे, ते लोकांकडून कांहीं पैसे घेतल्यावाचून तो देत नसत. आतां ह्या राज्यांतील पुष्कळ कामदारांला लिहितांवाचतां येत नसल्यामुळें धूर्त लोक सरकार कागदासारखा दिसणारा कसलाही कागद जवळ बाळगून तो परवाना आहे असें भासवीत, आणि ते हवे तिकडे बिनहरकत फिरत. असा एक लबाड तुर्क बरेच दिवस प्रवास करीत होता. त्याच्याजवळ परवाना म्हणून जो कागद होता, तो त्याला राजधानींतल्या एका रस्त्यांत पडलेला सांपडला होता. पण ही त्याची लबाडी फार दिवस पचली नाहीं. तो परवाना शेवटीं एका सुशिक्षित कामदाराच्या हातीं आला. तेव्हां त्याचें खरें स्वरूप उघडकीस आलें. त्या कागदावर एका जातीच्या दारूचें नांव असून ती कोणत्या कारखान्यांत तयार केली होती तें लिहिलें होतें. आणि तो बाटलीवर मारण्यासाठीं तयार केला होता!

## बादशहाकडचें पत्र

रशियांतील कांहीं लष्करी अमलदार एशियांतील एका शेजारच्या राज्यांतली माहिती काढण्याकरितां गेले असतां, त्यांला तेथल्या कामदारांनीं पकडून राजासमोर आणिलें. तेव्हां त्या अमलदारांपैकीं एका वयोवृद्ध इसमानें पुढें होऊन राजासमोर गुडघे टेकिले, आणि आपल्या खिशांतलें सोन्याचें घड्याळ काढून त्याच्यासमोर ठेवून म्हटलें: ''सरकार, आमच्या बादशाहांनीं आपणांस हा नजराणा पाठविला आहे.'' तें घड्याळ फार सुंदर असून मोठ्या किंमतांचे होतें. पण तेवढ्यानें त्या राजाचें समाधान झालें नाहीं. तो त्यांला म्हणाला: ''बादशाहांनीं जर हा नजराणा पाठविला आहे असें म्हणतां, तर त्याबरोबर पत्र पाहिजे, तें कोठें आहे?'' हा त्याचा प्रश्न ऐकून दुसऱ्या रशिअन अमलदारानें गुडघे टेकून हात जोडिले, आणि खिशांतला एक कागद काढून न कचरतां त्याच्यापुढें ठेविला. तो कागद पाहून राजा खुश झाला. आतां हा कागद नाटकाच्या जुन्या जाहिरातीचा होता. पण त्या राजाला वाचता येत नव्हतें; व जवळचे नोकरही अक्षरशत्रु होते. म्हणून त्या रशिअन अमलदारांची ती बतावणी चालून गेली.

त्या राजानें त्यांचा यथायोग्य आदरसत्कार केला, व मोठ्या थाटाची मेजवानी देऊन बादशाहाला मोठ्या किंमतीचा नजराणा दिला!

## मास्कोशहर जळलें

मानचेस्टर शहरांत एक व्यापारी रहात असे. त्याला आपल्या व्यापारांत बराच पैसा मिळाल्यावर त्याच्या मनांत आपल्या मुलास घेऊन देश पाहावयास जावयाचें आलें. मग पहिल्यानें आस्त्रियादेशांत जावयाचें ठरवून त्या देशाच्या माहितीचें पुस्तक खरेदी करण्याकरितां तो आपल्या मुलास घेऊन एका पुस्तकवाल्याच्या दुकानीं गेला. त्या दुकानदारानें त्याला हवें होतें तें पुस्तक काढून दिलें. तेव्हां त्याचा मुलगा त्याचीं पानें उलटून त्यांत मास्कोशहराविषयीं कांहीं माहिती आहे किंवा नाहीं तें पाहूं लागला. त्याचा बापही त्याच्याप्रमाणेंच तें शहर त्या पुस्तकांत पाहू लागला. पण तें त्यांला त्यांत सांपडेना. तेव्हां तो मुलगा तें पुस्तक कांहीं कामाचें नाहीं असें म्हणून टाकून देण्याच्या बेतांत आला. तेव्हां त्याचा बाप आठवलेंसें करून म्हणाला: ''अरे, यांत मास्को सांपडत नाहीं याबद्दल तुला आश्चर्य वाटण्याचें कांहींएक कारण नाही. नेपोलिअनानें त्या शहरावर स्वारी करी तेव्हां तेथल्या रशिअन लोकांनीं तें जाळून टाकिलें. ते आतां कोठून असणार!'' त्या दोघांही बापलेकांला मास्कोशहर रशियामध्यें आहे हें ठाऊक नव्हतें, म्हणून त्यांची अशी फजिती झाली.

## फेकून दिलेले बटाटे

इंग्लंडांत पहिल्यानें सर वॉल्टर राले यानें अमेरिकेंतून बटाटे आणिले. त्यांचें पहिलें पीक काढिल्यावर रालेनें कांहीं बटाटे आपल्या एका मित्रास पाठविले, आणि, हे कंद फार रुचकर व पौष्टिक आहेत, असें त्याला कळविलें. त्या गृहस्थानें ते तसेच राखून ठेवून लावणीच्या हंगामांत आपल्या जमिनींत लाविले. पुढें ते तयार होऊन त्यांला एका प्रकारचीं फळें आलीं. तीं त्यानें काढून आणविलीं आणि स्वयंपाक्याला तीं रांधायाला सांगितलीं. तीं त्यानें चांगली तळून त्यांवर साखर पेरून मेजावर आणून ठेविलीं. तीं त्या गृहस्थानें चाखून पाहिलीं; तीं अर्थात् त्याला कडू लागलीं. तेव्हां राग येऊन त्यानें तीं बटाट्यांचीं झाडे उपटून काढून साफ जाळून टाकायाला आपल्या चाकरांस सांगितलें. ह्या हुकमाप्रमाणें त्यांनीं तीं सगळी उपटून काढून जाळिलीं. तीं जाळिल्यावर एक गृहस्थ सहज तेथें आला; आणि त्याचा पाय त्या राखेवर पडला असतां, तिच्या खालीं भाजून निघालेल्या एका कंदावर दाब पडून त्याचें सालपट

निघालें; आणि आंतला पांढरा भाग बाहेर पडून त्याला चांगला वास सुटला. त्यावरून तो खाण्याजोगा आहे असें वाटून त्यानें तो चाखून पाहिला. तो त्याला फारच स्वादिष्ठ लागला. ह्याप्रमाणें बटाट्याच्या झाडाचा कोणता भाग खावा हें त्यांला कळून आलें.

## व्यवहारी अपूर्णांक

एका दच जमीनदाराच्या वतनांत तेलाची खाण लागली. ती एका व्यापारी मंडळीने मक्त्यानें घेऊन मालकाला तेलाच्या आठ पिंपांमागें एक पिंप देण्याचा करार केला. त्यांत अर्थात् असें लिहिलें होतें कीं, उत्पन्नाचा एक अष्टमांश जमिनीच्या मालकाला द्यावा. ह्या खाणींत अंदाजाबाहेर तेलाचा लाग लागला. तेव्हां अर्थात् त्या जमीनदारानें मंडळीपाशीं आपणाला उत्पन्नाचा अधिक मोठा भाग मिळाला पाहिजे अशी तक्रार केली. त्या व्यापाऱ्यांनीं त्याला विचारिलें: ''तुह्मांला किती जास्त भाग हवा?'' तो म्हणाला: ''एका अष्टमांशाच्या ऐवजीं निदान एक बारांश तुम्ही मला दिला पाहिजे.'' हा त्याचा हिशोब ऐकून त्याला मोठी मौज वाटली, आणि त्यांनीं त्याच्याशीं तसा करार केला. पुढें हिशोबाप्रमाणें त्यांचा वाटा काढून देण्याचा समय आला तेव्हां व्यापाऱ्यांनीं प्रत्येक बारा पिंपांमागे एक पिंप ह्याप्रमाणें त्याच्या पदरांत माप घातलें. हा हिशोब पाहून त्या जमीनदाराला मोठा अचंबा वाटला. त्याची कल्पना अशी होती कीं, आपला नवा करार आपल्या फायद्याचा आहे. तो असा बुचकळ्यांत पडलेला पाहून त्याला त्यांनीं तो हिशोब समजून सांगितला. तेव्हां त्यानें आपलें डोके खाजवून म्हटले: ''आठ बारांपेक्षा अधिक आहेत हें मला आजच पहिल्यानें कळलें!''

## सही करितां येईना

एका जमीनदाराची एक तरुण मुलगी होती. ती रूपानें सुंदर असून चांगल्या गुणांची होती. ती गृहकृत्यांत फार कुशल होती. ती नेहमीं कांहींतरी काम करण्यांत गुंतलेली असे. तिचा स्वभावही चांगला मनमिळावू होता. हे तिचे गुण व स्वरूप पाहून एका सधन व्यापाऱ्याच्या मनांत तिच्याशीं विवाह करावयाचें आलें. आणि त्यासंबंधानें त्यानें तिजपाशीं गोष्ट काढिली. ती तिला मान्य झाली. मग त्यांचा विवाह होण्याचें ठरून त्याचा पुकारा चोहोंकडे झाला. तेव्हां त्या मुलीच्या शेजाऱ्यांस व ओळखीच्यांस ह्या शरीरसंबंधाबद्दल बरें वाटलें, आणि त्यांनीं तिचें अभिनंदन केलें. पुढें ठरलेल्या दिवशीं ख्रिस्ती लोकांच्या रिवाजाप्रमाणें तीं दोघें देवळांत उपाध्यायाच्या समोर विवाहाच्या करारावर सह्या करावयास गेलीं. पण ती मुलगी निरक्षर असल्यामुळें तिला त्या करारावर सही करितां येईना. हें पाहून त्या व्यापाऱ्याला मोठें आश्चर्य

वाटलें, आणि तो म्हणाला: ''अशा सुंदर व गुणी मुलीस लिहितांवाचतां येत नसेलसें मला मुळीं वाटलें नव्हतें. असली अक्षरशून्य बायको करून माझें मुळीं चालावयाचें नाहीं. माझ्या उद्योगामुळें मला नेहमीं बाहेर हिंडावे लागणार. तेव्हां अर्थात् घरीं माल आला किती व बाहेर गेला किती, याचा हिशोब ठेवण्याच्या कामीं मला मदत करील अशी बायको हवी आहे. असल्या सुरूप पण अक्षरशत्रु बायकोला घेऊन मला काय करावयाचें आहे?'' असें म्हणून त्यानें तिच्याशीं विवाह केला नाहीं. ही अशी निराशा व फजिती झाली तेव्हां त्या मुलीस किती खेद झाला असावा बरें!

## नवा शिपाई

फ्रेडरिक दि ग्रेट राजाच्या तैनातीस जी पलटण असे, तींतील प्रत्येक शिपायाची त्याला ओळख असे. ह्या पलटणींत कोणी नवा माणूस ठेविला असतां, त्याजवर त्याची नजर अवश्य जाई, अणि त्याला तो तीन प्रश्न बहुशः क्रमवार विचारी. ते असे: (१) तुझें वय काय? (२) लष्करांत लागून तुला किती दिवस झाले? आणि (३) तुला तुझा पगार व जामानिमा नेमानें मिळत आहे काय?

ह्या पलटणींत एकदां एक तरुण फ्रेंच मनुष्य ठेविला. त्याला जर्मन भाषा मुळीं येत नव्हती. यास्तव राजानें सदरील प्रश्न विचारिले तर त्यांचीं उत्तरें त्याला त्या भाषेंत देतां यावीं म्हणून तीं त्याच्या सोबत्यांनीं त्याला यथाक्रम शिकवून ठेविलीं होतीं. पुढें लौकरच राजाची नजर त्याजवर जाऊन त्यानें त्याला नेहमींचे प्रश्न केले. पण ह्या वेळीं राजानें आपल्या प्रश्नांचा क्रम बदलला. त्यानें दुसरा प्रश्न पहिल्यानें केला. तो अर्थात् असा कीं, ''लष्करांत लागून तुला किती दिवस झाले?'' त्या शिपायानें शिकविलेल्या क्रमानें उत्तर दिलें. तो म्हणाला: ''एकवीस वर्षें.'' हें उत्तर ऐकून राजाला आश्चर्य वाटलें. पण त्यानें तें न दर्शवितां दुसरा प्रश्न केला. तो असा: ''तुझें वय काय?'' त्याचें उत्तर त्यानें,''सहा महिने झाले.'' असें दिलें. तें ऐकून तर राजाला मोठाच विस्मय वाटला, आणि तो म्हणाला: ''ह्यावरून एक तर तूं वेडगळ आहेस किंवा मी आहें.'' हा तिसरा प्रश्न आहे असें समजून त्या शिपायानें उत्तर केलें: ''दोन्ही नेमानें.'' हें उत्तर ऐकून राजा संतापून म्हणाला: ''माझ्या शिपायानें मला माझ्या तोंडावर वेडगळ म्हणण्याचा हाच पहिला प्रसंग. तर आतां सांग कीं, ह्या तुझ्या धट्टाईचा अर्थ काय?'' राजानें रागास चढून असा प्रश्न केला. तेव्हां त्या शिपायानें ताडिलें कीं, आपल्या उत्तरांत कांहीं तरी गफलत झाली असावी. मग लागलींच त्याच्या पुढें गुडघे टेकून व क्षमा मागून तो फ्रेंच भाषेंत ह्मणाला:''खावंद सरकार, मला जर्मन भाषा मुळीं येत

नाहीं.'' राजा म्हणाला: ''असें काय? तर मग मी तुला ह्याबद्दल क्षमा करितों. पण जर्मन भाषा होईल तितकी लौकर शीक. माझी खातरी आहे कीं, तूं मोठा शूर शिपाई होशील.''

## अज्ञानाबद्दल नशिबाला दोष

एक बाई आपल्या बहिणीला भेटण्याकरितां फार दिवसांनीं गेली. रीतीप्रमाणें ती आपल्या बहिणीला कुटुंबाचें क्षेमकुशल विचारूं लागली. तेव्हां तिने आपलें रडगाणें सांगितलें. ती म्हणाली: ''ह्या घरांत रहायाला आल्यापासून आम्हांला एक दिवस चांगला गेला नाहीं. दैव आमच्या पाठीस हात धुऊन लागलें आहे. माझ्या नवऱ्याला संधिवाताचा विकार जडून तो अगदीं पंगू होण्याची भीति वाटत आहे. मला तर जेव्हातेव्हां सरदी होत असते. हिंवाळा आला कीं मुलांस सरदीखोकला होऊन त्यांचे घसे धरतात. येथें आल्यावर पहिल्यानें आम्हां सगळ्यांला असा सडकून ताप आला कीं, त्यामुळें माझे दोन लहान मुलगे गमावले, व एक चाकर आटपला; आणि तेव्हांपासून आमची सगळ्यांची प्रकृति क्षीण झाली ती कधींच सांवरली नाहीं. अशी आमच्यामागें सदा विपत्ति लागून राहिली आहे.''

बहिणीचें हें रडगाणें ऐकून ती बाई म्हणाली: ''ताई, मी तुला खरेंच सांगते कीं, ह्या बाबतींत देवाला किंवा दैवाला बोल लावण्याचें मुळीं प्रयोजन नाहीं. ही सगळी विपत्ति तुमच्या अविचारामुळें उद्भवली आहे. हें पाहा, तुमच्या ह्या घराच्या बाजूला मोठी थोरली दलदल आहे, तीमुळें तुमची ही जागा अगदीं दमसर असते. भूईंत ओल असली म्हणजे तीवर रहाणारांला तूं सांगितले तसले विकार अवश्य होतात. तुला किंवा तुझ्या नवऱ्याला आरोग्याचे नियम ठाऊक असते तर तुझी येथें कदापि रहायाला आलां नसतां. आरोग्याचे नियम मोडिले म्हणजे विकार व्हावयाचेच. तेथें देवाचें किंवा दैवाचें कांहींएक चालत नाहीं. दैव प्रतिकूळ झालें आहे असें म्हणण्यापेक्षां आपलें अज्ञान आपणांला भोंवत आहे असें म्हणणें विशेष रास्त आहे. तर अजून तरी सावध होऊन हें घर होईल तितकें लौकर सोडा आणि पुढें आणखी येणारीं संकटे टाळा.''

बहिणीचें हें सांगणे त्या बाईला पटून तिनें ती जागा सोडण्याविषयीं आपल्या नवऱ्याला आग्रहपूर्वक सुचविलें; आणि तीं लौकरच दुसऱ्या जागेंत रहावयास गेलीं. तेथें त्या गृहस्थाचा संधिवात साफ गेला; आणि कुटुंबांतल्या कोणत्याही माणसाला कसलीही रुजा होईनाशी झाली.

❑❑❑

## भाग पंधरावा

# अविचारीपणाचे वाईट परिणाम

## भली खोड मोडली

बोस्तनशहरांतल्या एका दुकानासमोर एक बाई आपली गाडी उभी ठेवून कांहीं वस्तु घेण्याकरितां दुकानांत गेली. तिची गाडी वाटेंत आडवी उभी होती; आणि ती वाट अरुंद असल्यामुळें जाणाऱ्यायेणाऱ्यांस तीमुळें अडचण झाली. त्या वाटेनें दोन गृहस्थ आले. त्यांनीं गाडीवानाला वाटेंतून गाडी काढायाला सांगितलें. पण तो ऐकेना. त्यांची गडबड ऐकून ती बाई दुकानाच्या दाराशीं येऊन गाडीवानाला मोठ्या कुऱ्यानें म्हणाली कीं, ''गाडी मुळीं हालवूं नको. आहे तेथेंच ठेव.'' हा त्यांचा हट्ट पाहून ते गृहस्थ त्या गाडींत शिरून पलीकडे उतरून गेले. गाडींत त्या बाईची एक मैत्रीण बसली होती, तिला हा प्रकार पाहून कसेंसेंच वाटलें. इतक्यांत तिकडून आणखी कांहीं शिपाई आले. त्यांनींही सदरील गृहस्थांचेंच अनुकरण केलें. ते सगळे एकामागून एक गाडींत घुसून पलीकडे निघून गेले. ह्यामुळें त्या गाडींत बसलेल्या बाईच्या मनाची अवस्था कशी काय झाली असेल, व त्या उद्दाम बाईचें मन किती खट्टू झालें असेल, तें कांहीं सांगायाला नको.

## एक बाई आणि तिचें मुंगूस

एका गृहस्थाने एक मुंगूस पाळिलें होतें. तें माणसाळून घरांत मोकळें हिंडे. एके दिवशीं त्याची बायको चिरगुटें धुण्यासाठीं विहिरीवर जावयास निघाली, तेव्हां तिने नवऱ्याला सांगितलें: ''मूल पाळण्यांत निजलें आहे. त्याला मुंगूस उपद्रव करील; तर मी परत येईतोपर्यंत घरांतून कोठे जाऊं नका.'' ती गेल्यावर ह्या गृहस्थाला कांहीं निकडीच्या कामासाठीं बाहेर जावें लागलें. इतक्यांत घरांत एक मोठा नाग शिरला.

त्याचा सुगावा लागतांच मुंगसानें त्याच्यावर झडप घालून त्याला ठार केलें; आणि त्याच्या तोंडाला व अंगाला सर्पाचे रक्त लागलें. ती बाई परत येऊन पाहते तो नवरा घरीं नाहीं. आणि मुंगसाचे अंग रक्तानें भरलें आहे. तेव्हां आपलें मूल त्यानें फाडून खाल्लें असें वाटून तिने त्याच्या अंगावर डोकीवरील पाण्याचें भांडें फेकून त्याचा प्राण घेतला; मग ती आरडतओरडत पाळण्यापाशीं गेली; तों मूल आंत स्वस्थ निजलें आहे, आणि जवळच एक मोठा साफ छिन्नभिन्न होऊन पडला आहे,असें तिच्या दृष्टीस पडलें. तेव्हां मुंगसाचा नाहक जीव घेतल्याबद्दल तिला मोठे दुःख वाटलें.

## गाईच्या गळ्यांतील घांट

एका शेतकऱ्याचा मुलगा रानांत गाई राखीत होता. त्याच्या प्रत्येक गाईच्या गळ्यांत घांट होती. एक मनुष्य तेथें येऊन त्याला म्हणाला, ''ह्या गाईच्या गळ्यांतली ही घांट फार नामी आहे. अशा घांटेला काय पडतें रे?'' तो मुलगा म्हणाला: ''एक क्राऊन पडतो.'' ''एकच क्राऊन का? मला वाटलें होतें कीं, हिला अधिक पैसे पडत असावे. मी तर अशा घांटेला दोन क्राऊन देईन.'' तें ऐकून त्या मुलानें म्हटलें कीं, ''आण दोन क्राऊन, मी तुला ही घांट देतों.'' त्या मनुष्यानें तेवढे पैसे चटदिशीं काढून दिले; आणि तो घांट घेऊन चालता झाला. ते पैसे पाहून मुलास मोठा हर्ष झाला. पण ज्या गाईच्या गळ्यांतली घांट त्यानें काढून दिली, ती चरतचरत दुसऱ्या गाईंला सोडून अमळ दूर गेली. तेव्हां त्या घांट खरेदी करणाऱ्या माणसानें तिच्या गळ्यांत दोरी अडकवून तिला लांबविली. तिच्या गळ्यांतल्या घांटेचा आवाज त्या मुलास ऐकूं आला असता तर त्याला ती कोणीकडे आहे व कोठें जात आहे तें कळलें असतें. ती गाय नाहींशी झाली हें पाहून तो मुलगा घाबरून गेला. तिचा त्यानें सगळ्या रानांत हिंडून शोध केला. पण ती त्याला सांपडेना. तेव्हां त्यानें ही युक्ती योजून गाय नेली असावी. मग तो रडत घरीं आला. त्याच्या बापानें त्याचें ते रडण्याचें कारण ऐकून म्हटलें: ''तूं एवढ्याशा लाभाला भुलून गाय घालविली, हा तूं मोठाच अविचार केला. ह्या प्रपंचांत असे मोहप्रसंग पुष्कळ येतात. त्या वेळीं मनुष्याची खरी पारख होते. त्यांला भुलून जाऊन वाईट काम करण्यास जो तयार होतो, त्याचें अनेक प्रकारीं नुकसान होतें. ह्यासाठीं प्रत्येक गोष्टीचा नीट विचार करून चांगला मार्ग सहसा सोडूं नये.''

## भयंकर प्रसंग

कांगो नांवाच्या बंदरांत एक जहाज असतां, त्यावरील एका खलाश्याला पाण्यांत पोहण्याची इच्छा झाली. त्याचे सोबती त्याला म्हणाले कीं, ''ह्या पाण्यांत मोठे मगर

असण्याचा संभव आहे. यांत पोहणें धोक्याचें आहे. ह्यासाठीं तूं पाण्यांत उडी टाकण्याचें धाडस करूं नको.'' पण हें त्यांचें सांगणें मनास न आणून त्यानें पाण्यांत उडी टाकिली. तो अमळ दूर पोहून गेला नाहीं तों एक मोठा मगर त्याच्याकडे येत आहे असें जहाजावरील लोकांच्या दृष्टीस पडलें. तें पाहून तें अगदीं घाबरून गेले. त्याला त्या भयंकर प्राण्याच्या तोंडांतून कसें सोडवावें तें कांहीं त्याला सुचेना. त्यांनीं त्याच्यासाठीं पाण्यांत होडी सोडिली आणि त्या मगरावर पिस्तुलें झाडिलीं. पण त्यांचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. कारण त्याच्या कठिण खवलांवरून गोळ्या निसटून गेल्या. ह्या त्यांच्या गडबडीवरून त्या अल्लड खलाश्याला आपल्यावरील संकटाचा इशारा मिळून तो मोठ्या वेगानें पोहूं लागला. पण तो मगर त्याच्या अगदीं जवळ येऊन ठेपला, आणि आतां त्याला तो धरितो खास असें दिसलें. इतक्यांत किनाऱ्याजवळच्या वेताच्या बेटांतून एक मोठा वाघ त्या खलाश्यावर उडी टाकायाला अगदीं टपून राहिला आहे असा दिसला. तो मगर त्याला आतां पकडणार तोच त्या वाघाने त्याच्यावर उडी टाकिली. ती अमळ दूर जाऊन तो वाघ त्या मगराच्या जबड्यांत पडला, आणि त्यांची झटापट लागली. अशा अवचित प्रकारें त्या दोन्ही हिंसक व भयंकर प्राण्यांच्या तावडींतून सुटून खलाशी एकदांचा होडींत चढला; आणि तारवावर सुखरूप येऊन पोंचला. ह्याप्रमाणें त्याच्या अविचारामुळें त्याचा जीव अशा भयंकर संकटांत पडला होता. तें टळल्याबद्दल त्यानें गुडघे टेकून देवाचे आभार मानिलें.

## विश्वासू कुत्रा

एक फ्रेंच व्यापारी आपलें येणें वसूल करण्याकरितां एका दूरच्या गांवीं घोड्यावर बसून गेला. त्याच्याबरोबर त्याचा एक विश्वासू कुत्रा होता. वसूल केलेल्या पैशांची थैली जिनाला बांधून तो आपल्या गांवीं यावयास निघाला. कांहीं मैल प्रवास केल्यावर त्याला अमळ थकवा वाटून तो एका झाडाखालीं विसावा घ्यावा म्हणून घोड्यावरून उतरून बसला; आणि ती थैली त्यानें आपल्याजवळ ठेविली. कांहीं वेळ विश्रांति घेतल्यावर पुनः तो घोड्यावर स्वार होऊन मार्गस्थ झाला. पण ती थैली तो तेथें विसरला. ती कुत्र्याच्या नजरेस पडून तो घोड्याच्या मागून मोठ्याने भुंकत धावूं लागला. पण तो भुंकतो कां हें त्याच्या ध्यानांत कांहींच येईना. त्या कुत्र्यानें मागें जाऊन ती तोंडांत धरून नेण्याचा प्रयत्न केला. पण ती जड असल्यामुळें त्याला हालेना. मग तो पुनः परत धन्याच्या मागें दौड करून गेला, आणि भुंकून व घोड्याच्या टांचाला चावे घेऊन त्याला त्याच्या चुकीचा इशारा देऊं लागला. हें त्या कुत्र्याचें

विचित्र वर्तन पाहून त्या व्यापाऱ्याला वाटलें कीं, आपला कुत्रा पिसाळला. मग तो खराच पिसाळला आहे किंवा कसें हें पाहण्यासाठीं एक नाला वाटेंत लागला त्याचें पाणी तो कुत्र्याच्या चालीप्रमाणें चाखितो कीं नाहीं हें तो पाहूं लागला. पण तो आपल्या धन्याला त्याच्या नुकसानाचा इशारा देण्याविषयीं अतिशयित आतुर झाला होता. त्याला पाणी चाखण्याचें भान कोठून रहाणार! हें पाहून त्या व्यापाऱ्याला खास वाटलें कीं, तो पिसाळला आहे. मग त्याचा मुलाजा करणें बरोबर न वाटून त्यानें आपलें पिस्तूल त्याच्यावर झाडिलें. त्यासरशी तो तेथें प्राणांतवेदनांनीं इवळत पडला. तेव्हां त्याच्या किंकाळ्या ऐकूं न याव्या, व त्याचा अंत आपल्या डोळ्यांसमोर न व्हावा म्हणून तो घोडा भरधाव काढून चालता झाला. आपल्या आवडत्या कुत्र्याची अशी अवस्था झाली याबद्दल त्याला अतिशयित खेद झाला. तो आपल्या मनांत म्हणाला कीं, मी जी रकम आज वसूल केली ती सगळी गेली असती तरी तिचें मला कांहींएक वाटलें नसतें. पण माझा असा उत्तम कुत्रा गेला याचें मला भारी वाईट वाटतें. असें म्हणून जिनास जेथें ती थैली बांधिली होती, तेथें तो ती चाचपून पाहूं लागला. पण ती हातास लागली नाहीं. त्याबरोबर कुत्र्याच्या त्या भुंकण्याचा अर्थ त्याच्या ध्यानांत लागलींच आला, आणि तो जेथे विश्रांति घ्यावयास बसला होता, त्या झाडाकडे घोडा भरधाव फेकीत आला. वाटेंत जेथें त्या कुत्र्यावर त्यानें पिस्तुल झाडिलें होतें, तेथें तो त्याला पाहूं लागला; पण त्याला तो कोठेंही दिसेना. मग त्या झाडापाशीं येऊन तो पाहतो तों तो कुत्रा मृतप्राय होऊन त्या थैलीवर पडलेला त्याला आढळला. हें त्या अत्यंत विश्वासू कुत्र्याचें वर्तन पाहून त्याला मनस्वी गहिंवर आला, आणि तो मुलासारखा रडूं लागला. त्यानें त्या कुत्र्याच्या अंगावरून हात फिरविला, तेव्हां त्यानें त्याचा हात चाटून व शेपूट हालवून आनंद प्रगट केला आणि प्राण सोडिला!

## राजा आणि ससाणा

प्राचीन काळी इकडील राजे ससाणे पाळीत असत. त्यांना आकाशांत उडणाऱ्या पक्ष्यांच्या मागें लागून ठार मारावयास शिकवीत. त्यांला मणगटावर धरून उडता पक्षी दाखवून सोडिलें म्हणजे ते त्याच्यावर झडप घालून त्याला ठार करून परत आपल्या ठिकाणीं येत.

एका मोठ्या राजानें असे ससाणे पाळिले होते. त्यांतला एक त्याच्या विशेष आवडीचा होता; त्यास घेऊन तो रानांत गेला; आणि उडणारा पक्षी दिसला कीं त्याच्यावर त्याला सोडूं लागला. ह्याप्रमाणें त्या ससाण्यानें बरेच पक्षी मारिले. शेवटीं

राजाने त्याला एका पक्ष्यावर सोडिलें असतां, तो कोठें उड्डाण करून गेला. राजाने त्याची वाट बराच वेळ पाहिली. पण तो कांहीं परत येईना. तेव्हां तों कंटाळून परत राजवाड्याकडे जावयास निघाला. कारण तो ससाणा कोठेंही गेला असला तरी परत आल्यावांचून रहाणार नाहीं, हें त्याला पक्के ठाऊक होतें. राजाने आपल्या बरोबरच्या लोकांस जवळच्या वाटेनें नगरांत जावयाचा हुकूम करून आपण एकटाच एका दरींतून फिरत चालला. वाटेंत त्याला पराकाष्ठेची तहान लागली; तेव्हां तो जवळपास कोठे पाणी शोधू लागला. तो एका खडकाच्या भेगेतून पाणी खालीं पाझरतांना त्यानें पाहिले; आणि मोठा हर्ष पावून त्यानें तें आपल्या जवळच्या पेल्यांत धरिलें. पेला भरल्यावर तो त्यानें तोंडाजवळ नेला. इतक्यात झाडींत सळसळ आवाज होऊन त्याच्या हातचा पेला कोणी चटदिशीं ढकलून दिला. त्यामुळें त्यांतले सगळे पाणीजमिनीवर सांडले. तेव्हां ही अशी आगळीक करायाची छाती कोणाला झाली हें तो पाहूं लागला. तो त्याचा तो आवडता ससाणा त्या खडकाच्या वरल्या भागीं बसलेला त्याच्या नजरेस पडला. राजाने पेला त्या पाण्यानें पुनः भरून तोंडाकडे नेला. तेव्हां त्या ससाण्याने तो पुन: उलथून टाकिला. राजाने आणखी एक वेळ तो पेला भरिला, पण तोही त्या पक्ष्यानें त्याच्या हातचा लोटून दिला. हें पाहून राजाला त्याचा अतिशयित राग आला. आणि त्यानें आपल्या कंबरेच्या तरवारीनें त्याला तत्काळ छाटून टाकिलें. मग तो आपला खालीं पडलेला पेला पाहूं लागला. तो तो घळणीवरून खालीं घरंगळत गेला असून तो पुनः हातीं लागण्याजोगा नाहीं असें त्याला आढळून आलें. मग तें पाणी कोठून झिरपत आहे तें पाहावें, आणून तो त्या खडकाच्या वरल्या भागी गेला. तेथें पाण्याचे एक लहानसें डबकें असून त्यांत एक भला मोठा नाग पडून कुजून गेला होता. तो पाहून त्याच्या उरात धडकी भरली; आणि त्या बिचाऱ्या ससाण्यानें आपल्या हातचा पेला तीन वेळां लोटून देऊन आपला प्राण वांचविला असतां, आपण त्याचा प्राण अविचारानें घेतला, हें कांहीं बरोबर केलें नाहीं. अशी हुरहुर त्याच्या मनाला सारखी लागून राहिली.

आपला जीव वांचविणाऱ्या अशा उत्तम मित्राची हत्या आपल्या हातून झाली, याबद्दल त्याला अतोनात खेद झाला.

## चांगली मसलत नेहमीं ऐकावी

प्राचीन काळीं तार्तरीदेशाचा राजा आपल्या दरबारच्या उमरावांसहवर्तमान घोड्यावर बसून चालला असतां, त्याला एक दरवेशी वाटेंत आढळला. ह्या लोकांना पाहून तो

दरवेशी मोठ्यानें ओरडून म्हणाला:''जो कोणी मला शंभर दिनार देईल त्याला मी चांगली मसलत देईन.'' हे शब्द राजाच्या कानीं पडले तेव्हां त्याचें कौतुक वाटून त्यानें त्याला पुसलें: ''तूं शंभर दिनार घेऊन मसलत देणार ती कसली?'' दरवेशी म्हणाला: ''खाविंद सरकार, प्रथम मला शंभर दिनार देण्याचा हुकूम करा. ते माझ्या हातावर पडतांच मी मोठ्या आनंदानें माझी मसलत सांगेन.'' तेव्हां, हा कांहींतरी अशीच मोठी विलक्षण गोष्ट सांगणार आहे, असें राजाच्या मनांत येऊन त्यानें त्याला तेवढी रूम देण्याचा हुकूम केला. ती हातीं पडल्यावर दरवेशी म्हणाला : ''खाविंद सरकार, माझी मसलत एवढीच आहे कीं,कोणत्याही गोष्टीचा परिणाम काय हाईल याचा नीट विचार केल्यावांचून तिला कदापि हात घालूं नये.''

ही त्याची मसलत क्षुल्लक वाटून राजाचे उमराव हसून व त्याचा उपहास करून राजाकडे पाहूं लागले. त्यांला असें वाटलें कीं, दरवेश्यानें अशी ठकबाजी केल्याबद्दल राजाला क्रोध येऊन तो त्याला जबर शिक्षा करवील. पण राजानें त्यांचा तो अभिप्राय समजून म्हटलें कीं, दरवेश्यानें जी ही मसलत सांगितली आहे, तींत हसण्यासारखें काहीं नाहीं. ह्या मसलतीप्रमाणें आपण नेहमीं वागलों, तर आपणांस पुष्कळ अनर्थ टाळितां येण्याजोगे आहेत, असा माझा अभिप्राय आहे. ह्या उपदेशाचें महत्त्व मला इतकें वाटत आहे कीं, हा माझा राजवाड्याच्या प्रत्येक भिंतीवर खोदून ठेवावा, असें मीं योजिलें आहे. कारण असा तो खोदिल्यानें माझ्या दृष्टीसमोर तो सदोदित राहील.

ह्या गोष्टीला कांहीं दिवस लोटल्यावर ह्या राजाच्या पदरच्या एक मोठ्या गर्विष्ठ व महत्त्वाकांक्षी उमरावाच्या मनांत असें आलें कीं, राजाचा घात करून आपण त्याची गादी बळकावावी. मग त्यानें राजवैद्याला आपल्या मसलतींत घेऊन असें सांगितले कीं, ''मी विष लाविलेलें एक शस्त्र तुझ्याकडे देतों. राजाला शीर काढावयाची झाली म्हणजे त्या शस्त्रानें ती कढ. असें तूं केलेस तर तुला मी दहा हजार दिनार देईन, व मी राजा झालों म्हणजे तुला मी आपला वजीर करीन.'' ह्या दुष्ट मसलतीला तो वैद्य कबूल झाला; आणि थोडे दिवस लोटल्यावर त्याला राजानें शीर काढावयास बोलाविलें, तेव्हां तो त्या उमरावानें विष लावून दिलेलें शस्त्र आपल्या पिशवीच्या एका कप्पींत घालून राजवाड्यांत गेला. त्यानें राजाचा हात बांधून शीर तोडण्यासाठीं तें विषारी शस्त्र बाहेर काढिलें; आणि तें तो आतां राजाच्या हातावर ठेवणार, इतक्यांत रक्त धरण्यासाठीं जवळ ठेविलेल्या भांड्याच्या तळशीं,''कोणत्याही गोष्टीचा परिणाम काय होईल याचा नीट विचार केल्यावांचून तिला कदापि हात घालूं नये.'' हें वचन त्याच्या

नजरेस पडलें. त्याबरोबर त्याच्या मनांत असा विचार आला कीं, ''ह्या विषारी शस्त्राचा प्रयोग केल्यानें राजाचा प्राणघात होईल. पण मला ह्याबद्दल पकडून फाशीं देतील. मला देहांतशासन मिळाल्यावर सगळ्या जगांतली दौलत मिळाली तरी तिचा मला काय उपयोग?'' असा विवेक करून त्यानें तें शस्त्र पिशवींत ठेविलें आणिदुसरें काढिलें. वैद्यानें शस्त्र बदललें व त्याची मुद्रा कासरीबावरी झाली आहे, असें पाहून राजानें त्याला शस्त्र का बदललें म्हणून विचारिंले. वैद्यानें उत्तर केलें कीं,''त्या शस्त्राचें टोंक मोडलें आहे.'' ह्या त्याच्या म्हणण्याचा संशय येऊन राजाने त्याला तें शस्त्र दाखविण्याचा हुकूम केला. त्याबरोबर तो अगदीं काळवंडून जाऊन थरथरां कापूं लागला. ही त्याची अवस्था पाहून यांत कांहीं तरी दगा आहे खास, अशी राजाची खातरी झाली व त्यानें त्याला दरडावून म्हटले कीं: ''खरा प्रकार काय आहे तो सांग; नाहींतर तुझें शिर धडापासून वेगळें झालेंच म्हणून समज.''

वैद्य भयानें थरथरां कांपूं लागला. आतां खरा प्रकार कबूल केल्यावांचून गति नाहीं असें पाहून तो हात जोडून व गुडघे टेकून म्हणाला:''सरकार मला अभय देतील तर मी सगळें कबूल करितों.'' राजानें त्याला अभय दिल्यावर त्यानें त्या उमरावाची सगळी मसलत फोडिली, आणि ह्या भयंकर गुन्ह्यास आपला हात न वाहण्यास कोणतें कारण घडलें तेंही त्यानें सांगितलें. तें ऐकून राजानें दरबार भरविला, आणि त्या दगेखोर उमरावाची चौकशी करून त्याला देहांतशासन दिलें. मग तो आपल्या उमरावांस म्हणाला: ''तुम्ही त्या दरवेश्याच्या मसलतीला हसलां होतां. पण तिचा मीं स्वीकार केल्यामुळें माझा प्राण आज वांचला. तर आतां त्या दरवेश्याचा तपास करून त्याला मजकडे घेऊन या. ह्या त्याच्या अमोल मसलतीबद्दल मी त्याला मोठें बक्षीस देणार आहें.''

❑❑❑

वाय ६४७-११०५ पु.-७.२०१९

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर